UNIVERSAL
LIBRARY
OU_196173
UNIVERSAL
LIBRARY

हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमाला—पुस्तक चौथें

उद्धरेदात्मनात्मानम् ।

—गीता

# धर्मशास्त्रमंथन

लेखक व प्रकाशक

हिंदुधर्म-प्रचारक, महादेवशास्त्री दिवेकर

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

मुद्रक

विश्वनाथ गणेश जावडेकर, बी. ए. एलएल. बी.

आत्माराम छापखाना, गल्ली नं. २, घर नं. १२, धुळें

मूल्य १ रुपाया

शके १८५५ ] [ त्रिपुरी पूर्णिमा

# अनुक्रमणिका

CKED. 1951

Checked 1963


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | श्रीमंत नाईक यांचा फोटो | |
| २ | अर्पणपत्रिका | |
| ३ | लेखकाची प्रस्तावना ... ... ... ... | १ ते ५ |
| ४ | पं. पाठकशास्त्री यांचा उपोद्घात ... ... ... | ६ ते १६ |
| ५ | तज्ञांचे अभिप्राय ... ... ... ... | १७ ते १८ |
| ६ | शुद्धिपत्र ... ... ... ... ... | १९ ते २१ |


## मुख्य ग्रंथ ( पूर्वार्ध )


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ लें | प्रामाण्यविचार ... ... ... | १ ते ८ |
| २ रें | देशमर्यादा व लोकस्थिति ... ... | ८ ते १२ |
| ३ रें | कालविचार ... ... ... | १२ ते १७ |
| ४ थें | चार वर्णांचे व्यवहार ... ... ... | १७ ते ४० |
| ५ वें | जातिसंस्था व जात्युत्कर्ष ... ... | ४० ते ५६ |
| ६ वें | आश्रमविचार ... ... ... | ५६ ते ७१ |
| ७ वें | विवाहसंस्था ... ... ... | ७२ ते ८१ |
| ८ वें | स्त्रिया .. ... ... | ८२ ते ९९ |


## ( उत्तरार्ध )


| | | |
|---|---|---|
| ९ वें | व्यवसाय ... ... ... ... | १०० ते ११० |
| १० वें | स्पर्शास्पर्श ... ... ... | ११० ते १२२ |
| ११ वें | मांसाहार ... ... ... ... | १२३ ते १३३ |
| १२ वें | शाकाहार व भोज्याभोज्य ... ... | १३३ ते १४४ |
| १३ वें | धर्मतारतम्य ... ... ... | १४५ ते १६२ |
| १४ वें | धर्मतारतम्य ( पुढें चालू ) ... ... | १६२ ते १७५ |
| १५ वें | हा धर्म कसला ? ... ... ... | १७५ ते १९९ |
| १६ वें | कांहीं संकीर्ण प्रश्न व उपसंहार ... ... | १९९ ते २०८ |



श्री. धर्मवीर वामन रामचंद्र नाईक जहागिरदार
हैद्राबाद दक्षिण.

# * अर्पणपत्रिका *

धर्मवीर

**श्रीमंत वामन रामचंद्र नाईक साहेब**

जहागीरदार, संस्थान हैद्राबाद

यांचे सेवेसी

आपल्या ठिकाणीं वसणाऱ्या सौजन्य, दानशूरत्व, प्रगतिप्रियता,

शुद्धाचार, विद्याभिरुचि, धर्माविषयीं उत्कट अभिमान,

हिंदुसमाजाच्या संघटनेची तळमळ,

आणि

हैद्राबाद संस्थानांत हिंदुत्वाची जागती ज्योत

सतत तेवत ठेवण्याविषयींचे परिश्रम,

इत्यादि

अनेक सद्गुणांविषयीं

आदर व्यक्त करण्याकरितां हा ग्रंथ

आपणास

अर्पण केला आहे.

# ग्रंथकर्त्यांची प्रस्तावना

आज जो ग्रंथ आम्ही महाराष्ट्र वाचकांच्या हातीं देत आहोंत, त्याची घटना खरोखरीच अपूर्व आहे. हिंदुसमाजोद्धारक वाङ्मयमालेच्या प्रकाशनाचें कार्य गेलीं साडेतीन वर्षे जें थांबलें त्याचें कारण हें असें:–निर्बंधभंगाच्या पहिल्या लाटेच्या वेळी आम्ही वांईच्या आसपासच्या वाड्यांमध्यें सकाळीं व संध्याकाळीं थोडें झाडलोटीचें व इतर असें आमच्या सूक्ष्म प्रकृतीस न मानवणारें काम कांहीं दिवस केलें. त्यामुळें पावसाळ्यांत आमचा संग्रहणीचा विकार इतका विकोपाला गेला कीं श्रावणमासीं आम्हांला जगण्याची आशा सोडावी लागली. ईश्वरी कृपा आणि इतर कुटुंब, ग्राम, समाज, धर्म यांचे ऋणानुबंध म्हणून त्या दुखण्यांतून पुनर्जन्म होऊन आज पुनश्च थोडीतरी हालचाल करण्याची शक्ति आली आहे. संग्रहणीच्या विकारांतून यावेळी बरें करण्याला डॉ. पळसुले पुणें, व पटवर्धनबुवा वांई हेच कारणीभूत झालेले आहेत. डॉ. पळसुले यांनीं निरपेक्षपणें औषधाची मदत फारच केली, याबद्दल कृतज्ञता वाटते. या ईश्वरी जगांत सर्व कांहीं बरोबर व कार्यकारणयुक्त चाललेलें आहे. त्या दृष्टीनें प्रस्तुत लेखकाला निमित्त करून ईश्वरालाच महाराष्ट्रापुढें कांहीं विचार मांडण्याची घटना घडवावयाची आहे, असें म्हणावें लागते.

वांईहून मिरजेला केवळ प्रकृतीकरितां स्थलांतर केलें. त्यावेळीं स्थलांतराबरोबर देहांतरहि करावें लागणार, या ठाम समजुतीनें घरगुती निरवानिरव केली व वाङ्मयमालेच्या सर्व शाश्वत ग्राहकांना निर्वाणीचा प्रसंग कळवून अनृणी करण्याविषयीं विनंती केली. कांहींना त्यांच्या पत्राप्रमाणें रोख पैसे व कांहींना तितक्या किंमतीचीं पुस्तकें पाठवून, शेवटचा निरोपहि आम्हीं घेतला. अशा स्थितीनंतर पुन्हा पुस्तकरूपानें झालेलें प्रस्तुत लेखकाचें पुनर्दर्शन आमच्या सर्व शाश्वत व इतर ग्राहकांना आनंददायकच होईल. ज्या उदार गृहस्थांनीं पैसे व पुस्तकें न मागतां, जी उदार मनस्कता दाखविली तिचें सव्याज उतराई होण्याला पुनश्च योग आज येत आहे, याबद्दलहि संतोष वाटतो. मालेच्या सर्व आश्रयदात्यांना, शाश्वत व सामान्य ग्राहकांना आम्ही एवढेंच आश्वासन

देतों की, मध्यंतरी खंडित झालेलें ग्रंथप्रकाशनाचें कार्य पूर्ववत चालू राहील आणि प्रकृतीचें तंत्र संभाळून प्रतिवर्षी एक नवा ग्रंथ याप्रमाणें आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष-उत्तरार्ध, हिंदुधर्म शिक्षण-पुस्तक तिसरें ( गृहस्थाश्रम ), गीताप्रदीप, शांकरवेदांत, इत्यादि अनेक पुस्तकें प्रसिद्ध होतील. म्हणून सर्वांनी मालेशी पूर्व ऋणानुबंधानें वागावें अशी विनंति आहे.

१९२० साली ( शके १८४२ ) सिंहस्थ पर्वणीच्या निमित्तानें श्री क्षेत्र नाशिक येथे भरलेल्या सुप्रसिद्ध ' महाराष्ट्र हिंदु परिषदे ' पासून गेली १२।१३ वर्षे आम्ही धर्म व समाज आणि शिक्षण या क्षेत्रांत अल्पशी सेवा करीत आहोंत. अस्पृश्योद्धार, मंदिरप्रवेश, पोटजातींचें एकीकरण, ब्राह्मण संघटण, क्षत्रिय वैश्यांचे अस्तित्व, शुद्धि व संघटणा अशा सर्व विषयांवर महाराष्ट्रामध्यें आम्ही लेखन व भाषणद्वारां जें जागृतीचें कार्य केलें आहे त्याचें सार प्रस्तुतच्या ग्रंथांत आहे. गणितें सोडविण्याला जशी एक पद्धति ( Key ) लागते, त्याप्रमाणें सर्व धार्मिक व सामाजिक प्रश्न सोडविण्याची, हा ग्रंथ म्हणजे किल्लीच होय !

या ग्रंथाची कल्पना सोलापूर येथें १९२० साली जी प्रसिद्ध पंडित परिषद भरली, त्यावेळीं गुरुवर्य नारायणशास्त्री मराठे, पंडित पाठकशास्त्री, श्रीमंत वामनराव नाईक, यांच्या चर्चेंत सुचली. त्या कल्पनेचा विस्तार प्रा. पा. शाळेमध्यें पुढे धर्मकोशाच्या रूपानें परिणत झाला. त्याच्या ओघांत चिकित्सक व सुबुद्ध वाचकांना उपयुक्त असा या ग्रंथाची जरी कल्पना होऊन असतां तिला मूर्त स्वरूप येण्याचें मुख्य कारण म्हणजे गतवर्षी महात्मा गांधींनी हरिजनांकरितां केलेलें प्राणांतिक प्रायोपवेशन हेंच होय ! महात्माजींच्या उपोषणामुळें राष्ट्रांत खळबळ उडाली. आम्ही त्या निमित्तानें पन्हाळा व खानदेशांत प्रचंड सभांमध्यें व्याख्यानें दिलीं, खाजगी चर्चा केल्या व कित्येक दुराग्रही शास्त्रीमंडळींशीं वादहि केले. त्यावेळी महाराष्ट्रांतील सुबुद्ध शास्त्रीमंडळींच्या विचाराचें व अशा लोकांच्या मागें असलेल्या मोठ्या समाजाचें मत-परिवर्तन करावें, व सुशिक्षित वाचकांच्या विचाराला चालना द्यावी म्हणून ग्रंथ लौकर लिहावा, असें आम्हाला वाटलें. विशेषतः धुळेकर मित्रमंडळींनी त्याकरितां शंभर रुपये देण्याचें कबूल केल्यामुळें ग्रंथ लहान स्वरूपांत लौकर लिहावा, असें आम्ही ठरविलें. पण पुढें ग्रंथाचें स्वरूप वाढलें व त्याच स्वरूपांत आज हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

**ग्रंथाचें महत्त्वः**—या ग्रंथाचें महत्त्व किती आहे, व तो कसा उपयुक्त आहे, हें महामहोपाध्याय पं. पाठकशास्त्री, प्रो. पांडुरंग वामन काणे, प्रि. नानासाहेब घारपुरे इत्यादि विद्वानांच्या अभिप्रायावरून कळेलच ! वर्ण, जाति, आश्रम, व्यवसाय, विवाह, भक्ष्याभक्ष्य इत्यादि सर्व विषय फारच जिव्हाळ्याचे आहेत. तथापि पूर्वार्धांतील चार वर्णांचा व्यवहार, जातिसंस्था व जात्युत्कर्ष, हीं दोन प्रकरणें आणि उत्तरार्धांतील धर्मतारतम्य व हा धर्म कसला? हीं प्रकरणें आमच्या मतें फार महत्त्वाचीं आहेत; म्हणून वाचकांनीं हीं काळजी-पूर्वक वाचावीत. खालच्या जातीचा उत्कर्ष व वरच्या जातीचें अधःपतन हें कोणत्या क्रमानें होतें, हें आजवर कोणीहि स्पष्ट मांडलेलें नाहीं. त्याच प्रमाणें धर्मग्रंथांतील अर्थवादावर निर्भिड टीका आणि अभ्युदयाशीं धर्माचा पुरुषबुद्धीला कळण्याजोगा कसा संबंध आहे, हे विषय महाराष्ट्राला अपूर्व आहेत. या विषयावर स्पष्ट व मार्गदर्शक विवेचन या ग्रंथांत असल्यामुळें हा ग्रंथ जुन्या व नव्या अशा दोन्ही मतांच्या लोकांना मान्य होणार आहे. जुन्या समजुतीच्या लोकांना आपल्या धर्माचारामध्यें कसकसे बदल होत गेले, हें यावरून समजेल. नवमतनिष्ठांनाहि देशकालाप्रमाणें धर्म कसा बदलत असतो हें या ग्रंथावरून पद्धतशीर व सप्रमाणतया कळून येईल. सर्व स्मृतिग्रंथ एका कालीं झाले नाहींत. ते मागें पुढें झाले. त्यांत परिस्थितीप्रमाणें धार्मिक आचारा-विषयीं फेरबदल सांगितले आहेत. पूर्वकालाप्रमाणें आजहि अभ्युदय व निःश्रेयस यांना पोषक, समाज संघटणेला साधक, असे फेरबदल करणें अवश्य आहे व तसें करण्यांत अधर्म नाहीं, हेंच या ग्रंथाधारें शिकवावयाचें आहे. देशकालाप्रमाणें आचारविचार बदलतात, ही अगदीं साधी गोष्ट असली तरी ती पटविण्याकरितां असे उद्योग केलेच पाहिजेत. कारण जुने दृढ संस्कार एकदम जाणें कठीण असतें. महाराष्ट्रांत असे उद्योग वाई, धुळे व लोणावळें, येथें चालू असून त्यांचें फळहि लवकर दृष्टीस पडेल.

**आभारः**—हा ग्रंथ तयार करण्याचे कामीं अनेकांचें सहाय्य झालेलें आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें अवश्य आहे. या ग्रंथाची प्राथमिक टिपणें, सर मोरोपंत जोशी व लेडी जोशी यांच्याकडे उमरावतीस केली. श्रीमंत पण साधे, व सुधारक पण सज्जन, असें हें जोशांचें घराणें आहे. रावबहादूर ब्रह्म यांनीं

तेथें दुर्मिळ स्मृतिग्रंथांचें सहाय्य केलं. ग्रंथांतील विषय, ग्रंथाचें धोरण आणि स्मृतिकर्त्यांचे काल इत्यादि ठरविण्याचे कामीं श्री. परमहंस केवलानंद स्वामी महाराज, म. म. पं. पाठकशास्त्री, प्रो. काणे, प्रि. घारपुरे इत्यादींचें फारच सहाय्य झालें. श्रीमंत नानासाहेब घारपुरे यांनीं तर सर्व तऱ्हेचे ग्रंथ पुरविले व रॉ. ए. सोसायटीचा लाभहि मिळवून दिला. गतवर्षी प्लेगनिमित्त कऱ्हाड येथें श्रीमंत अण्णासाहेब शिराळकर यांचे घरीं एक दीड महिना वास्तव्य घडलें. तेथें त्यांचें सौजन्य व आदरातिथ्य यामुळें स्वास्थ मिळालें, म्हणून बराचसा ग्रंथ तेथेंच तयार झाला. श्री. शिराळकर यांच्या कांहीं सूचनांचाहि या ग्रंथास उपयोग झाला आहे. मिरज येथें ग्रंथांचा अभाव, विचार विनिमयास व्यासंगी मनुष्यांचा अभाव आणि प्लेगमुळें स्वास्थ्याचाहि अभाव असतांना वरील सर्व गृहस्थांच्या मदतीमुळेंच हा ग्रंथ लिहिला गेला.

ग्रंथाचें स्वरूप जसजसें मोठें होऊं लागलें, तसतशी छपाईखर्चाची विवंचना वाढूं लागली. धुळेकरांच्या शंभर रुपयाशिवाय आणखी द्रव्य पाहिजे होतें. बेळगांवचे श्री. केशवराव अजरेकर यांनी रुपये २५ दिले, ते सूत्रग्रंथ व इतर ग्रंथ खरेदी करण्यांत खर्च झाले. शेवटीं नागपूरचे आमचे ऋणानुबंधी श्रीमंत वामनराव चितळे व त्यांचे वडील श्री. वासुदेवराव चितळे यांचेकडे आम्ही धांव घेतली. श्रीमंत अप्पासाहेबांनीं एखादें खुलाशाचें पत्र व त्याचें उत्तर यांची किंचित्‌हि अपेक्षा न करतां, अत्यंत अगत्यानें एकदम ३०० रुपये पाठवून दिले. श्रीयुत चितळे यांनीं द्रव्यसहाय्य करतांना जें अगत्य दाखविलें तें अपूर्व होय.

महामहोपाध्याय पंडित पाठकशास्त्री यांनी वार्धक्यामध्यें आमच्या विनंतीस मान देऊन विद्वत्ताप्रचुर व बहुमोल असा उपोद्घात लिहिला. निबंधकारांना आपली बुद्धि न विकता, स्मृति व सूत्रें आणि मूळ वेदग्रंथ यांचें संस्कारशून्य मनानें, संशोधनपूर्वक परिशीलन विद्वानांनीं केल्यास धर्मशास्त्राला नवी व योग्य दिशा लागणार आहे, हें पं. पाठकशास्त्री बुवांचें म्हणणें वाचकांनीं विसरूं नये. प्रो. काणे व प्रि. घारपुरे यांनीं समग्र ग्रंथ काळजीपूर्वक वाचून अभिप्राय देण्याची कृपा केली. प्रो. काणे यांच्या ‘ धर्मशास्त्राचा इतिहास ’ या इंग्रजी ग्रंथाचा कालनिर्णयाचे कामीं बराच उपयोग झाला.

हैद्राबाद येथील सुप्रसिद्ध धर्मवीर व जहागीरदार श्रीमंत वामनराव साहेब नाईक यांनीं मोठ्या संकोचानें स्वतःस ग्रंथ अर्पण करण्याची परवानगी दिली; श्रीमंत नाईक यांच्या सारखे हैद्राबाद येथें थोर गृहस्थ आहेत म्हणून तेथें हिंदुत्व थोडें तरी चमकत आहे. ईश्वर करो व त्या संस्थानांत असेच पुष्कळ धर्मवीर चमकत राहोत !

या ग्रंथाचें सर्व लिखाण ( उतारे काढण्याशिवाय ) आमचे मित्र श्री. भाऊराव आपटे यांनीं मोठ्या तत्परतेनें, हौसेनें व उत्साहानें केलें. ग्रंथ छापण्याचें कामहि धुळें येथील आत्मागम प्रेसच्या व्यवस्थापकांनी बरेच व्यवस्थित केलें. तात्पर्य हा ग्रंथ छापून तयार होईपर्यंत विचारविनिमय, ग्रंथसहाय्य, द्रव्यसहाय्य, लेखन व प्रकाशन सहाय्य इत्यादि ज्यांनी ज्यांनीं केलें, त्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. प्रकृति, पैसा, प्रज्ञा या सर्वांचें दारिद्र्य असतांना वरील मंडळींच्या सहाय्यानें हा ग्रंथ तयार झाला असल्यामुळें, याच्या कर्तृत्वाचा अहंकार आमच्याकडे कांहींचाहि उरत नाहीं.

शेवटीं ज्या जगत् चालकाच्या कृपेनें पुनर्जन्म होऊन या ग्रंथाचा योग आला, त्याचे चरणीं साष्टांग प्रणिपात करून, तो जगत्चालक आम्हांकडून यापुढें अशीच धर्म व समाजसेवा अखंड घेवो, अशी प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करतों.

बलि प्रतिपदा शके १८५५<br>मिरज, ( *S. M. C.* )

हिंदुधर्मप्रचारक<br>**महादेवशास्त्री दिवेकर**

॥ श्रीशिवः शरणम् ॥

# महामहोपाध्याय पं० पाठकशास्त्री यांचा

# उपोद्घात

' धर्मशास्त्रमंथन ' या नांवाचा प्रस्तुत ग्रंथ वेदशास्त्रसंपन्न महादेवशास्त्री दिवेकर यांनीं लिहिला आहे. वैदिक धर्मानुयायांच्या धार्मिक विचारांस योग्य अशी मूळची जुनीच पण नवीन वाटणारी दिशा लावण्याचें काम ते आज बरींच वर्षे करीत असल्यामुळें अखिल महाराष्ट्राच्या ते परिचयाचे झालेले आहेत. त्यांनीं लिहिलेले ३१४ ग्रंथहि लोकांपुढें आहेत व वाचले जात आहेत त्यामुळें लोकांमध्येंहि धर्मजिज्ञासा व धर्मजागृति वाढत आहे. आपलें धर्मशास्त्र काय आहे, त्याची प्रस्तुत स्थिति कशी आहे, प्रचलित कित्येक समजुती कशा चुकीच्या व भ्रामक आहेत, समाजपुरुषाचे तुकडे पडून तो छिन्नभिन्न कसा झाला आहे व होत आहे, पोटजातींचें एकीकरण करणें कसें जरूर आहे, धर्माला सामुदायिक स्वरूप कोणत्या बाबतींत व कसें द्यावें, समाज संघटित करून इतर धर्माचे आघातास प्रत्याघात कसा करावा, अस्पृश्यतेविषयी काय धोरण असावें वगैरे अनेक विषयांची चर्चा त्यांनीं आपल्या ग्रंथांतून व लेखांतून केलेली आहे व ती करतांना जुन्या शास्त्रांतूनच देशपरिस्थितीप्रमाणें नवा मार्ग कसा काढतां येईल याचें त्यांनीं सप्रमाण विवेचन केलेलें आहे. सदरहू ग्रंथांत श्रुतिस्मृतींच्या परंपरेंतच आचारधर्म हा कसकसा बदलत आला आहे हें त्यांनीं दाखविलें आहे. एवढें खरें कीं प्रत्येकाचा शास्त्रदृष्ट्या थोडाफार मतभेद असणें साहजिक आहे व तसा तो आमचाहि आहे. परंतु आमचे व वे. दिवेकर शास्त्री यांचे धोरणाची दिशा समान आहे म्हणून सदरहू ग्रंथास आम्ही उपोद्घात लिहावा अशी विनंति त्यांनीं केल्यावरून ' चिन्तां प्रकृतसिद्ध्यर्थमुपोद्घातं प्रचक्षते ' या वचनानुरूप उपोद्घाताकरितां धर्मशास्त्राध्ययनाची परंपरा कसकशी चालत आली आहे याचें थोडक्यांत विवेचन करण्याचें योजलें आहे.

धर्मशास्त्राचें अध्ययन म्हणजे कोणत्या ग्रंथांचें अध्ययन हा प्रश्न विचारणीय आहे. आज धर्म व धर्मग्रंथ हे शब्द उच्चरल्याबरोबर अगदीं वेदांपासून तों अलीकडच्या प्राकृतांतील एखाद्या सामान्य चोपड्यापर्यंत सर्वच धर्मग्रंथ अशी लोक आपली समजूत करून घेतात. परंतु धर्मग्रंथ याचा शास्त्रांतील अर्थ इतका अतिव्याप्त नाहीं. धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथ. "धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः" हें मनुवाक्य प्रसिद्धच आहे. धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथ हा अभिप्राय पराशर-स्मृतीच्या आरंभीं असलेल्या व्यासांच्या वाक्यावरूनहि दिसून येतो. कलियुगांतील मनुष्यांचा शौचाचार आम्हास सांगा असें व्यासास ऋषींनीं विचारल्यावरून मी सर्व धर्मतत्त्व जाणणारा नाहीं तेव्हां माझ्या पित्यालाच धर्म विचारूं असें म्हणून ऋषींसह व्यास पराशराकडे गेले व 'धर्म कथय मे तात' अशी पित्याची प्रार्थना करते झाले व आपल्यास कोणते धर्म ठाऊक आहेत त्याचें परिगणन त्यांनीं केलें. त्यांत मनु, वसिष्ठ, काश्यप, गर्ग, गौतम, उशनस्, अत्रि, विष्णु, संवर्त, दक्ष, अङ्गिरस्, शातातप, हारीत, याज्ञवल्क्य, आपस्तम्ब, शंख, लिखित, कात्यायन व प्रचेतस् अशा एकोणीस ऋषींनीं सांगितलेले धर्म आपण ऐकलेले आहेत पण कृतयुगांत झालेले सर्व धर्म कलियुगांत नष्ट झाले आहेत म्हणून चातुर्वर्ण्याचे साधारण धर्म थोडेसे मला सांगा असें व्यास म्हणतात. यावरून धर्म म्हणजे स्मृतींतील धर्म व धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथ असें समजतें.

द्विजमात्रानें कशाचें अध्ययन करावें हें श्रुतीमध्यें सांगितलें आहे व नित्यकर्मामध्यें अध्ययनाचा समावेश केलेला आहे. या नित्य अध्ययनाला ब्रह्मयज्ञ असें शास्त्रीय नांव आहे. ब्रह्म म्ह. वेद व तद्विषयक यज्ञ म्हणजे वेदाध्ययन असा याचा अर्थ आहे. ब्रह्मयज्ञासाठीं कशाकशाचें अध्ययन करावें याचें विधान ब्राह्मणग्रंथ, सूत्रग्रंथ, स्मृतिग्रंथ व प्रयोगग्रंथ यांतील ब्रह्मयज्ञ विधींत सांगितलेलें आहे. या विधींचें परीक्षण केलें असतां धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथ यांच्या अध्ययनाचा इतिहास आपणास समजतो. कसा तो पाहा. शतपथ ब्राह्मणांत ब्रह्मयज्ञाच्या विधानांत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांच्या अध्ययनाचें फल सांगितल्यावर 'मध्वाहुतयो ह वा एतान्देवानां यदनुशासनानि विद्या, वाकोवाक्यमितिहासपुराणं गाथा नाराशंस्यः स य एवं विद्वान् अनुशासनानि विद्या वाकोवाक्यमितिहासपुराणं गाथा

नाराशंसीरित्यहरहः स्वाध्यायमधीते' इत्यादि वाक्याने वेदानंतर अनुशासनानि, विद्या, वाकोवाक्यं, इतिहास, पुराण, गाथा व नाराशंसी एवढ्यांचाच उल्लेख अध्ययनाचे ग्रंथ म्हणून आहे. या नामनिर्देशांत स्मृति किंवा धर्मशास्त्र यांचा निर्देश नाही. याचे कारण त्या काळी धार्मिक आचार शिष्टांच्या आचरणांत यथा-योग्य असल्यामुळे ते ग्रंथांवरून जाणण्याची आवश्यकता नव्हती म्हणूनच ते ग्रंथांत निविष्ट केलेले नव्हते. म्हणून ब्रह्मयज्ञाच्या ब्राह्मणोक्त विधानांत स्मृति-ग्रंथांचा अध्ययनाचे ग्रंथ म्हणून निर्देश नाही. यानंतर सूत्र ग्रंथांतील ब्रह्मयज्ञाच्या विधानाचा विचार करूं.

आश्वलायन सूत्रांत ब्रह्मयज्ञासंबंधी पुढील सूत्र आहे. 'अथ स्वाध्याय-मधीयीत ऋचो यजूंषि सामान्यथर्वाङ्गिरसो ब्राह्मणानि कल्पान्गाथा नाराशंसीरितिहासपुराणानि इति'। या सूत्रांत स्मृतींचा निर्देश नाही व शतपथब्राह्मणांतील वर दिलेल्या वाक्यांतील ग्रंथांचाच उल्लेख आहे व कल्प व ब्राह्मण हे शब्द ज्यास्त आहेत तात्पर्य सूत्रकाळापर्यंत स्मृतिग्रंथांचें अध्ययन नव्हते. परंतु सूत्रांवरून जे प्रयोग रचले गेले त्या प्रयोग ग्रंथांत दिलेल्या ब्रह्मयज्ञांच्या विधानांत मन्त्र-ब्राह्मणाचे बरोबर महाभारत व स्मृति यांचा उल्लेख सापडतो. आह्निकचन्द्रिका, नारायणवृत्ति व जयन्तनिबंधांत ऋग्वेद्यांनी ब्रह्म-यज्ञासाठी म्हणावयाच्या ग्रंथांच्या नामनिर्देशांत 'योगीश्वरं याज्ञवल्क्यं' असें याज्ञवल्क्य स्मृतीचें प्रतीक घेतलेले आहे, व 'नारायणं नमस्कृत्य' असें महाभारताचें प्रतीक व अथातो धर्मं व्याख्यास्यामः, अथातो धर्मजिज्ञासा व अथातो ब्रह्मजिज्ञासा अशी धर्मसूत्रें, जैमिनिसूत्रें व ब्रह्मसूत्रें यांतील पहिली सूत्रें घेतली आहेत. म्हणजे येथे केवळ वेद व वेदाङ्गे यांचे अध्ययनाबरोबर याज्ञवल्क्यस्मृति व महाभारत यांचे अध्ययन प्रचारांत आलें. श्रौतधर्म मागे पडत जाऊन स्मृतिप्रणीत धर्म चालू झाला. याज्ञवल्क्यस्मृति, महाभारत व धर्मसूत्रे यांत धर्मशास्त्राचा सर्व विषय आलेला आहे. अर्थात् त्याच्या अभ्यासाची आवश्यकता भासूं लागली. बृहस्पतिस्मृतीत तर पुढील वचन आहे:—अधीत्य चतुरो वेदान् साङ्गोपाङ्गपदक्रमान्। स्मृतिहीना न शोभन्ते चन्द्रहीनेव शर्वरी॥ या वचनांत वेदांचा अभ्यास स्मृतींच्या अभ्यासाशिवाय पुरा होत नाही व शोभत नाही असे म्हटलें आहे. मनूनेंहि

'श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः' असें म्हटलें आहे. शतपथब्राह्मणांतील इतिहासपुराणं या पदांतील इतिहास शब्दानें 'महाभारत' इतिहास असें कोणी समजूं नये. तर वाकोवाक्यं, नाराशंसी, गाथा इत्यादि शब्दांच्या साहचर्यानें इतिहासपदानें 'हरिश्चन्द्रो ह वैधस ऐक्ष्वाको राजाऽपुत्र आस' इत्यादि ब्राह्मणान्तर्गत ग्रंथाचेच इतिहासपदानें ग्रहण आहे. कारण की वाकोवाक्य व नाराशंसी हे ब्राह्मणान्तर्गत भागच म्हणून प्रसिद्ध आहेत. पुराणें ही देखील ब्राह्मणान्तर्गतच घ्यावयाची. ब्राह्मादि पुराणें त्या वेळी उत्पन्न झाली नव्हती. याला आणखी गमक याज्ञवल्क्यस्मृतीतील ब्रह्मयज्ञप्रकरणांत चार वेदांच्या अध्ययनानंतर वाकोवाक्यं पुराणं च नाराशंसीश्च गाथिकाः। इतिहासस्तथा विद्याः शक्त्याधीते हि योऽन्वहम् ॥ यात आलेला पुराणशब्द पूर्वोक्त साहचर्यानें ब्राह्मणोक्त पुराण अशाच अर्थाचा आहे. तेथेंहि ब्राह्मादि पुराण हा अर्थ करणें शक्य नाहीं. जर पुराण शब्दाचा अर्थ ब्राह्मादि पुराण याज्ञवल्क्यास इष्ट असता तर त्यानें पुराण–प्राक्तन स्मृतीचा उल्लेख केला असता, तसा तो केला नाहीं. एवंच येथें धर्मशास्त्राचें अध्ययन स्पष्ट सांगितलेलें नाही. मिताक्षराकार 'चकारान्मानवादिधर्मशास्त्रं' असें लिहितात तें चिंत्य आहे. वर शतपथब्राह्मणाचा जो उतारा दिला त्यांत धर्मशास्त्राचा उल्लेख शक्य नाही हे सांगितलेंच. ही गोष्ट विद्वन्मान्य आहे की शतपथब्राह्मण व याज्ञवल्क्य स्मृति या दोघांचे प्रणेते याज्ञवल्क्यमहर्षीच आहेत. पूर्वोक्त शतपथाचें वाक्य व येथील याज्ञवल्क्यस्मृतीचे श्लोक ताडून पाहिल्यास ब्राह्मणोक्त ग्रंथच येथें आलेले दिसतात. अर्थात् याज्ञवल्क्यस्मृतीपर्यंत धर्मशास्त्राच्या अध्ययनाचा प्रचार नव्हता. आणि आम्ही वर निर्दिष्ट केलेल्या पराशरस्मृतीच्या वाक्यांत मात्र व्यासानें स्मृतीग्रंथाचें परिशीलन केल्याचा निर्देश आहे. तसेच बृहस्पती स्मृतींतहि आहे हें वर दाखविलें. श्रुता मे मानवा धर्मा वासिष्ठाः काश्यपास्तथा ॥ १२ ॥ गार्गेया गौतमीयाश्च तथा चौशनसः स्मृताः । अत्रेर्विष्णोश्च संवर्तात् दक्षादङ्गिरसस्तथा ॥ १३ ॥ शातातपाच्च हारीताद् याज्ञवल्क्यात्तथैव च । आपस्तम्बकृताधर्माः शंखस्य लिखितस्य च ॥ १४ ॥ कात्यायनकृताश्चैव तथा प्राचेतसान्मुनेः ॥ यावरून पराशरस्मृतीच्या कालापासून धर्मशास्त्राच्या म्हणजे स्मृतींच्या अध्ययनाची परंपरा चालू झाली.

अभ्यासविषयक स्मृतिग्रंथांचें स्वरूप कसें असतें याचें थोडक्यांत निरूपण करूं. यासाठीं ब्रह्मयज्ञांत जिचें प्रतीक घेतलेलें आहे त्या याज्ञवल्क्यस्मृतीचें अवलोकन करूं. या स्मृतींचें स्वरूप त्रिविध आहे. आचार, व्यवहार व प्रायश्चित्त हें तें त्रिविध स्वरूप होय. स्मृतींचें हें त्रिविधत्व उपनिषदांच्या त्रिविधत्वाप्रमाणेंच आहे. उपनिषदांत आख्यायिका, तत्त्वज्ञान व साधनें असे तीन अंश असतात. मोठ्या म्हणजे छांदोग्य, बृहदारण्यक वगैरे उपनिषदांत तीनहि अंश आहेत व ईशावास्यादि लघु उपनिषदांत एक वा दोन अंश असतात. त्याप्रमाणें मनु, याज्ञवल्क्य व पराशर या मोठ्या स्मृतीत आचार, व्यवहार व प्रायश्चित्त हीं तीनहि कांडें आहेत व देवलादि लहानस्मृतींतून एक किंवा दोन कांडें आहेत. पैकीं पहिलें आचार काण्ड व तिसरें प्रायश्चित्त काण्ड. यांची व्यवस्था निरनिराळ्या स्मृतींत देशकालादि भेदानें निरनिराळी सांगितली आहे. याचेंच द्योतक 'देशं कालं वयो वीक्ष्य प्रायश्चित्तं प्रकल्पयेत्' हें वाक्य प्रवृत्त झालें. याची उदाहरणें या ग्रंथांत ग्रंथकारांनीं पुष्कळ दाखविलीं असल्यामुळें आम्ही येथें त्यांचा निर्देश करीत नाहीं. दुसऱ्या व्यवहार काण्डाची स्थिति अशी आहे कीं निरनिराळ्या राजांच्या वेळीं झालेल्या निरनिराळ्या स्मृत्या भिन्नभिन्न व्यवहार दाखवितात असें दिसतें. कारण मनु व याज्ञवल्क्य यांचा अष्टादशपदात्मक व्यवहार अगदीं तंतोतंत जुळत नाहीं. इतकेंच नव्हे तर याज्ञवल्क्यस्मृति व ती-वरील टीकाकार विज्ञानेश्वर यांच्या मतांतहि व्यवहारसंबंधानें फरक दिसतो म्हणूनच मिताक्षराकारानें विद्याधन वगैरे प्रसंगीं आपला अभिमत अर्थ काढण्या-करीतां मूळ श्लोकाची ओढाताण केलेली दिसते. हें तें तें प्रकरण काढून पाहिलें असतां सहज लक्षांत येईल. म्हणून आम्ही स्थलसंकोचास्तव येथें त्याचा विस्तार करीत नाहीं.

पूर्वापर स्मृतिग्रंथकारांचा आतांपर्यंत विषयनिर्देशपूर्वक परिचय सांगितला. स्मृतिकालानंतर कित्येक शतकांनी निबंधांचा काल सुरू झाला, त्यांत कांहीं मेधातिथी व विज्ञानेश्वर यांचे टीकाग्रंथ आहेत. ह्या दोन प्राचीन टीका क्रमें करून मनु व याज्ञवल्क्य या स्मृतींच्या टीका आहेत. त्यांशिवाय हेमाद्रिकृत चतुर्वर्गचिंतामणि, कालमाधव, निर्णयाब्धि, कौस्तुभ वगैरे ग्रंथ आहेत. या निबंध व टीकाग्रंथांकडे पाहिलें असतां असा एक विशेष आढळून येतो कीं,

स्मृतिग्रंथांस अपरिचित असलेली एकवाक्यता ( निरनिराळ्या वचनांची एकार्थाकडे सहज अथवा आयासपूर्वक प्रवृत्ति करणें ) यांत पदोपदीं दिसते. याचें विवरण करूं. मनु, याज्ञवल्क्य, पराशर वगैरे स्मृतींतून पूर्वस्मृतींचीं वचनें व उत्तर स्मृतींचीं वचनें भिन्नभिन्न असलीं तर केचित् , अन्ये, अपरे, आचार्याः वगैरे शब्दांनीं पूर्व ग्रंथकाराचा निर्देश असतो व स्वतःचें मत वेगळें सांगितलेलें असतें. परंतु कशीतरी गोळा बेरीज करण्याकरितां एकवाक्यता केलेली नसते. यास उदाहरणें, याज्ञवल्क्य स्मृति. 'यदुच्यते द्विजातीनां शूद्राद्दारोपसंग्रहः। नैतन्मम मतं यस्मात् तत्रायं जायते स्वयम्॥ या. स्मृ. अ. १. अशा तऱ्हेचीं निरनिराळ्या स्मृतींत पुष्कळ आढळतात. कांहीं स्मृतींत तर इति मनुः, इति विष्णुः अशा तऱ्हेचीं निरनिराळ्या स्मृतिकारांचीं नांवें घेऊन स्वतःचा मतभेद दाखविला आहे. याच्या उलट, सर्व निबंधांत पूर्व मीमांसेचीं अधिकरणें व अभिमत सिद्धीकरितां प्रमाण घेऊन निरनिराळ्या स्मृतिवाक्यांची कशी तरी एकवाक्यता ( एकार्थप्रतिपादकत्व ) दाखविली आहे.

मीमांसेचा उपयोग धर्मशास्त्रांतील एकवाक्यता सिद्ध करण्याकडे करणें यासंबंधीं थोडासा विचार करणें क्रमप्राप्त आहे. कुमारीलभट्टांच्या श्लोकवार्तिकांतील पुढील उताऱ्यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं श्रुतीच्या अर्थाचा संदेहनिराकरणाकरतां पूर्व मीमांसासूत्रांची प्रवृत्ति आहे. स्मृतींचा अर्थ कसा लावावा हें सांगण्याकरितां मीमांसासूत्रें प्रवृत्त झालीं असें दाखविणारें एकहि अधिकरण सहस्राधिकरणक पूर्वमीमांसेमध्यें नाहीं. स्मृति श्रुतीच्या अविरोधस्थलीं प्रमाण मानावी याबद्दल अधिकरण आहे यांत संशय नाहीं, परंतु आपला प्रसंग स्मृतीचा अर्थ कसा लावावा, असा आहे, आणि तो अशा अशा तऱ्हेनें लावावा असें सांगणारें कोणतेंच अधिकरण नाहीं हें आमचें प्रतिपादन आहे.

स्थिते वेदप्रमाणत्वे पुनर्वाक्यार्थनिर्णये। मतिर्बहुविदां पुंसां संशयाद्योपजायते॥ १२७॥ केचिदाहुरसावर्थः केचिन्नासावयं त्विति। तन्निर्णयार्थमप्येतत् परं शास्त्रं प्रणीयते॥ १२८॥ हे कुमारील भट्टाचे श्लोक वरील अर्थाला प्रमाण आहेत; अर्थाच्या संशयाच्या निराकरणाकरितां पूर्वमीमांसा आहे. दोन चार श्रुतींचा एकच अर्थ करणें याकरितां पूर्वमीमांसा ही नाहीं. उदाहरणार्थ 'अक्ताः शर्करा उपदधाति' या वाक्यांत 'केन अक्ताः घृतेन तैलेन वा'

इत्यादि संशयाच्या निराकरणार्थ अन्य श्रुतिवाक्य आणून ' घृतेनैव अक्ताः ' असा निःसंशय अर्थ अन्य श्रुतीच्या साहाय्यानें करण्यास पूर्वमीमांसा उपयोगी पडते. म्हणजे बऱ्याच श्रुतींचा एकच अर्थ एतद्रूपी एकवाक्यता श्रुतिविषयांतहि मीमांसेला मान्य नाहीं. मग धर्मशास्त्र विषयांत तर असणेंच संभवत नाहीं. कारण तिची स्मृतीकरितां प्रवृत्तीच नाहीं. उत्तर मीमांसेंत मात्र ' अथातो ब्रह्म जिज्ञासा, ' ' जन्माद्यस्य यतः, ' ' शास्त्रयोनित्वात् ' ' तत्तु समन्वयात् ' यापैकीं चवथ्या सूत्रात सूत्रकार बादरायणांनीं ब्रह्मरूप अर्थामध्यें सर्व श्रुतींचा समन्वय होतो व तसा तो केला पाहिजे म्हणून सांगितलें आहे, कारण ब्रह्मातिरिक्त आकाशादि सर्व पदार्थ ब्रह्मावर अध्यस्त असल्यामुळें व अध्यस्ताचें वर्णन अधिष्ठानाचेंच बोधक असल्यामुळें ' आकाशो वै नाम नामरूपयोर्निर्वहिता ' इत्यादि श्रुत्या आकाशादि भूतांचें वर्णन करणाऱ्या नसून अधिष्ठानभूत ब्रह्माचेंच वर्णन करणाऱ्या आहेत, एवंच जेथें एकच देशकालानवच्छिन्न वस्तु प्रतिपादन करावयाची असते तेथे एकवाक्यता स्वरसतेनें संभवते, म्हणून करावी व तशी सूत्रकार बादरायणांनीं आज्ञा केली. धर्मशास्त्राचे आचार प्रायश्चित्तादि विषय भिन्न भिन्न देशकालावलम्बि असल्यामुळें त्यांची एकवाक्यता संभवत नाहीं, प्रत्युत वैरस्योत्पादकहि होतें. हें बऱ्याच एकवाक्यतेच्या उदाहरणावरून ध्यानांत येईल. आतां असा एक विचार करूं कीं, महानिबंधकारांच्या गौरवार्थ त्यांनीं आचरिलेला एकवाक्यतेचा मार्ग आपणहि स्वीकारावा परंतु ती गोष्ट कशी अशक्य आहे हें पुढील विवरणावरून ध्यानांत येईल. स्मृतींची एकवाक्यता करावयाची म्हटल्यास किती स्मृतींची त्या विषयापुरती एकवाक्यता करावी ? सर्वच स्मृतींची एकवाक्यता करावी असा पक्ष अंगिकारिल्यास सर्व स्मृति एका कालीं आठवणें निबंधकारास शक्य आहे काय ? जेवढ्या स्मृत्या ठाऊक आहेत तेवढ्यांचीच एकवाक्यता करावी असा पक्ष घेतल्यास तेंहि युक्तिरहितच आहे, कारण एकावेळीं आठवलेल्या स्मृत्या त्याच निबंधकारपंडितास दुसऱ्या वेळीं आठवतीलच असा नियम नाहीं, कारण मानुषी बुद्धि अल्प व अनिश्चित आहे म्हणूनच निरनिराळ्या हेमाद्रि व माधव त्यासारख्या निबंधांत परस्पर विरुद्ध सिद्धांत काढलेले आढळून येतात. ही अडचण आम्हांला आतांच आली असें नसून पांचशें वर्षांपूर्वीचे महामान्य ग्रंथकार माधवाचार्य, पराशरस्मृतीच्या

ग्याख्येच्या आरंभीं पुढील श्लोक लिहितात ह्यावरून त्यांना याच अडचणी आल्या असें स्पष्ट त्यांनीं श्लोकांत लिहून ठेविलें आहे व देशभेद, कालभेद, पुरुषभेद, यांनीं शास्त्रार्थ निरनिराळा होतो म्हणून, अर्थवादांश टाकून केवळ विधी वाक्यालाच महत्व द्यावें वगैरे लिहिलें आहे.

स्मृत्यन्तरानुसारेण विषयस्य व्यवस्थितिः । कल्पनीयेति चेद् ब्रूहि सर्वज्ञ-मन्य साधकम् ॥ यावत्यः स्मृतयस्तासां सर्वासामनुसारतः । साकल्याच्चेदस्मदादेस्तत्र शक्तिर्न विद्यते ॥ स्वेन दृष्टास्तु यावत्यस्तासा-मित्यप्ययुक्तिमत् । क्वचित्कदाचिदन्यासां दर्शनाद्व्यवस्थितेः ॥ आलिका मानुषी बुद्धिः सा च न व्यवतिष्ठते । अत एव निबन्धेषु दृश्यते नैकवाक्यता ॥ हन्तैवं खण्डने शास्त्रं भवेद्दत्तजलाञ्जलि । न खण्डये वारये तु पण्डितं-मन्यतां तव ॥ शृणु निर्णयमत्र त्वं स्वतः प्रामाण्यवादिनः । प्रतीतेऽर्थेऽखिलं शास्त्रं प्रमाणं बाधया विना ॥ मध्यें कांही श्लोकांनंतर-देशभेदात्कालभेदात् पुंभेदादन्यथाऽन्यथा । विपर्यस्यति शास्त्रार्थं इति पूर्वमवादिषम् ॥ अतोऽ पास्यार्थ-वादांशं विधिवाक्येषु यद्यथा । प्रतीतं तत्तथा ग्राह्यं बाधं वाचनिकं विना ॥ स्मृतिव्याख्यातृभिः सर्वैर्वचनानां व्यवस्थितिम् । ब्रुवाणैर्मन्द-मतयो व्युत्पाद्यन्ते हि केवलम् ॥ वरील श्लोकांत माधवाचार्यांनीं एक-वाक्यता किती दुष्कर आहे, याचा उहापोह केला व असा सिद्धांत सांगितला की एकवाक्यता करणें जरी फार युक्तियुक्त नाहीं, तथापि व्याख्याकारांनीं मंदबुद्धि लोकांना व्युत्पत्ति व्हावी म्हणजे निरनिराळ्या वचनांचा अर्थ स्पष्ट कळावा ह्याच हेतूनें एकवाक्यतारूपी व्यवस्थेचा आश्रय केला आहे. वर दिलेल्या श्लोकांपैकीं शेवटच्या श्लोकांत ' मंदमतयो व्युत्पाद्यन्ते हि केवलम् ' या पदसमुच्चयानें माधवाचार्यांनीं असें द्योतित केलें कीं जे देशकालादिक समजून धर्मशास्त्राचा म्हणजे स्मृतींचा अर्थ लावतील त्यांना एकवाक्यतेची जरूर नाहीं. तात्पर्य असें कीं निबंधकारांनीं दिलेली व्यवस्था, ही केवळ विचार करण्याची दिशा दाखविणारी आहे. ह्यापेक्षां त्यास अधिक महत्व नाहीं. केवळ स्मृतींना ज्याप्रमाणें विधायकस्वरूपी प्रामाण्य आहे तसें निबंध-कारांना नाहीं. कारण कीं स्मृतींचें प्रामाण्य वेदांप्रमाणें प्रभुवत् ' उपदेशविधया ' आहे व निबंधांचें प्रामाण्य ' विचारविधया ' आहे, याचा इत्यर्थ असा कीं

स्मृतिविहित आचारादि धर्मांचें अनुष्ठान न केल्यास पातित्य येईल. परंतु निबंध हे विद्वानांचे ग्रंथ असल्यामुळें त्यांनीं सांगितलेल्या दिशेनें योग्य असल्यास आपणहि विचार करावा. त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे असें बंधन नाहीं व हल्लींहि स्मृति व निबंध ह्यांची योग्यता अशीच समजतात. या सर्व सविस्तर प्रतिपादनाचा भावार्थ असा कीं, बृहस्पति स्मृतींत सांगितल्याप्रमाणें स्मृतींचें मूलतः अध्ययन करावें. अलीकडे ही परंपरा लुप्त झालेली दिसते. बहुतेक लोक निबंधाचा आश्रय करितात व निबंधोक्त प्रमाणें घेऊन तीं मूळ स्मृतीशीं ताडून न पाहतांच व्यवस्था-पत्रें लिहितात व त्यांत ‘ तथा च गार्ग्यः ’ प्रभृति निबंधावर विसंबून वाक्यें लिहितात. निबंधकारांनीं मूळांतून वचनें घेतलेलीं नसतात तर पूर्वीच्या निबंधांकडे पाहून उतारे केलेले असतात. ही गोष्ट ‘ पृथ्वीचंद्रोदये व्यासः ’ ‘ मदनपारिजाते स्कांदे ’ वगैरे निर्णयसिंधु प्रभृति निबंधांतील वचनांवरून सिद्ध होते, म्हणजे पृथ्वीचंद्रोदय ह्या ग्रंथांत व्यासांनीं असें म्हटलें आहे व मदनपारिजात या निबंधांत स्कंदपुराणांतील असें वाक्य आहे, ह्याचा इत्यर्थ असा निघतो कीं निर्णयसिंधुकारांनीं वरील गार्ग्य वाक्य, अगर स्कंद पुराणांतील वाक्य स्वतः पाहून लिहिलेलें नाहीं. तसें असतें तर ‘ पृथ्वीचंद्रोदये ’ व ‘ मदनपारिजाते ’ असे हवाले दिले नसते. खरें पाहिलें असतां पृथ्वीचंद्रोदय वगैरेवर सर्वदा ह्या निबंधकारांचा भरंवसा नसतो व म्हणूनच अन्य निबंधांचें खंडण करीत असतां ‘ तदुध्दृत वचनानां निर्मूलत्वात् ’ इत्यादि निर्देश आले आहेत, म्हणजे निरनिराळ्या निबंधकारांनीं उद्धृत केलेलीं वचनें निर्मूल आहेत म्हणजे मूळग्रंथांत आढळत नाहींत, अशीं हीं वाक्यें निबंधकार पुष्कळ वेळां उच्चारतात. या सर्वांचा निर्गलित अर्थ इतकाच कीं प्रत्यक्ष स्मृतींचें अध्ययन करावें व तसें तें पूर्वीं होतहि असे. परंतु अलीकडच्या विद्वानांनीं निबंधांच्या पठनावर इतका भर दिला कीं निबंधगृहीत जें स्मृतिवाक्य असेल तेंच मान्य, अन्य अमान्य असें म्हणण्यापर्यंत अलीकडच्या विद्वानांना पाळी आली. ह्या विचारसरणीप्रमाणें मनुस्मृतीचा पहिला अध्याय ज्यांत जगदुत्पत्तीचें वर्णन आहे त्याचा निर्देश कोणत्याहि निबंधांत केला नसल्यानें त्याला अप्रमाण म्हणावें लागेल. हा सर्व अनर्थ केवळ स्मृतींचें अध्ययन न केल्यानें व निबंधावर विशेष भर दिल्यानें झाला हें आतां कोणाचेहि

लक्षांत येईल. वर निर्दिष्ट केलेल्या निबंधांपैकीं चतुर्वर्गचिंतामणींत पुराणांचा बराच उद्धार केलेला आहे, मिताक्षरेंत नाहीं. या पुराणाच्या उद्धारामुळें व्रतें वैकल्यें हें एक धर्मशास्त्राचें अंगच होऊन बसलें व उपांगललिता एकादशी वगैरे व्रतांचा निर्णय हा धर्मशास्त्रांतर्गत भाग समजला जाऊं लागला. मनु, याज्ञवल्क्य, पराशर इत्यादि स्मृतींत पूर्वोक्त व्रतांचें नांवहि नाहीं. या चतुर्वर्गचिंतामणीच्या आश्रयामुळेंच निर्णयसिंधु, धर्मसिंधु, पुरुषार्थचिंतामणि, वगैरे ग्रंथांत व्रतवैकल्याचे शास्त्रार्थ प्रामुख्यानें आले. पौराणिक धर्म वैदिक धर्माचा बाध करतो हें आदित्य-पुराणांतील कलिवर्ज्य प्रकरणावरून स्पष्ट होतें. अग्निहोत्र, गवालंभ, संन्यास वगैरे वेदोक्त विधि पौराणिक निषेधानें कसे बाधित होतात, म्हणजे पुराण वेदाचें बाधक कसें झालें हें पूर्व मीमांसकांस कोडेंच पडेल. अस्तु.

वरील विवेचनावरून असेंहि लक्षांत येईल कीं निबंध ग्रंथांचेंच केवळ अध्ययन केलें असतां स्मार्तधर्म समुचित अगर स्मार्तधर्मविरुद्ध पौराण धर्माचें परिशीलन होईल अर्थात् प्रयोगकारानें सांगितलेलें जें स्मृतींचें अध्ययन तें दूर गेलें, करितां धर्मशास्त्राध्ययन करणारानें निबंधांकडे दुर्लक्ष करून केवल स्मृतिग्रंथांचें अध्ययन केलें पाहिजे व तसें केल्यावर पूर्वोक्त माधवाचार्य वचनाप्रमाणें अर्थ लावण्याचें धोरण समजण्याकरितां निबंधांचें परिशीलन करावें. ही झाली दोनशें वर्षांपूर्वींपर्यंतची स्थिति. अलीकडच्या काळाकडे नजर दिल्यास असें उपलब्ध होतें कीं, फारच थोडे अपवाद वगळून बहुतेक शास्त्री न्याय व्याकरणांत पंडित असतात, म्हणजे त्यांचें पूर्व व उत्तर वय न्याय व्याकरणाचें अध्ययन अध्यापनांतच विलीन होतें. धर्मशास्त्राचें सांगोपांग अध्ययन अध्यापन करण्यास त्यांस निरनिराळ्या कारणांनीं वेळ मिळत नाहीं. एखादा धर्मशास्त्राचा प्रश्न सोडविण्याचा प्रसंग आल्यास ते प्रचलित कोणता तरी निबंध घेऊन त्यावरून आपलें उत्तर तयार करितात. सामान्य प्रसंगीं या योगें कार्यसिद्धि होते, परंतु सार्वजनिक महाप्रश्नांच्या ऊहापोहाला ही त्यांची तयारी अपुरी पडते, तरीहि आपल्या बुद्धीचा व विद्वत्तेचा पूर्ण उपयोग करून ते धर्मशास्त्राचें परिशीलन करीत नाहींत तर अशा वेळीं सामान्यतः अज्ञ लोकांत जी रूढि चालू आहे तिच्या धोरणावर पूर्वोक्त प्रश्नाचे वेळीं उत्तर देतात. या शास्त्रीलोकांची धर्मशास्त्रांत किती गति आहे हें माहीत नसल्यानें सामान्य जनता हें शास्त्रोक्त उत्तर आहे असें समजते,

व तिची दिशाभूल होते व आलेला सार्वजनिक प्रश्न कठीण होऊन बसतो. हा सर्व अनर्थ टळावा म्हणून आमची सर्व शास्त्री लोकांस नम्र विनंती आहे कीं त्यांनीं इतर शास्त्राच्या अध्ययनाप्रमाणेंच धर्मशास्त्राचें अर्थात् उपलब्ध सर्व स्मृत्यांचें व उपोद्बलक म्हणून महाभारतांतील शांतिपर्व, अनुशासनपर्व इत्यादि प्रकरणांचें सांगोपांग अध्ययन व अध्यापन चालू ठेवावें, त्यायोगें कोणताहि सार्वजनिक आपत्तीचा प्रश्न धर्मशास्त्रानुकूल सोडविला जाऊन समाजास शास्त्री लोकांची मदत होईल; कारण न्याय व्याकरणद्वारा समाजाला शास्त्री लोक जितके उपयोगी पडतील त्यापेक्षां कितीतरी पटीनें धर्मशास्त्रद्वाराच ते समाजाच्या अधिक उपयोगी पडतील. अशा तऱ्हेनें सर्व स्मृतींचें अध्ययन करण्याची पराशर, बृहस्पति वगैरे स्मृतिकार व निरनिराळ्या शाखेचे ब्रह्मयज्ञ प्रयोगग्रंथकार यांच्या वेळीं असलेली स्मृतींची अध्ययन पद्धति चालू करण्याची सद्बुद्धि श्रीशंकर हल्लींच्या विद्वानांस देवो अशी त्याचे चरणीं प्रार्थना करून व ब्रह्मश्री महादेव शास्त्री दिवेकर यांनीं असा श्रुतिपरिशीलनात्मक व स्मृतींचा विचार कसा करावा हें धोरण दाखविणारा ग्रंथ लिहून जनताजनार्दनाची जी सेवा केली त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन हा अल्पसा उपोद्घात पुरा करतों.

| | |
|---|---|
| विजयादशमी शके १८५५<br>वास्तव्य—धूलीपत्तनम् | विद्वद्वसंवदः<br>पाठकोपनामा श्रीधर शर्मा |



# तज्ज्ञ काय म्हणतात तें पाहा

## ( १ ) प्रो. पांडुरंग वामन काणे-मुंबई ( ता. ३१।८।३३ )

वेदशास्त्रसंपन्न रा. दिवेकर शास्त्री यांचा ‘ धर्मशास्त्रमंथन ’ ह्या ग्रंथाचीं कांहीं पानें व कांहीं हस्तलिखितें मीं वाचून पाहिलीं. शास्त्रीबोवांचीं मतें व विचारसरणी इतर बऱ्याच शास्त्री लोकांच्या मतांहून भिन्न आहेत, हें सर्व-विश्रुतच आहे. या ग्रंथांतील प्रत्येक प्रकरणांत शास्त्रीबोवांचा व्यासंग, स्वतंत्र विचारशक्ति व निर्भीडपणा जागोजाग दिसून येतो. सनातनधर्माचे अभिमानी म्हणविणारांपुढें त्यांनीं अफाट स्मृति-निबन्धरूपी सागराचें मंथन करून अमृत ठेविलें आहे.

ग्रंथांतील प्रामाण्य-विचार, चार वर्णांचे व्यवहार, जातिसंस्था व जात्युत्कर्ष, व्यवसाय, हा धर्म कसला, इत्यादि प्रकरणें वाचनीय झालीं आहेत. जागोजाग शास्त्रीबोवांनीं प्रमाण ग्रंथांतून मोठमोठे उतारे दिल्यामुळें एकंदर विवेचन सप्रमाण झालें आहे. धर्मशास्त्राचीं पुस्तकें वाचकांजवळ असतातच असें नाहीं. तेव्हां उतारे विस्तृत दिल्यामुळें मध्यम स्थितींतील वाचकांची चांगलीच सोय झाली आहे. देशकाल परिस्थिति पाहून धर्मविचारांत व आचारांत प्राचीन ऋषींनीं वेळोवेळीं परिवर्तन केलें व आजहि तें करणें आवश्यक आहे, असें सर्व सनातनीय म्हणविणारांस पटविणें, हा शास्त्रीबोवांच्या ग्रंथाचा मुख्य हेतु आहे; तो या ग्रंथाचें वाचनानें उत्तम सिद्धीस जाईल असें मला वाटतें. रूढ झालेल्या कल्पना एकदम सोडून देणें कोणासहि कठीण वाटतें. परंतु शास्त्रीबोवांनीं केलेल्या विवेचनानें विचारांची तरी खळबळ उडेल, यांत शंका नाहीं.

अशा प्रकारचें, प्रगमनशील विचारांनीं भरलेलें पुस्तक लिहून शास्त्रीबोवांनी मराठी भाषेंतील धार्मिक वाङ्मयांत चांगलीच भर टाकली आहे व धर्माची पुनर्घटना कोणत्या बाजूनें केली पाहिजे याचाहि उत्तम विचार केला आहे, याबद्दल शास्त्रीबोवांचें अभिनंदन केलें पाहिजे. त्यांच्या श्रमाचें सर्व धर्माभिमानी चीज करतील अशी आशा आहे.

**( २ ) श्री. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, प्रिन्सिपॉल, लॉ–कॉलेज, पुणें**

**( ता. ३१।८।३३ )**

' धर्मशास्त्रमंथन ' या नांवाचा ग्रंथ श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनीं लिहिलेला आहे. त्याचीं हस्तलिखितें व मुद्रितें पाहाण्यास मिळालीं.

श्रुतिर्विभिन्नाः स्मृतयश्च भिन्नाः । नैको मुनिर्यस्य मतं प्रमाणम् ॥
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां । × × × × × × ॥

ही प्राचीन काळची तक्रार सद्यःकालींतहि तितक्याच नाहीं तरी बऱ्याच अंशांनी कायम आहे, कारण धर्मशास्त्रग्रंथांचा महोदधी जरी अभ्यासकांना प्राप्त असला, तरी साधारण वाचकांची अथवा जिज्ञासूंची स्थिति पूर्वीप्रमाणें आजहि आहेच ! हेमाद्रींचा ' चतुर्वर्ग चिंतामणी ' किंवा मित्रमिश्रांचा ' वीरमित्रोदय ' या व अशा प्रकारच्या निबंध ग्रंथांचा सामान्य जनांना फायदा होण्याचा संभव कमी. अशा परिस्थितींत शास्त्रीबुवांचे धर्मशास्त्रमंथनाचा फार उपयोग व्हावा असें वाटतें. प्रस्तुत ग्रंथांत ग्रंथकर्त्यानें केवळ आपलेच सिद्धांत दिलेले नसून डोळस व विवेचक वाचकांपुढें मूळ ग्रंथवचनें व तींहि ग्रंथकारांच्या कालानुक्रमानें ठेवून, त्यांचें विहंगमदृष्ट्या समालोचन करून काल, परिस्थिति व आकांक्षा यांच्या प्रेरणेनें धर्मवचनांच्या बंधनाबंधनत्वांतहि कशीं अंतरें होत गेलीं हें विशद केलें आहे. × × × × पुस्तक वाचनीय व संग्राह्य आहे.



# शुध्दिपत्र

ग्रंथकर्त्याचें प्रकृतिदौर्बल्य, शुद्ध प्रत करणाऱ्यांचा अभाव, मुद्रणयंत्राचें दूरत्व व प्रुफें तपासण्यास अपुरा वेळ यामुळें ग्रंथांत भलत्या ठिकाणीं पदच्छेद व भलत्या ठिकाणीं संयोग असलीं अशुद्धें फारच राहिलीं आहेत. तज्ञ वाचकांच्या तीं ध्यानीं येतील. येथें कांहीं महत्वाचीं अशुद्धें शुद्ध करून दिलीं आहेत. वाचकांनीं अगोदर शुद्धिपत्र पाहून ग्रंथ शुद्ध करावा व वाचावा.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ९ | स्वास्थ | स्वास्थ्य |
| २ | १२ | धर्मशास्त्रन्तु | धर्मशास्त्रं तु |
| ३ | २४ | धर्मशास्त्र प्रयोजक | धर्मशास्त्रप्रयोजक |
| ४ | १४ | कर्तव्य ... ... | हा शब्द सर्वत्र ‘ कर्त्तव्य ’ समजावा |
| ४ | २३ | स्मृतिशीलेच | स्मृतिशीले च |
| ५ | १२ | म्हणणेंस युक्तिक | म्हणणें सयुक्तिक |
| ७ | ८ | वसिष्ट | वसिष्ठ |
| ८ | ३ | अर्वाचीनीकरण | अर्वाचिनीकरण |
| १२ | ४ | सायंप्रातः | सायं प्रातः |
| १३ | ९ | कृतयुगेधर्मा | कृतयुगे धर्मा |
| १४ | ९ | धर्मप्रमाण | धर्म प्रमाण |
| २२ | ९ | मसृजत्त्रिष्टुभा | मसृजत् त्रिष्टुभा |
| २२ | १९ | वैशस्य | वैश्यस्य |
| २२ | २५ | शूदेषु | शूद्रेषु |
| २४ | ४ | शूद्रानें | शूद्रानें |
| २४ | १४ | वेदऋचीची | वेदऋचेची |
| २८ | २१ | हिते | हि ते |
| ३३ | २ | जेष्ठ या | जेष्ठया |
| ३३ | २३ | मानस्तापेन | मनस्तापेन |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५० | २२ | जात्युकर्ष | जात्युत्कर्ष |
| ५५ | १८ | दिक्रीशकलाणी | दिक्री शकलाणी |
| ५९ | २३ | तपसाशरीरं | तपसा शरीरं |
| ६४ | २ | न्यत्येतिपंच | न्यत्येति पंच |
| ६५ | १९ | तथा | तया |
| ६५ | २७ | वाप्रासा | वा प्रासा |
| ७२ | २५ | पांच | तीन |
| ७३ | २५ | दानंक्रयधर्मश्च | दानं क्रयधर्मश्च |
| ७४ | १४ | पांच | तीन |
| ७५ | १८ | दायादाबान्धवाश्च | दायादा बान्धवाश्च |
| ७५ | २० | स्वयं दत्तश्च | स्वयंदत्तश्च |
| ७५ | २३ | ' हे गोताचे भागीदार होतात ' याबद्दल ' बारांहि पुत्रांना गोत्रत्व येतें, तरी पहिले सहच रिक्थादिकारी असतात ' असें वाचावें. | |
| ७६ | ४ | विधवेनें | पुनर्भूनें |
| ७७ | ३–४ | विधवेनें अविवाहानें | पुनर्भूनें |
| | | पुनर्भू शद्बाचा अर्थ प्रकरण १६ पान २०० या ठिकाणीं पाहावा. | |
| ८२ | २१ | स्त्रीस्वातन्त्र्यं | स्त्री स्वातन्त्र्यं |
| ८३ | ११ | साचेदक्षतयोनिः | सा चेदक्षतयोनिः |
| ८४ | २० | साकन्या | सा कन्या |
| ९३ | २७ | धर्मसूत्रांत | गृह्यसूत्रांत |
| ९८ | २७ | ब्राह्मणीवन्हि | ब्राह्मणी वन्हि |
| ९८ | २८ | ब्राह्मणीचेत् | ब्राह्मणी चेत् |
| १०१ | ६ | वैशिष्ठय | वैशिष्ट्य |
| १०३ | ८ | कर्षीस्यात् | कर्षी स्यात् |
| १०३ | ९ | न्हाहारी | न्याहारी |
| १०८ | ३ | वैश्य जीविका | वैश्यजीविका |
| १०८ | १७ | उध्हरय | उध्हृत्य |

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १०९ | ५ | यादि | यादी |
| ११० | मथळा | पूर्वार्ध | उत्तरार्ध |
| ११० | २० | श्रृति | श्रुति |
| १११ | १६ | वैश्वदेवो | वैश्वदेवे |
| ११२ | २० | शेषाद | शेषाद् |
| ११५ | १२ | संवर्त्त | संवर्त |
| १२३ | ७ | प्राणि | प्राणी |
| १२६ | २३ | नवैवतु | नवैव तु |
| १३० | २७ | बलिष्ठ | बलिष्ठं |
| १३७ | १७ | यच्छात्रेषु | यच्छास्त्रेषु |
| १४४ | ८ | शास्र | शास्त्र |
| १५१ | २६ | सर्वेधनापहारे | सर्वधनापहारे |
| १५३ | २७ | अशाना | अशांना |
| १५५ | १६ | तंद्रुह्येत | तं द्रुह्येत |
| १६१ | १८ | त्वचेपासून | त्वचेपासून |
| १६८ | १४ | विहाहोत्स्व वयज्ञेषु | विवाहोत्सवयज्ञेषु |
| १६९ | २४ | संक्रातिपर्यंत | संक्रातीपर्यंत |
| १७१ | १२ | मृज्जलभ्यां | मृज्जलाभ्यां |
| १७१ | १५ | यद्ददाति | यद्दाति |
| १७६ | ८ | ठांसून | ठासून |
| १९२ | १७ | सुखरूप | सुस्वरूप |
| २०४ | १६ | ननामनियममेनैव | ननाम नियमनैव |

# धर्मशास्त्र-मंथन

## प्रकरण पहिलें

### प्रामाण्य-विचार

आज या विसाव्या शतकांत हिंदु-समाजाची पुनर्घटना करण्याचा काल आलेला आहे. जगामध्यें विद्यमान् असलेल्या समाजांत हिंदु-समाज हा अत्यंत प्राचीन समाज आहे. या समाजानें आजवर अनेक क्रांत्या पाहिलेल्या आहेत. या समाजाची पूर्वापार चालत आलेली रचना विस्कळित झालेली आहे व तसें होणें अपरिहार्य आहे. हा समाज भिन्न भिन्न मानव वंश मिळून बनला आहे व यामध्यें भिन्नभिन्न संस्कृति मिसळलेल्या आहेत. आज या समाजाचा जगाशीं संबंध आलेला असून जागतिक स्पर्धा-क्षेत्रांत हा समाज कसा टिकेल हा आपणापुढें प्रश्न आहे.

हिंदु-समाजांत आज स्वास्थ्य नाहीं. राजकीय असंतोष, आर्थिक ऱ्हास, दारिद्र्य आणि अज्ञान आपत्ति दत्त म्हणून उभ्या आहेत. हिंदु-समाजांत कुठें तरी व कांहीं तरी बिघडलें आहे हें खास! कुठें बालविधवांचे अश्रु अंतःकरणाला पीळ पाडतात, तर कुठें स्त्रियांवरील जुलूम अंगावर रोमांच उभे करतो! कोठें अस्पृश्यांची हीन दीन स्थिति अनुकंपा उत्पन्न करते, तर कोठें जातिजातींतील उच्चनीच कल्पना अगदीं भंडावून सोडतात! कोठें सुशिक्षितांची बेकारी, एखाद्या राक्षसीसारखी 'आ' म्हणून उभी राहिलेली दिसते, तर कुठें साक्षरतेची भूक प्रखर झालेली आढळते! जगांतील विचारांचे प्रवाह हिंदुस्थान देशांत सोसाट्यानें वाहूं लागल्यामुळें या समाजांतील खालच्या लोकांमध्येंहि महत्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे. चांभार, लोहार व शेतकरी या वर्गांतून इतर देशांत जर एखादा मुसोलिनी, एखादा लेनीन आणि एखादा स्टॅन्ले मार्क उत्पन्न होतो, तर हिंदु-समाजांतूनहि तसे कां न उत्पन्न व्हावेत? मोठें होण्याचा मक्ता हा कांहीं विशिष्ट जातींनाच दिलेला नाहीं! जन्मजात उच्चनीचता व

जन्मसिद्ध अस्पृश्यता ही येथेंच कां असावी ? अस्पृश्यतेचे आणि जन्माचे प्रतिबंध येथेंच कां असावेत ? प्रत्येक मनुष्याला त्याच्या अंगीं असलेल्या नैसर्गिक सर्व शक्तींचा विकास कां न करतां यावा ? अशा प्रकारच्या विचारांचें काहूर हिंदु-समाजांत उत्पन्न झालेलें आहे, हें कांहीं खोटें नव्हे. अस्पृश्यांमध्यें, स्त्रियांमध्यें व हिंदु-समाजांतील खालच्या थरामध्यें एक तऱ्हेचा जिवंतपणा दिसत असून, हा जिवंतपणा हिंदु-समाजाची पुनर्घटना करणार यांत मुळींच शंका नाहीं. ही पुनर्घटना कोणत्या तत्त्वावर व्हावी, या घटनेचीं प्रमाणें कोणतीं, या घटणेचें ध्येय काय, इत्यादि विचार प्रस्तुत प्रकरणांत कर्तव्य आहे.

हिंदु-समाजाची भावी पुनर्घटना जुन्या परंपरेचा विचार ध्यानांत घेऊनच केली पाहिजे. कोणत्याहि समाजाची परंपरा म्हणजे त्याचा इतिहास होय. हिंदु-समाज-रचनेची परंपरा प्रामुख्यानें स्मृतिग्रंथांतच आहे.

श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्मशास्त्रन्तु वै स्मृतिः ॥ मनु-अ. १।१०

श्रुति म्हणजे वेद आणि धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथ हे होत. हिंदु-समाजाचा व श्रौतधर्माचा म्हणजे वेदाचा संबंध आज फारसा राहिलेला नाहीं. श्रौतधर्म जेव्हां आचरणांत येईना तेव्हांच स्मार्तधर्म पुढें आला व स्मार्तधर्मांतीलहि कांहीं आचार जेव्हां कठोण वाटूं लागला तेव्हां पुराणांतील व्रतें वगैरे उत्पन्न झालीं. म्हणून हिंदु-समाजाचा इतिहास व धर्मशास्त्र यांच्या आधारानेंच पुढील समाज-घटनेचा विचार केला पाहिजे.

हिंदु-समाजाचें ध्येय अभ्युदय व निःश्रेयस हें आहे व पुढें कोणत्याहि कालीं तेंच असलें पाहिजे. कोणत्याहि समाजाला अभ्युदय पाहिजे व निःश्रेयसहि पाहिजे. हें ध्येय ठरवितांना केवळ धर्मशास्त्र हें एकच बलवत्तर प्रमाण होय असें म्हणतां येणार नाहीं. धर्माचीं प्रमाणें श्रुति, स्मृति व शिष्टाचार इत्यादि आहेत.

धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ।
द्वितीयं धर्मशास्त्रंतु तृतीयं लोकसंग्रहः ॥ महाभारत-शां. प.

धर्म जिज्ञासूंचें पहिलें प्रमाण जसें श्रुति तसेंच दुसरें धर्मशास्त्र व तिसरें लोकसंग्रह हें होय ! श्रुतीचा संबंध आजच्या व्यवहाराशीं फारसा नाहीं हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् धर्मशास्त्र व लोक-संग्रह यांच्या आधारेंच हिंदु-समाजाची भवितव्यता ठरविली पाहिजे. कोणत्याहि समाजाचा अभ्युदय हा बाह्य-परिस्थिति,

लोकस्थिति आणि जगांतील उलाढाली यांवरच अवलंबून असतो. आज जगांत काय चाललें आहे हा प्रश्न केव्हांहि विसरतां कामा नये. आज जगामध्यें शास्त्रीय शोध वाढत आहेत, सुधारणा घडत आहेत, महत्वाकांक्षा वृद्धिंगत होत आहे, आणि एकंदरींत माणसाविषयींच्या कल्पनाहि बदलत आहेत; बदललेल्या परिस्थितीप्रमाणें धर्मांतहि बदल झालेले आहेत आणि भावी परिस्थितीकडे नजर देऊन हिंदु-समाजाच्या रचनेंतहि बदल केलाच पाहिजे. जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांत ज्या अभ्युदयाच्या कल्पना आहेत त्याच कल्पना आपल्याहि आहेत. चतुर्विध पुरुषार्थ हेंच मानवी जीविताचें ध्येय होय. धर्म, अर्थ व काम हेहि पुरुषार्थच होत ! अर्थ व काम म्हणजे द्रव्य व सत्ता यांचा उपभोग; हे कांहीं सामान्य पुरुषार्थ नाहींत, असें शुक्र व बृहस्पतींनीं* आपल्या ग्रंथांत सांगितलें आहे. म्हणून त्रिविध पुरुषार्थ आणि मोक्ष यांचीच सांगड घातली पाहिजे. जगांतील राष्ट्रें, जगांतील परिस्थिति, जगांतील सुधारणा या सर्व गृहीत धरून वागणें म्हणजेच आजचा लोकसंग्रह होय व हा लोकसंग्रह हें भावी पुनर्घटनेंतील एक प्रमाणच समजलें पाहिजे.

हिंदु-समाजाच्या पुनर्घटनेचा विचार हा जसा लोकसंग्रहदृष्ट्या केला पाहिजे तसाच तो धर्मशास्त्रदृष्ट्याहि केला पाहिजे. धर्मशास्त्र म्हणजे स्मृतिग्रंथच होत. तथापि शिक्षा कल्पादि षडंगें, श्रौत व गृह्यसूत्रें, पुराणें व उपपुराणें हे सर्व स्मृतिग्रंथच होत. या सर्व स्मृतिग्रंथांचा प्रधान भाग म्हणजे धर्म-सूत्रें व स्मृति हाच होय ! श्रुति या अपौरुषेय आणि त्यांचा व्यवहाराशीं फारसा संबंध नाहीं, म्हणून त्यांतील धर्माची चिकित्सा न करतां, आणि पुराणेंहि अर्वाचीन व त्यांतील विषयहि बराच प्रक्षिप्त व भानगडीचा म्हणून तोहि वगळून, केवळ श्रुतिस्मृतिपुराणापैकीं मधलें जें धर्मशास्त्र त्याच्या आधारेंच समाज-घटनेचा विचार केला पाहिजे.

धर्मशास्त्र प्रयोजक स्मृतिकर्ते हे सर्व एका कालींच झालेले नाहींत. हे सर्व स्मृतिकार भिन्नभिन्न कालीं झाले व त्यांनीं आर्यसंस्कृतींतील मुख्य तत्वें व

* टीप—बार्हस्पत्यसूत्र अ. ६ मध्यें ' धनमूलंजगत् । सर्वाणि तत्रसन्ति । मृतश्चांडालश्च निर्धनः । अधनेनार्थमार्जयितुं न शक्यते । यस्यार्थराशिस्तस्य मित्राणि । असें धनाचें महत्त्व सांगितलें आहे.

आपापल्या कालाच्या परिस्थितीचा विचार करून प्रत्येक मनुष्याला अभ्युदय व निःश्रेयस हे कसे साध्य करतां येतील, याचा मार्ग सांगितला. इसवीसनापूर्वी एक हजार ते इसवीसन सातशें आठशेंपर्यंतच्या काळांत बहुतेक स्मृतिकार झालेले आहेत असें पाश्चात्य व भारतीय पंडितांनीं ठरविलेलें आहे. गेल्या बाराशें वर्षांत कोणीहि स्मृतिकार झालेला नाहीं. पण तें कार्य धर्मनिबंधकर्त्यांनीं केलें आहे. या धर्मनिबंधकारांच्या कल्पना व आधुनिकांच्या कल्पना या प्रामाण्याच्या बाबतींत मुळींच जमत नाहींत. नवे विद्वान् देशतः कालतः जुने ग्रंथ इतिहास दृष्टीनें प्रमाण मानतात व त्यांत परिस्थित्यनुरूप फेरफार झालेले आहेत असें सिद्ध करतात. पण जुन्या पंडितांचें मत याहून निराळें आहे, त्याचें परीक्षण थोडें अवश्य आहे.

गेल्या हजार वर्षांत सर्व निबंधकारांनीं धर्मशास्त्रांतील सर्व वचनांचा समन्वय करण्याची एक पद्धति स्वीकारलेली आहे व तिला थोडासा मीमांसाशास्त्राचा तोंडीलावण्याप्रमाणें आधार घेतलेला आहे. मीमांसकांच्या अपूर्वाचा आणि इतर विषयांचा परामर्श पुढें आम्ही एका प्रकरणांत घेणार आहोंतच. प्रस्तुत स्मृतींच्या उत्पत्तीसंबंधानें त्यांच्या मताचा विचार कर्तव्य आहे. सर्व स्मृति या श्रुतिमूलकच होत असें हे मीमांसक मानतात. सर्व स्मृति या श्रुतिमूलक आहेत म्हणजे त्यांच्या आवृत्त्या आहेत काय? श्रुतीचा अर्थ सौलभ्यानें समजावा, म्हणून या स्मृति केल्या असें म्हणतां येईल काय? तसें जर असेल तर संस्कृताचे प्राकृत ग्रंथ करणाऱ्यांनीं जसा मूलग्रंथ वर देऊन खालीं प्राकृत अनुवाद केला तसें या स्मृतिकारांनीं कां केलें नाहीं? अनेक स्मृतिकर्त्यांच्या मागें ते वेदवेत्ते होते, सर्वज्ञ होते, ते वेदशास्त्रार्थ–तत्वज्ञ होते, अशीं विशेषणें आहेत. त्यावरून स्मृति-वाक्यें देतांना त्यांना श्रुतींचें प्रतीक आठवलें नसेल, हें संभवत नाहीं. पण ज्या अर्थी प्रत्यक्ष श्रुतींचा उल्लेख नाहीं व वेदाच्या पुढेंच

वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीलेच तद्विदाम् । मनु–अ. १ श्लो. ६

असें म्हटलें आहे त्यावरून शिष्टांचा आचार, त्यांचें शील व स्मरण यांचा समावेश स्मृतीमध्यें केला आहे असेंच म्हणावें लागतें. प्रत्येक स्मृति रचतांना त्या त्या स्मृतिकारानें, श्रुतींतील मूलभूत तत्त्वें, त्या वेळची लोकस्थिति, यांचा विचार करून त्या कालीं जेणेंकरून समाजधारणा होईल, अशीच स्मृति सांगितली असावी व हेंच सयुक्तिक दिसतें.

प्रत्येक स्मृतिवाक्य हें श्रुतिमूलक असलें पाहिजे व तसें जें नसेल तें धर्मप्रमाण नव्हे, हा मीमांसकांचा केवळ आग्रह होय ! ( धर्मस्य शब्द मूलत्वात् अशब्दमनपेक्षं स्यात्—जै. सू. १-३-१ ). पुष्कळ स्मृतिवाक्यें अशीं आहेत कीं त्यांना श्रुतीचें मूळ मिळणें शक्य नाहीं. त्यावर हे मीमांसक म्हणतात, कीं वेदांच्या शाखा पूर्वी अनंत होत्या, त्यांपैकी पुष्कळ लुप्त झाल्या. पुरुषाच्या मंदमतीमुळें नाना प्रकरणांमध्यें पसरलेल्या श्रुतींचा थांग मनुष्याला लागत नाहीं. मीमांसकांच्या या म्हणण्याला ' प्रच्छन्न वाद ' असें म्हणतात. स्मृतींतील ज्या वाक्यांना श्रुतीचें मूळ सांपडत नाहीं, त्या श्रुति आज अनुपलब्ध आहेत व त्या नष्ट झाल्या असें जर गृहीत धरलें तर नास्तीक, बौद्ध, चोर आणि लबाडहि म्हणतील कीं आमच्या मतालाहि अनुकूल श्रुति होत्या, पण त्या आज उपलब्ध नाहींत ! असें झाल्यास अनवस्था प्रसंगच येईल ! म्हणून कुमारिलभट्टांचे पुढील म्हणणेंस युक्तिक वाटत नाहीं.

शाखानां विप्रकीर्णत्वात् पुरुषाणां प्रमादतः ।
नाना प्रकरणस्थत्वात् स्मृतेर्मूलं न दृश्यते ॥

वेदशाखांचा पसारा, मनुष्यांचे मंदमतित्वादि दोष व नाना प्रकरणांच्या ठिकाणीं श्रुतींचें अस्तित्व यामुळें स्मृतिमूलक श्रुति सांपडत नाहींत. या प्रच्छन्न वादाला पुढें उच्छिन्नवादानें साह्य केलें आहे. " श्रुति आहेत पण सांपडत नाहींत " आणि " होत्या पण त्या आतां नष्ट झाल्या " हें म्हणणें श्रुतीबद्दल दृढ आदर दाखवितें पण तें युक्तीला मात्र पटत नाहीं.

श्रुतीविरुद्ध स्मृति असेल तर ती अप्रमाण, श्रुतीविरुद्ध श्रुति असेल तर तो विकल्प आणि स्मृतिविरुद्ध स्मृति असेल तर तोहि विकल्प असे मीमांसकांचे सिद्धांत आहेत. या बाबतींतहि सर्व मीमांसकांची एकवाक्यता नाहीं. जैमिनी व शबरस्वामी यांपेक्षां कुमारिल भट्टांचें मत निराळें आहे. श्रुतीविरुद्ध स्मृति असली तरी कधीं काळीं श्रुति सांपडली तर ती स्मृति प्रमाण मानावी व ती प्रमाणें वागावें असें कुमारिल भट्ट म्हणतात. पण त्यामुळें आज जें योग्य ठरेल, तें उद्यां अयोग्यहि होईल. शबरस्वामी म्हणतात कीं श्रुती-विरुद्ध स्मृति नाहीं एवढ्यावरून ती प्रमाण असें मात्र नव्हे; कारण लोभमूलक स्मृति असण्याचाहि संभव आहे ( जै. सू.-हेतुदर्शनाच्च ). या सूत्रावरील भाष्यांत त्यांनीं तें स्पष्ट केलें आहे. पुष्कळ स्मृतींमध्यें पुष्कळसे प्रक्षेपहि आहेत.

कारण श्रुतीप्रमाणें स्मृतींच्या अध्ययनाचा पाठक्रम नाहीं. तात्पर्य श्रुति अपौरुषेय आहेत, श्रुतिमूलक स्मृति म्हणून त्यांतील विषयहि अपौरुषेय, सर्व स्मृति एका कालींच झाल्या व त्या सर्व स्मृतींमध्यें एकवाक्यता आहे इत्यादि मीमांसकांचे सिद्धांत हे पूर्व-काळीं योग्य असले तरी आज ते आग्रहच दर्शवितात. म्हणून देशभेदानें व कालभेदानेंच स्मृतिग्रंथ रचले गेले व त्या स्मृतिकारांनीं त्या परिस्थितींत योग्य तो धर्म सांगितला असेंच समजलें पाहिजे.

गेल्या १० वर्षांत अनेक सामाजिक प्रश्न पुढें आले आहेत. त्या सर्वांचा धर्मशास्त्राशीं संबंध आहे. शास्त्रचर्चा, पंडितसभा व संमेलनें यांमुळें धर्मशास्त्र थोडेसें परिचित झालेलें आहे. तथापि बहुजन समाजानें, धर्मशास्त्र म्हणजे आहे तरी काय ? त्यांत कोणते विषय आहेत ? त्याचा व आपल्या व्यवहाराचा संबंध कांहीं आहे काय ? पूर्वीपेक्षां आपण कोणत्या बाबतींत हल्ली सुधारलों आहोंत व कोणत्या बाबतींत मागें जात आहोंत, हें सर्व चिकित्सेनें पाहाण्याची वेळ आली आहे. उगीच धर्म धर्म, म्हणून भय मानण्यांत अर्थ नाहीं व अधर्म म्हणजे तरी काय हेंहि समजलें पाहिजे. म्हणून धर्मसूत्रें व अनेक स्मृतिग्रंथ यांचें मंथन करून जें नवनीत उत्पन्न होईल तें या ग्रंथरूपानें वाचकांपुढें ठेवावयाचें आहे. आपस्तंबादिसूत्रकार व मन्वादिस्मृतिकार यांनीं धर्माचारामध्यें जर परिस्थित्यनुरूप फेरबदल केले असले तर आजहि समाजांतील अधिकारी धर्मज्ञांनीं परिस्थिती-प्रमाणें अभ्युदय व निःश्रेयस साध्य करण्याचे निराळे मार्ग लोकांना सांगणें हें अयोग्य तर नाहींच उलट तसें करणें हा त्यांचा हक्क व तें त्यांचें कर्तव्य आहे; एवढें जरी समंजस लोकांना या पुस्तकाचे द्वारें समजलें तरी पुस्तकाचें कार्य झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तत्त्वज्ञान, नीतिधर्म व आचारधर्म अशीं धर्माचीं त्रिविध अंगें आहेत. त्यांतील तत्त्वज्ञान हें अढळ असतें, नीतितत्वें सापेक्ष असतात व आचारधर्म हा परिस्थितीप्रमाणें बदलणारा असतो. धर्मामध्यें प्रत्यक्ष ईश्वरहि बदल करूं शकत नाहीं अशी घोषणा कांहीं लोक आज करीत असतात ती किती व्यर्थ आहे हें पुढील प्रकरणें वाचल्यावर वाचकांना समजेलच. धर्मामध्यें बदल करण्याला ईश्वराची आवश्यकता नसते. ईश्वर तें कार्य काल, परिस्थिति व माणसें यांना निमित्त करूनच तें करून घेत असतो. असो.

## सूत्रकार व स्मृतिकार यांचे काल

हे काल अनेक विद्वानांची चर्चा व स्वतः केलेली चिकित्सा ह्यांच्या साधनानें साधारणतः अंदाजानें ठरविलेले आहेत व याच क्रमानें पुढें प्रत्येक प्रकरणांत वचनें दिलेलीं आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ आपस्तंब धर्मसूत्र | ख्रि. पू. | ८०० | १६ पाराशर स्मृति | इ. स. | ३०० |
| २ गौतम धर्मसूत्र | ,, | ६५० | १७ आपस्तंब स्मृति | ,, | ३०० |
| ३ बौधायन धर्मसूत्र | ,, | ६०० | १८ बृहद्यम व यम स्मृति | ,, | ३०० |
| ४ वसिष्ठ धर्मसूत्र | ,, | ५०० | १९ बृहस्पति स्मृति * | ,, | ३०० |
| ५ विष्णु धर्मसूत्र | ,, | ४५० | २० संवर्त स्मृति | ,, | ३५० |
| ६ उशन संहिता | ,, | ४०० | २१ अत्रि स्मृति व संहिता | ,, | ४०० |
| ७ शंख स्मृति | ,, | ४०० | २२ लघुविष्णु, लघुहारित, लघुशातातप, लघुशंख, इ. अनेक लघु व वृद्ध स्मृत्या | इ. स. | ४०० |
| ८ गोभिल स्मृति | ,, | ४०० | | | |
| ९ मनुस्मृति | ,, | ३०० | | | |
| १० लिखित व हारित स्मृति | ,, | २०० | २३ वेदव्यास स्मृति | ,, | ४५० |
| ११ याज्ञवल्क्य स्मृति | इ. स. | १०० | २४ दक्ष स्मृति | ,, | ४५० |
| १२ लघु आश्वलायन स्मृति | ,, | १५० | २५ वृद्धहारित स्मृति | ,, | ५०० |
| १३ आंगिरस स्मृति | ,, | २०० | २६ शंख लिखित स्मृति | ,, | ५०० |
| १४ शातातप स्मृति | ,, | २०० | २७ देवल स्मृति | ,, | ६०० |
| १५ प्रजापति स्मृति | ,, | २०० | २८ औशनस स्मृति | ,, | ६५० |

याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें याज्ञवल्क्य स्मृतीपूर्वी झालेल्या मनु, अत्रि, विष्णु, हारित, याज्ञवल्क्य, उशना, अंगिरा, यम, आपस्तंब, कात्यायन, बृहस्पति, पराशर, व्यास, शंख, लिखित, दक्ष, गौतम, शातातप व वसिष्ठ अशा एकोणीस धर्मशास्त्रप्रयोजकांच्या नांवांचा उल्लेख आहे. तसेंच पराशर स्मृतीमध्येंहि मानव, वसिष्ठ, काश्यप, गार्ग्य, गौतम, औशनस, अत्रि, विष्णु, संवर्त, दक्ष, आंगिरस, शातातप, हारित, याज्ञवल्क्य, आपस्तंब, शंख, लिखित, कात्यायन, प्राचेतस अशा १९ धर्मशास्त्रप्रयोजकांचा उल्लेख आहे. त्यावरून हे स्मृतिकार पूर्वी झाले असावेत.

* टीपः- या स्मृतींचा काल कोणी इ. स. ६०० हि ठरवितात !

हे धर्मशास्त्रकर्ते जरी पूर्वी झाले असले तरी त्यांच्या नांवावर जे आज छापील ग्रंथ उपलब्ध आहेत ते मात्र पूर्वीचे असावेत असें वाटत नाहीं. कांहीं धर्मशास्त्रकर्ते समकालीन असतील तर कांहींच्या ग्रंथांचें प्रक्षेपादिमुळें अर्वाचीनीकरण होणें असंभाव्य नाहीं. आम्ही वापरलेले ग्रंथ पुढीलप्रमाणें आहेत—

| | | | |
|---|---|---|---|
| १ मनुस्मृति | ( कुल्लुकीटीकेसह ) | निर्णयसागर | — मुंबई |
| २ याज्ञवल्क्यस्मृति | ( मिताक्षरेसह ) | ,, | ,, |
| ३ अष्टादशस्मृतिमूल | | व्यंकटेश्वर प्रेस | ,, |
| ४ स्मृतीनां समुच्चयः | | आनंदाश्रम | पुणें |
| ५ गौतमप्रणीतधर्मसूत्राणि | | ,, | ,, |
| ६ आपस्तंब धर्मसूत्र | | बॉंबे संस्कृत व प्राकृतसेरीज | |
| ७ धर्मशास्त्र ग्रंथमाला | | कलकत्ता ( १९०८ ) | |

# प्रकरण दुसरें

## देशमर्यादा व लोकस्थिति

धर्मशास्त्र प्रयोजकांनीं धर्म सांगण्याकरितां जो देश निवडला, त्याच्या व्याख्या सर्व शास्त्रकर्त्यांच्या मतें एक नाहींत तर त्यांमध्यें परिस्थितीप्रमाणें फरक होत गेला आहे. देशाची मर्यादा जर परिस्थितीप्रमाणें वाढत गेली तर त्या देशाला पूर्वीच्या संकुचित देशांतील धर्माचार पाळतां येतील काय? आपस्तंबापासून तों देवलापर्यंत देश-मर्यादा कशी वाढत गेली व त्या मर्यादेवर परिस्थितीचा कसा परिणाम झाला हें पुढील विवेचनावरून समजून येईल.

आपस्तंबानें देशाची व्याख्या दिली नाहीं, तशीच ती गौतमानेंहि दिली नाहीं. परंतु बौधायनादिकांनीं आर्यावर्ताच्या व्याख्या पुढीलप्रमाणें दिल्या आहेत:-

प्राग्विनशनात्प्रत्यक्कालकाद्वनाद्दक्षिणेन हिमवन्तमुदक्पारियात्रमेतदार्यावर्तं तस्मिन्य आचारः स प्रमाणम् ॥ २७ ॥

गङ्गायमुनयोरन्तरमित्येके ॥ २८ ॥

अथाप्यत्र भाल्लविनो गाथामुदाहरन्ति ॥ २९ ॥

पश्चात्सिन्धुर्विधरणी सूर्यस्योदयनं पुरः ।
यावत्कृष्णा विधावन्ति तावद्धि ब्रह्मवर्चसमिति ॥ ३० ॥
अवन्तयोऽङ्गमगधाः सुराष्ट्रा दक्षिणापथाः ।
उपावृत्सिन्धुसौवीरा एते संकीर्णयोनयः ॥ ३१
अथाप्युदाहरन्ति ॥ ३३ ॥
पद्भ्यां स कुरुते पापं यः कलिङ्गान्प्रपद्यते ।
ऋषयो निष्कृतिं तस्य प्राहुर्वैश्वानरं हविः ॥ ३४ ॥ (बौ. प्र.१ अ.१)

प्रागादर्शात्प्रत्यक्कालकवनादुदक्पारियात्राद्दक्षिणेन हिमवत
उत्तरेण च विन्ध्यस्य ॥ ७ ॥ वसिष्ठ ॥

एतदार्यावर्तमित्याचक्षते ॥ १० ॥ गङ्गायमुनयोरन्तरेऽप्येके ॥ ११ ॥
यावद्वा कृष्णमृगो विचरति तावद्ब्रह्मवर्चसमित्यन्ये ॥१२॥ (अ. १)
चातुर्वर्ण्य-व्यवस्थानं यस्मिन् देशे न विद्यते ।
स म्लेच्छदेशो विज्ञेय आर्यावर्तस्ततः परः ॥ विष्णुधर्मसूत्र ॥

सरस्वतिदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरम् ।
तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ॥ १७ ॥
कुरुक्षेत्रं च मत्स्याश्च पञ्चालाः शूरसेनकाः ।
एष ब्रह्मर्षिदेशो वै ब्रह्मावर्तादनन्तरः ॥ १९ ॥
हिमवद्विन्ध्ययोर्मध्यं यत्प्राग्विनशनादपि ।
प्रत्यगेव प्रयागाच्च मध्यदेशः प्रकीर्तितः ॥ २१ ॥
आसमुद्रात्तु वैपूर्वादासमुद्रात्तुपश्चिमात् ।
तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः ॥ २२
कृष्णसारस्तु चरति मृगो यत्र स्वभावतः ।
स ज्ञेयो यज्ञियो देशो म्लेच्छदेशस्त्वतः परः ॥ २३ ॥
एतान्द्विजातयो देशान्संश्रयेरन्प्रयत्नतः ।
शूद्रस्तु यस्मिन्कस्मिन्वा निवसेद्वृत्तिकर्शितः ॥ २४ ॥ मनु. अ. २
यस्मिन् देशे मृगः कृष्णः तस्मिन् धर्मान् निबोधत ॥ या.व.अ.१श्लो.२
स्वभावात् विचरेद्यत्र कृष्णसारः सदामृगः ।

धर्मदेशः स विज्ञेयो द्विजानां धर्मसाधनं ॥ ४ ॥ संवर्त ॥
कृष्ण सारो मृगो यत्र स्वभावेन प्रवर्तते ।
तस्मिन् देशे वसेत् धर्मः सिध्यन्ति द्विजसत्तमाः ॥ १६ ॥ हारित ॥
वरील संवर्तांचाच श्लोक घेतला आहे. व्यास

पूर्वेस विनशन, पश्चिमेस कालकावन, उत्तरेस हिमालय व दक्षिणेस पारियात्र यांमध्यें जो देश आहे तो आर्यावर्त होय व तेथील आचार प्रमाण समजावा. बौधायनकालीं गंगा व यमना यांचे मधील प्रदेशास 'आर्यावर्त' समजणाराहि एक वर्ग होता. भाल्लवी हे 'ब्रह्मवर्चस' या देशाची व्याख्या निराळीच करीत. अवंती, अंग, मगध, सौराष्ट्र ( काठेवाड ), दक्षिणापथ ( महाराष्ट्र ) हे देश त्या कालीं संकीर्ण लोकांचे होते. शुद्ध चातुर्वर्ण्य या ठिकाणीं नव्हतें म्हणून पुढें अनेक देशांचीं नांवें सांगून तेथें गेल्यास प्रायश्चित्त घेतलें पाहिजे असें बौधायनानें सांगितलें आहे.

वसिष्ठानें आर्यावर्ताच्या पूर्वपश्चिम सीमा व उत्तर सीमा बरोबर बौधायनाच्याच सांगितल्या आहेत; परंतु दक्षिणेकडे विंध्य पर्वताची स्पष्ट सीमा दाखविली आहे. यापुढें हिमालय व विंध्य यांमधील प्रदेशास आर्यावर्त समजूं लागले. गंगा व यमुना यांमधील अंतर्वेदीस आर्यावर्त म्हणत, त्याचाहि निर्देश वसिष्ठानें केला आहे.

चातुर्वर्ण्य व्यवस्था जेथें आहे तो आर्यावर्तदेश व ती व्यवस्था जेथें नाहीं तो म्लेच्छदेश होय ही विष्णूची व्याख्या देशमर्यादा व समाजस्थितिनिदर्शक अशी आहे.

मनूनें आर्यावर्ताशिवाय ब्रह्मावर्त, ब्रह्मर्षिदेश, मध्यदेश यांच्याहि व्याख्या दिलेल्या आहेत. त्यावरून हा एवढा सबंध प्रदेश मनूच्या धर्माचा विषय होता असें दिसतें. पूर्व व पश्चिम समुद्रामधील आणि हिमालय व विंध्य पर्वतांमधील सर्व भागास मनु आर्यावर्त असें समजतो, अर्थात् या आर्यावर्तामध्यें सरस्वति व दृषद्वति यांमधील देवनिर्मित ब्रह्मावर्तदेश, कुरुक्षेत्र, मत्स्य, पंचाल, शूरसेन मिळून बनलेला ब्रह्मर्षिदेश; प्रयाग व विनशन आणि हिमालय व विंध्य या चतुःसीमेंतील मध्यदेश हे सर्व देश होते. द्विजांनीं याच देशांचा आश्रय करावा. शूद्रानें कोठेंहि रहावें असें मनूचें मत आहे.

काळवीट अथवा कृष्णसार नांवाचा हरिण जेथें स्वभावतः संचार करितो तो यज्ञिय देश होय अशी व्याख्या मनु, वसिष्ठ, याज्ञवल्क्य, संवर्त, व्यास इत्यादि अनेकांनीं केली आहे. हा यज्ञिय देश म्हणजे जर आर्यावर्त असेल तर या व्याख्येनें पुढें सर्व दक्षिण हिंदुस्थान आर्यावर्तांत मोडूं लागलें असें दिसतें. काळवीट या पशूचा स्वाभाविक संचार होत असलेले पूर्वी व आजहि अनेक देश सांपडतील; परंतु त्या संचारावरून तेथें अहिंसक लोक असावेत असें समजणें युक्त नाहीं. कारण पूर्वी वैदिक आर्यच हरिण वगैरे पशु खात असत. समशीतोष्ण कटिबंधांत हरिण वाढतो असें जर असेल तर आजची अमेरिका, इजिप्त आणि असलेच इतर सर्व देश आर्यावर्तांत समाविष्ट होतील. हरिणाच्या स्वैर संचाराचा आर्यावर्ताच्या व्याख्येशीं कसा संबंध आहे हें जरी कळत नसलें तथापि आर्यावर्ताची व्याख्या पूर्वी संकुचित होती व पुढें ती परिस्थितीप्रमाणें व्यापक झाली एवढें वाचकांच्या ध्यानांत येईल. अर्थात् आजचें भरतखंड म्हणजे सबंध हिंदुस्थान हा आर्यावर्त होय व जगभर पसरलेले सर्व हिंदु लोक हेहि ध्यानांत घेतलें पाहिजेत.

## लोकस्थिति

धर्मशास्त्रकर्त्यांनीं सांगितलेला धर्म ज्या देशामध्यें राहून आचरणांत आणावयाचा त्या देशाची व्याख्या कशी व्यापक झाली हें पाहिल्यावर तेथील परिस्थिति कशी असावी याचाहि विचार शास्त्रकर्त्यांनीं केलेला आहे. वसिष्ठ म्हणतो कीं " तिन्ही वर्णांनी ब्राह्मणाच्या सांगण्याप्रमाणें चालावें, ब्राह्मणानें सर्वांना धर्म सांगावा व त्या धर्माचें अनुष्ठान राजानें लोकांकडून करवून घ्यावें. " उदाहरणार्थ—ब्राह्मण जर संध्या करीत नसतील तर त्यांना राजानें संध्या करण्यास भाग पाडावें व जर ते न ऐकतील तर त्यांना शूद्राप्रमाणें कामास लावावें असें बौधायनाचेंहि मत आहे. विष्णुधर्मसूत्रकार म्हणतो कीं " राजानें प्रत्येक वर्णाला आपापल्या धर्माप्रमाणें वागावयास लावावें, राज्यामध्यें विद्वान् ब्राह्मण क्षुधेनें पीडित असा नसावा. धर्मशास्त्रांतील वर्णाश्रमाचा धर्म हा क्षत्रिय राजा व चातुर्वर्ण्यवान् समाज जेथें असेल तेथेंच आचरणांत येण्याजोगा आहे, इतरत्र नाहीं हें स्पष्टच आहे. हा मुनींचा आशय ज्यांत स्पष्ट आहे तीं वचनें पुढीलप्रमाणें आहेत.

त्रयो वर्णा ब्राह्मणस्य वशे वर्तेरन् ॥ ४०
तेषां ब्राह्मणो धर्मान्प्रब्रूयात् ॥ ४१ ॥
तं राजा चानुशिष्यात् ॥ ४२ ॥ वसिष्ठ ( अ. १ ) ॥
सायंप्रातः सदा संध्यां ये विप्रा नो उपासते ।
कामं तान् धार्मिको राजा शूद्रकर्मसु योजयेत् ॥ २० ॥
बौधायन ( प्र. २ अ. ४ ) ॥
अथ प्रजापालनं, वर्णाश्रमाणां स्वेस्वेधर्मे व्यवस्थापनम् ।
धर्मकार्येषु धर्मिष्ठान् शूरान् शूरकर्मणि ।
न च अस्य विषये ब्राह्मणः क्षुधार्तो अवसीदेत । विष्णु ॥

# प्रकरण तिसरें

## काल-विचार

धर्माचरण करण्याला जसा शास्त्रकारांनीं निर्दिष्ट केलेला देश पाहिजे व त्यांनीं सांगितल्याप्रमाणें समाजस्थितिहि पाहिजे, तसाच त्यांनीं सांगितलेला कालहि पाहिजे. काल ही वस्तु अखंड असली तरी तिचे भूत, भविष्य, वर्तमान, मुख्य काल, गौण व आपत्काल असे भेद पडूं शकतात. अर्थात् कालभेदाप्रमाणें धर्मामध्येंहि फेरबदल होतो. शहाण्यानें देश, काल, परिस्थिति व आपत्काल यांचें तारतम्य ध्यानीं घेऊनच वागलें पाहिजे.

कृत, त्रेता, द्वापर व कलि हे शब्द ऐतरेय ब्राह्मणांत आले असले तरी तेथें ते द्यूतांतील संज्ञा म्हणून आलेले आहेत, युगवाचक आलेले नाहींत. वरील शब्द युगवाचक असे फार पुढें वापरलेले दिसतात. विष्णूखेरीज कोणत्याहि धर्मसूत्रांत ही युगकल्पना नाहीं व कलीमध्यें आपला धर्म रद्द होईल असें कोणीहि धर्मसूत्रकार म्हणत नाहीं. प्रथम विष्णूनें कल्पना मांडली ती अशी—

यदुत्तरायणं तदहर्देवानाम् । दक्षिणायनं रात्रिः ।
संवत्सरोऽहोरात्रः तत्रिंशतामासः द्वादशमासा वर्षं ।
द्वादशवर्षशतानि दिव्यानि कलियुगम् । द्विगुणानि द्वापरम् ।

त्रिगुणानि त्रेता। चतुर्गुणानि कृतयुगम् ॥ विष्णुधर्मसूत्र (अ. २०)

मनूची युगकल्पना विष्णूपेक्षां निराळी दिसते.

कृतं त्रेतायुगंचैव द्वापरं कलिरेव च।
राज्ञो वृत्तानि सर्वाणि राजा हि युगमुच्यते ॥ ३०१ ॥
कलिः प्रसुप्तो भवति स जाग्रद्द्वापरं युगम्।
कर्मस्वभ्युद्यतंस्त्रेता विचरंस्तु कृतं युगम् ॥ ३०२ ॥ मनु. अ. ९ ॥

मनुस्मृतीच्या पहिल्या अध्यायांत जो युगकल्पना आहे तिचाच अनुवाद पुढे पराशरानें केला आहे.

अन्ये कृतयुगेधर्मास्त्रेतायां द्वापरे परे।
अन्ये कलियुगे नृणां युग ऱ्हासानुरूपतः ॥ ८५
तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते।
द्वापरे यज्ञमेवाहुर्दानमेकं कलौ युगे ॥ ८६ ॥ मनु अ. १ ॥
सर्वे धर्माः कृते जाताः सर्वे नष्टाः कलौ युगे ॥
चातुर्वर्ण्यसमाचारं किंचित् साधारणं वद ॥ १६ ॥
तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुच्यते।
द्वापरे यज्ञमेवाहुर्दानमेव कलौ युगे ॥ २३ ॥
कृते तु मानवा धर्मास्त्रेतायां गौतमाः स्मृताः।
द्वापरे शंखलिखिताः कलौ पाराशराः स्मृताः ॥ २४ ॥
कृते संभाषणादेव त्रेतायां स्पर्शनेन च।
द्वापरे त्वन्नमादाय कलौ पतति कर्मणा ॥ २६ ॥
सीदंति चाग्निहोत्राणि गुरुपूजा प्रणश्यति।
कुमार्यश्च प्रसूयंते तस्मिन् कलियुगे सदा ॥ ३१ ॥
युगे युगे च ये धर्मास्तत्र तत्र च ये द्विजाः।
तेषां निंदा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः ॥ ३२ ॥ पराशर अ. १

उत्तरायण हा दिवस व दक्षिणायण ही रात्र; सबंध एक मानवी वर्ष म्हणजे देवांची अहोरात्र, असे तीस अहोरात्र म्हणजे एक महिना, अशा १२ महिन्यांचें एक वर्ष व याप्रमाणें देवांच्या १२०० वर्षांपर्यंत कलियुग असतें. कृत, त्रेत, द्वापर व कली हीं सर्व राजाचीं वृत्तेंच होत म्हणजे राजाच्या वागणुकीवर सर्व

युगें अवलंबून आहेत, अर्थात् राजा हाच युग होय. राजा कर्तव्यविन्मुख असेल तर कलि, कर्तव्यजागरुक असेल तर द्वापर, कर्माला उद्युक्त झाला तर त्रेतायुग व साक्षात् कर्तव्य करूं लागला की कृतयुग समजावें असें मनु म्हणतो.

कृतयुगांतील धर्म निराळे व द्वापरांतील धर्म निराळे. क्रमानें युगऱ्हास होत आहे म्हणून त्या ऱ्हासानुरुप कलियुगांतील धर्महि निराळेच आहेत. तप, ज्ञान, यज्ञ व दान हे अनुक्रमें चतुर्युगांतील धर्म होत. सर्व धर्म कृतयुगीं उत्पन्न झाले पण ते कलियुगांत बहुतेक नष्टच झाले म्हणून चातुर्वर्ण्यसमाचार थोडा तरी सांगा असें व्यास पराशरांना विचारतात. पराशरांनीं तप, ज्ञान, यज्ञादि युगधर्म सांगून कलियुगांत आपल्या स्मृतींतील धर्मप्रमाण असें प्रथम सांगितलें व युग-प्रताप वर्णन केला. गुरुपूजा व अग्निहोत्रें नष्ट होतील आणि कौमारावस्थेमध्यें मुली प्रसूत होतील असें भविष्य केलें. परंतु आजहि गुरुबद्दल आदर आहे, अग्निहोत्रें-हि क्वचित् दिसतात व क्वचित् एकादीच कुमारी फसून विवाहापूर्वी बाळंत होत असते-सार्वत्रिक तो नियम आहे असें म्हणतां येणार नाहीं.

पराशरकालीं ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हा वर्ग बराच अधःपतित झालेला असावा. तथापि त्यांची निंदा करूं नये आणि ते युगानुरुप द्विज आहेत असें समजावें. " खवटखोबरें व खत्याळ गिऱ्हाईक " असें म्हणतात त्याप्रमाणें किंवा " यथा राजा तथा प्रजा " असें म्हणतात त्याप्रमाणें जसें युग तसे द्विज आहेत असें समजावें. पराशराचा हा वरील श्लोक पुढें अ. ११ मध्येंहि आहे. या ग्रंथावरील टीकाकार जो माधवाचार्य त्यानें मोठी मार्मिक टीका पुढें केलेली आहे. तो म्हणतो अधर्मप्रवृत्ति ही दोन प्रकारची असते. एक युगप्रयुक्त अधर्मप्रवृत्ति व दुसरी प्रमादालस्यादि प्रयुक्त. पैकीं युगप्रयुक्त अधर्मप्रवृत्ति ही अपरिहार्य असल्यामुळें पराशराचा यत्न त्याकरितां नाहीं. या युगास अनुसरून इंग्रजी शिक्षण घेणें, त्या शिक्षणावर चालतील ते धंदे करणें, विविध धंद्यांमध्यें पडल्यावर त्या धंद्याप्रमाणें स्पर्शास्पर्शादि विचार पाळणें, खाद्य, पेय, वर्ज्यावर्ज्य, विवाह, इत्यादि सर्व बाबतींत युग प्रयुक्त व सर्वांनाहि अपरिहार्य अशी जी अधर्मप्रवृत्ति आहे ती निर्दोष आहे असें समजूनच चाललें पाहिजे. " युगप्रयुक्तां सर्वैरपि अवर्जनीयां अधर्मप्रवृत्तिं अदोषत्वेन अभ्युपगम्य । तेषां निंदा न कर्तव्या " असें माधवाचार्य लिहितो. आज या

विसाव्या जगांत कुठेंहि हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें कलिकल्पना नाहीं. इतर राष्ट्रें शोध, सुधारणा, आकांक्षा व आक्रमण यांनीं सुसज्ज होऊन जगत् व्यापूं लागलीं आहेत व आम्ही मात्र ' कलिकलि ' म्हणून इच्छेविरुद्ध जें होईल त्याला दुबळेपणानें संमति देत आहोंत. धर्मशास्त्रकर्त्यांचें पहिलें गृहीत कृत्यच मुळीं चूक आहे. कलीमध्यें अधर्म, पाप, दुराचरण होणारच असें समजून धर्म सांगण्यास प्रारंभ झालेला दिसतो. या कलिकल्पनेचें खंडण श्री. काळे, वैद्य, करंदीकर, दप्तरी अशा विद्वानांनीं केलेलें आहे व आम्ही सुद्धां ( हिंदु समाज समर्थ कसा होईल ? ) या आमच्या ग्रंथांत त्याचें वैयर्थ्य दाखविलें आहे. तेव्हां पुनरुक्ति न करितां या विसाव्या शतकांत जगाबरोबर हिंदु समाजाला जावयाचें आहे असेंच समजून चाललें पाहिजे. आज जगामध्यें शिक्षण, विचार, कल्पना वाढत आहेत, माणसाची योग्यता वाढत आहे व प्रत्येक व्यक्तीचे कांहीं जन्मसिद्ध हक्क म्हणून आहेत असें गृहीत धरलें जात आहे. तेव्हां आजचें हें कलियुग नसून विसाव्या शतकांतील तें यंत्रयुग आहे, मंत्र व तंत्र युगांचा आतां काळ संपला असें समजावें व या युगानुरुप समाजाची पुनर्घटना करावी.

प्रत्येक युगांतील धर्म निराळा असतो युगानुरुप धर्मामध्यें बदल करण्याचा अधिकार धर्मज्ञांना असतोच. धार्मिक आचार जे पाळावयाचे तेहि आपलें शरीर, बल, काळ, देश, द्रव्य, आपली अवस्था इत्यादि सर्व ध्यानीं घेऊन तारतम्यानेंच पाळले पाहिजेत. मनुष्याची जात, बुद्धि व त्याची पूर्व परंपरा हीं सर्व ध्यानीं घेऊनच प्रायश्चित्त सांगावें असें देवल म्हणतो. प्रायश्चित्त सांगतांना दुर्बलावर अनुग्रह करणें व लोकसंग्रह करणें हें तत्त्व विसरतां उपयोगी नाहीं. दुर्बल, बाल, वृद्ध यांवर अनुग्रह न केला तर अधर्म होतो आणि दुर्बलादिकांकडून न होणारें प्रायश्चित्त सांगितलें तर समाज उत्सन्न होण्याचा प्रसंग येत असतो असें पुढें दिलेल्या अनेक स्मृतिवचनांमध्यें म्हटलेलें आहे.

शरीरं बलमायुश्च वयः कालंच कर्मच ।
समीक्ष्य धर्मवित् बुध्द्या प्रायश्चित्तानि निर्देशेत् ॥ १६

कालं देशं तथात्मानं द्रव्यं द्रव्यप्रयोजनम् ।
उपपत्तिमवस्थांच विज्ञाय शौचं ......समाचरेत् ॥ ५५ ॥ बौधायन ॥
दंडस्तु देशकाल धर्मवयोविद्यास्थानविशेषैः ॥ वसिष्ठ-राजधर्म ॥

राजानें देश, काल, धर्म, वय, विद्या व स्थानविशेष हीं ध्यानीं घेऊनच अपराध्यांना दंड करावा.

देशं कालं तथात्मानं द्रव्यं द्रव्यप्रयोजनम् ।
उपपत्तिमवस्थांच ज्ञात्वा कर्म समाचरेत् ॥ १४३ ॥ अंगिरा ॥

देशं कालं वयः शक्तिं पापंचावेक्ष्य यत्नतः ।
प्रायश्चित्तं प्रकल्प्यं स्यात् यस्य चोक्ता न निष्कृतिः ॥ अत्रि ॥

याज्ञवल्क्य अ. ३ श्लो. २९३ बरोबर वरील नक्कल आहे.
देशं कालं तथात्मानं द्रव्यं ... ... ... ...
उपपत्तिं ... ... ... धर्मं समाचरेत् ॥ यम ॥

देशं कालं वयः शक्तिं पापं चावेक्ष्य यत्नतः ।
प्रायश्चित्तं प्रदातव्यं धर्मविद्भिर्मनीषिभिः ॥ २९७ ॥ वृद्धहारित-अ. ९ ॥
जातिशक्तिगुणापेक्षं सकृत् बुद्धिकृतं तथा ।
अनुबंधादि विज्ञाय प्रायश्चित्तं प्रकल्पयेत् ॥ देवल ॥
दुर्बलेऽनुग्रहः कार्यस्तथा वै बालवृद्धयोः ।
अतोऽन्यथा भवेत् दोषः तस्मान्नानुग्रहः स्मृतः ॥ पराशर अ. ६ ॥
प्रायश्चित्तं यथोदिष्टमशक्यं दुर्बलादिभिः ।
कार्यो ह्यनुग्रहस्तेषां लोकसंग्रह कारणात् ॥ देवलः ॥

प्रत्येक युगांतहि पुनः मुख्य काल व आपत्काल असतो. मुख्य कालाप्रमाणें आपत्कालीं धर्माचरण घडत नाहीं; म्हणून त्या प्रसंगीं प्रथम काय पाहिजे तें करून जगावें. मृदु अगर दारुण मार्गांनीं स्वतःचा उद्धार प्रथम करावा आणि नंतर खुशाल धर्माचरण करावें. आपत्कालीं शौचाचाराचा विचार मुळींच करूं नये, तो काल गेल्यावर स्वस्थपणें धर्माचरण करावें. शरीर हें मुख्य आहे. त्यांतूनच धर्म पसरत असतो. काय पाहिजे तें करून शरीर जगवावें व आपत्तीचा प्रतिकार करावा असें पराशर व शंख या स्मृतिकारांचें म्हणणें आहे. तें त्यांच्याच शब्दांत देऊन प्रकरण पुरें करितों.

देशभंगे प्रवासे वा व्याधिषु व्यसनेष्वपि ।
रक्षदेव स्वदेहादि पश्चाद्धर्मं समाचरेत् ॥ ४१

येन केनच धर्मेण मृदुना दारुणेन वा ।
उद्धरेद्दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ॥ ४२
आपत्काले तु निस्तीर्णे शौचाचारांश्च चिंतयेत् ।
शुद्धिं समुद्धरेत्पश्चात्स्वस्थो धर्मं समाचरेत् ॥ ४३ ॥ पराशर (अ. ७)
तस्करश्चापदाकीर्णे बहुव्याघ्रमृगे वने ।
न व्रतं ब्राह्मणः कुर्यात्प्राणबाधभयात्तथा ॥ ६३
सर्वत्र जीवनं रक्षेज्जीवन्पापमपोहति ।
व्रतैः कृच्छ्रैश्च दानैश्च इत्याह भगवान्यमः ॥ ६४
शरीरं धर्मसर्वस्वं रक्षणीयं प्रयत्नतः ।
शरीरात् स्रवते धर्मः पर्वतात्सलिलं यथा ॥ ६५ ॥ शंख (अ. १७ )

# प्रकरण चौथें

## चार वर्णांचे व्यवहार

सनातन वैदिक धर्माचें एक मुख्य अंग वर्णाश्रमधर्म हें होय. कित्येकांच्या मतें हें अंग गौण असून तत्त्वज्ञान हेंच प्रमुख अंग होय. तत्त्वज्ञानाचें क्षेत्र फार थोड्या लोकांकरितां मोकळें असतें. म्हणून बहुजन समाजाचा समावेश ज्या एका मोठ्या सामाजिक क्षेत्रांत होतो तें क्षेत्र म्हटलें म्हणजे वर्ण व आश्रम हेंच होय. उपनयन, अध्ययन, विवाह, दान, यज्ञ, व्यवसाय, भक्ष्याभक्ष्य, भोज्याभोज्य अशा अनेक बाबींमध्यें, ज्या नियमांनीं चातुर्वर्ण्यवान् समाज वागत होता; ते नियम म्हणजेच धर्म होय, ' आचारःप्रथमो धर्मः ' याचा अर्थहि वागणुकीचे नियम हाच पहिला धर्म होय असा आहे. चार वर्णांनीं स्वतःशीं व इतरांशीं कसें वागावें, काय खावें, कोणता उद्योग करावा, वगैरे संबंधाच्या नियमांतून पुढें धारणेचा धर्म उत्पन्न होतो. ' आचारः प्रभवो धर्मः ' या वाक्याचाहि अर्थ असाच आहे. पूर्वकालीं वर्णाश्रम ही संस्था होती. त्यावेळीं तिचें स्वरूप कसें होतें ? आज ती संस्था आहे काय ? ती वर्णस्वरूपांत आहे कां जातिस्वरूपांत आहे ? भविष्य

कालांत पूर्वीप्रमाणें चातुर्वर्ण्य कधींतरी उत्पन्न होईल काय ? जर तें होणार असेल, तर त्याचें स्वरूप कसें असावें हें या प्रकरणांत पहावयाचें आहे.

**अथातः सामयाचारिकान्धर्मान्व्याख्यास्यामः ॥ १ ॥**

**धर्मज्ञसमयः प्रमाणम् ॥ २ ॥** वेदाश्च ॥ ३ ॥ आपस्तंब ( १-१-१ )

सर्व धर्मसूत्रकारांमध्यें अत्यंत प्राचीन जो आपस्तंब त्यानें धर्मज्ञांनीं ठरविलेले जे निर्णय ते प्रमाण होत असें म्हटलें आहे व अशा 'धर्मज्ञांचे जे निर्णीत धर्म तेच मी सांगतों, असाच धर्म-सूत्राचा प्रारंभ आहे. त्यानें वेदांना गौण प्रामाण्य दिलें आहे व प्रधान प्रामाण्य धर्मज्ञांना दिलें आहे, हे विशेष लक्षांत घेण्याजोगें आहे.

चत्वारो वर्णा ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः ॥ ४ ॥

तेषां पूर्वः पूर्वो जन्मतः श्रेयान् ॥ ५ ॥

अशूद्राणामदुष्टकर्मणामुपायनं वेदाध्ययनमग्न्याधेयं

फलवन्ति च कर्माणि ॥ ६ ॥ आपस्तंब ( १-१-१ )

ब्राह्मणादि चार वर्ण व ते जन्मानें एकापेक्षां एकेक श्रेष्ठ होत. अदुष्ट कर्मानें युक्त असणारे जे त्रैवर्णिक त्यांचेंच उपनयन, अध्ययन व अग्निकार्य इत्यादि कर्में फलद्रूप होत असतात. ( अर्थात् दुष्ट कर्मयुक्त द्विजांचीं वरील कर्में निष्फळ होतात, हें सिद्धच होय ! ) शूद्रानें इतर वर्णांची सेवा करावी, त्याशिवाय शिल्प वगैरे करण्यासंबंधींचा उल्लेख आपस्तंब धर्म-सूत्रांत नाहीं. आपस्तंब-कालीं शूद्र व उग्र हे समाज फार हीन स्थितीमध्यें असावेत. कारण शूद्राबद्दल आपस्तंबानें जें लिहिलें आहे, तें आज फार विपरित दिसतें. हिंदु-समाजांत आज त्रैवर्णिक-बाह्य असा समाज जास्त आहे, त्या समाजाविषयीं पूर्वीचेच नियम ठेविले तर ते सर्वस्वीं निंद्य ठरतील.

**शुश्रूषा शूद्रस्येतरेषां वर्णानाम् ॥ ७ ॥ ( १-१-१ )**
**विषमगते त्वाचार्य उग्रतः शूद्रतो वाहरेत् ॥ २० ॥**
**सर्वदा शूद्रत उग्रतो वाचार्यार्थस्याहरणं धार्म्यमित्येके ॥२१॥ ( १-२-७ )**
**सर्ववर्णानाँ स्वधर्मे वर्तमानानां भोक्तव्यं शूद्रवर्जमित्येके ॥१३॥**
**तस्यापि धर्मोपनतस्य ॥ १४ ॥ ( १-६-१८ )**

वायसप्रचलाकबर्हिणचक्रवाकहंसभासमण्डूकनकुलहिंसायाँ शूद्रवत्प्रायश्चित्तम् ॥ १३ ॥ ( १-९-२५ )
आर्याधिष्ठिता वा शूद्राः संस्कर्तारः स्युः ॥ ४ ॥ ( २-२-३ )
वध्यः शूद्र आर्यायाम् ॥ ९ ॥ ( २-१०-१७ )
जिह्वाच्छेदनं शूद्रस्यार्यं धार्मिकमाक्रोशतः ॥ १४ ॥ ( २-१०-२७ ) आपस्तंब

शूद्रानें इतर वर्णांची सेवाच करावी असें आपस्तंब म्हणतो. गुरु आपत्तीमध्यें असेल तर शिष्यानें शूद्र व उग्र यांच्याकडून द्रव्य हरण करावें. नेहमी गुरुकरितां शूद्र व उग्र यांच्याकडील द्रव्य-हरण करणें हें धर्म्य होय असें कित्येकांचें मत आहे. स्वधर्मानें वागणाऱ्या त्रैवर्णिकांच्या घरीं परस्परांनीं जेवावें, पण शूद्र-गृहीं जेवूं नये. तथापि धर्माकरितां जो शरण आलेला शूद्र असेल त्याच्या घरीं जेवण्यास हरकत नाहीं. कावळा, मोर, चक्रवाक, बेडूक, नकुल, कुत्रें यांच्या हिंसेला जें प्रायश्चित्त तेंच शूद्रहत्येला सांगितलें आहे. यावरून त्या कालीं शूद्राच्या जीविताची किंमत फारच क्षुद्र दिसते. आर्यांनी नेमलेले शूद्र, त्रैवर्णिकांच्या घरी स्वयंपाक करीत असत व तें अन्न प्रोक्षण केल्यावर ब्राह्मणांनाहि चाले. शूद्रानें आर्यस्त्रीशीं गमन केल्यास त्याला ठार करावें व शूद्र जर ब्राह्मणाला मोठ्या ऐटीनें आक्रोशपूर्वक धर्म सांगू लागेल तर त्याचा जिव्हाच्छेद करावा. शूद्रापेक्षां वैश्यांसंबंधीं जरा उदार विचार आहेत व वैश्यांपेक्षां क्षत्रियांसंबंधीं जरा वरचे विचार आहेत. तात्पर्य जन्मजात-उच्चता व नीचता आपस्तंबानें सांगितली आहे. पुढील सूत्रकारांनीं व स्मृतिकारांनीं बहुतेक आपस्तंबाचाच अनुवाद केलेला आहे. जन्मसिद्ध उच्चता व नीचता पूर्वी मानली असली तरी भावी समाज-घटनेंत तिला मुळींच स्थान मिळणार नाही. जन्मानें सर्व व्यक्ति सारख्याच असतात. गुणामुळेंच व्यक्तीला व व्यक्तीमुळें जातीला महत्त्व येतें हें तत्त्व आज सर्वमान्य झालेलें आहे.

अवरोऽप्यार्यः शूद्रेण ॥ ११ गौतम ( अ. ६ प्र. १ )
शूद्रश्चतुर्थो वर्ण एकजातिः ॥ ५१ ॥
आचमनार्थे पाणिपादप्रक्षालनमेवैके ॥ ५३ ॥
तेभ्यो वृत्तिं लिप्सेत ॥ ५८ ॥ तत्र पूर्वं पूर्वं परिचरेत् ॥ ५९ ॥
जीर्णान्युपानच्छत्रवासः कूर्चादीनि ॥ ६० ॥

उच्छिष्टाशनम् ॥ ६१ ॥ शिल्पवृत्तिश्च ॥ ६२ ॥
यं चायमाश्रयेद्भर्तव्यस्तेन क्षीणोऽपि ॥ ६३ ॥ गौतम (अ. १ प्र. २)
आर्यस्त्र्यभिगमने लिङ्गोद्धारः स्वहरणं च ॥ २ ॥
अथ हास्य वेदमुपशृण्वतस्त्रपुजतुभ्यां श्रोत्रप्रतिपूरणमुदाहरणे
जिह्वाच्छेदो धारणे शरीरभेदः ॥ ४ ॥ गौतम ( अ. ३ प्र. २ )
मण्डूकनकुलकाकबिम्बदहरमूषकश्वहिंसासु च ॥१९॥ गौ. (अ. ४ प्र. ३)

गौतमधर्मसूत्रामध्ये आर्य कितीहि कनिष्ठ असला तरी श्रेष्ठ शूद्रानें सुद्धां त्याला नमस्कार करावा. शूद्र हा एक चौथा वर्ण होय, त्यानें आर्यांना आचमन व पादप्रक्षालनाकरितां पाणी आणून द्यावें. तिन्ही वर्णांची सेवा करावी. त्यांच्या-कडून मिळालेल्या अन्नावर निर्वाह करावा. जुनीं वस्त्रें, उष्टें अन्न, फाटके जोडे, इत्यादि जे आर्य देतील त्यांवर संतोष मानावा. आर्य स्वतः दरिद्री बनला तरी त्यानें त्या शूद्राला आपत्कालांत विसरूं नये. शूद्रानें प्रसंगी शिल्पवृत्तिहि करावी, इत्यादि म्हटलें आहे. तसेंच शूद्रानें आर्य स्त्रीशीं गमन केल्यास त्याचा लिंगच्छेद करून सर्वस्व हरण करावें. तो जर वेद ऐकेल तर त्याच्या कानांत शिसें व लाख यांचा रस भरावा. वेद उच्चारल्यास जिव्हाच्छेद व पठण करून त्याचें धारण केल्यास शरीरभेद करावा म्हणजे त्याला ठार मारावें. ( या धर्माज्ञेला राजाची मान्यता होती असें दिसत नाहीं. या नुसत्या धर्माज्ञांच्या आज्ञाच असाव्यात. ) बेडुक, कावळा, उंदीर व कुत्रा इत्यादिकांच्या हिंसेला जें प्रायश्चित्त तेंच शूद्र-हत्येलाहि गौतमानें सांगितलें आहे. ( हें आज आपणास किती तरी चमत्कारिक वाटेल ). खालच्या वर्णांनीं वरच्या वर्णांची सेवा करावी. आर्यानें शूद्रीशीं गमन केलें तर तो पतित होतो. शूद्रानेंहि ( अमंत्रक ) श्राद्ध करावें. आपल्या स्त्रीचें व परिवाराचें पोषण करावें. वरच्या वर्णांतील स्त्रियांशीं शूद्रानें संबंध ठेवला तर त्याला कडक शिक्षा करावी.

चत्वारो वर्णा ब्राह्मणक्षत्रियविट्शूद्राः ॥ १ ॥
तेषां वर्णानुपूर्व्येण चतस्रो भार्या ब्राह्मणस्य ॥ २ ॥
तिस्रो राजन्यस्य ॥ ३ ॥ द्वे वैश्यस्य ॥ ४ ॥
एका शूद्रस्य ॥ ५ ॥ बोधायन-( प्र. १ अ. ८ )
षड्भागभृतो राजा रक्षेत्प्रजाम् ॥ १ ॥

ब्रह्म वै स्वं महिमानं ब्राह्मणेष्वदधादध्ययनाध्यापन-
यजनयाजनदानप्रतिग्रहसंयुक्तं वेदानां गुप्त्यै ॥ २ ॥
क्षत्रे बलमध्ययनयजनदानशस्त्रकोशभूतरक्षणसंयुक्तं
क्षत्रस्य वृद्ध्यै ॥ ३ ॥
विट्स्वध्ययनयजनदानकृषिवाणिज्यपशुपालनसंयुक्तं
कर्मणां वृद्ध्यै ॥ ४ ॥
शूद्रेषु पूर्वेषां परिचर्यां ॥ ५ ॥ बौधायन
अवध्यो वै ब्राह्मणः सर्वापराधेषु ॥ १८ ॥ बौ. ( प्र. १ अ. १० )
अयन्त्रितकलत्रा हि वैश्यशूद्राभवन्ति ॥ १५ ॥
कर्षणशुश्रूषाधिकृतत्वात् ॥ १६ ॥ बौ. ( प्र. १ अ. ११ )
स्त्रीशूद्रैर्नाभिभाषेत ॥ २३ ॥ बौ. ( प्र. ३ अ. ८ )
स्त्रीशूद्रैर्नाभिभाषेत ब्रह्मचारी हविर्व्रतः ॥ ४ ॥
अध्यापनयाजनप्रतिग्रहैरशक्तः ।
क्षत्रधर्मेण जीवेत्प्रत्यनन्तरत्वात् ॥ ७७ ॥
अथाप्युदाहरन्ति ॥ ७९ ॥
गवार्थे ब्राह्मणार्थे वा वर्णानां वाऽपि संकरे ।
गृह्णीयातां विप्रविशौ शस्त्रं धर्मव्यपेक्षया ॥८०॥ बौ. ( प्र. ४ अ. ५ )
वैश्यवृत्तिरनुष्ठेया प्रत्यनन्तरत्वात् ॥ ८३ ॥ बौ. ( प्र. २ अ. २ )
तिस्रो ब्राह्मणस्य भार्या वर्णानुपूर्व्येण,
द्वे राजन्यस्य, एकैका वैश्यशूद्रयोः ॥ २४ ॥
शूद्रामप्येके, मन्त्रवर्जं तद्वत् ॥ २५ ॥ तथा न कुर्यात् ॥ २६ ॥
अतोहि ध्रुवः कुलापकर्षः प्रेत्य चास्वर्गः ॥ २७ ॥ वसिष्ठ ( अ. १ )
एतेषां परिचर्या शूद्रस्य ॥ २४ ॥
अनियता वृत्तिः ॥ २५ ॥ वसिष्ठ ( अ. २ )
शूद्रान्नरसपुष्टाङ्गो ह्यधीयानोऽपि नित्यशः ।
जुह्वन्वाऽपि जपन्वाऽपि गतिमूर्ध्वां न विन्दति ॥ २५ ॥
शूद्रान्नेनोदरस्थेन यः कश्चिन्म्रियते द्विजः ।
स भवेत्सूकरो ग्राम्यस्तस्य वा जायते कुले ॥ २६ ॥

शूद्रान्नेन तु भुक्तेन मैथुनं योऽधिगच्छति ।
यस्यान्नं तस्य ते पुत्रा नच स्वर्गार्हको भवेत् ॥ २७ ॥ वसिष्ठ (अ. ६)

एके वैतच्छ्मशानं ये शूद्रास्तस्माच्छूद्रसमीपे नाध्येतव्यम् ॥ ९ ॥
अथापि यमगीताञ्श्लोकानुदाहरन्ति ॥ १० ॥
श्मशानमेतत्प्रत्यक्षं ये शूद्राः पापचारिणः ।
तस्माच्छूद्रसमीपे तु नाध्येतव्यं कदाचन ॥ ११ ॥
न शूद्राय मतिं दद्यान्नोच्छिष्टं न हविष्कृतम् ।
न चास्योपदिशेद्धर्मं न चास्य व्रतमादिशेत् ॥ १२ ॥ वसिष्ठ (अ. १८)

गायत्र्या छन्दसा ब्राह्मणमसृजत्त्रिष्टुभा राजन्यं, जगत्या वैश्यं, न केनचिच्छन्दसा शूद्रमित्यसंस्कार्यो विज्ञायते ॥ ३ ॥ वसिष्ठ ( अ. ४ )

ब्राह्मणस्य अध्यापनम्, क्षत्रियस्य शस्त्रनित्यता
वैश्यस्य पशुपालनम्, शूद्रस्य द्विजातिशुश्रूषा
शूद्रस्यसर्वशिल्पानि । आपद्यनंतरा वृत्तिः । विष्णु ( अ. २ )

अथमहापातकिनो ब्राह्मणवर्ज्यं सर्वे वध्याः । न शारीरो ब्राह्मणस्य दंडः।
दर्पेण धर्मोपदेशकारिणो राजा तप्तं मासेचयेत् तैलमास्ये ॥ वि. अ. ५
ब्राह्मणानां प्रसादेन दिवि तिष्ठन्ति देवताः ।
ब्राह्मणाभिहितं वाक्यं न मिथ्या जायतेक्वचित् ॥ २२ ॥ वि. अ. १९

अथब्राह्मणस्य वर्णानुक्रमेण चतस्रोभार्या भवन्ति ।
तिस्रः क्षत्रियस्य, द्वे वैश्यस्य, एकाशूद्रस्य ॥ विष्णु ( अ. २४ )
द्विजस्य शूद्रा भार्या न धर्मार्थे भवेत् कामुरत्यर्थमेव ॥ विष्णु अ. २६
मातुरग्रे विजननम् । द्वितीये मौंजिबंधनम् ।
प्राङ् मौंजिबंधनात् द्विजः शूद्रसमोभवति ॥ विष्णु ( अ. २८ )
यस्तु उपनीय व्रतादेशं कृत्वावेदमध्यापयेत् तमाचार्यं विद्यात् । अ.२९
आर्धिकः कुलमित्रंच दासगोपालनापिताः ।
एते शूद्रेषु भोज्यान्ना यश्चात्मानं निवेदयेत् ॥ विष्णु ( अ. ५७ )
न वेदपाठमात्रेण संतुष्टो वै द्विजोत्तमः ।
पाठमात्रावसानस्तु पङ्के गौरिव सीदति ॥ ८१ ॥

योऽधीत्य विधिवद्वेदं वेदान्तं न विचारयेत् ।
स सान्वयः शूद्रकल्पः स पाद्यं न प्रपद्यते ॥८२॥ उशनःसंहिता (अ.३)
शूद्रस्य द्विजशुश्रूषा सर्वशिल्पानि वाप्यथ ।
क्षमा सत्यं दमः शौचं सर्वेषामविशेषतः ॥ ५ ॥ शंख (अ. १)
गर्भाष्टमे कुर्वीत ब्राह्मणस्योपनायनम् ॥ ६
गर्भादेकादशे राज्ञो गर्भात्द्वादशमे विशः ।
विज्ञातव्यास्त्रयोऽप्येते यथाकालमसंस्कृताः ।
सावित्रीपतिता व्रात्याः सर्व-धर्मबहिष्कृताः ॥ ९ ॥ शंख (अ. २)

आपस्तंब व गौतम यानंतर बौधायनापासून मनूपर्यंत एक टप्पा पडतो. म्हणून त्यांच्या ग्रंथांत चातुर्वर्ण्याच्या संबंधानें काय उल्लेख आहेत हें पाहूं !

वर्ण चार आहेत. ब्राह्मणाला चार वर्णांच्या, क्षत्रियाला तीन, वैश्याला दोन, व शूद्राला एकच वर्णाची स्त्री करण्याचा अधिकार आहे. ब्राह्मणानें अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह, यजनयाजन इत्यादि षट्कर्मे करावींत. क्षत्रियानें अध्ययन, यजन, दान हीं त्रिकर्मे करून, बल, शस्त्र, कोश व भूतरक्षण याकडेहि लक्ष्य द्यावें. वैश्यानें अध्ययनादि त्रिकर्मे करून कृषि, वाणिज्य व पशु-पालन यांनींहि युक्त असावें. शूद्रानें फक्त तीन्ही वर्णांची सेवाच करावी. ब्राह्मणानें सर्व अपराध केले तरी तो अवध्य होय ! वैश्य व शूद्र यांच्या स्त्रियांवर त्यांचें स्वतःचें नियंत्रण राहूं शकत नाहीं. कृषि व शुश्रूषा या कामामुळें हे लोक पराधीन असतात. ( जितकी अनुदारता शूद्राविषयीं प्राचीन ग्रंथांत आहे तितकीच ती स्त्रियांविषयींहि आहे. स्त्रिया व शूद्र यांचे उल्लेख जेथें तेथें अगदीं सारखे आलेले आहेत. ) स्त्री-शूद्रांशीं व्रतप्रसंगीं भाषण करूं नये, हविर्व्रत धारण करणाऱ्या ब्रह्मचर्यानें स्त्रीशूद्र-संबंध टाळावा. ब्राह्मणाचा निर्वाह अध्यापन, याजन व प्रतिग्रहावर जर होत नसेल, तर त्यानें क्षात्रवृत्तीनें जगावें. कारण तीच त्याला जवळची आहे. गोब्राह्मण व वर्णसंकर प्रसंगीं ब्राह्मण आणि वैश्य ह्यांनीं धर्मरक्षणार्थ शस्त्रें धारण करावींत. क्षात्रवृत्तीवर निर्वाह न होईल तर वैश्य वृत्ति करावी, असें बौधायनाचें मत आहे.

वसिष्ठाचें मतहि जवळजवळ बौधायनाप्रमाणेंच आहे. ब्राह्मणानें स्ववर्णाशिवाय इतर तीन वर्णांच्या स्त्रिया कराव्यात, क्षत्रियानें स्ववर्णाशिवाय इतर दोन वर्णांच्या

कराव्या व वैश्यशूद्रांनीं फक्त स्ववर्णांच्याच एकेक स्त्रिया कराव्यात. शूद्रस्त्रीशीं विवाह अमंत्रक करावा. शूद्रस्त्रीशीं विवाह केल्यानें कुलापकर्ष होतो व मेल्यावर दुर्गति प्राप्त होते. चार वर्णांचीं मुख्य कर्मे वसिष्ठानें बोधायनाप्रमाणेंच सांगितलीं आहेत. शूद्रानें फक्त सेवाच करावी, पण तिचेंहि स्वरूप निश्चित नाहीं, असें वसिष्ठ म्हणतो. वसिष्ठानें शूद्रासंबंधीं पुष्कळच लिहिलें आहे. शूद्रान्न सेवन करून पुष्टांग झालेला, जप व हवन करणारा विद्वान् विप्र सुद्धां उच्च गतीला जात नाहीं. शूद्रान्न पोटांत असतांनाच जो द्विज मरतो, तो ग्राम्यसूकर होतो. शूद्रान्न सेवन करून जो स्त्रीसंभोग करतो, त्याचीं मुलें हीं शूद्राचींच समजावीं. ( कारण ज्याचें अन्न त्याचे पुत्र. ) हे पुत्र स्वर्गार्ह होत नाहींत. वसिष्ठानें एक मत म्हणून यमगीतेच्या आधारानें पुढील प्रमाण दिलेलें आहे. शूद्र हा स्मशान आहे, म्हणून त्याच्या समीप अध्ययन करूं नये. पापचारी शूद्र म्हणजे प्रत्यक्ष स्मशान होय. त्याच्या समीप अध्ययन तर करूं नयेच, पण त्याला व्रत, धर्म, बुद्धि हीं कांहींच सांगूं नयेत. त्याला उच्छिष्ट हवीसुद्धां देऊं नये. ब्रह्मदेवानें इतर वर्णांना गायत्री त्रिष्टुभ व जगती छंदानें निर्माण केलें. परंतु शूद्रोत्पत्तीला कोणत्याहि वेदऋचीची जरूर पडली नाहीं. म्हणून शूद्र हा असंस्कार्य होय ! वसिष्ठानें दिलेले शूद्रासंबंधाचे नियम पाहिले म्हणजे शूद्र हा त्या कालीं अत्यंजासमान अर्थात् ( अंते जातः ) शेवटीं जन्मला म्हणून अंत्यजच असावा. त्या वेळचा शूद्र व आजचा शूद्र हा एक नाहीं. शिक्षण, संस्कृति आणि इतर सुधारणांमुळें तो शूद्रहि वर आलेला आहे.

विष्णुधर्मसूत्रामध्यें ब्राह्मणानें अध्यापन, क्षत्रियानें शस्त्रग्रहण, वैश्यानें पशुपालन आणि शूद्रानें सेवा व सर्व शिल्पेंहि करावीं असें म्हटलें आहे. आपत्कालामध्यें प्रत्येकानें जवळची वृत्ति करावी. ब्राह्मण सोडून इतर सर्व महापातकी वध्य होत. ब्राह्मणाला शारीरदंड करूं नये. मोठ्या तोऱ्यानें ब्राह्मणाला जो धर्माच्या गोष्टी सांगूं लागेल, त्याच्या तोंडांत राजानें तापलेलें तेल ओतावें. ब्राह्मणाच्या प्रसादानें आकाशांत देवता वास करितात, म्हणूनच त्याचें वाक्यहि मिथ्या होत नाहीं. प्रत्येक वरच्या वर्णानें आपल्याशिवाय इतर वर्णांच्या स्त्रिया कराव्यात, हें विष्णूनें बौधायनाप्रमाणेंच सांगितलें आहे. मात्र द्विजाला शूद्रभार्या ही धर्माकरितां विहित नसून ती संभोगाकरितांच आहे, असें समजावें. द्विज म्हणजे दोनदां जन्मणारे. मौंजीबंधनानंतर द्विजांचा दुसरा जन्म होतो. त्यापूर्वीं द्विज हा

शूद्रसमच असतो. उपनयन करून जो व्रत सांगेल व वेद शिकवील, तोच आचार्य होय ! ( शूद्रान्नाचा निषेध सर्वांनीं केलेलाच आहे. तथापि आपस्तंब धर्माकरितां शरण आलेला शूद्र हा भोज्यान्न, असें जसें म्हणतो तसेंच पुढील स्मृतिकारांनीं अपवाद म्हणून सहा शूद्र भोजनास योग्य ठरविले आहेत. ) अर्धेलीनें शेत करणारा, कुलमित्र, दास, गोपाल, नापित हे सर्व आणि जो, " मी आपला आहे असें म्हणेल " तो भोज्यान्न होय !

उशनः संहितेमध्यें केवळ वेदमात्र-पठण करून ब्राह्मणानें संतुष्ट राहूं नये, वेदांताचा विचार करावा, तसें न केल्यास तो शूद्र होतो व तो अर्घ्य व पाद्य यांना पात्र होत नाहीं, असें म्हटलें आहे. त्यावरून ब्राह्मण तेव्हां नुसतें वेदपठणच करीत होते व इतरत्र त्यांचें लक्ष नसे. म्हणून त्यांनीं वेदांत-विचारहि करावा असा इषारा उशनसानें दिलेला आहे.

शंखस्मृतीमध्यें चार वर्णांचे सामान्यधर्म सांगून शूद्रानें शिल्प किंवा शुश्रूषा करावी, असें म्हटलें आहे. या विकल्पावरून शूद्र हा द्विजसेवेंतून बाहेर पडून विविध शिल्पामध्यें लक्ष घालीत होता, असें दिसतें. क्षमा, सत्य, दम, शौच हे सर्वांचे अविशेषानें धर्म होत ! शंखानें द्विजांचा उपनयनकाल इतरांप्रमाणेंच सांगितला आहे. द्विज जर यथाकालीं उपनीत न झाले तर ते सावित्रीपतित, व्रात्य व सर्व धर्म बहिष्कृत असें समजावें. ( पातित्य, हें संस्कारांच्या अपूर्णत्वानें येतें आणि अविहित कर्मांमुळेंहि येतें. आजचा द्विज-समाज या दोन्हीहि दृष्टीनें पतित नाहीं काय ? )

आपस्तंब, गौतम, बौधायन, वसिष्ठ, विष्णु, उशनस व शंख यांच्या वचनांवरून चतुर्वर्णांची स्थिति काय होती ती पाहिली. आतां मनूपासून देवला-पर्यंत या व्यवस्थेंत कायकाय उलाढाली झाल्या हें पहाणें आवश्यक आहे. अलिकडचें टोंक देवल व प्राचीन टोंक आपस्तंब होय. बरोबर मध्यें साधारणतः मनु हा पडतो. म्हणून त्याचें म्हणणें प्रथमतः सविस्तर काय आहे, हें पाहिलें पाहिजे. मनूनंतर झालेल्या स्मृतिकारांनीं बहुतेक मनूचीच री ओढलेली आहे. म्हणून पुढील स्मृतिकारांचीं वचनें फारशी न देतां मनूपेक्षां त्यांत जो निराळेपणा असेल, तेवढ्याच अर्थाचीं वचनें पुढें देऊं. प्रथम मनुस्मृतींतील वचनें उद्धृत करतों.

लोकानां तु विवृद्ध्यर्थं मुखबाहूरुपादतः ।
ब्राह्मणं क्षत्रियं वैश्यं शूद्रं च निरवर्तयत् ॥ ३१ ॥
अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहं चैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥ ८८ ॥
एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् ।
एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ॥ ९१ ॥
उत्तमाङ्गोद्भवाज्ज्यैष्ठ्याद्ब्रह्मणश्चैव धारणात् ।
सर्वस्यैवास्य सर्गस्य धर्मतो ब्राह्मणः प्रभुः ॥ ९३ ॥
उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिर्धर्मस्य शाश्वती ।
स हि धर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ९८ ॥
ब्राह्मणो जायमानो हि पृथिव्यामधि जायते ।
ईश्वरः सर्वभूतानां धर्मकोशस्य गुप्तये ॥ ९९ ॥
सर्वं स्वं ब्राह्मणस्येदं यत्किंचिज्जगतीगतम् ।
श्रैष्ठ्येनाभिजनेनेदं सर्वं वै ब्राह्मणोऽर्हति ॥ १०० ॥
स्वमेव ब्राह्मणो भुङ्क्ते स्वं वस्ते स्वं ददाति च ।
आनृशंस्याद्ब्राह्मणस्य भुञ्जते हीतरे जनाः ॥ १०१ ॥ मनु-अ. १

ब्राह्मणं कुशलं पृच्छेत्क्षत्रबन्धुमनामयम् ।
वैश्यं क्षेमं समागम्य शूद्रमारोग्यमेवच ॥ १२७ ॥
विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यं क्षत्रियाणां तु वीर्यतः ।
वैश्यानां धान्यधनतः शूद्राणामेव जन्मतः ॥ १५५ ॥
न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः ।
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥ १५६ ॥
संमानाद्ब्राह्मणो नित्यमुद्विजेत विषादिव ।
अमृतस्येव चाकाङ्क्षेदवमानस्य सर्वदा ॥ १६२ ॥ मनु-अ. २

सवर्णाग्रे द्विजातीनां प्रशस्ता दारकर्मणि ॥
शूद्रैव भार्या शूद्रस्य सा च स्वा च विशःस्मृते ।
ते च स्वा चैव राज्ञश्च ताश्च स्वाचाग्रजन्मनः ॥ १३ ॥

न ब्राह्मणक्षत्रिययोरापद्यपि हि तिष्ठतोः ।
कस्मिंश्चिदपिवृत्तान्ते शूद्रा भार्योपदिश्यते ॥ १४ ॥
शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् ।
जनयित्वा सुतं तस्यां ब्राह्मण्यादेव हीयते ॥ १७ ॥
अनिन्दितैः स्त्रीविवाहैरनिंद्या भवति प्रजा ।
निन्दितैर्निन्दिता नृणां तस्मान्निन्द्यान्विवर्जयेत् ॥ ४२ ॥
न ब्राह्मणस्य त्वतिथिगृहे राजन्य उच्यते ।
वैश्यशूद्रौ सखा चैव ज्ञातयो गुरुरेवच ॥ ११० ॥ मनु–अ. ३
अद्रोहणैव भूतानामल्पद्रोहेण वा पुनः ।
या वृत्तिस्तां समास्थाय विप्रो जीवेदनापदि ॥ २ ॥
यात्रामात्रप्रसिद्ध्यर्थं स्वैः कर्मभिरगर्हितैः ।
अक्लेशेन शरीरस्य कुर्वीत धनसंचयम् ॥ ३ ॥
न शूद्राय मतिं दद्यान्नोच्छिष्टं न हविष्कृतम् ।
न चास्योपदिशेद्धर्मं न चास्य व्रतमादिशेत् ॥ ८० ॥
क्षत्रियं चैव सर्पं च ब्राह्मणं च बहुश्रुतम् ।
नावमन्येत वै भूष्णुः कृशानपि कदाचन ॥ १३५ ॥
नाद्याच्छूद्रस्य पक्वान्नं विद्वानश्राद्धिनो द्विजः ।
आददीताममेवास्मादवृत्तावेकरात्रिकम् ॥ २२३ ॥
आर्धिकः कुलमित्रं च गोपालो दासनापितौ ।
एते शूद्रेषु भोज्यान्ना यश्चात्मानं निवेदयेत् ॥ २५३ ॥ मनु–अ. ४
म्रियमाणोऽप्याददीत न राजा श्रोत्रियात्करम् ।
नच क्षुधास्य संसीदेच्छ्रोत्रियो विषये वसन् ॥ १३३ ॥
यस्य राज्ञस्तु विषये श्रोत्रियः सीदति क्षुधा ।
तस्यापि तत्क्षुधा राष्ट्रमचिरेणैव सीदति ॥ १३४ ॥ मनु–अ. ७
यदा स्वयं न कुर्यात्तु नृपतिः कार्यदर्शनम् ।
तदा नियुञ्ज्याद्विद्वांसं ब्राह्मणं कार्यदर्शने ॥ ९ ॥
जातिमात्रोपजीवी वा कामं स्याद्ब्राह्मणब्रुवः ।
धर्मप्रवक्ता नृपतेर्न तु शूद्रः कथंचन ॥ २० ॥

शूद्रं तु कारयेत्दास्यं क्रीतमक्रीतमेव वा ।
दास्यायैव हि सृष्टोऽसौ ब्राह्मणस्य स्वयंभुवा ॥ ४१३ ॥

शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते ।
द्विजातीनां च वर्णानां विप्लवे कालकारिते ॥ ३४८ ॥

आत्मनश्च परित्राणे दाक्षिणानां च संगरे ।
स्त्रीविप्राभ्युपपत्तौ च घ्नन्धर्मेण न दुष्यति ॥ ३४९ ॥ मनु–अ. ८

अविद्वांश्चैव विद्वांश्च ब्राह्मणो दैवतं महत् ॥ ३१७
एवं यद्यप्यनिष्टेषु वर्तन्ते सर्व कर्मसु ।
सर्वथाः ब्राह्मणाः पूज्याः परमं दैवतं हि तत् ॥ ३१९ ॥
विप्राणां वेदविदुषां गृहस्थानां यशस्विनाम् ।
शुश्रूषैव तु शूद्रस्य धर्मो नैश्रेयसः परः ॥ ३३४ ॥
शुचिरुत्कृष्टशुश्रूषुर्मृदुवागनहंकृतः ।
ब्राह्मणाद्याश्रयो नित्यमुत्कृष्टां जातिमश्नुते ॥ ३३५ ॥ मनु. अ. ९
सर्वेषां ब्राह्मणो विद्याद्वृत्त्युपायान्यथाविधि ।
प्रब्रूयादितरेभ्यश्च स्वयं चैव तथा भवेत् ॥ २ ॥
वैशेष्यात्प्रकृतिश्रैष्ठ्यान्नियमस्यच धारणात् ।
संस्कारस्य विशेषाच्च वर्णानां ब्राह्मणः प्रभुः ॥ ३ ॥
ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः ।
चतुर्थ एकजातिस्तु शूद्रोनास्ति तु पञ्चमः ॥ ४ ॥
नाध्यापनाद्याजनाद्वा गर्हिताद्वा प्रतिग्रहात् ।
दोषो भवति विप्राणां ज्वलनाम्बुसमा हिते ॥ १०३ ॥
विद्या शिल्पं भृतिः सेवा गोरक्ष्यं विपणिः कृषिः ।
धृतिर्भैक्ष्यं कुसीदं च दश जीवनहेतवः ॥ ११६ ॥
विप्रसेवैव शूद्रस्य विशिष्टं कर्म कीर्त्यते ।
यदतोऽन्यद्धि कुरुते तद्भवत्यस्य निष्फलम् ॥ १२३ ॥
उच्छिष्टमन्नं दातव्यं जीर्णानि वसनानि च ।
पुलाकाश्चैव धान्यानां जीर्णाश्चैव परिच्छदाः ॥ १२५ ॥

न शूद्रे पातकं किंचिन्न च संस्कारमर्हति ।
नास्याधिकारो धर्मेऽस्ति न धर्मात्प्रतिषेधनम् ॥ १२६ ॥

यथायथा हि सद्वृत्तमातिष्ठत्यनसूयकः ।
तथातथेमं चामुं च लोकं प्राप्नोत्यनिन्दितः ॥ १२८ ॥

शक्तेनापि हि शूद्रेण न कार्यो धनसंचयः ।
शूद्रो हि धनमासाद्य ब्राह्मणानेव बाधते ॥ १२९ ॥ मनु-अ. १०

न ब्राह्मणोऽवेदयेत किंचिद्राजनि धर्मवित् ।
स्ववीर्येणैव ताञ्छिष्यान्मानवानपकारिणः ॥ ३१ ॥

स्ववीर्याद्राजवीर्याच्च स्ववीर्यं बलवत्तरम् ।
तस्मात्स्वेनैव वीर्येण निगृह्णीयादरीन्द्विजः ॥ ३२ ॥

मार्जारनकुलौ हत्वा चाषं मण्डूकमेव च ।
श्वगोधोलूककाकांश्च शूद्रहत्याव्रतं चरेत् ॥ १३१ ॥

अवगूर्य त्वब्दशतं सहस्रमभिहत्य च ।
जिघांसया ब्राह्मणस्य नरकं प्रतिपद्यते ॥ २०६ ॥ मनु-अ. ११

ब्रह्मदेवानें लोकांच्या वृद्धीकरतां ब्राह्मणादि चार निर्माण केले. ब्राह्मणानें षट्कर्मे करावींत. शूद्रानें असूयारहित होऊन इतरांची सेवा करावी. कारण त्याला तेंच कर्म ब्रह्मदेवानें सांगितलें आहे. मुखापासून जन्म, वडीलपणा आणि वेदांचें धारण यामुळें या सृष्टींत धर्मतःच ब्राह्मण हा प्रभु होय ! ब्राह्मण म्हणजे मूर्तिमंत धर्मच होय ! तो धर्माकरितांच उत्पन्न केलेला आहे. म्हणून त्याची योग्यता ब्रह्माबरोबरीची आहे. ब्राह्मण हा जन्मला कीं पृथ्वींत सर्व कांहीं जन्माला येतें. सर्व भूतांचा धर्मकोश रक्षण करणारा ब्राह्मण हा ईश्वर होय. हें सर्व जें आहे तें ब्राह्मणाचें आहे. जगांतील सर्व वस्तूंना ब्राह्मण हा पात्र आहे. ब्राह्मण नेहमीं स्वतःचेंच खातो. स्वतःच्याच ठिकाणीं रहातो व स्वतःचेंच देतो. त्याच्या कृपेमुळेंच इतरांना थोडेंबहुत खावयास मिळतें. ( अध्याय १ )

( ब्राह्मणांचा मोठेपणा व त्या मानानें इतरांचा हीनपणा हा बारीकसारीक व्यवहारांतहि पूर्व-ग्रंथांत पुष्कळ दाखविला आहे पण तो विस्तार-भयास्तव देतां येत नाहीं. मुंज, दंड, मेखला, वस्त्र, आचमन, पाणी, आशीर्वाद,

एकमेकांशीं बोलणें अशा अनेक बाबतींत चार वर्णांचे नियम उच्चनीचता दर्शक आहेत. पण त्या काळीं ही व्यवस्था सर्वमान्य होती.

ब्राह्मणाला कुशल, क्षत्रियाला अनामय, वैश्याला शूद्र व शूद्राला आरोग्य विचारावें म्हणजे एकमेकांचे भेटींत वरील शब्दांनीं त्यांची विचारपूस करावी. ब्राह्मणांमध्यें विद्वान्, क्षत्रियांमध्यें वीर्यवान्, वैश्यामध्यें धनवान् व शूद्रांमध्यें म्हातारा मनुष्य श्रेष्ठ समजावा. टक्कल पडलेला मनुष्यच वृद्ध असतो असें नाहीं, तर वयानें लहान असून ज्ञानानें जो वृद्ध होतो, तोहि वृद्ध समजावा. ब्राह्मणानें मान हा विषासारखा व अवमान हा अमृतासारखा समजावा.

( अध्याय २ )

सवर्ण स्त्री करणें हेंच द्विजांना प्रशस्त होय. इतरवर्णीय स्त्रिया करणें हें एकंदरींत गौणच होय. शूद्राला एक, वैश्याला दोन, क्षत्रियाला तीन व ब्राह्मणाला चार वर्णांच्या स्त्रिया करण्याचा अधिकार आहे. एकंदरींत कोणच्याहि स्थितींत शूद्र भार्येचा उपदेश केलेला नाहीं. शूद्र स्त्रीशीं संबंध ठेवणारा ब्राह्मण अधोगतीला जातो व त्याचा पुत्रहि ब्राह्मण्यापासून भ्रष्ट होतो. एकंदरींत निंद्य विवाह वर्ज्य करावेत. निंद्य विवाहापासून होणारी प्रजा निंद्यच होते. ब्राह्मणाच्या घरांत क्षत्रिय, वैश्य हे अतिथी होऊं शकत नाहींत. ब्राह्मणानें आपत्ती नसतांना बिन भानगडीचा किंवा कमी भानगडीचाच धंदा स्वीकारावा. ज्या धंद्यांत त्याला व लोकाला फार त्रास होईल असा धंदा त्यानें वर्जावा. अनिंदित कर्मानें निर्वाहापुरतें मिळवावें, फारशी शरीरपीडा न करितां ब्राह्मणानें धनसंचय करावा. शूद्रसंबंध शक्य तितका टाळावा. त्याच्या समीप मोठ्यानें अध्ययन करूं नये. त्याला धर्म, व्रत, मति इत्यादि सांगूं नयेत. ( वसिष्ठ म्हणतो कीं शूद्रसमीप अध्ययनच करूं नये. तर मनु म्हणतो कीं त्याला न कळेल असें अध्ययन करावें. त्यावरून वसिष्ठकालीं दूर असलेला शूद्र मनुकालीं जवळजवळ येऊं लागला होता. ) क्षत्रिय, साप व विद्वान् ब्राह्मण आणि अग्नि यांचा अवमान कधींहि करूं नये. शूद्राच्या घरचें पक्व अन्न खाऊं नये. प्रसंगच आला तर, एक रात्रीपुरतें कच्चें अन्न ग्रहण करावें. शूद्रांपैकीं आर्धिक, कुलमित्र, दास, गोपाल व नापित हे भोज्यान्न होत. हे मनूप्रमाणें पुढें याज्ञवल्क्य, पराशर, अत्रि, आंगिरस इत्यादि सर्व स्मृतिकारांनीहि म्हटलें आहे.

( अध्याय ३–४ )

राजानें कोणत्याहि स्थितींत श्रोत्रियांपासून कर घेऊं नये. राजाच्या देशांत विद्वान् ब्राह्मण भुकेनें व्याकूळ नसावा. तशी स्थिति ब्राह्मणाला आल्यास, त्या राष्ट्रावरहि दुर्भिक्ष-प्रसंग ओढवतो. ( राजानें शिल्पकारांकडून प्रत्येक महिन्याला वेठ म्हणून एकेक दिवस फुकट काम करुन घ्यावें ). राजानें स्वतः न्यायनिवाडा न करतां त्या कामावर विद्वान् ब्राह्मण नेमावेत. धर्म सांगणारा अगदीं शंख असा ब्राह्मण असला तरी चालेल. परंतु शूद्राला धर्मप्रवक्ता म्हणून कधींच नेमूं नये. ऋणको शूद्राला धनकोची सेवाच करावयाला लावावें. कारण ब्रह्मदेवानें त्याला सेवेकरितांच उत्पन्न केलें आहे. धर्माचा उपरोध जेथें होईल व वर्ण-विप्लवाचा प्रसंग येईल त्यावेळीं आणि स्वसंरक्षणार्थ द्रव्य, स्त्रिया इत्यादींच्या रक्षणाकरितां ब्राह्मणानें शस्त्रधारण करावें. त्यावेळीं जरी हत्या केली तथापि दोष लागत नाहीं.

( अध्याय ७।८ )

विद्वान्, अविद्वान्, कसलाहि ब्राह्मण असला व तो कसलींहि बरी वाईट कर्में करीत असला, तथापि तो पूज्य होय! वेदवेत्त्या, कुटुंबवत्सल विप्रांची सेवा शूद्रानें करावी व त्यांतच त्याचा मोक्ष आहे. शुद्धाचारी व उत्कृष्ट सेवक, निगर्वी, मधुर भाषी असा शूद्र त्रैवर्णिकांच्या आश्रयामुळें उत्कृष्ट जातीप्रत प्राप्त होतो.

ब्राह्मणानें सर्वांच्या वृत्तींचा विचार करावा. त्यांना त्यांचे धर्म सांगावेत व स्वतःहि तसें वागावें. वैशिष्ट्य, मुखापासून जन्म आणि नियमांची धारणा, यांमुळें व संस्कार विशेषामुळें ब्राह्मण हा श्रेष्ठ होय. ब्राह्मणादि तीन वर्ण हे द्विजाति व चौथा वर्ण शूद्र होय. पांचवी जात किंवा वर्णहि अस्तित्वांत नाहीं. अध्यापन, याजन व असत्प्रतिग्रह यांमुळें आपत्कालीं ब्राह्मणांना दोष लागत नाहीं. कारण ते अग्नि व उदकवत् पवित्र आहेत. आपत्कालीं वैद्यकी, ज्योतिष या विद्या, कला-कौशल्य, भाड्यानें कामें करणें, नोकरी, कृषी, व्यापार, भिक्षा व व्याजबट्टा इत्यादि करुनहि निर्वाह करावा. शूद्रानें मात्र सेवाच करावी; ती न केल्यास त्याचें प्रत्येक कर्म निष्फळ होतें. शूद्राला उष्टें अन्न, जुनीं वस्त्रें, धान्यांतला कोंडा असें सर्व द्यावें. त्याच्या ठिकाणीं पातक नाहीं, संस्कार नाहीं व त्याला कसलाहि धार्मिक विधिनिषेध नाहीं. शूद्र हा जसजसा निर्मत्सर व असूयारहित होतो, तसतसा तो उत्तम लोकास जातो. शूद्र समर्थ झाला तरी त्यानें द्रव्यसंग्रह न करावा. कारण द्रव्यामुळें तो ब्राह्मणांना त्रास देऊं लागेल. ( अध्याय ९।१० )

ब्राह्मणानें आपल्या संबंधीं कोणतीहि तक्रार राजाकडे करूं नये. अपकार करणाऱ्यांना त्यानें आपल्या पराक्रमानेंच शासन करावें. स्ववीर्य आणि राजवीर्य यांपैकीं स्ववीर्य हेंच बलवत्तर म्हणून स्वतःच अरींचें निर्मूलन करावें. ब्राह्मणाकडून शूद्रहत्या झाल्यास त्यानें मार्जार, नकुल, मंडूक, काक यांच्या हत्येला जें प्रायश्चित्त सांगितलेलें असेल तेंच करावें. ब्राह्मणावर दंड उगारला किंवा मारण्याच्या हेतूनें त्याचा तडाखा दिला तर तसें करणाऱ्याला नरकप्राप्ति होते. ( अध्याय ११ )

मनु हा क्षत्रिय राजा होता. त्याच्या शिष्यानें ही स्मृति सांगितली असली तरी तीमध्यें मनूचे विचार मुळींच नाहींत असें म्हणतां येणार नाहीं. मनूनें ब्राह्मणांचें स्तोम उगीच वाढविलेलें असेल असें शक्य नाहीं. निदान त्या कालांत ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व सर्व दृष्टीनें तसें होतें, यांत शंका नाहीं. तो धर्मगोप्ता, विद्वान्, न्यायी, तपस्वी व म्हणूनच सर्व श्रेष्ठ होता; ब्राह्मणाला काय पाहिजे तें करून जगण्याचा उपदेश आहे. परंतु त्याला पैशाकरितां पाहिजे ते धंदे करण्यास मात्र सांगितलें नाहीं. सत्ता व द्रव्य यांविषयीं निरभिलाष आणि केवळ विद्या व आचार ह्यांविषयीं आसक्ति असा हा वर्ग त्या कालीं होता, हें खरें. विद्वान् अविद्वान् व सदाचारी दुराचारी असा कसाहि ब्राह्मण असला तरी तो श्रेष्ठ; हा अर्थवाद आहे. तें म्हणणें आज तर चमत्कारिकच वाटतें! पण पूर्वींहि तें फारसें पसंत पडलें नसावें. बोधायन, आपस्तंबादिकांनीं अशी मिथ्यास्तुति केलेली नाहीं; उलट अविद्वान् ब्राह्मणांची निंदाच केलेली आहे. मनु व पुढें पराशर यांनीं मात्र केवळ ब्राह्मण जातींत जन्मला म्हणून तो श्रेष्ठ असें म्हटलें आहे आणि अविद्वान् ब्राह्मणांची निंदा केलेली आहे. ह्या उलट भगवत् पदारविंदी रंगलेला श्वपाक हा ब्राह्मणापेक्षां श्रेष्ठ असें विधान भागवतादि ग्रंथांत आहे. तें वरील वचनांना प्रतिक्रिया रूपच आहे असें म्हणावें लागतें.

ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रा वर्णास्त्वाद्यास्त्रयो द्विजाः ।
निषेकाद्याः श्मशानान्तास्तेषां वै मन्त्रतः क्रियाः ॥ १०
यदुच्यते द्विजातीनां शूद्राद्दारोपसंग्रहः ।
नैतन्मम मतं यस्मात्तत्रायं जायते स्वयम् ॥
तिस्रो वर्णानुपूर्व्येण द्वे तथैका यथाक्रमम् ।
ब्राह्मणक्षत्रियविशो भार्यास्वा शूद्रजन्मनः ॥ ५७

सत्यामन्यां सवर्णायां धर्मकार्यं न कारयेत् ।
सवर्णासु विधौ धर्म्ये ज्येष्ठ या न विनेतरा ॥ ८८
शूद्रस्य द्विजशुश्रूषा तयाऽजीवन् वणिग्भवेत् ।
शिल्पैर्वा विविधैर्जीवेद्द्विजातिहितमाचरन् ॥ १२०
भार्या रतिः शुचिर्भृत्यभर्ता श्राद्धक्रियारतः ।
नमस्कारेण मन्त्रेण पंच यज्ञान्न हापयेत् ॥१२१॥ याज्ञवल्क्य (अ. १)
शूद्रस्य द्विजशुश्रूषा परमो धर्म उच्यते ।
अन्यथा कुरुते किंचित्तद्भवेत्तस्य निष्फलम् ॥ ७१
लवणं मधु तैलं च दधि तक्रं घृतं पयः ।
न दुष्येच्छूद्रजातीनां कुर्यात्सर्वेषु विक्रयम् ॥ ७२
विक्रीणन्मद्यमांसानि ह्यभक्ष्यस्यच भक्षणम् ।
कुर्वन्नगम्यागमनं शूद्रः पतति तत्क्षणात् ॥ ७३
कपिलाक्षीरपानेन ब्राह्मणीगमनेन च ।
वेदाक्षरविचारेण शूद्रस्य नरको ध्रुवम् ॥ ७४ ॥ पराशर (अ. १)
शूद्रान्नं शूद्रसंपर्कः शूद्रेण तु सहासनम् ।
शूद्राज्ज्ञानागमश्चापि ज्वलन्तमपि पातयेत् ॥ ३२ ॥ (प. अ. १२)
क्षत्रियो वापि वैश्यो वा क्रियावंतौ शुचिव्रतौ ।
तद्गृहेषु द्विजैर्भोज्यं हव्यकव्येषु नित्यशः ॥ १३

शूद्राच्या घरीं जेवूं नये हा निषेध-पण

घृतं तैलं तथा क्षीरं गुडं तैलेन पाचितम् ।
गत्वा नदीतटे विप्रो भुंजीयात् शूद्र भोजनम् ॥ १४
आपत्काले तु विप्रेण भुक्तं शूद्रगृहे यदि ।
मानस्तापेन शुध्येत द्रुपदां वा शतं जपेत् ॥ १९ ॥
दासनापितगोपालकुलमित्रार्धसीरिणः ।
एते शूद्रेषु भोज्यान्ना यश्चात्मानं निवेदयेत् ॥ २० ॥ पराशर (अ. ११)
यथा काष्ठमयो हस्ती यथा चर्ममयो मृगः ।
ब्राह्मणस्त्वनधीयानस्त्रयस्ते नामधारकाः ॥ २४

५

ग्रामस्थानं यथा शून्यं यथा कूपस्तु निर्जलः ।
यथा हुतमनग्नौ च अमन्त्रो ब्राह्मणस्तथा ॥ २५
गायत्रीरहितो विप्रः शूद्रादप्यशुचिर्भवेत् ।
गायत्रीब्रह्मतत्त्वज्ञाः संपूज्यन्ते जनैर्द्विजाः ॥ ३२
दुःशीलोऽपि द्विजः पूज्यो न तु शूद्रो जितेंद्रियः ।
कः परित्यज्य गां दुष्टां दुहेच्छीलवतीं खरीम् ॥ ३३ ॥ प. ( अ. ८ )
अग्निकार्यात् परिभ्रष्टाः संध्योपासनवर्जिताः ।
वेदं चैवानधीयाना सर्वे ते वृषलाः स्मृताः ॥ २९ ॥ प. ( अ. १२ )
शूद्रान्नं शूद्रसंपर्कः शूद्रेणैव सहासनम् ॥
शूद्राज्ज्ञानागमः कश्चिज्ज्वलन्तमपि पातयेत् ॥ ७३
अमृतं ब्राह्मणस्यान्नं क्षत्रियस्य पयः स्मृतम् ।
वैश्यान्नमन्नमेव स्याच्छूद्रस्य रुधिरं स्मृतम् ॥ ७८
दासनापितगोपालकुलमित्रार्धसीरिणः ।
एते शूद्रेषु भोज्यान्ना यश्चाऽऽत्मानं निवेदयेत् ॥ १२०
अन्यशूद्रेषु अन्नाद्यं ये भुञ्जन्ति क्षुधा द्विजाः ।
प्रायश्चित्तं च संप्राप्तं चरेच्चान्द्रायणं व्रतम् ॥ १२१ ॥ अंगिरः
चतुर्थस्य तु वर्णस्य प्रायश्चित्तं कथं भवेत् ।
व्रतं नास्ति तपो नास्ति होमो नैव च विद्यते ॥ आपस्तंब ( अ. ५ )
ख्यापयित्वा द्विजानां तु शूद्रो दानेन शुध्यते ।
शूद्रान्नं शूद्रसंपर्कः शूद्रेणैव सहासनम् ॥ ७
शूद्राज्ज्ञानागमः कश्चिज्ज्वलन्तमपि पातयेत् ।
आहिताग्निस्तु यो विप्रः शूद्रान्नान्न निवर्तते ॥ ८
तथा तस्य प्रणश्यन्ति आत्मा ब्रह्मत्रयोऽग्नयः ।
शूद्रान्नेन तु भुक्तेन मैथुनं योऽधिगच्छति ॥ ९
यस्यान्नं तस्य ते पुत्रा अन्नाच्छुक्रस्य संभवः ॥ आपस्तंब ( अ. ८ )
याजनाध्यापनाद्यानात्तथैवासत्प्रतिग्रहात् ।
विप्रेषु न भवेद्दोषो ज्वलनार्कसमो द्विजः ॥ ६ ॥ अत्रि ( अ. ३ )
शौचं मंगलमायासश्चानसूयाऽस्पृहा दमः ।
लक्षणानि च विप्रस्य तथा दानं दयाऽपि च ॥ ३३

जन्मना ब्राह्मणो ज्ञेयः संस्कारैर्द्विज उच्यते ॥ १४१
विद्यया याति विप्रत्वं श्रोत्रियस्त्रिभिरेवच ॥
देवो मुनिर्द्विजो राजा वैश्यः शूद्रो निषादकः ।
पशुर्म्लेच्छोऽपि चाण्डालो विप्रा दशविधाः स्मृताः ॥ ३७३
क्रियाहीनश्च मूर्खश्च सर्वधर्मविवर्जितः ।
निर्दयः सर्वभूतेषु विप्रश्चाण्डाल उच्यते ॥ ३८३
वेदैर्विहीनाश्च पठन्ति शास्त्रं ।
शास्त्रेण हीनाश्च पुराणपाठाः ॥
पुराणहीनाः कृषिणो भवन्ति ।
भ्रष्टास्ततो भागवता भवन्ति ॥ अत्रिसंहिता
परदेवार्चको विप्रस्तदधीनो भवेद्यदि ।
मासत्रयं तदन्नाशी जीवञ्शूद्रत्वमाप्नुयात् ॥ २१॥ प्रश्न. २२
यश्च कर्मपरित्यागी पराधीनस्तथैव च ।
अधीतोऽपि द्विजश्चैव स च शूद्रसमो भवेत् ॥ २२
अनधीत्य द्विजो वेदानन्यत्र कुरुते श्रमम् ।
स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥ २३ ॥ लघु आश्व.
यो न संध्यामुपासीत ब्राह्मणोहि विशेषतः ।
स जीवन्नेव शूद्रस्तु मृतः श्वा चैव जायते ॥ २६
संध्याहीनोऽशुचिर्नित्यमनर्हः सर्वकर्मसु ।
यदन्यत्कुरुते कर्म न तस्य फलभाग्भवेत् ॥ २७
द्वितीये च तथा भागे वेदाभ्यासो विधीयते ।
वेदाभ्यासो हि विप्राणां विशिष्टं तप उच्यते ॥ ३३ ॥ दक्ष-अ. २
शूद्रो वर्णश्चतुर्थोऽपि वर्णत्वाद्धर्ममर्हति ।
वेदमन्त्रस्वधास्वाहावषट्कारादिभिर्विना ॥ ९
वर्धकी नापितो गोप आशापः कुम्भकारकः ॥ १०
वणिक्किरातकायस्थमालाकारकुटुम्बिनः ।
एते चान्ये च बहवः शूद्रा भिन्नाः स्वकर्मभिः ॥ ११
उद्वहेत्क्षत्रियां विप्रो वैश्यां च क्षत्रियोऽपि ताम् ।

न तु शूद्रां द्विजः कश्चिन्नाधरः पूर्ववर्णजाम् ॥ ११

नानावर्णासु भार्यासु सवर्णा सहचारिणी ।
धर्मे धर्मेण धर्मिष्ठा ज्येष्ठता तु सजातिषु ॥ १२ ॥ व्यास-( अ. १ )

नापितान्वयमित्रार्धसीरिणो दासगोपकाः ।
शूद्राणामप्यमीषां तु भुक्त्वाऽन्नं नैव दुष्यति ॥ ५५ ॥ ( अ. २ )

यस्तु भुङ्क्ते शूद्रान्नं मासमेकं निरन्तरम् ।
इह जन्मनि शूद्रत्वं मृतः श्वा चोपजायते ॥ ६९ ॥ ( अ. ३ )

यस्य शूद्रा पचेन्नित्यं शूद्रा च गृहमेधिनी ।
वर्जितः पितृदेवैस्तु रौरवं याति स द्विजः ॥ ७० ॥ व्यास-( अ. ४ )

शूद्रधर्मो-द्विजातिशुश्रूषा पापवर्जनं कलत्रादिपोषणं कर्षण पशुपालनभारोद्वहनपण्यव्यवहारचित्रकर्म नृत्यगीतवेणुवीणामुरजामृदंगवादनादीनि ॥ देवल ॥

याज्ञवल्क्यानें चार वर्णांपैकीं द्विजांचे सर्व संस्कार समंत्रक व्हावेत आणि द्विजातींनीं शूद्र स्त्री करूं नये, असें आपलें मत म्हणून स्पष्ट मांडलें आहे; हें विशेष होय ! वर्णानुपूर्वीनें तीन, दोन व एक वर्णाच्या स्त्रिया ब्राह्मणादिकांनीं कराव्या. सवर्ण स्त्री-शिवाय धर्मकार्य करूं नये. सवर्णांत सुद्धां जी ज्येष्ठ असेल तीच धर्मकार्यांत युक्त होय ! शूद्रानें द्विजसेवा करावी. त्यावर उपजीविका न झाल्यास वणिग्वृत्ति किंवा शिल्पहि करावें. शूद्रानें नमस्कारमंत्रानें पंचयज्ञ, श्राद्धक्रिया वगैरे कराव्यात. ( शूद्रानें फक्त सेवा करावी असें पहिले सूत्रकार सांगतात. त्यानंतर त्यानें शिल्प करावें असें पुढील स्मृतिकार सांगतात आणि त्यानें वाणिज्य करावें असें याज्ञवल्क्यच प्रथम सांगतो. व्यापाराची परवानगी शूद्राला यापूर्वी कुणीहि दिलेली नाहीं. पुढें शूद्रानें व्यापार कशाकशाचा करावा हें पराशर सांगूं लागला आहे. ) शूद्रांपैकीं दासगोपालनापितादि शूद्र भोज्यान्न होत !

पराशरः—शूद्रानें द्विजसेवा करावी. तोच त्याचा परम धर्म होय. शूद्रानें लवण, मधु, तेल, दही, ताक, दूध, तूप वगैरे विकावें. त्यांचा धंदा त्यानें केल्यास त्याला दोष नाहीं. मात्र त्यानें मांसभक्षण करूं नये. मद्यमांस विकूं नये. वेदाक्षर-विचार, ब्राह्मणीगमन व कपिलाक्षीरपान इत्यादि करूं नयेत. शूद्रान्न, शूद्रसंपर्क, शूद्रसहवास हा पातित्याला कारणीभूत होतो. ( प्रथम दूध, दही, तूप, तेल

वगैरे विकण्याचा धंदा शूद्रच करीत असत. पुढें तो ब्राह्मण करूं लागले म्हणून, ब्राह्मणानें दूध विकल्यास तो तीन दिवसांत शूद्र होतो असा निषेध आला. )

क्षत्रिय व वैश्य यांनीं व ब्राह्मणांनीं एकमेकांच्या घरीं हव्यकव्यप्रसंगीं भोजनास जावें. शूद्राच्या घरीं केव्हांहि जेवूं नये. तथापि दासनापितगोपाल इत्यादि शूद्र भोज्यान्न होत. प्रसंगीं शूद्राचें अन्न खाण्याची आपत्ति आली तर पाण्याचा संबंध नसलेलें तेल, तूप, दूध, गूळ यांनीं बनवलेले फराळाचे पदार्थ त्याच्या घरचे घ्यावेत पण ते नदीवर जाऊन खावेत. अनधीत ब्राह्मणाची पराशरानें यथेच्छ निंदा केली आहे व गायत्रीरहित विप्र हा शूद्रापेक्षांहि अपवित्रच म्हटलेला आहे. पण त्या उलट जितेंद्रिय शूद्रापेक्षां दुःशील द्विजहि पूज्य होय, कारण गाढवीपेक्षां गाय ही केव्हांहि श्रेष्ठ होय, असें म्हणून जन्माचेंच महत्त्व सांगितलें आहे. पराशरकालीं ब्राह्मण हे शेतीच्या धंद्यामुळें, वृषल म्हणजे शूद्रवत् होऊं लागलेले होते म्हणूनच, अग्निकार्य व संध्या न करणारे व वेदाध्ययन न करणारे ब्राह्मण वृषल होत, असें त्यानें ठासून सांगितलेलें आहे. आंगिरसस्मृतीमध्यें शूद्रान्नाचा निषेध केला असून दासनापित-गोपाल इत्यादि शूद्र हे अपवाद म्हणून भोजनास योग्य होत असें म्हटलें आहे. आपस्तंब स्मृतीमध्येंहि शूद्रान्नाचा निषेध, शूद्राची दानानें शुद्धि व शूद्राचें अन्न खाऊन संभोग केल्यास होणारी प्रजा, शूद्राचीच होते असें म्हटलें आहे. अत्रिस्मृतीमध्यें ब्राह्मणानें याजन, अध्यापन व प्रतिग्रह हा कोठेंहि केला तरी त्याला दोष लागत नाहीं, असें म्हटलें आहे. अत्रिसंहिताकालीं ब्राह्मणाची परिस्थिति बरीच हीन झाली असावी. जन्मतः मोठेपणाच्या कल्पनेमुळें ब्राह्मण हे पाहिजे तसे वागूं लागलेले असावेत म्हणून प्रथम त्यानें ब्राह्मणाचीं लक्षणें दिलेलीं आहेत, तीं अशीं:-शौच, कल्याण, श्रम, निर्मत्सर, लोभराहित्य, दम, दान, दया इत्यादि ब्राह्मण-लक्षणें होत ! जन्मानें ब्राह्मणत्व, संस्कारानें द्विजत्व व विद्येनें विप्रत्व येतें आणि जन्म, संस्कार व विद्या या तीहींनें श्रोत्रियत्व येतें, हें अत्रीचें म्हणणें मार्मिक आहे. देव, मुनि, द्विज, राजा, वैश्य, शूद्र, निषाद, पशु, म्लेच्छ आणि चांडाल असे ब्राह्मणांचे दहा प्रकार अथवा वर्ग असतात. क्रियाहीन मूर्ख, सर्वधर्मविवर्जित, निर्दय असा ब्राह्मण चांडाल होय. वेदविहीन ब्राह्मण शास्त्री होतात, शास्त्रहीन ब्राह्मण पुराणिक होतात, पुराणहीन ब्राह्मण कृषी करून पोट भरूं

लागतात आणि सर्वांत श्रेष्ठ असे ब्राह्मण म्हणजे कृपीलादि जे नालायक ते भागवत होतात व बुवाबाजी करतात. अत्रिसंहितेंतील हे वरील विचार पुष्कळच निर्भीड व वस्तुस्थितिदर्शक आहेत.

लघु, आश्वलायन व दक्षस्मृतीमध्यें ब्राह्मण्य ऱ्हासाचीच परिस्थिति रेखाटलेली आहे. पराधीन होऊन दुसऱ्यांच्या देवाची पूजा करणारा म्हणजे पुजारी होऊन त्यावर जगणारा ब्राह्मण हा शूद्रच होतो. विद्वान् ब्राह्मण जर स्वकर्म-त्याग करून अन्नाकरितां पराधीन झाला, तर तो शूद्र-तुल्य होतो. वेदाशिवाय अन्यत्र श्रम करणारा ब्राह्मण हा शूद्र होय असें लघु आश्वलायनानें व इतरांनीं मनूप्रमाणेंच म्हटलेलें आहे. दक्षानें संध्येचें महत्त्व व ती न केल्यास शूद्रत्व कसें येतें, हें सांगून वेदाध्ययनाचें महत्त्व वर्णिलें आहे.

व्यासांनीं आपल्या स्मृतीमध्यें तत्कालीन परिस्थितीचें चित्र बरेंच रेखाटलेलें आहे. शूद्र हा एक चौथा वर्ण आहे व तो वर्ण आहे म्हणून, त्याला वर्णत्वामुळें धर्महि आहे, मात्र तो धर्म वेदमंत्रयुक्त नाहीं एवढेंच! शूद्राला कसलाहि धर्म नाहीं, त्याला कसलेंहि पातक नाहीं व त्याला कसलाहि संस्कार नाहीं असें जें पूर्व-स्मृतिकारांनीं म्हटलेलें आहे, त्या उलट व्यास असें म्हणतात कीं, शूद्र हा एक वर्ण आहे व त्यालाहि कांहीं तरी धर्म असला पाहिजे. व्यासकालीं शूद्रांच्या धंद्यावरून भिन्नभिन्न जाति पडूं लागल्या होत्या. न्हावी, गोपाल, कुंभार, व्यापारी, माळी, सावकारी, कारकुनी असे विविध धंदे शूद्र करूं लागले होते. अनुलोम विवाहाला मान्यता व प्रतिलोम विवाहाचा निषेध करून व्यासानें अनेक वर्णाच्या भार्यांपैकीं सवर्ण सहधर्मचारिणी श्रेष्ठ व तीच धर्मकार्यांत योग्य असें म्हटलेलें आहे. शूद्रांपैकीं अपवाद म्हणून दासनापितगोपाल इत्यादि शूद्रांच्या घरचें अन्न खाण्यास हरकत नाहीं, व्यासानें शूद्रान्नाचा निषेध इतरांप्रमाणेंच केलेला आहे.

मिताक्षरेमध्यें देवलाच्या नांवावर जें एक वचन दिलेलें आहे, त्यांत शूद्रानें शेती, पशु-पालन, भार वाहणें, व्यापार, चित्रकर्म, नृत्यगीत, वीणा, अलगुज, मृदंग, इत्यादि वाद्येंहि वाजवावीत असें म्हटलेलें आहे. त्यावरून शूद्र हा देवलाच्या कालीं पुष्कळच सुधारलेला होता, हें स्पष्ट होतें.

एकंदरींत चातुर्वर्ण्यासंबंधींचीं सर्व वचनें पाहिलीं म्हणजे त्यावरून असें दिसतें कीं पूर्वीं त्रैवर्णिकामध्यें परस्पर अन्न व लग्न व्यवहार होत असत. आजच्या-

सारखे बेटीबंदीचे व रोटीबंदीचे चातुर्वर्ण्य पूर्वी नव्हतें; तर तें प्रवाही होतें. त्याचप्रमाणें समाजांत शाकाहार व मांसाहारहि रूढ होता. आहाराचें विवेचन पुढें एका प्रकरणांत येणारच आहे. चार वर्णांपैकीं क्षत्रिय व वैश्य यांच्या संबंधाचें व त्यांच्या धर्माचें विवेचन फारसें आढळत नाहीं. तें फक्त ब्राह्मण, शूद्र व राजधर्म याविषयींच आढळतें. ब्राह्मणाचें श्रेष्ठत्व, महत्त्व, उच्चत्व आणि पावित्र्य हीं ठिकठिकाणीं दर्शविलेलीं असलीं तरी, आचार व व्यवसाय या दृष्टीनें ब्राह्मण खालीं खालीं येऊं लागले होते हें या वचनावरूनच सिद्ध होतें. वेदाध्ययन व संध्या हीं न करणें, शास्त्रविहित व्यवसाय सोडून दुसरे व्यवसाय करणें, यामुळें ब्राह्मणाला पातित्य येऊं लागलेलें होतें. ब्राह्मण हा क्रमानें जसा खालींखालीं येऊं लागलेला होता, तसाच शूद्रहि क्रमानें उच्च स्थितीप्रत येऊं लागलेला दिसतो. शूद्रासंबंधाचे पहिले कठोर निषेध जरी अखेरपर्यंत लिहिलेले असले तथापि शूद्र हा द्विजसेवेच्या बाहेर शिल्प, वाणिज्य, नृत्य, गीत, वाद्य या क्षेत्रांत पडूं लागलेला होता. शूद्रानें अनेक व्यवसाय स्वीकारल्यावर तो द्विजांचें उष्टें अन्न व फाटकीं वस्त्रें यांवर कसा संतुष्ट व्हाणार ? व्यवसायामुळें त्याचा उत्कर्ष होत होता. प्रत्यक्ष स्मशान म्हणजे पापचारी शूद्र होय व त्यासमीप राहूं नये, अध्ययन करूं नये, इतका जेथें प्रथम कडक निषेध होता, तेथें तो शूद्र वाणी झाल्यावर, त्याच्या दुकानांतील पदार्थ चालूं लागले. त्याचें नृत्य व गीत यांनींहि द्विजांना मोहून टाकलें व सर्व शूद्रांच्या घरचे फराळाचे पदार्थ प्रसंगीं द्विजांना चालूं लागले ही क्रांति उत्क्रांतीनेंच होत गेली ! क्षत्रिय व वैश्य यांची स्थिति फारसे उल्लेख नसले तरी ब्राह्मणाप्रमाणें खालींखालींच आली असावी. पुष्कळ ब्राह्मण वेदशास्त्रविहित शेती करूं लागले आणि क्रियाहीन व मूर्ख ब्राह्मण समाजांत वाढूं लागले आणि ब्राह्मणांमध्यें देव, मुनि, द्विज, पशु, म्लेंच्छ व चंडाल इत्यादि भेद गुणामुळें पडले. त्यावरून वरचा वर्ण व्यवसाय व संस्कार यांनीं खालीं येत गेला व त्या उलट खालचा वर्ण उच्च व्यवसायामुळें वर चढत गेला म्हणजे दोघेहि एका पातळींत आले. तात्पर्य हिंदु समाजाच्या पुनर्घटनेमध्यें पूर्वीसारखे चातुर्वर्ण्य आजहि जेथें नाहीं तेथें तें भविष्यकालीं कोठून येणार ?

पूर्व ग्रंथावरून सर्व वर्ण एका पातळींत आलेले दिसतात आणि आजच्या व्यवहारावरूनहि सर्वत्र समताच दिसत आहे. अशा स्थितींत जन्मतः उच्चनीचता

व श्रेष्ठकनिष्ठपणा हा या कालांत टिकणार नाहीं. यास्तव हिंदु-समाजांतील प्रत्येक व्यक्ति व जाति जन्मतः उच्च नाहीं व नीच नाहीं तर प्रत्येक व्यक्ति व जाति या जन्मतः सारख्याच दर्जाच्या होत असें समजलें पाहिजे व आज जगांत हीच पद्धत आहे.

सर्व वर्णांना मोक्ष आहे हें शास्त्रकारांनींच सांगितलें आहे. भक्तीचा मार्ग व नामाचा अधिकार हा साधुसंतांनीं सर्वांना मोकळा केला आहे. आज जगांत असलेलें पाहिजे तें शिक्षण व करतां येईल तो धंदा हीं इंग्रजी राज्यानें सर्वांना मोकळीं केलीं आहेत. अशा स्थितींत जन्मतः उच्चनीचपणाची कल्पना मनांतून काढून टाकणें आणि ती व्यवहारांत आणणें येवढेंच करण्याजोगें कार्य हिंदुसमाजाच्या स्वाधीन आहे.

# प्रकरण पांचवें

## जातिसंस्था व जात्युत्कर्ष

आज विद्यमान असलेला हिंदु-समाज हा चातुर्वर्ण्ययुक्त नसून जातियुक्त आहे. जातिसंस्था हें हिंदुसमाजाचें वैशिष्ट्य आहे. जात ही केवळ जन्मावरच ठरविली जाते व त्या जातींतच लग्न करण्याचें बंधन पाळावें लागतें. हिंदु-समाजांतील व्यक्ति ही जातीवरून ओळखिली जाते. वर्णावरून आज तरी व्यक्तीला ओळखिलें जात नाहीं. पूर्वी जेव्हां चार वर्णांचे लोक अधीक होते, तेव्हां वर्णनिर्देश होत असावा. परंतु चातुर्वर्ण्यांतील अनुलोम जाति व प्रतिलोम संकर, हे जसे वाढत गेले आणि यांतच निरनिराळ्या मूळच्या रानटी जातींची जशी भर पडली, तसतसे चातुर्वर्ण्याचें नांव प्रचारांतून कमी झालें व जातीचें नांव रूढ होऊं लागलें. हिंदुस्थानांत आज प्रत्येक मनुष्य जातिहिताकडेच पहातो. देश व धर्म या उच्च कल्पनापेक्षां जातीवरच हिंदुसमाजाची दृष्टी खिळलेली दिसते.

चातुर्वर्ण्यापैकीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे आर्य आणि शूद्र हे अनार्य होत. आर्यांतील अनुलोम विवाहजन्यसंततीला जाति व आर्यानार्य-प्रतिलोम संततीला संकर असें म्हटलेलें आहे. म्हणजे आजचा हिंदु-समाज हा वर्ण, जाति व संकर

यांचें मिश्रण आहे. संकर असंख्य आहेत. जातीहि अनेक आहेत. पण वर्ण मात्र चार आहेत. आज विद्यमान् असलेल्या जाति या अनेक कारणांनीं बनलेल्या आहेत. आचार, व्यवसाय, आहार, उपास्य, क्रान्ति, उत्पात अशा अनेक कारणांनीं जाति बनतात. एका मुख्य जातीमध्यें अनेक पोटजातीहि आहेत. मुंबईइलाख्यांत सुमारें दीड हजार आणि सबंध हिंदुस्थानांत सुमारें आठ हजार जाति आहेत. या सर्व जाति ईश्वरानेंच उत्पन्न केल्या आहेत, अशी एक भ्रामक समजूत आहे; ती गेली पाहिजे आणि जन्मतः प्रत्येक जात स्वतःला कांहीं जातीपेक्षां उच्च व कांहीं जातीपेक्षां नीच समजते, हाहि समज गेला पाहिजे. जातीच्या उत्पत्तींत ईश्वराचा संबंध आणि जन्मतः श्रेष्ठकनिष्ठपणा या दोन कल्पना मारक आहेत. या कल्पना घालवून ज्यांचे आचार, आहार, व्यवहार व संस्कार सम आहेत, अशा समान संस्कृतीच्या पोटजातींनीं आपल्या मुख्य जातींत एकरूप झालें पाहिजे. सर्व जातींनीं एक होण्याजोगी संस्कृतीमध्यें एकरूपता आलेली नाहीं. हिंदु-समाजांतील कित्येक जातीमध्यें सांस्कृतिक दृष्ट्या फार अंतर आहे. हें अंतर झटाझट तुटत आहे व तुटण्याजोगी परिस्थितिहि उत्पन्न झालेली आहे. म्हणून सर्व जातीमध्यें समान संस्कृति उत्पन्न होण्याचें कार्य मोठ्या नेटानें व्हावयास पाहिजे व तें होईपर्यंत आजच्या सुसंस्कृत गटांनीं एकरूप बनलें पाहिजे.

हिंदुसमाजांतील जातिसंस्थेचा मूळ उगम बरोबर कळत नाहीं. तथापि रुद्राध्यायामध्यें कुलाल, कर्मार, पुंजिष्ट, निषाद, इषुकृत, धन्वकृत, इत्यादि जातींचा उल्लेख आहे. प्राचीन यज्ञसंस्थेमध्यें कुंभार, लोहार, सुतार, चांभार, दोऱ्या वळणारे, केरसुण्या बांधणारे इत्यादींचा संबंध येत असे. त्यावरून असेंहि वाटतें कीं वर्णसंस्था उत्पन्न होण्यापूर्वी फार प्राचीन काळापासून जातिसंस्था होती. जातिसंस्था प्राचीन असली तरी वर्णव्यवस्थेनंतरच तिचीहि व्यवस्था झाली. धर्मशास्त्रकर्त्यांनीं जातींना निरनिराळ्या वृत्त्याहि लावून दिलेल्या आहेत. म्हणून आपस्तंबापासून देवलापर्यंतचे धर्मशास्त्रकार जातीबद्दल म्हणतात तरी काय हें पाहिलें पाहिजे. फक्त ८।१० स्मृतिकारांनींच काय तो जातिसंबंधाचा विचार केलेला आहे तो असा—

आपस्तंब फक्त चार वर्ण व प्रतिलोमापैकीं चांडाल, पौल्कस आणि वेण यांचा उल्लेख करितो. गौतमानें अंबष्ठ, उग्र, निषाद, दौष्मंत, पारशव हे अनुलोम

आणि सूत, मागध, आयोगव, क्षत्ता, वैदेहक व चंडाल हे प्रतिलोम सांगितले आहेत. म्हणजे वर्ण चार, अनुलोम पांच व प्रतिलोम सहा यांचा उल्लेख करून गौतमानें पुढें त्यांची उत्पत्ति दिली आहे. ब्राह्मणीला, ब्राह्मणक्षत्रियादि चार वर्णांपासून ब्राह्मण, सूत, मागध व चंडाल असे पुत्र होतात. क्षत्रियस्त्रीला अनुक्रमें ब्राह्मण क्षत्रियादिकांपासून मूर्धावसिक्त, क्षत्रिय, धीवर व पुल्कस असे पुत्र होतात. वैश्यस्त्रीला ब्राह्मणादिकांपासून अनुक्रमें भृज्जकंठ, माहिष्य, वैश्य, वैदेह असे पुत्र होतात आणि शूद्रस्त्रीला ब्राह्मणादिवर्णांपासून अनुक्रमें पारशव, यवन, करण व शूद्र असे पुत्र होतात. गौतमानें एकंदर सोळा जातींचा उल्लेख केला आहे. पैकीं दौष्मंताला ' दौष्यन्त ' व क्षत्त्याला ' कृत ' असेंहि दुसरें एक नांव कांहीं प्रतींत आहे. पण गौतमानें वरील अनुलोमांमध्यें ' करणाचा ' उल्लेख केलेला नाहीं.

बौधायनानें पहिल्या प्रश्नाच्या आठ व नऊ अध्यायामध्यें जातिविचार केलेला आहे. परंतु त्या दोन अध्यायांमध्यें एकवाक्यता नाहीं. कांहीं जातींची उत्पत्ति परस्पर विरुद्ध दिसते. तथापि अध्याय नऊमधीलच चर्चा प्रमाण मानून ती येथें आम्ही देतों. बौधायनानें चार वर्णांशिवाय रथकार, अंबष्ठ, सूत, उग्र, मागध, आयोगव, वैण, क्षत्ता, पुक्कस, कुक्कुट, वैदेहक, चंडाल, श्वपाक यांचा उल्लेख केलेला आहे. यामध्यें गौतमापेक्षां रथकार, कुक्कुट व श्वपाक यांचा उल्लेख अधिक आहे व गौतमोक्त कांहीं जातींचा उल्लेख नाहीं. ब्राह्मण व क्षत्रिया आणि क्षत्रिय व वैश्या यांच्या संततीला ब्राह्मण व क्षत्रियच म्हणावयाचें असें बौधायन म्हणतो. म्हणजे त्यानें पितृसावर्ण्य सांगितलें आहे. ब्राह्मण व वैश्या यापासून अंबष्ठ, ब्राह्मण व शूद्रा यापासून निषाद, क्षत्रिय व शूद्रा यापासून उग्र आणि वैश्य व शूद्रा यापासून रथकार होतो, असें अनुलोमासंबंधानें सांगून प्रतिलोम गौतमाप्रमाणेंच सांगितलेले नाहींत. उग्र व क्षत्त्याची स्त्री यापासून श्वपाक, वैदेहक व अंबष्ठा यापासून वैण, निषाद व शूद्रा यापासून पुल्कस, शूद्र व निषादी यापासून कुक्कुट अशी कांहींची उत्पत्ति दिलेली आहे.

वसिष्ठ धर्मसूत्रांत अध्याय अठरामध्यें चंडाल, वैण, अंत्यावसायी, रामक, पुल्कस, सूत आणि अंबष्ठ, उग्र, निषाद, पारशव इत्यादींचे उल्लेख आहेत. गौतम व बौधायन यांनीं सांगितलेले सर्व अनुलोम वसिष्ठानें दिलेले नसून प्रतिलोम मात्र सहा सांगून, त्यांची उत्पत्तीहि निराळीच दिलेली आहे. ती अशी:—

शूद्र व क्षत्रिया = वैण, शूद्र व वैश्या = अंत्यावसायी, वैश्य व ब्राह्मणी = रामक, वैश्य व क्षत्रिया = पुल्कस, क्षत्रिय व ब्राह्मणी = सूत, आणि शूद्र व ब्राह्मणी = चांडाल इत्यादि.

वसिष्ठानंतर विष्णुधर्मसूत्रामध्यें जाति-विचार आहे व येथूनच जातींचे धंदे सांगण्याला प्रारंभ झालेला आहे. यापूर्वी जातींच्या धंद्याचा विचार ग्रंथांत आढळत नाहीं. विष्णुधर्मसूत्रांमध्यें चार वर्णाशिवाय आयोगव, पुक्कस, मागध, चांडाल, वैदेहक व सूत हे अनुलोम सांगितले असून त्यांचे धंदेहि अनुक्रमें रंगावतरण, व्याधता, स्तुतिक्रिया, बहिर्वास व मृतवस्त्रधारण, स्त्रीरक्षा व अश्वसारथ्य असे सांगितले आहेत. अनुलोमांची उत्पत्ति जवळ जवळ पूर्वसूत्रकारासारखीच सांगितली आहे. अनुलोम संतति मातृसवर्ण समजावी. प्रतिलोमसंतति आर्यविगर्हित समजावी आणि सर्वांचा समान जातीशींच लग्नव्यवहार व्हावा, असें विष्णूचें मत आहे. त्यावरून या काळीं मातृसावर्ण्य रूढ होऊन पितृसावर्ण्य मागें पडलें आणि प्रत्येक जातीचे स्वजातीशींच अन्नलग्नव्यवहार होऊं लागले.

विष्णूनंतर मनु, याज्ञवल्क्य, औशनस, वृद्धहारीत व वेदव्यास इत्यादींनीं जातिविचार केला आहे. त्यांतील मनूचा विचार बराच विस्तृत आहे. मनूनें सहा अनुलोम दिलेले नाहींत. अंबष्ठ, निषाद व उग्र असे तीन दिलेले असून ब्राह्मण व क्षत्रिया, क्षत्रिय व वैश्या आणि वैश्य व शूद्रा, यांच्या संततीला त्यानें अनुल्लेखावरून पितृसावर्ण्यांतच घातलेलें आहे. प्रतिलोम पूर्वाचार्यांच्याप्रमाणेंच सांगितलेले नाहींत. मनूनें एकंदर तीन अनुलोम, सहा प्रतिलोम, वीस संकरजाति व चार वर्ण सांगितले असून, सुमारें तेवीस जातींचे धंदे सांगितले आहेत. ते असेः—

१ सैरिंध्र—वेणीफणी करणें, अंगसंवाहन व मृगादिवध.
२ मैत्रेय—सकाळीं घंटा वाजवून राजादींची स्तुति करणें.
३ मार्गव—दास-कैवर्त-( धंदा )-नावांचा धंदा करणें.
४ चर्मकार—चामडी व जोडे यांचा धंदा.
५ अंध्र व मेद—गांवाबाहेर राहून आरण्यपशु मारणें.
६ पांडुसोपाक—बुरुडाचा धंदा.
७ आहिंडिक—बंधनस्थानसंरक्षण.

८ सोपाक—फांशी देणें. वध्यघाती.
९ अंत्यावसायी—डोंबाचा स्मशानांतील धंदा करणें.
१० सूत—अश्वसारथ्य करणें.
११ अंबष्ठ—रोगशांत्यादि चिकित्सा.
१२ वैदेहक—अंतःपुरांतील स्त्रीकार्य.
१३ मागध—स्थल व पथ वणिज्या.
१४ निषाद—मासे मारणें.
१५ आयोगव—सुतारकाम ( पण कोणी नट व पाथर्वट ).
१६ चंचुमद्गु—अरण्यांतील पशू मारणें.
१७ क्षत्ता, उग्र, पुक्कस—या तीन जातींनीं बिळांतील उंदीर वगैरे मारणें.
१८ धिग्वण—ढोराचा धंदा.
१९ वेण—झांजा, ढोल वगैरे वाजविणें.
२० चांडाल, श्वपच—बहिर्वास, श्वगर्दभधन, प्रेतें पुरणें.

## मनूनें सांगितलेल्या संकर जाति

### पहिलें नांव पुरुषाचें व दुसरें नांव स्त्रीचें समजावें

१ ब्राह्मण + उग्र = आवृत्त
२ ब्राह्मण + अंबष्ठ = आभीर
३ ब्राह्मण + आयोगव = धिग्वण
४ निषाद + शूद्र = पुक्कस
५ शूद्र + निषाद = कुक्कुटक
६ क्षत्ता + उग्र = श्वपाक
७ वैदेह + अंबष्ठ = वेण
८ दस्यु + आयोगव = सैरंध्र
९ वेदह + आयोगव = मैत्रेयक
१० निषाद + आयोगव = मार्गव–दास–कैवर्त
११ निषाद + वैदेहक = चर्मकार
१२ वैदहक + कारावर = अंध्र
१३ वैदहक + निषाद = मेद
१४ चंडाल + वैदेह = पांडु-सोपाक
१५ निषाद + वैदेह = आहिंडिक
१६ चंडाल + पुक्कस = सोपाक
१७ चंडाल + निषाद = अंत्यावसायी
१८ ब्राह्मण + वैदेहक = चंचु
१९ ब्राह्मण + बंदि = मद्गु
२० दस्यु

मनूनें व्रात्य, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य स्त्रीपुरुषांपासून अनुक्रमें पुढील जाति सांगितल्या आहेत.

१ भूर्जकंटक – आवंत्य – वाटधान – पुष्पध – शेख.

२ झल्ल – मल्ल – निच्छवी – नट – करण – खस – द्रविड.

३ सुधन्वाचार्य – कारुष – मैत्र – सात्वत.

याज्ञवल्क्य हा मनूनें न सांगितलेलें मूर्धावसिक्त, माहिष्य व करण असे अनंतर अनुलोम सांगतो आणि अंबष्ठ, उग्र व निषाद यांचींहि नांवें देतो. सूत मागध, वैदेह, आयोगव, क्षत्ता व चांडाल अशीं प्रतिलोमांचीं नांवें त्यानें दिलेलीं आहेत. सहा अनुलोम व सहा प्रतिलोम यांशिवाय माहिष्यपुरुष व करणस्त्री यांपासून एक रथकार होतो, असें याज्ञवल्क्य म्हणतो. म्हणजे चार वर्णांशिवाय तेरा जातींचा उल्लेख याज्ञवल्क्यानें केलेला आहे. याज्ञवल्क्यानंतर पराशरानें कांहीं फारसा जातिविचार सांगितलेला नाहीं. पण दास, नापित, गोपाल व आर्धिक या चौघांची उत्पत्ति तेवढी कोणच्याहि स्मृतिकारानें न सांगितलेली, अशी सांगितली आहे. हे चार शूद्र अपवाद म्हणून भोजनास योग्य असें सांगितल्यापैकीं आहेत. वेदव्यासस्मृतीमध्यें तीन जन्म–चंडाळ सांगितले आहेत. एक शूद्रब्राह्मणीसंभव, दुसरा कुमारीसंभव आणि तिसरा सगोत्रस्त्रीसंभव. व्यासांनीं शूद्रांचे धंद्यामुळें झालेले दहा प्रकारहि सांगितले आहेत. ते असेः–वर्धकी, नापित, गोप, आशाप, कुंभकारक, वणिक, किरात, कायस्थ, मालाकार व कुटुंबी.

व्यासांनीं अंत्यजांचेहि बारा प्रकार सांगितले आहेत. प्रथम आंगिरस पांच अंत्यज सांगतो, तर अत्रि सात सांगतो व पुढें व्यास स्मृतींत बारा अंत्यज आले हेंहि चित्यच होय. लघुआश्वलायन स्मृतीमध्यें माहिषेय, वैकुंठ, वृषलेय अशा जाति व गोळकांचे कुंड व रंड असे दोन भेद सांगितले आहेत. औशनसस्मृति ही फार अर्वाचीन असावी. तीमध्यें बऱ्याच अलीकडील जातींचा निर्देश असून एकंदर अडतीस जातींची उत्पत्ति व त्यांचे धंदे हे या स्मृतींत सांगितलेले आहेत. या अडतिसांपैकीं राजरोस विवाहसंबंधानें झालेल्या जाति अठ्ठावीस असून, चौर्यकर्मानें झालेल्या जाति दहा दिलेल्या आहेत. त्या अशाः—रथकार, पुलिंद, रंजक, चक्री ( तेली ), भिषक्, कुंभकार, निषाद, मणिकार, शूलिक, कटकार इत्यादि. विवाहसंबंध व उघड व्यवहारानें झालेल्या जाति—सूत, वेणुक,

चर्मकार, मागध, चांडाल, श्वपच, आयोगव, ताम्रोपजीवी, सूनिक, उद्बंधक, पुक्कस, रजक, नर्तक, वैदहक, चर्मोपजीवी, सूचिक, मूर्धावसिक्त, नृप, गूढजातक, अंबष्ठ, पारशव, सूत (उत्पत्ति निराळी), उग्र, सूचक, तक्षक, मत्स्यबंधक, कटकार, व काकवच इत्यादि दिल्या आहेत. विस्तृतपणें जातींच्या उत्पत्तीचा विचार मनु व औशनस, यांनींच केलेला आहे. परंतु दोघांमध्यें जातींच्या नांवाचा, धंद्याचा व उत्पत्तीचाहि मोठाच फरक आहे. त्यावरून मनु व औशनस या दोघांच्या काळीं जी परिस्थिति होती, तिचेंच प्रतिबिंब त्या जातिविचारावर पडलें आहे असें म्हणावें लागतें. मनूनें सांगितलेल्या कित्येक जाति औशनसानें सांगितलेल्या नाहींत. तात्पर्य आज हिंदुसमाजांत दिसणाऱ्या असंख्य जातींचा उल्लेख धर्मशास्त्रग्रंथांत नाहीं, इतकेंच नव्हे तर सर्व स्मृतिकारांनीं दिलेल्या जातींची बेरीजहि साठ व पाऊणशे यांच्यापुढें जात नाहीं. अर्थात् हिंदुसमाजांत आज ज्या जाति दिसतात त्यांची वाढ अगदीं अलीकडील आहे व ती ईश्वरकृत नाहीं हें निःसंशय होय. सर्व स्मृतिकारांमध्यें जाति, त्यांची उत्पत्ति व त्यांचे धंदे यांविषयीं एकवाक्यता आहे, हाहि केवळ लोकांचा उगाच भ्रम आहे. तो नष्ट व्हावा म्हणून औशनसानें दिलेल्या कांहीं जातींचे धंदे येथें देतो. या धंद्यांची व पृष्ठ (४३।४४ वर) दिलेल्या मनूनें सांगितलेल्या धंद्यांची वाचकांनीं तुलना करावी व निर्णय आपल्या मनाशींच ठरवावा.

## औशनसानें सांगितलेले धंदे

१ सूत—वैश्यकर्म करावें.

२ उग्र—राजाज्ञा घेऊन बंदोबस्त करावा.

३ निषाद—वनांतील श्वापदें मारावीं.

४ अंबष्ठ—कृषीवर व नर्तनावर जगावें.

५ वैदहक—शेळ्या, म्हशी, गाई पाळाव्या.

६ पुक्कस—दारू विकावी.

७ आयोगव—शिंपीकाम, कोष्टीकाम व काशाचीं भांडीं विकणें.

८ मागध—भाटकर्म, वैश्यप्रेष्यकर.

९ चंडाल—मलापकर्षण.

वरील नऊ जातींचे धंदे हे मनूनें सांगितलेल्या धंद्यापेक्षां खास निराळे आहेत. किंबहुना कित्येकांचे धंदे पूर्वीपेक्षां सुधारलेलेहि आहेत. मनुकालीं जो उग्र उंदीर मारून खात असे, तो पुढें पोलीसाचें काम करूं लागला, अश्वसारथ्य करणारा सूत हा व्यापार-धंदे करूं लागला. मासे मारणारा निषाद अरण्यांत जाऊन तेथील श्वापदावर नेम धरूं लागला. पूर्वीचा पुक्कस हा कलाल बनून दारू विकूं लागला व वैदेहक हा अंतःपुरांतील स्त्रीकार्य सोडून शेळ्या, मेंढ्या व गाई पाळून त्यावर निर्वाह करूं लागला! चंडालाचें काम मनुकालीं गांवाबाहेरच होतें, पण तो गांवांतील मलापकर्षण ( भंगीकाम ) करण्याकरितां गांवांत येऊं लागला. यावरून मनुकालापेक्षां औशनसकाली समाजस्थिति पालटली होती व म्हणूनच लोकांचे धंदेहि पालटले होते, हेंच खरें नव्हे काय ? जातींच्या नांवांत एकवाक्यता नाहीं, त्यांच्या धंद्यांत एकवाक्यता नाहीं, फार काय पण उत्पत्तींतहि कसे मतभेद आहेत हेंहि पाहणें मनोरंजक आहे. तुलनात्मक कोष्टकें सर्व जातींच्या व्युत्पत्तीसंबंधानें देण्याजोगीं असलीं तरी विस्तारभयास्तव तो मोह आवरलाच पाहिजे. नमुना म्हणून फक्त अनुलोम व प्रतिलोम यांच्या उत्पत्तीचे दोन तक्ते पुढील पानावर दिले आहेत. +

---

+ टीप—गृह्यसूत्रामध्यें फार थोड्या जातींचीं नांवें आलीं आहेत.

आश्वलायन गृह्यसूत्रांत कुलालाचा उल्लेख आहे. पाणिनीनें कुलालादि गण सांगितला आहे त्यांत व्यास, वरुड, ( बुरुड ), निषाद, चंडाल, बिंब यांचीं नांवें आहेत. वार्तिककार सूत व उग्र यांचीं नांवें देतो. ग्रामशिल्पी, ग्रामनापित, ग्रामकुलाल असे भेद पाणिनीनेंहि केले आहेत. रथकार हें नांव आपस्तंब, कात्यायन, बौधायन सूत्रांत आलें आहे. सत्याषाढ सूत्रामध्यें निषाद व जैमिनी सूत्रामध्यें सौधन्वन हीं नांवें आहेत. कौटिलीय अर्थशास्त्रांत चंडाल, पाषांड, अंबष्ठ, निषाद, पारशव हीं नांवें आलीं आहेत. दिवाकीर्ति, अपकृष्ट, तक्षकर्मोपजीवी अशा कांहीं जातींचा उल्लेख आश्वलायन सूत्रांत आहे. एकंदरींत श्रौत व गृह्यसूत्रांत जो मुख्य धार्मिक विषय आहे त्याच्याशीं संबद्ध असलेल्या जातींचा उल्लेख त्या ग्रंथांत आहे.

| अनुलोम | गौतम | बौधायन | वसिष्ठ | विष्णु | मनु | याज्ञवल्क्य | औशनस | वृद्धहारीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब्राह्मणक्षत्रिया | मूर्धावसिक्त | ब्राह्मण | अनुलोमांना नांव देत नाहीं | अनुलोमांना नांव देत नाहीं | नांव देत नाहीं. | मूर्धावसिक्त | मूर्धावसिक्त | मूर्धावसिक्त |
| ब्राह्मणवैश्या | भृज्जकंठ (भूर्जकंठ) | अंबष्ठ | | | अंबष्ठ | अंबष्ठ | अंबष्ठ | अंबष्ठ |
| ब्राह्मणशूद्रा | पारशव | निषाद (पारशव) | | | निषाद (पारशव) | निषाद (पारशव) | पारशव | निषाद |
| क्षत्रियवैश्या | माहिष्य | क्षत्रिय | | | नांव देत नाहीं. | माहिष्य | सूत | माहिष्य |
| क्षत्रियशूद्रा | यवन | उग्र | | | उग्र | उग्र | नांव देत नाहीं. | उग्र |
| वैश्यशूद्रा | करण | रथकार | | | करण | करण | सूचक | करण |

रथकार हें अधीक नांव अनुलोमांत नवीन देतो.

| प्रतिलोम | गौतम | बौधायन | वसिष्ठ | विष्णु | मनु | याज्ञवल्क्य | औशनस | वृद्धहारीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षत्रियब्राह्मणी | सूत | सूत | सूत | सूत | सूत | सूत | सूत | सूत |
| वैश्यक्षत्रिया | धीवर | आयोगव | पुल्कस | पुक्कस | मागध | मागध | आयोगव | मागध |
| वैश्यब्राह्मणी | मागध | वैदेहक | रामक | वैदेहक | वैदेहक | वैदेहक | मागध | वैदेहक |
| शूद्रवैश्या | वैदेह | मागध | अंत्यावसायी | आयोगव | आयोगव | आयोगव | वैदेहक | आयोगव |
| शूद्रक्षत्रिया | पुल्कस | क्षत्ता | वैण | मागध | क्षत्ता | क्षत्ता | पुक्कस | क्षत्ता |
| शूद्रब्राह्मणी | चंडाल | चंडाल | चंडाल | चंडाल | चंडाल | चंडाल | चंडाल | चंडाल |

रथकार हा प्र. न. सांगतो.

वर जो अनुलोम व प्रतिलोम यांच्या उत्पत्तीचा तक्ता दिला आहे, त्याचें आतां परीक्षण करूं.

ब्राह्मण व क्षत्रिया यांच्या पुत्राला बौधायन ब्राह्मण म्हणतो. मनु नांव देत नाहीं, त्यावरून तो ब्राह्मणच समजतो ! वसिष्ठ व विष्णु हे मनूशींच एकमत आहेत आणि गौतम, याज्ञवल्क्य इत्यादि चार त्याला मूर्धावसिक्त म्हणतात ! ब्राह्मण व वैश्या पुत्राला गौतम भृज्जकंठ उर्फ भूर्जकंटक म्हणतो. पण मनूनें हें नांव व्रात्य-विप्र-स्त्रीपुरुष-संततीला दिलेलें आहे. दोन स्मृतिकार याचें नांव देत नाहींत व पांच स्मृतिकार त्याला अंबष्ठ असें म्हणतात. निषादपारशव जातीबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे. क्षत्रिय व वैश्या पुत्राला कोणी क्षत्रिय म्हणतात, कोणी माहिष्य म्हणतात, तर कोणी सूत म्हणतात. क्षत्रियाचा धंदा प्रसिद्धच आहे, सूताचा धंदा अश्वसारथ्य आहे, पण माहिष्याचा धंदा कांहीं निराळाच आहे ! क्षत्रिय व शूद्रा पुत्राला गौतम यवन म्हणतो, तर इतर कांहीं उग्र म्हणतात, पण औशनस त्याची उत्पत्ति निराळी देतो. यवन जर अनुलोम आहे तर तो हिंदु होता व म्लेंच्छ आणि यवन हे हल्लीं दोघे जसे अस्पृश्य समजले जातात, तसे पूर्वी समजत नसत. "यवनासारखा नीच नाहीं. त्याची भाषा प्राण गेला तरी शिकूं नये," अशी कल्पना गौतमकालीं नव्हती. गौतमबौधायनवसिष्ठादि धर्मसूत्रांत जसा म्लेंच्छदर्शन, संभाषण व सहवासाचा निषेध आहे, तसा यवनाचा नाहीं. तेव्हां क्षत्रिय-शूद्रापुत्र जो यवन तो गौतमकालीं हिंदु होता, असें जरी ठरलें; तरी उग्र व यवन यांचा धंदा सर्वांनीं एकच सांगितलेला आहे असें नाहीं. उग्रानें बिळांतील प्राणी मारून खावें असें मनु म्हणतो. तर त्यानें राजाज्ञा घेऊन बंदोबस्त करावा असें औशनस म्हणतो. वैश्य व शूद्रापुत्राला करण, रथकार, सूचक अशीं भिन्नभिन्न नांवें आहेत. पण रथकाराचा धंदा सारथ्य, सूचकाचा धंदा शिंपीकाम व करणाचा धंदा याहून निराळाच आहे. याज्ञवल्क्य रथकाराची उत्पत्ति माहिष्य पुरुष व करणस्त्री यापासून देतो. तात्पर्य यांतहि सर्वांचें एकमत नाहीं. प्रतिलोमापैकीं सूत आणि चंडाल या दोघांबद्दल सर्वांचें एकमत आहे. पण वैश्य व क्षत्रिया पुत्राला कोणी धीवर, कोणी आयोगव, कोणी पुक्कस, तर कोणी मागध अशीं भिन्नभिन्न नांवें देतात. यांचे धंदेहि अगदीं परस्पर विरुद्ध असे आहेत. धीवर म्हणजे कोळी, आयोगव म्हणजे सुतार, पुक्कस म्हणजे कलाल किंवा गांवाबाहेर

राहून बिळांतील प्राणी मारून खाणारा व मागध हा फिरता किंवा बैठा व्यापार करणारा मनुष्य, असे त्यांचे विविध धंदे आहेत. वैश्य व ब्राह्मणी पुत्राला वसिष्ठ रामक म्हणतो. हें नांव अपूर्व आहे. याचा धंदा कोणीहि दिलेला नाहीं. पण मागध आणि वैदेहक यांचे धंदेहि एक नाहींत. वैदेहकानें अन्तःपुरांतील स्त्रीकार्य करावें, असे मनु म्हणतो, तर औशनस त्यानें शेळयामेंढ्याचा व्यापार करावा असें म्हणतो. मागधाचें कार्य कोणी व्यापार तर कोणी भाटकर्म असें सांगतो. शूद्र व वैश्या यांच्या पुत्राला अगदीं विरुद्ध अशीं नांवें दिलीं आहेत. वसिष्ठ त्याला अंत्यावसायी म्हणजे डोंबाची वृत्ति करणारा म्हणतो, तर एक दोन स्मृतिकार त्याला वैदेहक व मागध म्हणतात आणि चौघे त्याचा आयोगव म्हणून उल्लेख करतात. स्मशान-क्रिया करणें, व्यापार करणें व शेळयामेंढ्या पाळणें हे धंदे परस्पर विरुद्ध आहेत. तसेंच आयोगव शब्दाचे अर्थहि पुष्कळांनीं अगदीं विरुद्ध असे दिलेले आहेत. आयोगव म्हणजे सुतार, पाथरवट, नट व कोष्टी इतके विविध अर्थ आहेत. तात्पर्य यांतहि परस्पर विरोधच आहे. त्याचप्रमाणें पांचवा प्रतिलोम जो शूद्र-क्षत्रिया-पुत्र त्याला कोणी बुरुड, तर कोणी कलाल, कोणी व्यापारी, कोणी दासीपुत्र असें म्हणतात व त्याचे धंदेहि भिन्न भिन्न सांगतात. असें होण्याचें कारण हेंच कीं वरील सर्व स्मृतिकार हे एका कालीं व एका स्थलीं झाले नाहींत. स्थल व कालभेदामुळें त्यांच्या कालच्या समाजस्थितींतहि अंतर पडलें आणि त्याचें प्रतिबिंब ग्रंथावर पडलें. सर्व स्मृतिकारांनीं अगदीं एकच धर्मविषय सर्वत्र सांगितला आहे हा भ्रम वरील विवेचनावरून नष्ट झाल्यास बरें होईल.

एवढा वेळपर्यंत धर्मशास्त्राच्या आधारें जातिसंस्थेचा विचार वाचकापुढें मांडला. आतां जात्युत्कर्ष पूर्वीं होत होता काय व तो कसा होत होता, हें पाहूं.

जात ही केवळ जन्मावर होती; पण वर्ण हा जन्म, व्यवसाय व संस्कार याशीं संबद्ध होता. प्राचीन काळीं केवळ जन्माला महत्त्व (निदान आजच्या इतकें) नव्हतें, असें गौतम व आपस्तंब सूत्रांवरून दिसतें. जन्माला महत्त्व हें अलीकडील काळांतच फार आलेलें आहे. आपस्तंब म्हणतो कीं अधर्मचर्येनें वरचा वर्ण खालच्या खालच्या वर्णाला प्राप्त होतो व खालचा वर्ण हा धर्मचर्येनें, वरच्या वरच्या वर्णामध्यें जाऊन जातिपरिवर्तन करून घेतो ! आतां धर्माचरण व अधर्माचरण हे शब्द मोघम

असले तरी जन्म व जन्माबरोबर सांगितलेला व्यवसाय आणि संस्कार यांचा मेळ असल्यास तें धर्माचरण होय व त्यांत विसंगति असल्यास तें अधर्माचरण होय असेंच समजलें पाहिजे. वरचे वर्ण आपत्कालीं किंवा मोहानें खालच्या वर्णांचे व्यवसाय करूं लागतात व खालचे वर्णहि महत्त्वाकांक्षेनें वरच्या वर्णांच्या व्यवसायांत शिरतात. असें होऊं लागलें कीं हीन धंद्यामुळें एकाच्या संस्कृतींत फरक पडतो व एकाची संस्कृति उत्तम धंद्यामुळें सुधारते. धंद्याचा व संस्कृतीचा सर्वांगानें नसला तरी पुष्कळच संबंध आहे. म्हणूनच गौतमानें आर्य व अनार्य यांच्या कर्मांचा व्यतिक्षेप ( परस्पर अदलाबदल ) झाला म्हणजे साम्य उत्पन्न होतें असें म्हटलें आहे. जात्युत्कर्षाला पोषक अशीं वचनें आहेत तीं अशीः—

अधर्मचर्यया पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥१०॥
धर्मचर्यया जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥ ११ ॥
आपस्तंब ( २-५-११ )

आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यं ( साम्यम् ) ॥ ६९ ॥
गौतम ( अ. २ प्र. २ )

निषादेन निषाद्यामापञ्चमाज्जातोऽपहन्ति शूद्रताम् ॥ १३ ॥
तमुपनयेत्षष्ठं याजयेत् ॥ १४ ॥ बौधायन ( अ. ८ प्र. १ )

उत्तमानुत्तमान्गच्छन्हीनान्हीनांश्च वर्जयन् ।
ब्राह्मणः श्रेष्ठतामेति प्रत्यवायेन शूद्रताम् ॥ २४५ ॥ मनु ( अ. ४ )

शूद्रायां ब्राह्मणाज्जातः श्रेयसा चेत्प्रजायते ।
अश्रेयान् श्रेयसीं जातिं गच्छत्यासप्तमाद्युगात् ॥ ६४ ॥
शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ।
क्षत्रियाज्जातमेवं तु विद्याद्वैश्यात्तथैव च ॥ ६५ ॥
अनार्यमार्यकर्माणमार्यं चानार्यकर्मिणम् ।
संप्रधार्याब्रवीद्धाता न समौ नासमाविति ॥ ७३ ॥ मनु ( अ. १० )

जात्युत्कर्षो युगे ज्ञेयः सप्तमे पंचमेऽपि वा ।
व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चाधरोत्तरम् ॥ ९६ ॥ याज्ञवल्क्य (अ. १)

वैखानसेन केचित्तु केचिद्भागवतेन च ।
वेदशाखावलम्बास्ते भविष्यन्ति कलौ युगे ॥ ४६

कटकारास्ततः पश्चान्नारायणगणाः स्मृताः ।
शाखा वैखानसेनोक्ता तन्त्रमार्गविधिक्रियाः ॥ ४७
निषेकाद्याः श्मशानान्ताः क्रियाः पूजांगसूत्रधृक् ।
पंचरात्रेण वा कश्चित्तन्त्रोक्तं धर्ममाचरेत् ॥ ४८ ॥ औशनस ॥

वचनांचा पूर्वापर संबंध आग्रहशून्य दृष्टीनें पाहिल्यास आपस्तंब व गौतमाचें म्हणणें हेंच उघड दिसतें कीं वरचा वर्ण हा हीन कर्मानें खालीं येतो व खालचा वर्ण उच्च व्यवसायानें जातिपरिवर्तन करूं शकतो. आर्यांनीं अनार्य कर्म व अनार्यांनीं आर्यकर्म स्वीकारलें तर दोघामध्यें कसें साम्य उत्पन्न होतें हें हरदत्ताच्या भाषेंतच देतों.

आर्यस्त्रैवर्णिकः । अनार्यः शूद्रः । तयोः कर्मण आचारस्य व्यतिक्षेपे व्यत्यासे सति तयोः साम्यमेव भवति । न परिचार्यपरिचारकभावः । ब्राह्मणादिरप्यनार्यकर्मा चेन्न शूद्रेण परिचरणीयः । शूद्रोऽप्यार्यकर्माचेदनार्यं कर्मभिरितरैर्जात्यपकर्षेण नावमन्तव्य इति ॥

आर्य हे त्रैवर्णिक व अनार्य हा शूद्र होय. यांच्या कर्मामध्यें उलटापालट झाली म्हणजे उभयतांत साम्य उत्पन्न होतें आणि सेव्य-सेवक भाव नष्ट होतो. ब्राह्मण जर अनार्यकर्मा असेल तर शूद्रानें जशी त्याची सेवा करूं नये तशीच ब्राह्मणांनीं आर्यकर्मी शूद्राचो हा शूद्र आहे म्हणून निंदाहि करतां कामा नये. ( आर्यकर्मा शूद्र हा आपला उच्च व्यवसाय व राहाणी यामुळें आपला सामाजिक दर्जा वाढवितो व जन्माबरोबर आलेली आपल्या संबंधींची हीन कल्पना नष्ट करतो असें हरदत्त म्हणतो. )

बौधायनानें पांचव्या पिढीमध्यें निषादाची शूद्रता जाते व ती गेल्यावर त्याचें उपनयन करून, याजनहि करावें, असें म्हटलें आहे. तें ' निषाद स्थपतिं यजेत ' या श्रुतीचें विवरणच होय. मनुस्मृतीमध्यें उलट सुलट दोन्ही विचार आहेत. ब्राह्मणाचा शूद्र व शूद्राचा ब्राह्मण होऊं शकतो, असें मनूनें म्हटलें आहे. पण मनूच्या सर्व विवरणामध्यें व्यवसायाचा उल्लेख फारसा नाहीं. आर्य व अनार्य यांच्या बीजक्षेत्राची चर्चा करून आर्यबीज व आर्यक्षेत्र हें उत्कृष्ट, आर्यबीज व अनार्यक्षेत्र हें अपकृष्ट आणि अनार्यबीज व अनार्यक्षेत्र हे निकृष्ट असें मनूनें ठरविलें आहे व कर्मदृष्ट्या दोघांत साम्य आहे व नाहीं असें धरसोडीचें मत दिलें आहे.

मनूपेक्षां याज्ञवल्क्याचेंच वचन अधिक स्पष्ट आहे. पांचव्या किंवा सातव्या पिढींत जात्युत्कर्ष होतो, असें याज्ञवल्क्य म्हणतो व कर्मांचा व्यत्यास म्हणजे उलटापालट झाली कीं आर्यानार्यांमध्यें साम्य होतें असें तो स्पष्ट मत देतो. कर्मव्यत्ययाला गौतमाप्रमाणें याज्ञवल्क्यानें महत्त्व दिलेलें आहे. मिताक्षराकाराची या श्लोकावरील मार्मिक टीका पहा.

तस्मिन्व्यत्यये सति यद्यापद्विमोक्षेऽपि तां वृत्तिं न परित्यजति तदा सप्तमे षष्ठे पञ्चमे वा जन्मनि साम्यं यस्य हीनवर्णस्य कर्मणा जीवति तत्समानजातित्वं भवति । तद्यथा । ब्राह्मणः शूद्रवृत्त्या जीवंस्तामपरित्यजन् यदि पुत्रमुत्पादयति सोपि तयैव वृत्त्या जीवन्पुत्रान्तरमित्येवं परम्परया सप्तमे जन्मनि शूद्रमेव जनयति ।

आपत्कालीं ब्राह्मणानें खालच्या वर्णाची वृत्ति करावी. पण आपत्ती संपल्यावर जर तो ती वृत्ति ( धंदा ) न सोडील तर पांचव्या किंवा सहाव्या पिढींत ज्या हीन वर्णाच्या धंद्यावर तो जगतो, त्याच हीन वर्णांत हाहि जातो. उदाहरणार्थ आपत्कालीं ब्राह्मणानें शूद्राचा धंदा स्वीकारला पण आपत्ति संपल्यावरहि जर तोच धंदा त्यानें चालवला व त्यांतच पुत्र व नातू अशी परंपरा उत्पन्न केली, तर सातवी पिढी शूद्र वर्णाची होते.

जातीचा उत्कर्ष व अपकर्ष यासंबंधानें टीकाकारानें दिलेला दुसरा अर्थ कसा अव्यावहारिक व अनैतिहासिक आहे, हेंहि पाहिलें पाहिजे. टीकाकार म्हणतात कीं ब्राह्मण व निषादीचा विवाह झाला, तिच्या मुलीचा पुन्हां ब्राह्मणाशीं विवाह, तसाच नातीचा, पणतीचा व खापरपणतीचा पुनः पुन्हा ब्राह्मणाशीं विवाह होत गेला म्हणजे सातव्या पिढींत क्षेत्राचा दोष जातो व होणारी संतति ब्राह्मण ठरते. एखाद्या ब्राह्मणानें चुकून निषादीशीं विवाह केला हें संभवेल. कारण निषाद व शूद्र स्त्रीच्या विवाहाचा निषेध कडकडून केलेला आहे. पण सात पिढ्यापर्यंत सारखा ब्राह्मणनिषादीजन्य मुलीशीं लग्न करणारा ब्राह्मण भेटेलच असें नाहीं. प्रत्येक पिढी तीस वर्षांची धरली तरी निदान दोनशें वर्षे एवढा काल एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमुच्चयाच्या ध्यानांत राहाण्याजोगा नाहीं. ब्राह्मणांनीं या जात्युत्कर्षाच्या बाबतींत नियमन करावें, अधिकारी नेमावेत किंवा संस्था उत्पन्न कराव्या, असें कोठेंहि म्हटलेलें नाहीं. तसेंच राजधर्मामध्यें राजानें या बाबतींत नोंद ठेवावी,

अशीं लग्नें नोंदवावींत, त्या कामावर अमुक अमुक ब्राह्मण अधिकारी नेमावेत असेंहि म्हटलेलें नाहीं. राजधर्मांत हा विषय नाहीं. ब्राह्मणधर्मांत हें प्रकरण नाहीं आणि कौटिलीय अर्थशास्त्र व महाभारत अशा प्रमाण ऐतिहासिक महाग्रंथांत कुठेंहि हा अर्थ व्यवहार्य ठरेल, असा उल्लेख नाहीं. तेव्हां टीकाकारांनीं केलेला अर्थ योग्य आहे, असें म्हणणें सयुक्तिक वाटत नाहीं. त्या अर्थाप्रमाणें, लग्नाची नोंद पाहिजे, रजिस्टर पाहिजे, त्यावर अधिकारी पाहिजेत, आणि दोनदोनशे वर्षांची टिपणेंहि पाहिजेत. हीं नसतील तर हा अर्थ अनर्थावह होय. कारण ज्याला उत्कर्ष साधून घ्यावयाचा आहे तो तीन पिढ्या झाल्या तरी सात पिढ्या झाल्या असें म्हणणार व ज्यांना तो साधूं द्यावयाचा नसेल, त्यांच्याजवळ त्या विरुद्ध जो पुरावा पाहिजे, त्याची सामुग्री कुठेंच सांगितलेली नाहीं.

दुसरें असें कीं हा उत्कर्ष बीजाचा कां क्षेत्राचा ? बीजोत्कर्ष म्हणावा तर बीज सात पिढ्यापर्यंत एकच आहे व क्षेत्रोत्कर्ष म्हणावा तर त्या क्षेत्राचा उत्कर्ष होतच नाहीं. क्षेत्रजन्य संततीचा उत्कर्ष होतो. पण जाति ही क्षेत्रावरच होती असें नसून, बीजावरहि ती होती असे उलटसुलट उल्लेख आहेत. एकंदरींत टीकाकारांचा हा अर्थ पुष्कळच घोटाळ्याचा व भानगडीचा आहे. व्यवहारदृष्ट्या कर्मांची अलटापालट संभवते व त्यामुळें साम्य उत्पन्न होतें हें मात्र शक्य आहे. न्हाव्याचा मुलगा व्यापारी, त्याचा नातु मास्तर व पणतु प्रोफेसर, अशी स्थिति झाल्यास चौथ्या पिढींत, पूर्व विस्मरण होऊन त्याचा दर्जा वाढेल आणि या उलट बाप वैदिक ब्राह्मण, मुलगा हॉटेलवाला, नातु ड्रायव्हर व पणतु कलालाचा कारकून, अशी स्थिति राहिल्यास पूर्वविस्मरण होऊन ब्राह्मणाचा सामाजिक दर्जा कमी होतो, हे युक्ति व व्यवहार दृष्ट्या अत्यंत सयुक्तिक आहे.

औशनस स्मृतीमध्यें पूर्वी वैश्य व शूद्र असलेले कटकार हे वैखानस व भागवत दीक्षेमुळें वेदशास्त्रावलंबी होतात. त्यांना नारायणगण म्हणतात आणि ते वैखानास आगम व पंचरात्र यांच्या आधारें यज्ञोपवीत धारण करून अंत्येष्टीपर्यंत सर्व संस्कार करतात असें म्हटलें आहे. त्यावरूनहि जात्युत्कर्ष सिद्ध होतो. शूद्राचा कटकार, कटकाराचा नारायणगण, हा जसा होतो, तसाच अस्पृश्याचाहि, हरिजन कां होणार नाहीं ?

मनुष्याचें अन्तःकरण, त्याच्या भावना व त्याचे संस्कार, यांचा विचार केला असतां, शिक्षण, राहाणी व व्यवसाय यामुळें मनुष्यांत विलक्षण फरक होतो हें सिद्ध होतें. खालच्या जातींनीं उच्च राहाणी, उच्च शिक्षण, उच्च संस्कार व उच्च व्यवसाय स्वीकारले ( तसा त्यांना आज कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं ) तर त्यांची संस्कृतीहि उच्च होणार नाहीं काय ? व ती तशी झाल्यावरहि त्या जातीचा सामाजिक दर्जा पूर्ववत् राहील काय ? कधींहि राहाणार नाहीं. आज समाजांत ही क्रान्ति घडत आहे. कांहीं उच्च-वर्णीय जाति आचार, राहाणी व व्यवसाय, यांत अधःपतित झाल्यामुळें त्यांचाहि सामाजिक दर्जा घटत आहे. म्हणून पूर्वाचार्यांनीं सांगितल्याप्रमाणें जात्युत्कर्षाचें तत्त्व मान्य व रूढ करून सर्व निकृष्ट जातींना उत्कर्षाचें क्षेत्र दाखविणें हेंच योग्य आहे.

सदाचार, संस्कृति व उच्च व्यवसाय यामुळें जात्युत्कर्ष होतो, असें दाखविणारे कित्येक श्लोक महाभारतांतील शांतिपर्व, अनुशासनपर्व व अश्वमेधपर्व यामध्यें सांपडतील. परंतु स्मृति व धर्मसूत्रें एवढेंच आमचें क्षेत्र मर्यादित असल्यामुळें, अश्वमेधपर्व अ. ३७, शांतिपर्व अ. २९१, अनुशासनपर्व अ. १४३ या ठिकाणीं जिज्ञासूंनीं आपली जिज्ञासा भागवावी एवढेंच सांगून, पुढें जाणें भाग आहे. कांहीं ठिकाणच्या म्हणीहि जात्युत्कर्ष दर्शवितात, ' रजपुताणि तण पिढिये गड चढे ' म्हणजे सामान्य रजपुताची मुलगी ही तीन पिढ्यामध्यें राजाची बायको होण्यालाहि योग्य होते. ' मा मारवाडीणी दिकीशुकलाणी ' म्हणजे आई ही सामान्य मारवाडीण असते पण तिची नात शुकलाची म्हणजे ब्राह्मणाची ( तीन पिढ्यामध्यें ) बायको होऊं शकते. जात्युत्कर्ष होणें म्हणजे त्या जातीचा सामाजिक दर्जा वाढणें, असाच अर्थ आहे. तो दर्जा वाढल्यानें उच्च जातीशीं अन्न व्यवहारास व लग्न व्यवहारास मुळींच प्रत्यवाय नसतो असें मात्र कुठें म्हटलेलें नाहीं. तसें झाल्यास तो संकरच होईल. उत्कर्ष निराळा व संकर निराळा. उत्कर्ष म्हणजे जन्माबरोबर आलेली नीचतेची, हीनतेची व अस्पृश्यतेची कल्पना नष्ट होणें एवढेंच ! व ती धंद्यामध्यें बदल केला, राहाणी सुधारली म्हणजे आपोआप नष्ट होते.

आजच्या या यांत्रिकयुगांत धंद्यांतील अमंगलपणा नष्ट होत आलेला असल्यामुळें अगदीं अमंगल धंदेहि स्वच्छपणें करण्याजोगे झालेले आहेत. तसेंच

अमुकांनीं अमुकच धंदे केले पाहिजेत, असें नियंत्रण आज कोणीहि घालूं शकणार नाहीं व तें चालणार नाहीं. धंद्यांची गल्लत सारखी सुरू आहे. पूर्वी अमुक वर्णानें व जातीनें अमुक अमुकच धंदे केले पाहिजेत असें बंधन होतें. तें त्या काळीं समाज व्यवस्थेच्या दृष्टीनें इष्ट होते. पण आज तसें बंधन खालच्या व वरच्या जातींनाहि नसल्यामुळें, खालच्या जातींना धंदे, शिक्षण व राहाणी यांत सुधारणा करून उत्कर्ष साधून घेण्याची बहुमोल संधी आलेली आहे, यांत मुळींच शंका नाहीं. खालच्या जातींच्या उत्कर्षाकरितां, शिक्षण देणें, राहाणी सुधारणें, त्यांना आर्यसभ्यता शिकविणें इत्यादि सर्व केले पाहिजे असें कट्टर सनातनीसुद्धां म्हणतात. पण इतकें झाल्यावर त्यांचा दर्जा वाढेल व त्यांची अस्पृश्यता नष्ट होईल हें मात्र त्यांच्या लक्ष्यांत येत नाहीं, या कोत्या समजुतीला काय म्हणावें हेंच कळत नाहीं ! उच्च शिक्षण, उच्च व्यवसाय, उच्च राहाणी यामुळें वरचे वर्ग जसे आज अधःपतित झाले तसेंच आतां खालचे वर्गहि अधीक पतित होतील असें ज्याचें मत असेल, त्याचें समाधान ब्रह्मदेवहि करूं शकत नाहीं, हें मात्र निर्विवाद आहे.

# प्रकरण सहावें

## आश्रम-विचार

हिंदुधर्माचें वैशिष्ट्य म्हणजे त्याचें तत्वज्ञान होय. परंतु वर्णाश्रमसंस्था हेंच त्याचें वैशिष्टय आहे असें अट्टाहासानें सांगणारा अद्याप एक वर्ग आहे. तेव्हां वर्णाप्रमाणें आश्रमांचाहि विचार केला पाहिजे. हिंदुसमाजांत आज पूर्वी वर्णन केलेली वर्णसंस्था नाहीं, वर्णोचितव्यवसाय, संस्कार व आचार यांचा लोप होऊन तेथें जातिसंस्था आलेली आहे व त्यांतील प्रत्येक जातीनें आपला उत्कर्ष ऐहिकदृष्टया करण्याचा यत्न कां व कसा केला पाहिजे हें गेल्या प्रकरणांत सांगितलें. आतां येथें आश्रमविचार करूं.

सर्व सूत्रकार व स्मृतिकार हे आश्रमाचें महत्त्व सारखेंच सांगतात असें नाहीं. चारहि आश्रम अवश्य आहेत असें मनु, गौतम व दक्ष वगैरे सांगतात.

ब्रह्मचर्यातून वानप्रस्थ किंवा संन्यासहि घेता येतो असेंहि कित्येक स्मृतिकार प्रतिपादितात. तसें झाल्यास गृहस्थाश्रमाची किंमत कवडीचीहि ठरत नाहीं. सर्व आश्रम सारख्याच योग्यतेचे आहेत, असें आपस्तंब म्हणतो, मात्र सर्वांचें प्रतिपालन यथाशास्त्र झालें पाहिजे. बौधायनानें वानप्रस्थाची प्रशंसा व विवेचन हीं इतकीं केलीं आहेत कीं तो ७० व्या वर्षींच संन्यासाश्रमाला परवानगी देतो. बौद्धकाळाच्या आसपासचे स्मृतिकार वानप्रस्थ व संन्यास यांना महत्त्व देतात तर वसिष्ठ, मनु, गौतम व दक्षप्रभृति स्मृतिकार त्यांना गौण ठरवून गृहस्थाश्रमाचें श्रेष्ठत्व दर्शवितात. मनु तर वैदिक कर्मयोगाचें तत्त्व गृहस्थाश्रमांत सांगतो. ब्रह्मचर्याश्रमाविषयीं सर्वांचें एकमत व एकवाक्यता आहे. विद्यार्थ्यानें कसें वागावें, कसें उठावें, कसें बसावें, कशी भिक्षा मागावी, कोणते अनध्याय पाळावेत यासंबंधीं सर्व स्मृतिकारांमध्यें एकमत असलें तरी तें आज उपयोगी नाहीं; कारण व्यवहार अगदीं निराळा झाला आहे. ब्रह्मचर्याश्रमांतील सर्व नियमांची चिकित्सा करून त्यांना विद्यार्जन दर्शेतील एक शिस्त येवढेंच नांव देणें योग्य होईल. आजहि तशी शिस्त पाहिजे; परंतु ती शिस्त आजचीं विद्यासाधनें, विद्यालयें व आजचे देशकाल यांना अनुसरून पाहिजे इतकेंच.

सर्व ब्रह्मचारी आज गुरुगृहांत राहून भिक्षा मागूं शकत नाहींत. जोडे, छत्र्या व कपडे याशिवाय त्यांचें भागत नाहीं. त्यांनीं पूर्वीचे सर्व अनध्याय पाळले तर त्यांचें आज विद्यार्जनहि होणार नाहीं. तेव्हां जगामध्यें जीं उत्कृष्ट विद्यापीठें असतील व जेथून लक्षावधी विद्वान् उत्पन्न झाले असतील तेथीलच शिस्त आपण घेतली पाहिजे व ब्रह्मचर्याश्रम म्हणजे बुद्धि व शरीरबल संपादन करण्याचा काल असें समजून त्या ध्येयाला प्रतिबंधक असलेल्या गोष्टी दूर करण्याचे नियम केले पाहिजेत. विविध स्मृतिकार आश्रमाविषयीं काय म्हणतात तें पाहा.

चत्वार आश्रमा गार्हस्थ्यमाचार्यकुलं मौनं वानप्रस्थ्यमिति ॥ १ ॥

तेषु सर्वेषु यथोपदेशमव्यग्रो वर्तमानः क्षेमं गच्छति ॥ २ ॥

अत एव ब्रह्मचर्यवान् प्रव्रजति ॥ ८ ॥ अथ वानप्रस्थः ॥ १८ ॥

अत एव ब्रह्मचर्यवान् प्रव्रजति ॥ १९ ॥ ( २-९-२१ )

गृहान् कृत्वा सदारः सप्रजः सहाग्निभिर्बहिर्ग्रामाद् वसेत् ॥ ८ ॥
एको वा ॥ ९ ॥ ( २-९-२२ )
स्यात् तु कर्मावयवेन तपसा वा काश्चित् सशरीरोन्तवन्तं लोकं जयति
संकल्पसिद्धिश्च स्यान्न तु तज्ज्यैष्ठ्यमाश्रमाणाम् ॥ १४ ॥
आपस्तंब ( २-९-२४ )
तस्याऽऽश्रमविकल्पमेके ब्रुवते ॥ १ ॥
ब्रह्मचारी गृहस्थो भिक्षुर्वैखानसः ॥ २ ॥
ऐकाश्रम्यं त्वाचार्याः प्रत्यक्षविधानाद्गार्हस्थस्य गार्हस्थस्य ॥ ३५ ॥
न फालकृष्टमधितिष्ठेत् ॥ ३१ ॥ ग्रामं च न प्रविशेत् ॥ ३२ ॥
वैखानसो वने मूलफलाशी तपःशीलः ॥ २५ ॥ गौतम ( अ. ३ )
ब्रह्मचारी गृहस्थो वानप्रस्थः परिव्राजक इति ॥ १७ ॥
ब्रह्मचारी गुरुशुश्रूष्यामरणात् ॥ १८ ॥
वानप्रस्थो वैखानसशास्त्रसमुदाचारः ॥ १९ ॥
ऐकाश्रम्यं त्वाचार्या अप्रजनत्वादितरेषाम् ॥ २९ ॥
जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणैर्वा जायते
ब्रह्मचर्येणार्षिभ्यो यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्य इति ॥ ४१ ॥
बौधायन ( प्र. २ अ. ६ )
अथातः संन्यासविधिं व्याख्यास्यामः ॥ १ ॥
सोऽत एव ब्रह्मचर्यवान्प्रव्रजतीत्येकेषाम् ॥ २ ॥
अथ शालीनयायावराणामनपत्यानाम् ॥ ३ ॥
विधुरो वा प्रजाः स्वधर्मे प्रतिष्ठाप्य वा ॥ ४ ॥
सप्तत्या ऊर्ध्वं संन्यासमुपदिशन्ति ॥ ५ ॥
वानप्रस्थस्य वा कर्मविरामे ॥ ६ ॥ प्र. २ अ. १०
अथ शालीनयायावरचक्रचरधर्मकाङ्क्षिणां
नवभिर्वृत्तिभिवर्तमानानाम् ॥ १ ॥
तेषां तद्वर्तनात्वृत्तिरित्युच्यते ॥ २ ॥
शालाश्रयत्वाच्छालीनत्वम् ॥ ३ ॥
वृत्त्या वरया यातीति यायावरत्वम् ॥ ४ ॥

अनुक्रमेण चरणाच्चक्रचरत्वम् ॥ ५ ॥ प्र. ३ अ. १

अथवानप्रस्थद्वैविध्यम् ॥ १ ॥ पचमानका अपचमानकाश्चेति ॥ २ ॥

तत्र पचमानकाः पञ्चविधाः ॥ ३ ॥

सर्वारण्यका वैतुषिकाः कन्दमूलफलभक्षाः

फलभक्षाः शाकभक्षाश्चेति ॥ ४ ॥ पञ्चैवापचमानकाः ॥ १० ॥

उन्मज्जकाः प्रवृत्ताशिनो मुखेनाऽऽदायिनस्तोयाहारा

वायुभक्षाश्चेति ॥ ११ ॥ बौधायन ( प्र. ३ अ. ३ )

चत्वार आश्रमा ब्रह्मचारी ( रि ) गृहस्थवानप्रस्थपरिव्राजकाः ॥ १ ॥

गृहस्थ एव यजते गृहस्थस्तप्यते तपः ।

चतुर्णामाश्रमाणां तु गृहस्थस्तु विशिष्यते ॥ १४ ॥

यथा नदीनदाः सर्वे समुद्रे यान्तिसंस्थितिम् ॥ १५ ॥

यथा मातरमाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।

एवं गृहस्थमाश्रित्य सर्वे जीवन्ति भिक्षवः ॥ १६ ॥ वसिष्ठ ( अ. ७ )

वानप्रस्थो जटिलश्चीराजिनवासा ग्रामं च न प्रविशेत् ॥ १ ॥

न फालकृष्टमधितिष्ठेत् ॥ २ ॥ वसिष्ठ ( अ. ८ )

अकृष्टं मूलफलं संचिन्वीत, ऊर्ध्वरेताः क्षमाशयः ॥ ३ ॥

न शब्दशास्त्राभिरतस्य मोक्षो न चापि लोकग्रहणे रतस्य ।

न भोजनाच्छादनतत्परस्य नचापि रम्यावसथप्रियस्य ॥ १४ ॥

वसिष्ठ ( अ. ९ )

पैशुन्यमत्सराभिमानाहंकाराश्रद्धानार्जवात्मस्तवपरगर्हादम्भलोभमोह

क्रोधासूयाविवर्जनं सर्वाश्रमिणां धर्म इष्टः ॥ २३ ॥ वसिष्ठ ( अ. १० )

अथब्रह्माश्रमिणस्त्रिविधोऽर्थोभवति ।

शुक्लः शबलऽसितश्च वानप्रस्थस्तपसाशरीरं शोषयेत् ॥

ग्रीष्मेपंचतपाःस्यात् आर्द्रवासा हेमन्ते ।

सर्ववेदं दाक्षिणां दत्वाप्रव्रज्याश्रमीस्यात् ॥ विष्णु ( अ. ५८ )

सा भार्या या गृहे दक्षा सा भार्या या पतिव्रता ।

सा भार्या या पतिप्राणा सा भार्या या प्रजावती ॥ १५ ॥

लालनीया सदा भार्या ताडनीया तथैव च ।
ताडिता लालिता चैव स्त्री श्रीर्भवति नान्यथा ॥१६॥ शंखस्मृति (अ. ४)

पुत्रेषु दारान्निक्षिप्य तया वानुगतो वनम् ।
अग्नीनुपचरेन्नित्यं वन्यमाहारमाहरेत् ॥ २ ॥
य आहारो भवेत्तेन पूजयेत्पितृदेवताः ।
तेनैव पूजयेन्नित्यमतिथिं समुपागतम् ॥ ३ ॥ ( अ. ६ )
दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं जलं पिबेत् ।
सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥ ६
सर्वभूतसमो मैघः समलोष्टाश्मकांचनः ।
ध्यानयोगरतो भिक्षुः प्राप्नोति परमां गतिम् ॥ ७ ॥
प्राणायामैर्दहेदोषान् धारणाभिश्च किल्बिषम् ।
प्रत्याहारेण संसर्गान्ध्यानेनानीश्वरान्गुणान् ॥११॥ शंखस्मृति (अ. ७)
यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सर्वजन्तवः ।
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्वं आश्रमाः ॥ ७७ ॥
यस्मात्त्रयोऽप्याश्रमिणो ज्ञानेनान्नेन चान्वहम् ।
गृहस्थेनैव धार्यन्ते तस्माज्ज्येष्ठाश्रमो गृही ॥ ७८ ॥ मनु ( अ. ३ )
गृहस्थस्तु यदापश्येद्वलीपलितमात्मनः ।
अपत्यस्यैव चापत्यं तदारण्यं समाश्रयेत् ॥ २ ॥
संत्यज्य ग्राम्यमाहारं सर्वं चैव परिच्छदम् ।
पुत्रेषु भार्यां निक्षिप्य वनं गच्छेत्सहैव वा ॥ ३ ॥
न फालकृष्टमश्नीयादुत्सृष्टमपि केनचित् ।
न ग्रामजातान्यार्तोऽपि मूलानि च फलानिच ॥ १६ ॥
वनेषुच विहृत्यैवं तृतीयं भागमायुषः ।
चतुर्थमायुषोभागं त्यक्त्वा संगान्परिव्रजेत् ॥ ३३ ॥
ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ।
अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः ॥ ३५ ॥
अलाभे न विषादीस्याल्लाभे चैव न हर्षयेत् ।
प्राणयात्रिकमात्रः स्यान्मात्रासंगाद्विनिर्गतः ॥ ५७ ॥

एषधर्मोऽनुशिष्टो वो यतीनां नियतात्मनाम् ।
वेदसंन्यासिकानां तु कर्मयोगं निबोधत ॥ ८६ ॥
ब्रह्मचारी गृहस्थश्च वानप्रस्थो यतिस्तथा ।
एते गृहस्थप्रभवाश्चत्वारः पृथगाश्रमाः ॥ ८७ ॥
सर्वेपि क्रमशस्त्वेते यथाशास्त्रं निषेविताः ।
यथोक्तकारिणं विप्रं नयन्ति परमां गतिम् ॥ ८८ ॥
सर्वेषामपि चैतेषां वेदस्मृतिविधानतः ।
गृहस्थ उच्यते श्रेष्ठः स त्रीनेतान्बिभर्ति हि ॥ ८९ ॥
यथा नदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम् ।
तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥ ९० ॥
चतुर्भिरपि चैवैतैर्नित्यमाश्रमिभिर्द्विजैः ।
दशलक्षणको धर्मः सेवितव्यः प्रयत्नतः ॥ ९१ ॥
धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणं ॥ ९२ ॥ मनु ( अ. ६ )

आपस्तंबः—गृहस्थ, आचार्यकुल, मौन व वानप्रस्थ असे चार आश्रम आहेत. या सर्वांमध्यें यथाशास्त्र व अव्यग्रपणें धर्म पाळल्यास कल्याण होतें. ब्रह्मचर्यांतून एकदम वानप्रस्थ किंवा संन्यासहि घेता येतो. वानप्रस्थाश्रमांत बायका, मुलें व अग्नि यांसह अरण्यांत जाऊन राहावें किंवा एकट्यानें राहावें, अमूकच आश्रम श्रेष्ठ असें नाहीं. तपानें व कर्मक्षयानें, कोणीहि मनुष्य उत्तम लोकाप्रत जातो व आपले संकल्प पूर्ण करून घेतो. ( तप, कर्मक्षय, सदाचार हीच लोकजयाची मुख्य साधनें होत. )

गौतमः—आश्रमांचा विकल्प आहे असें कोणी म्हणतात. ब्रह्मचारी, गृहस्थ, भिक्षुक व वैखानस असे चार आश्रम आहेत. श्रुतींमध्यें गृहस्थाश्रमाचें प्रत्यक्ष विधान आहे, म्हणून तोच मुख्य होय व तो एकच आश्रम होय. वानप्रस्थाला वैखानस असेंहि म्हणतात. या आश्रमांत वनांत राहून फळें-मुळें खाऊन तपयुक्त असावें, गांवामध्यें येऊं नये. लागवडीस आलेल्या जमीनीवर राहूं नये. तेथील कोणतेंहि धान्य व फळें वगैरे घेऊं नयेत.

बौधायनः—हा चौथ्या आश्रमाला भिक्षु किंवा मौन असें न म्हणतां परिव्राजक म्हणतो. तिसरा आश्रम हा वैखानसशास्त्रानुसारी आहे. नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यानें आमरण गुरुशुश्रुषा करावी. इतर आश्रम हे वांझ आहेत म्हणून गृहस्थाश्रम हा एकच आश्रम होय. हा पत्करून जन्माबरोबर आलेलीं तीन ऋणें फेडावींत. ब्रह्मचर्यानें ऋषिऋण, यज्ञानें देवऋण व प्रजेनें पितृऋण फेडावें. कांहींच्या मतें पहिल्या आश्रमांतून चौथा आश्रम घेतां येतो. पण ज्यांना मुलें नाहींत असे शालीन व यायावर गृहस्थ आणि मुलांची व्यवस्था ज्यानें लावली आहे, अशा विधुरानेंहि सत्तर वर्षांनंतरच संन्यास घ्यावा. शालीन, यायावर व चक्रचर इत्यादि धर्मकांक्षी वानप्रस्थाश्रमी लोक अनेक वृत्तीनें राहात होते. शालेचा (धर्मशाळेचा) आश्रय करीत म्हणून शालीन, उञ्छवृत्तीनें निर्वाह करीत म्हणून यायावर व मोजून क्रमानें पावलें टाकीत म्हणून चक्रचर, असें म्हणत. वानप्रस्थाश्रमामध्येंहि शिजविणारे व न शिजविणारे असे दोन वर्ग होते. त्यांत सर्व आरण्यधान्यें, कोंडा, कंदमूलफळें, नुसती फळें व नुसती शाक खाणारे असे पांच वर्ग व दुसरे पांच हे उन्मज्जक, प्रवृत्ताशी, तोंडाला येईल ते खाणारे, तोयाहारी व वायुभक्षी असे होते. बौधायनकालीं वानप्रस्थाश्रम चांगला भरभराटीत होता असें म्हणावें लागतें.

वसिष्ठः—सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ होय. सर्व नदीनद जसे समुद्राला जाऊन मिळतात किंवा सर्व जसे आईच्या आश्रयानें जिवंत राहतात, त्याप्रमाणें गृहस्थावरच सर्व आश्रम व भिक्षु हे जगत असतात. तृतीयाश्रमी गृहस्थानें जटाधारण कराव्यात, अजिनें पांघरावींत, गांवांत येऊं नये. नांगरलेल्या जमीनीवर राहूं नये, न नांगरलेल्या जमीनींतील मुळें व फळें खावींत. ब्रह्मचारी व क्षमाशील असावें. शब्दशास्त्रामध्यें रंगलेला, लोकसंग्रहाच्या मागें लागलेला, भोजनाच्छादन व सुंदर गृहें यांना लोलुप अशा संन्याशाला मोक्ष मिळत नाहीं. चारहि आश्रमामध्यें पुढील दुर्गुण नसणें हें आवश्यक आहे. टवाळखोरपणा, मत्सर, अभिमान, अहंकार, अश्रद्धा, सरळपणा नसणें, आत्मस्तुति, परनिंदा, दंभ, लोभ, मोह, क्रोध, दीर्घद्वेष हे ते दुर्गुण होत.

विष्णुः— विष्णुधर्मसूत्रांत शुक्ल, शबल व असित, असे गृहस्थांचे तीन प्रकार धंद्यावरून सांगितलेले आहेत. तृतीयाश्रमी मनुष्यानें तपानें शरीरशोष

करावा तो असा कीं– भर उन्हाळ्यांत पंचाग्निसाधन करावें व कडक हिवाळ्यांत, ओलीं वस्त्रें धारण करून तपश्चर्या करावी, अनुक्रमें सर्व वेदांच्या अध्ययनाप्रीत्यर्थ दक्षणा देऊन चतुर्थाश्रम स्वीकारावा.

शंख स्मृतीमध्यें पतिव्रता व दक्ष, अशा भार्येचें महत्त्व सांगून प्रसंगीं तिला ताडण केल्यास ती स्त्रीची श्री होते असें म्हटलें आहे. तृतीयाश्रमामध्यें स्त्रीसह वनांत जावे किंवा स्त्रीला मुलांच्या स्वाधीन करावी आणि अग्निसेवा व वन्यआहार करून दिवस काढावेत. जें अन्न उपलब्ध असेल त्यानेंच पितर, देवता व अतिथी यांचें पूजन करावें. संन्याशानें पवित्र ठिकाणीं पाऊल टाकावें, गाळलेलें पाणी प्यावें, सत्य बोलावें व मनाला अत्यंत पवित्र व अन्तःकरणाला प्रसन्न असें आचरण करावें. सर्वभूतसम, समलोष्टाश्मकांचन, ध्यानयोगरत असा जो भिक्षु असतो तोच परम गतीला जातो. प्राणायामानें दोष जाळावेत, धारणेनें पाप जाळावें, प्रत्याहारानें आसक्ति व ध्यानानें अनीश्वर गुणांचा नाश करावा.

मनुः—सर्व आश्रमांत गृहस्थाश्रमच श्रेष्ठ होय असें अनेक दृष्टांतांनीं सांगितलें आहे. डोक्याला टक्कल पडलें व नातवाचें मुख पाहिलें म्हणजे तृतीयाश्रमांत जावें, बरोबर वाटल्यास बायको न्यावी किंवा तिला मुलांचे स्वाधीन करावी. तृतीयाश्रमानंतर चौथ्या आश्रमांत जावें. तीन ऋणें फेडल्याशिवाय चौथ्या आश्रमांत गेल्यास अधःपात होतो. यतीनें हर्ष, विषाद, सुखदुःख यांविषयीं समवृत्ति ठेवावी. प्राणधारणेपुरतें अन्न मिळवावें. यतींच्या आचाराशिवाय वैदिक संन्याशांचा एक कर्मयोगहि सर्वत्र आहे तो समजून घ्यावा. तो म्हणजे प्रत्येक आश्रमांतील आपआपलें कर्तव्य उत्तम व यथाशास्त्र करणें हा होय. वैदिक कर्मयोगांत गृहस्थाश्रम हाच श्रेष्ठ होय. सर्व आश्रमांतील द्विजांनीं दशलक्षणयुक्त धर्म यत्नानें आचरण करावा. धैर्य, क्षमा, दम, अस्तेय, शौच, इंद्रियनिग्रह, बुद्धि, विद्या, सत्य व न रागावणे हे ते दहा गुण होत.

सुखाभ्युदयिकंचैव नैःश्रेयसिकमेवच ।
प्रवृत्तंच निवृत्तंच द्विविधं कर्मवैदिकं ॥ ८८ ॥

इह चामुत्रवाकाम्यं प्रवृत्तं कर्मकीर्त्यते ।
निष्कामं ज्ञानपूर्वंतु निवृत्तमुपदिश्यते ॥ ८९ ॥

प्रवृत्तं कर्मसंसेव्य देवानामेति साम्यताम् ।
निवृत्तं सेवमानस्तु भूतान्यत्येतिपंच वै ॥ ९० ॥ वैदिककर्मयोग

अभ्युदयाला सुखकर व मोक्षाला हितकर, प्रवृत्त व निवृत्त अशीं दोन वैदिक कर्में आहेत. इहपरलोकीं जें फलाकरितां केलें जातें तें प्रवृत्त कर्म होय व ज्ञानपूर्वक जें निष्काम हेतूनें केलें जातें तें निवृत्त कर्म होय. प्रवृत्त कर्मानें मनुष्य देवतांच्या साम्यतेस पोंचतो व निवृत्त कर्मानें म्हणजे निष्काम कर्मानें तो पंचमहाभूतांचें अतिक्रमण करून जन्ममरणातीत होतो.

आपस्तंबापासून मनूपर्यंत सर्व धर्मशास्त्रकर्त्यांनीं चार आश्रमाविषयीं जें म्हटलें आहे तें थोडक्यांत वर दिलेलेंच आहे. वैदिककर्मयोग हा शब्द मनुस्मृतींतच आला आहे. त्या पूर्वींच्या किंवा पुढच्या स्मृतींत नाहीं, हें विचारार्ह आहे. गृहस्थाश्रमाचें श्रेष्ठत्व व ज्येष्ठत्व अत्यंत ठसठशीतपणें असें मनूनेंच सांगितलें आहे. गृहस्थाच्या श्रेष्ठपणाला वैदिक कर्मयोगी संन्यासाचीच जोड पाहिजे व त्याचें तत्त्वज्ञानहि जगत् दुःखरूप नसून तें आनंदरूप आहे व तें मिथ्या म्हणजे शून्य नसून वरचेवर पालटणारें आणि नामरूपाचीं पांघरुणें बदलणारें असें आहे, अशा प्रकारचें पाहिजे. मनूचें तत्त्वज्ञान याच प्रकारचें आहे, तीन ऋणें फेडणें हा पुरुषार्थ आहे असें तो म्हणतो. माया व मिथ्या हे शब्द मनु सांगत नाहीं. मिथ्या शब्दाचा अर्थहि श्री. शंकराचार्य जसा सांगतात, तसा लोक हल्लीं समजत नाहींत हें आश्चर्यच होय. मिथ्या म्हणजे शून्य, मिथ्या म्हणजे अभाव असें आचार्य कुठेंहि म्हणत नाहींत. तेव्हां जगाविषयींची आणि जगतांतील पुरुषार्थांना साजेशी अशीच तत्त्वज्ञानाची सत्य कल्पना समाजांत आली पाहिजे व ती म्हणजे वैदिक कर्मयोगी संन्यासाचीच होय. असें झालें तरच गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें उत्तम रीतीनें पार पडतील आणि समाज पुरुषार्थी, महत्त्वाकांक्षी, उत्कर्षेच्छु व आक्रमशील असा होईल. आजच्या आपल्या गृहस्थाश्रमाच्या दिव्यावर मायामिथ्यात्वाची, संसाराच्या असारतेची आणि जगत् दुःखमय आहे या कल्पनेची, जी काजळी आलेली आहे, ती झाडून कर्मयोग, आनंदमयता, आणि जगाचें अनादित्व, यांचे स्नेह त्या दिव्यांत वरचेवर घातलें गेलें पाहिजे म्हणजे त्याचा प्रकाश याहून उत्तम पडेल.

कलिवर्ज्यामध्यें ज्याचा निषेध नाहीं व ज्याचें नांवहि नाहीं, असा वानप्रस्थ आश्रम कां लुप्त झाला हें कळत नाहीं. आज समाजांत

क्वचित् संन्याशी दिसतात. परंतु तृतीयाश्रमी मनुष्य औषधालाहि दिसत नाहीं हें आश्चर्यच होय. ६०।६५ वर्षें झालीं तरी पुनः पुन्हां तृतीय व चतुर्थ संबंध करून संसारसुखांतच रमणारे हरीचे लाल दिसतात, मग बिचाऱ्या विधवांनींच व्रतस्थपणें कां राहावें हें कळत नाहीं. त्यांनींहि संसार-सुखाचा पुनः पुन्हां अनुभव घेण्याचें मनांत आणल्यास समाजस्वास्थ्य नष्ट होणार नाहीं काय? वृद्ध स्त्रीपुरुषांनीं कांहीं मर्यादेपुढें स्वार्थपर प्रपंचाचीं बंधनें शिथिल करून परार्थाकडेच वळलें पाहिजे. आज समाजामध्यें अनेक प्रकारचीं सार्वजनिक कार्यें दत्त म्हणून उभीं आहेत व तीं योग्य माणसांच्या हातूनच होण्याजोगीं आहेत. तेव्हां तृतीयाश्रमाचें रूपांतर करून ५५ व ६० वर्षें वयाच्या स्त्रीपुरुषांनीं सार्वजनिक कार्यास स्वतः वाहून घेणें हेंच योग्य आहे व असें केल्यानेंच तृतीयाश्रमाचें पुनरुज्जीवन होणार आहे. पहिला आश्रम हा आज फक्त बांधमुंज व सोडमुंज यांच्याकरितां आहे. त्या आश्रमांतील कोणताहि नियम आज व्यवहारांत नसल्यामुळें तो आश्रम आज जवळ जवळ नष्टच झालेला आहे. तथापि विद्यार्जनाचा विशिष्ट काळ म्हणून त्यांतील शिस्त पाळली पाहिजे व गृहस्थाश्रमावर आलेलीं असारत्वाची व क्षणभंगुरत्वाची छाया दूर केली पाहिजे. चतुर्थाश्रमासंबंधीं लिहिण्यापूर्वी याज्ञवल्क्यापासून व्यासापर्यंत इतर स्मृतिकार आश्रमाविषयीं काय म्हणतात हें थोडेसें पाहाणें आवश्यक आहे.

यत्रानुकूल्यं दम्पत्योस्त्रिवर्गस्तत्र वर्धते ॥ ७४ ॥
सुतविन्यस्तपत्नीकस्तथा वानुगतो वनम् ।
वानप्रस्थो ब्रह्मचारी साग्निः सोपासनो व्रजेत् ॥ ४५
दान्तस्त्रिषवणस्नायी निवृत्तश्च प्रतिग्रहात् ।
स्वाध्यायवान्दानशीलः सर्वसत्त्वहिते रतः ॥ ४८
ग्रीष्मे पंचाग्निमध्यस्थो वर्षासु स्थण्डिलेशयः ।
आर्द्रवासास्तु हेमन्ते शक्त्या वापि तपश्चरेत् ॥ ५२
यः कण्टकैर्वितुदति चन्दनैर्यश्च लिम्पति ।
अक्रुद्धोऽपरितुष्टश्च समस्तस्य च तस्यच ॥ ५३
ग्रामादाहृत्य वाग्रासानष्टौ भुंजीत वाग्यतः ।
वायुभक्षः प्रागुदीचीं गच्छेदात्वर्ष्मसंक्षयात् ॥ ५५

सर्वभूतहितः शान्तस्त्रिदण्डी सकमण्डलुः ।
एकारामः परिव्रज्य भिक्षार्थी ग्राममाश्रयेत् ॥ ५८
नाश्रमः कारणं धर्मे क्रियमाणो भवेद्धि सः ।
अतो यदात्मनोऽपथ्यं परेषां न तदाचरेत् ॥ ६५ ॥ याज्ञवल्क्य (अ.३)
चरेन्माधुकरीं वृत्तिमपि म्लेच्छकुलादपि ।
एकान्नं नैव भोक्तव्यं बृहस्पतिसमो यदि ॥ १६२ ॥ अत्रिसंहिता
आश्रमास्तु त्रयः प्रोक्ता वैश्यराजन्ययोस्तथा ।
पारिव्राज्याश्रमप्राप्तिर्ब्राह्मणस्यैव चोदिता ॥ १३ ॥ लघुविष्णु (अ. ५)

अनाश्रमी न तिष्ठेच्च क्षणमेकमपि द्विजः ।
आश्रमेण विना तिष्ठन्प्रायश्चित्तीयतेहि सः ॥ १० ॥ दक्ष ( अ. १ )
देवैश्चैव मनुष्यैश्च तिर्यग्भिश्चोपजीव्यते ।
गृहस्थः प्रत्यहं यस्मात्तस्माच्छ्रेष्ठो गृहाश्रमी ॥ ५७ ॥
त्रयाणामाश्रमाणां च गृहस्थो योनिरुच्यते ।
सीदमानेन तेनैव सीदन्तीहेतरे त्रयः ॥ ५८ ॥
मूलेनैकेन नष्टेन सर्वमेव विनश्यति ॥ ५९ ॥
तस्मात्सर्वप्रयत्नेन रक्षणीयो गृहाश्रमी ।
राज्ञा चान्यैस्त्रिभिः पूज्यो माननीयश्च सर्वदा ॥ ६० ॥
गृहस्थोऽपि क्रियायुक्तो न गृहेण गृही भवेत् ।
तथैव पुत्रादारैश्च स्वकर्मपरिवर्जितः ॥ ६१ ॥
दया लज्जा क्षमा श्रद्धा प्रज्ञा त्यागः कृतज्ञता ।
एते यस्य गुणाः सन्ति गृहस्थो मुख्य उच्यते ॥ ६७ ॥ ( अ. २ )
संध्या स्नानं जपो होमः स्वाध्यायो देवतार्चनम् ।
वैश्वदेवस्तथाऽऽतिथ्यमुद्धृतं चापि शक्तितः ॥ ९ ॥
कृत्वेवं नव कर्माणि सर्वकर्मा भवेन्नरः ॥ १० ॥ ( अ. ३ )
गृहाश्रमात्परं नास्ति यदि भार्या वशानुगा ।
तया धर्मार्थकामानां त्रिवर्गफलमश्नुते ॥ १ ॥
अनुकूला न वाग्दुष्टा दक्षा साध्वी प्रियंवदा ।
आत्मगुप्ता स्वामिभक्ता देवता सा न मानुषी ॥ ३ ॥

अनुकूलकलत्रस्य स्वर्गस्तस्य न संशयः ।
प्रतिकूलकलत्रस्य नरको नात्र संशयः ॥ ४ ॥
स्वर्गेऽपि दुर्लभं ह्येतदनुरागः परस्परम् ।
रक्तमेकं विरक्तं तु तस्मात्कष्टतरं नु किम् ॥ ५ ॥
गृहवासः सुखार्थं हि पत्नीमूलं च तत्सुखम् ।
सा पत्नी या विनीता स्याच्चित्तज्ञा वशवर्तिनी ॥ ६ ॥
अनुकूला ह्यवाग्दुष्टा दक्षा साध्वी प्रजावती ।
एतावद्गुणसंयुक्ता श्रीरेव स्त्री न संशयः ॥ ११ ॥
प्रहृष्टा मनसा नित्यं स्थानमानविचक्षणा ।
भर्तुः प्रीतिकरा या तु सा भार्या त्वितरा जरा ॥ १२ ॥
जिह्वा भार्या शिशुर्भ्राता मित्रो दासः समाश्रिताः ।
यस्यैते तु विनीताः स्युस्तस्य लोकेऽपि गौरवम् ॥ १३ ॥ ( अ. ४ )
सत्त्वोत्कटाः सुराः सर्वे विषयैश्च वशीकृताः ।
प्रमादिनि क्षुद्रसत्त्वे मनुष्ये चात्र का कथा ॥ २७ ॥
तस्मात्त्यक्तकषायेण कर्तव्यं दण्डधारणम् ।
इतरस्तु न शक्नोति विषयैरभिभूयते ॥ २८ ॥
त्रयो ग्रामः समाख्यात ऊर्ध्वं तु नगरायते ॥ ३४ ॥
नगरं हि न कर्तव्यं ग्रामो वा मिथुनं तथा ।
एतत्त्रयं प्रकुर्वाणः स्वधर्माच्च्यवते यतिः ॥ ३५ ॥
राजवार्ता ततस्तेषां भिक्षावार्ता परस्परम् ।
स्नेहपैशुन्यमात्सर्यं संनिकर्षान्न संशयः ॥ ३६ ॥
लाभपूजानिमित्तं तु व्याख्यानं शिष्यसंग्रहः ।
एते चान्ये च बहवः प्रपञ्चाः कुतपस्विनाम् ॥ ३७ ॥
ध्यानं शौचं तथा भिक्षा नित्यमेकान्तशीलता ।
भिक्षोश्चत्वारि कर्माणि पञ्चमं नोपपद्यते ॥ ३८ ॥ दक्ष ( अ. ७ )
यावन्न विन्दते जायां तावदर्धो भवेत्पुमान् ।
नार्धं प्रजायते सर्वं प्रजायेतेत्यपि श्रुतिः ॥ १४ ॥
न पृथग्विद्यते स्त्रीणां त्रिवर्गविधिसाधनम् ।

छायेवानुगता स्वच्छा सखीव हितकर्मसु ।
दासीवाऽऽदिष्टकार्येषु भार्या भर्तुः सदा भवेत् ॥ २७ ॥ ( अ. २ )
गृहाश्रमात्परो धर्मो नास्ति नास्ति पुनः पुनः ।
सर्वतीर्थफलं तस्य यथोक्तं यस्तु पालयेत् ॥ २ ॥
गुरुभक्तो भृत्यपोषी दयावाननसूयकः ।
नित्यजापी च होमी च सत्यवादी जितेन्द्रियः ॥ ३ ॥
स्वदारे यस्य संतोषः परदारनिवर्तनम् ।
अपवादं न कुर्वीत तस्य तीर्थफलं गृहे ॥ ४ ॥ व्यास-( अ. ४ )

याज्ञवल्क्यः—ज्या ठिकाणीं दंपतींचें आनुकूल्य असतें त्या ठिकाणीं धर्म, अर्थ व काम हे वृद्धिंगत होतात. पत्नी मुलांच्या स्वाधीन करून किंवा तिच्यासह वनांत जावें. तेथें ब्रह्मचर्य, अग्निसेवा आणि उपासना इत्यादि नियम पाळावेत. त्रिकाल-स्नान करावें, प्रतिग्रह घेऊं नये, स्वाध्यायशील व दानशील असावें. ग्रीष्मऋतूमध्यें पंचाग्निसाधन करावें, वर्षाऋतूंत ओल्या भुईवर निजावें, कडक हिवाळ्यांत ओलीं वस्त्रें अंगावर घेऊन तप करावें. जो कांट्यानें टोचील, अगर अंगाला चंदन लावील, त्या दोहोंबद्दलहि समवृत्ति ठेवावी. गांवांतून भिक्षा आणून फक्त आठ ग्रास खावेत. वायुभक्षण करून उत्तर दिशेकडे शरीरक्षय होईपर्यंत राहावें. संन्याशानें त्रिदंड, कमंडलु, इत्यादि धारण करून भिक्षेपुरतेंच गांवांत राहावें. स्वतःला ज्यामुळें वाईट वाटतें, असें कर्म इतराविषयीं करूं नये. धर्माचरणाला आश्रमच पाहिजे असें नाहीं. चतुर्थाश्रमाशिवायहि धर्माचरण, समवृत्ति, सर्वभूत-हिततत्परता हे गुण आणतां येतात. अत्रिसंहितेमध्यें एकान्न न खातां संन्याशांनीं म्लेंच्छकुलापासून सुद्धां माधुकरी मिळवावी असें म्हटलें आहे. तीन आश्रम हे क्षत्रिय व वैश्यांकरितां असून चतुर्थाश्रम हा केवळ ब्राह्मणांनींच स्वीकारावा. इतरांना या आश्रमाचा अधिकार नाहीं, असें लघुविष्णु म्हणतो.

दक्षः—द्विजांनीं क्षणभरहि अनाश्रमी असूं नये. अनाश्रमी राहिल्यास दोष आहे. देव, मनुष्य व पशु हे सर्व गृहस्थाश्रमावरच जगतात; म्हणून तोच आश्रम सर्वश्रेष्ठ होय. गृहस्थाश्रम क्षीण झाला कीं इतरहि आश्रम क्षीण होतात. म्हणून सर्वांचें उगमस्थान व मूल गृहस्थाश्रम होय. वृक्षाचें मूल नष्ट झालें कीं, त्याचा बुंधा, शाखा व पानें, हीं नष्ट होतात, म्हणून हरप्रयत्नेंकरून गृहाश्रमाचें रक्षण

करावें आणि राजा व इतर आश्रम यांनींहि त्या आश्रमाला पूज्य समजून मान द्यावा. स्वकर्मपरिभ्रष्ट व क्रियाविरहित असा गृहस्थ केवळ घरामुळें गृहस्थ होत नाहीं; तर दया, लज्जा, क्षमा, श्रद्धा, प्रज्ञा, त्याग आणि कृतज्ञता हे गुण ज्याच्या ठिकाणीं असतात तोच खरा गृहस्थ होय. स्नान, संध्या, जप, होम, अध्ययन, देवपूजन, वैश्वदेव, यथाशक्ति अतिथिसत्कार व दान इत्यादि नवकर्मे करणारा गृहस्थ कृतकृत्य समजावा. गृहाश्रमामध्यें जर भार्या मनाप्रमाणें वागणारी व कार्यकर्ती असेल तर त्रिविध पुरुषार्थ साधतात. मधुर भाषी, अनुकूल, दक्ष, मनोनिग्रही व पतिसेवातत्पर जी स्त्री असेल ती देवताच होय. पतिपत्नींची परस्पर अनुकूलता म्हणजे एकमत व एकध्येय जेथें असेल, त्या घरांत स्वर्गसुख नांदतें व या उलट स्थिति असल्यास तेथें नरकतुल्य दुःख होतें; दोन अंतःकरणें एकरूप असलीं म्हणजे स्वर्गतुल्य सुख होतें. पण एक अन्तःकरण चिकटलेलें व दुसरें त्याविषयीं उदासीन ( पतीचें पत्नीवर प्रेम नसणें ) असें असलें म्हणजे त्यासारखें कष्टदायक कांहीं नाहीं. कोणतेंहि सुख हें घरांतच मिळतें, पण तें पत्निमूलकच असतें. विनम्र, नम्र, वशवर्तिनी, अनुकूल, दक्ष व प्रजावान्, एवंगुणविशिष्ट स्त्री म्हणजे साक्षात् लक्ष्मी होय. पतीला जें प्रिय तें प्रसन्न मनानें करणारी, स्थल व प्रतिष्ठा यांचा विचार करून प्रेमानें वागणारी स्त्री तीच भार्या होय. तशा नसलेल्या स्त्रिया या जरेचा अवतार होत. जिव्हा, बायको, मुलें, भाऊ, मित्र व सेवक, हे ज्याचे सुसंस्कृत व नम्र असतात, त्याचेंच जगामध्यें नांव होतें.

सत्त्वाविषयीं प्रसिद्ध असे देव सुद्धां विषयांनीं वश केलेले आहेत. मग क्षुद्र मनुष्यांची विषयांपुढें काय कथा ? ज्याच्या मनांतील विषयेच्छा पूर्ण गेली आहे त्यानेंच दंड धारण करावा. तसें नसेल तर विषयलोलुपतेमुळें अधःपात होतो. तीन संन्याशी एकत्र झाले कीं त्याला ग्राम म्हणावें व त्यापेक्षां अधिक संख्या म्हणजे नगर होय. संन्याशांनीं ग्राम व नगर करूं नये; कारण चार संन्याशी एकत्र जमले म्हणजे कुठें काय चाललें आहे, कुणाला काय भिक्षा मिळाली, इत्यादि स्नेह, मत्सरयुक्त भाषा निघते. शिष्यसंग्रह, लाभ आणि पूजा यांच्या गोष्टी सुरू होतात. म्हणून यतीनें ध्यान, पावित्र्य, निर्वाहापुरती भिक्षा व एकांत-सेवन यांतच रत असावें.

मनूच्या नंतर आश्रमांचा विचार दक्षाइतका विस्तृत व व्यवस्थित कोणीं केलेला नाहीं. दक्षानें केलेली गृहाश्रमाची प्रशंसा मुळींच अयुक्त नाहीं. स्त्रीच्या गुणांचें विवेचनहि फारच मार्मिक आणि आजच्याहि सर्व स्त्रियांनीं तें लक्षांत घेण्याजोगें आहे. संन्यासाचा अधिकारी कोण, त्याची योग्यता, त्याचें वैराग्य, इत्यादि चर्चा योग्य असून यतींना दिलेला इशाराहि बोधप्रद आहे. आजच्या सर्व यतींनीं दक्षाचे हे दक्षपणाचे बोल ध्यानांत घेतलेच पाहिजेत.

व्यासः—जोंवर मनुष्य विवाह करीत नाहीं तोंवर तो अर्धा असतो. स्त्री व पुरुष असे दोघे मिळून एक पूर्ण मनुष्य होतो व पूर्णत्वांतूनच प्रजनन होतें. स्त्रियांना पतिकार्याशिवाय स्वातंत्र्यानें कोणतेंहि पुरुषार्थ-साधन नाहीं. शरीराबरोबर जशी छाया त्याप्रमाणें प्रत्येक हितकर्मामध्यें स्त्रीनें पुरुषाबरोबर असावें, आणि प्रत्येक कार्य हें अगदीं दासीप्रमाणें अंग मोडून करून दाखवावें. यथोक्त व यथाशास्त्र गृहाश्रम पाळला तर सर्व तीर्थांचें फळ तेथेंच मिळतें. गुरुभक्त, सेवकांचें पोषण करणारा, निर्मत्सर, दयावान्, नित्यजपी व होम करणारा, सत्यवादी, जितेंद्रिय, स्वदाररत, परस्त्रीनिवृत्त, असा जो गृहस्थ असेल त्याच्या घरीं सर्व तीर्थांचें फल मूर्तिमंत असतें.

व्यासांनींहि थोडक्यांत गृहाश्रमांतील कर्तव्याचें व सदाचाराचें श्रेष्ठत्व फार चांगलें सांगितलें आहे. गृहाश्रम हा तापदायक, अपवित्र, दुःखदायक, अशा ज्या कल्पना समाजांत आहेत, त्या कशा चुकीच्या आहेत, हें व्यासस्मृतीवरून उघड दिसतें. प्रत्येक गृहस्थानें अन्यायानें द्रव्य न मिळविणें, आपलीं धर्म, समाज व राष्ट्रसंबद्ध कर्तव्यें योग्य तऱ्हेनें पार पाडणें, स्वस्त्रीचे ठिकाणीं संतुष्ट असणें आणि प्रसन्न मनानें व समाहित चित्तानें सदैव वागणें हेंच खरोखरी अत्यंत पुण्यप्रद नाहीं काय? पुण्य म्हणून जें आहे तें या आचारांतच आहे, आणि सर्व तीर्थांच्या ठिकाणीं असलेलें फल अशा उत्कृष्ट सदाचारांत कां येणार नाहीं?

एकंदरींत गृहाश्रमाविषयींच्या स्मृतिकारांच्या कल्पना फारच उदात्त व उच्च आहेत. पण समाजामध्यें मात्र गेल्या हजार-आठशें वर्षांत या गृहाश्रमाची सारखी निंदा व टवाळी चाललेली आहे. समाजाचें केंद्र गृहाश्रम आणि त्याचेंहि मूल जी स्त्री त्या उभयतांची निंदा संन्याशी, संताळे, हरिदास, पुराणिक, यांनीं आजवर इतकी केली आहे कीं, तो संस्कार पुसून टाकण्याचा यत्न जोरानेंच

केला पाहिजे. उत्तम गृहस्थ होणें, उत्तम नागरिक होणें, हें ध्येय आज समाजापुढें नाहीं. भिक्षु, संन्यासी व साधू यांचाच बडेजाव समाजांत अधिक आहे. प्रज्ञा, पौरुष, प्रजा व पैसा हे चार पुरुषार्थ लाथाडण्याजोगे मुळींच नाहींत. प्रज्ञेनें जगताचें ज्ञान संपादन करावें, पौरुषानें जगांतील उलाढालींत भाग घ्यावा, द्रव्याचें सहाय्य घेऊन अनेक कर्तव्यें पार पाडावींत आणि प्रजा तर पुढील परंपरा चालविण्याकरितां आवश्यच आहे. गृहस्थाश्रमांतील उच्च व उदात्त ध्येयाचें आज पुनरुज्जीवन केलें पाहिजे आणि उत्तम गृहस्थ हेंच सामाजिक ध्येय ठरविलें पाहिजे.

चौथा आश्रम हा केवळ तत्वरूप होण्याकरितां आहे. तीन ऋणें फेडल्यावर किंवा कांहीं मर्यादेपर्यंत आजच्या कल्पनाप्रमाणें कर्तव्य केल्यावर अधिकारी माणसांनीं तत्त्वरूप होण्याकरितां झटलेंच पाहिजे. ब्रह्मज्ञान हा आमचा आत्मा, तें आपलें भूषण व सर्व जगाला देण्याजोगा असा हाच अलंकार आहे. या श्रेष्ठ विद्येच्या मागें बुद्धिमान्, सदाचारी आणि निग्रही माणसांनींच लागलें पाहिजे. वयाच्या ६०।६५ वर्षांनंतर ज्यांना तत्त्वज्ञानाची भूक अतिशय लागलेली आहे, त्यांनींच चौथा आश्रम स्वीकारून दक्षानें सांगितल्याप्रमाणें, यम-नियम-रत व्हावें. आज हिंदु-समाजांत ही अधिकारी परंपरा नाहीं. सर्वत्र बुवाबाजी, गुरुपदेश व अकारण अनुग्रह, असला गोंधळ चाललेला आहे. अमानित्वादि लक्षणें कुठेंहि दिसत नाहींत. अध्यात्म शास्त्राची बिनचुक समजूतहि भाषणांत व्यक्त होत नाहीं व एषणा नष्ट झाल्याचा भासहि जेथें होत नाहीं, असले अनधिकारी लोक ब्रह्मज्ञानाच्या नांवावर जगांत पैसे मिळविण्याचे धंदे करीत आहेत व मूर्ख लोक त्यांच्या मागें आहेत. हिंदु-समाजांतील भावी पिढीनें असले अनाचार बंद करून बुवाशाहीच्या बौद्धिक गुलामगिरींतून बाहेर पडलें पाहिजे.

स्त्रीशिवाय मनुष्य हा पूर्ण नाहीं आणि स्त्रीशिवाय घर व गृहाश्रमहि होत नाहीं. पुरुषानें द्वितीयाश्रम स्वीकारावयाचा म्हणजे त्यांत विवाहाचा संबंध येतो. यास्तव विवाह-संस्थेचा विचार केला पाहिजे. विवाहाच्या बाबतींत धर्मशास्त्रकार काय म्हणतात, पूर्वी विवाहाचे प्रकार कोणते होते, हल्लीं कोणते आहेत, विवाहाच्या बाबतींत आपले आजचे विचार हे अगदीं पूर्वींचे व सनातन आहेत, कीं त्यामध्यें परिस्थित्यनुरूप फेरबदल झाले आहेत, इत्यादि विषय महत्वाचा असल्यामुळें त्याचा विचार पुढील प्रकरणांतच करूं.

# प्रकरण सातवें

## विवाह-संस्था

जगांतील कोणत्याहि समाजामध्यें फार प्राचीन काळीं, विवाह ही संस्था नव्हती. वैदिक आर्यसमाज हा वरील नियमाला अपवाद नाहीं. ही विवाह-संस्था श्वेतकेतूनें प्रथम उत्पन्न केली, असा उल्लेख महाभारतांतील आदिपर्वांत आहे. आपस्तंबापासून याज्ञवल्क्यापर्यंत म्हणजे ख्रिस्तपूर्व ८०० ते ख्रिस्तोत्तर २०० पर्यंतच्या काळांत झालेल्या स्मृतिकारांनीं सामान्यतः विवाहाचे आठ प्रकार सांगितलेले आहेत. आपस्तंब हा ब्राह्म, आर्ष, दैव, गांधर्व, आसुर व राक्षस असे विवाहाचे सहा प्रकार सांगतो तर गौतम त्यामध्यें प्राजापत्य व पैशाच यांची भर अधिक घालतो. बौधायनानें ब्राह्म, प्राजापत्य, आर्ष, दैव, गांधर्व, आसुर, राक्षस व पैशाच, असे अष्ट प्रकार सांगितले आहेत. परंतु वसिष्ठ हा क्षात्र व मानुष हे दोन नवे प्रकार सांगून पूर्वींपैकीं ब्राह्म, दैव, आर्ष व गांधर्व यांचा उच्चार करतो. याज्ञवल्क्यानेंहि या आठ प्रकारच्या विवाहांचाच उल्लेख केलेला आहे. प्रत्येक स्मृतिकारानें हे विवाह कसे करावेत याचेंहि दिग्दर्शन थोडक्यांत केलेलें आहे. ते प्रकार आज व्यवहारांत नाहींत, म्हणून येथें फक्त कल्पना देण्याकरितां मनु-वचनें उद्धृत करितो.

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥ २१ ॥
चतुरो ब्राह्मणस्याद्यान्प्रशस्तान्कवयो विदुः ।
राक्षसं क्षत्रियस्यैकमासुरं वैश्यशूद्रयोः ॥ २४ ॥
पञ्चानां तु त्रयो धर्म्यौ द्वावधर्म्यौ स्मृताविह ।
पैशाचश्चासुरश्चैव न कर्त्तव्यौ कदाचन ॥ २५ ॥ मनु ( अ. ३ )

आठ विवाहप्रकारांपैकीं पहिले चार म्हणजे ब्राह्म, दैव, आर्ष व प्राजापत्य, हे ब्राह्मणांना योग्य होत. राक्षस हा प्रकार क्षत्रियांकरितां व आसुर हा वैश्य-शूद्रांकरितां आहे. आठांपैकीं पांच प्रकार धर्म्य होत. पैशाच व आसुर हे अधर्म्य होत म्हणून या पद्धतीनें विवाह करूं नये, गांधर्व विवाहालाहि मनूनें गौणत्व

दिलेलें आहे. विवाहाच्या बाबतींत समाजानें व राज्यसंस्थेनें पूर्वीपेक्षां आज सुधारणाच केलेली दिसते. जुलमानें स्त्री पळवून आणणें, बेसावध स्थितींत तिला भ्रष्ट करणें, असले प्रकार आज कायद्यानेंच बंद केलेले आहेत व समाजालाहि ते नको आहेत. पैसे देऊन मुलीला विकत घेण्याचा आसुरी-विवाह-प्रकार हा समाजांत कुठें कुठें आहे. तोहि बंद होणें अवश्य आहे. बौधायनानें विकत घेतलेली स्त्री ही पत्नी नव्हे, ती दैव व पितृकार्यांत उपयोगी नाहीं असें म्हटलें आहे. गांधर्व-विवाह हा जरी पूर्वीं गौण ठरविला असला, तथापि प्रौढ वधुवरांचा एकमेकांस परिचय होणें व त्यांनीं एकमेकांच्या पसंतीनें विवाहबद्ध होणें, हा प्रकार आजच्या कालांत रूढ झाला पाहिजे व तो अनिष्ट नाहीं. क्षत्रियांनीं गांधर्व-विधीनेंच विवाह करावा असें दुष्यंतानें शकुंतलेला सांगितलें, तिनें स्वयंदान केलें व कण्वानें कन्येच्या त्या कृत्याला शास्त्रोक्त संमति दिली, हें आदिपर्वांतील ( महाभारत ) उदाहरणहि चिंत्य आहे.

साक्षरतेचा प्रसार, शिक्षणाची वाढ, स्त्रियांच्या व स्त्रिया-विषयींच्या बदललेल्या लोकांच्या कल्पना, या सर्व लक्षांत घेतल्यावर, स्मृतिकारांनीं सांगितलेला गांधर्व-विवाह होणें आज इष्ट आहे. त्यामध्यें ब्राह्म, प्राजापत्य, दैव व आर्ष या विवाहप्रकारांतील मुख्य विधीची भर घातली म्हणजे हाच विवाहप्रकार अत्युत्तम होईल. आज उच्च वर्गांत होत असलेला विवाहसंस्कार हा ब्राह्म, दैव, आर्ष या सर्वांचेंच संकलन आहे. सीमांतपूजन, वाग्निश्चय, मधुपर्क, सप्तपदी, गृहप्रवेश व चतुर्थीकर्म, एवढे विधि या संस्कारांत मुख्य आहेत. ते सर्व करावेत आणि वधुवरांनीं एकमेकांच्या पसंतीनेंच विवाहबद्ध व्हावें.

कन्यादानाची कल्पना आजच्या शिक्षित व सुसंस्कृत स्त्रियांना कशीशीच वाटेल ! म्हणून त्यांनीं स्वयंदान करावें हेंच उत्तम. कन्यादानाचा अधिकार किंवा अपत्य-दानाचा अधिकार मातापितरांना आहे कीं नाहीं, याबद्दल स्मृतिकारांत एकमत नाहीं. आपस्तंब म्हणतोः—

‘ दानंक्रयधर्मश्चापत्यस्य न विद्यते ’

अपत्याचें दान, विक्रय करण्याचा अधिकार मातापितरांना नाहीं, पण वसिष्ठ अगदीं त्या उलट म्हणतोः—

शोणितशुक्रसंभवः पुरुषो मातापितृनिमित्तकः ॥ १ ॥
तस्य प्रदानविक्रयत्यागेषु मातापितरौ प्रभवतः ॥ २ ॥ ( अ. १५ )

पुत्र हा ज्या अर्थी आईबापांच्या शुक्रशोणितापासून उत्पन्न होतो, त्या अर्थी त्याचा त्याग, विक्रय व दान देण्याचा अधिकार आईबापांनाच आहे. वसिष्ठाचें हें म्हणणें स्थूलशरीरदृष्ट्या युक्त असलें तरी जीवतत्त्व हें मनुष्य निर्माण करीत नसल्यामुळें व त्याला प्रवृत्तिस्वातंत्र्य असल्यामुळें तो स्वतंत्रच आहे व त्याचा विक्रय व त्याग करण्याचा अधिकार कुणालाहि नाहीं. कन्येचें दान हें तिच्या बऱ्याकरितांच विवाहप्रसंगीं करावयाचें असतें व पुत्राचें दान त्याच्या कल्याणाकरितां दत्तकप्रसंगीं जबाबदारीनेंच करावयाचें असतें, म्हणून त्या दानाबद्दल फारसें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. कन्येनें वर स्वतः पसंत केला म्हणजे तें स्वयंदान झालें. नंतर औपचारिक दान पित्यानें केल्यावर आक्षेपार्ह असें कांहीं उरत नाहीं. तात्पर्य, विवाहाचा प्रकार पूर्वीपासून एकच व सनातन असा नाहीं. त्यामध्यें वेळोवेळीं फेरबदल झालेले आहेत. कोणी सहा प्रकार सांगतात, तर कोणी आठ सांगतात, कोणी पांच धर्म्य म्हणतात, तर कोणी चार धर्म्य म्हणतात, म्हणून आजच्या परिस्थितीला योग्य असा वर सांगितलेला विवाह-प्रकार रूढ करणें हें अधर्म्य व अनिष्ट नाहीं.

विवाह हा पुत्राकरितांच करावयाचा असतो. पुत्र हा पित्याचा आत्मा, तो त्याचा प्रतिनिधी म्हणून एका दृष्टीनें त्याचा तो दुसरा जन्मच होय! या पुत्राचें महत्त्व पूर्वस्मृतिकारांनीं फारच वर्णन केलेलें आहे. जन्माला येणारा मनुष्य तीन ऋणें घेऊन येतो, त्यांतील पितराचें ऋण त्यानें पुत्र उत्पन्न करून फेडलें पाहिजे असें सर्वांनीं अट्टाहासानें सांगितलें आहे. पुत्रासंबंधाच्या आजच्या व पूर्वीच्या कल्पनाहि अगदीं निरनिराळ्या आहेत.

पुत्रा औरसक्षेत्रजदत्तकृत्रिम गूढोत्पन्नापविद्धा रिक्थभाजः ॥ ३० ॥
कानीन-सहोढ-पौनर्भव-पुत्रिकापुत्र-स्वयंदत्त-क्रीता-गोत्रभाजः ॥ ३१ ॥
गौतम ( अ. १० प्र. ३ )

स्वाध्यायेन ऋषीन्पूज्य सोमेन च पुरंदरम् ।
प्रजया च पितृन्पूर्वाननृणो दिवि मोदते ॥ ६ ॥ बौधायन

पुत्रेण लोकाञ्जयति पौत्रेणाऽऽनन्त्यमश्नुते ।
अथ पुत्रस्यपौत्रेण नाकमेवाधिरोहतीति ॥ ७ ॥
सत्पुत्रमुत्पाद्याऽऽत्मानं तारयति ॥ ११ ॥
तस्मात्प्रजासंतानमुत्पाद्य फलमवाप्नोति ॥ १३ ॥
तस्माद्यत्नवान्प्रजामुत्पादयेदौषधमन्त्रसंयोगेन ॥ १४ ॥( प्र. २ अ. ९ )
पिता पुत्रस्य जातस्य पश्येच्चेज्जीवतो मुखम् ॥ १ ॥
अनन्ताः पुत्रिणां लोका नापुत्रस्य लोकोऽस्तीति श्रूयते ॥ २॥
पुत्रेण लोकाञ्जयति पौत्रेणाऽऽनन्त्यमश्नुते ।
अथ पुत्रस्य पौत्रेण बध्नस्याऽऽप्नोति विष्टपम् । इति ॥ ५ ॥
बहूनामेकजातानामेकश्चेत्पुत्रवान्नरः ।
सर्वे ते तेन पुत्रेण पुत्रवन्त इति श्रुतिः ॥ १० ॥
द्वादश इत्येव पुत्राः पुराणदृष्टाः ॥ १२ ॥ वसिष्ठ ( अ. १७ )
अपुत्रोऽनेन विधिना सुतां कुर्वीत पुत्रिकाम् ।
यदपत्यं भवेदस्यां तन्मम स्यात्स्वधाकरम् ॥ १२७ ॥
पुत्रेण लोकाञ्जयति पौत्रेणानन्त्यमश्नुते ।
अथ पुत्रस्य पौत्रेण बध्नस्याप्नोति विष्टपम् ॥ १३७ ॥
औरसः क्षेत्रजश्चैवदत्तः कृत्रिम एव च ।
गूढोत्पन्नोऽपविद्धश्च दायादाबान्धवाश्च षट् ॥ १५९ ॥
कानीनश्च सहोढश्च क्रीतः पौनर्भवस्तथा ।
स्वयं दत्तश्च शौद्रश्च षडदायादबान्धवाः ॥ १६० ॥ मनु ( अ. ९ )

गौतम पुत्राचे बारा प्रकार सांगतो. त्यांतील औरस, क्षेत्रज, दत्त, कृत्रिम, गूढोत्पन्न व अपविद्ध हे सहा पित्याच्या मिळकतीचे वाटेकरी होतात व कानीन, सहोढ, पौनर्भव, पुत्रिकापुत्र, स्वयंदत्त व क्रीत हे गोताचे भागीदार होतात. आज आपल्याला औरस व दत्तक एवढे दोनच पुत्र माहीत आहेत आणि इतर दहा प्रकारचे पुत्र समाजांत नाहींतच. आपल्या क्षेत्राच्या म्हणजे स्त्रीच्या ठिकाणीं रोग व क्लीबत्व यामुळें दुसऱ्यानें उत्पन्न केलेला तो क्षेत्रज पुत्र होय. दिलेला तो दत्त. पुत्रगुणांनीं युक्त असलेला तो कृत्रिम. जो आपल्या घरांतच गुप्तपणें

उत्पन्न झाला तो गूढज. आईबापांनीं किंवा आईनेंच जन्मानंतर टाकलेला तो अपविद्ध पुत्र होय. कौमारावस्थेंत झालेला तो कानीन, विवाह करतांना वधु गरोदर असल्यामुळें उदरस्थ पुत्रासह विवाह केला जातो, तो पुत्र सहोढ होय. विधवेनें उत्पन्न केलेला तो पौनर्भव. मुलगी जावयाला देतांना 'तिला होणारा पहिला पुत्र माझा,' अशा करारानें घेतलेला पुत्र हा पुत्रिकापुत्र होय. आईबापांनीं टाकल्यामुळें अनाथ स्थितींत जो एकाद्याला येऊन चिकटतो तो स्वयंदत्त व पैसे देऊन जो विकत घेतला जातो तो क्रीत पुत्र होय. पुत्राविषयींच्या पूर्वींच्या कल्पना आपणास आज चमत्कारिक वाटतात. नांव चालविणें, श्राद्ध, पुनर्जन्म व कार्यपरंपरा या दृष्टीनें किंवा लोक-संख्येच्यादि दृष्टीनें त्या वेळीं त्या कल्पना युक्त होत्या. पण आपण आज त्यापेक्षां पुढें गेलों आहोंत.

बौधायन म्हणतोः—यज्ञ व अध्ययनानें जसे देव व ऋषि तृप्त होतात, तसे प्रजेनें पितर तृप्त होऊन स्वर्ग मिळतो. पुत्र व पौत्रानें इहलोक व परलोक साधतां येतो आणि पौत्रानें स्वर्गावर आरोहण करितां येते. पुत्राचे योगानेंच आपला उद्धार होतो व फलहि मिळतें. म्हणून यत्नवानानें औषध, मंत्र, यांपैकीं पाहिजे त्याचें सहाय्य घेऊन पुत्र उत्पन्न करावा.

वसिष्ठः—पित्यानें पुत्रमुख पाहिलें म्हणजे तो अमृतत्त्वाला जातो. पुत्रवंतांना अनंत लोक मिळतात, अपुत्राला कोणताहि लोक मिळत नाहीं. पुत्रानेंच हा लोक जिंकला जातो व पौत्रानें स्वर्ग प्राप्त होतो. चार भावांत एखाद्याला जरी पुत्र असला तरी त्यामुळें ते सर्व बंधु पुत्रवंत होतात. पुत्राचे बारा प्रकार प्राचीन काळापासून सांगितलेले आहेत. मनूनें पुत्राचें महत्त्व, पुत्रिकापुत्राचा व्यवहार इतरांप्रमाणेंच सांगितलेला आहे. पण पुत्राच्या बारा प्रकारांमध्यें क्रीतपुत्र न सांगता, एक शौद्रपुत्र, म्हणजे शूद्रीपासून झालेला सांगितला आहे. दासीपुत्र व दासदासीपुत्रांचाहि गोत्रभाक् व अंशभाक् म्हणून मनूनें उल्लेख केलेला आहे.

पूर्वी त्रैवर्णिक आर्य हे संख्येनें येथें कमी होते, प्रजावृद्धीची त्यांची हाव अधिक होती, म्हणून त्यांना इतके हे पुत्राचे प्रकार मानावे लागले कीं काय कळत नाहीं. पुत्रिकापुत्राची कल्पना ही अर्धेलीनें गाई किंवा म्हशी देण्यापैकींच आहे. पहिलीं दोन वेतें माझीं व नंतर सर्व सत्ता तुझी, असें म्हणण्यापैकींच पुत्रिकापुत्राचा व्यवहार होता. कानीन, गूढज व सहोढ हे पुत्र तर नैतिकदृष्ट्या

आज गर्ह्य वाटतात. किंबहुना असले पुत्र नसले तरी बरें असें वाटतें. नैतिक दृष्ट्या पूर्वीपेक्षां आपल्या पुत्रविषयक कल्पना आज बदललेल्या आहेत हें खरें. पुनर्विवाहाला संमति देण्यांत पाप नाहीं असेंहि आज आम्हांस वाटतें. विधवेनें अविवाहानें उत्पन्न केलेल्या पुत्राला स्मृतिकारांनीं पुत्र म्हणून मान्यता दिलेली आहे, तर मग तिनें विवाह-संबद्ध होऊनच पुत्रोत्पादन केल्यास त्यांत काय वाईट ?

पुरुषाला इहपरलोकजयार्थ पुत्र पाहिजे. तो नसेल तर त्यानें बारा पुत्रांपैकीं एखादा पुत्र संपादन करावा. पण तसें होण्यापूर्वीं पुरुष मरण पावला तर त्याच्या स्त्रीनें पुत्र दत्तक घ्यावा. मात्र पतीनें पत्नीला मरतां मरतां दत्तक घेण्यास सांगितलेलें असावें. नवऱ्याचे नातलग, आपले आप्तइष्ट इत्यादि सर्वांना बोलावून राजाधिकाऱ्यांना कळवून तिनें दत्तक घ्यावा, असें वसिष्ठधर्मसूत्रांत म्हटलें आहे. पण पुत्र दत्तक घेण्यापेक्षां विधवेनें स्वतःच्या ठिकाणीं आपल्या कुलांतील पुरुषापासून पुत्र उत्पन्न करून घ्यावा असेंहि एक मत धर्मशास्त्रकर्त्यांनीं धर्म्य म्हणून सांगितलेलें आहे. त्याचाहि आतां विचार करूं.

अपतिरपत्यलिप्सुर्देवरात् ॥ ४ ॥
पिण्डगोत्रर्षिसंबंधेभ्यो योनिमात्राद्वा ॥ ६ ॥
नादेवरादित्येके ॥ ७ ॥ नातिद्वितीयम् ॥ ८ ॥
जनयितुरपत्यम् ॥ ९ ॥ समयादन्यस्य ॥ १० ॥ गौतम ( अ. ९ प्र.२ )
संवत्सरं प्रेतपत्नी मधुमांसमद्यलवणानि वर्जयेदधः शयीत ॥ ६६ ॥
षण्मासानिति मौद्गल्यः ॥ ६७ ॥
अत उर्ध्वं गुरुभिरनुमता देवराज्जनयेत्पुत्रमपुत्रा ॥६८॥बौ. (अ.२प्र.२)
अनियुक्तायामुत्पन्न उत्पादयितुः पुत्रो भवतीत्याहुः ॥ ५५ ॥
लोभान्नास्ति नियोगः ॥ ५७ ॥
प्रोषितपत्नी पञ्चवर्षाण्युपासीतोर्ध्वं पञ्चभ्यो भर्तृसकाशं गच्छेत् ॥६७॥
न तु खलु कुलीने विद्यमाने परगामिनी स्यात् ॥७१॥ वसिष्ठ (अ. १७)

पत्नि ही पतीचीच बायको नसून ती त्या कुलाची बायको होते, म्हणून त्या कुलांतील पुरुषानें विशेषतः वडील दिरानें आपल्या भावाचें नांव चालविण्याकरितां भावजयीच्या ठिकाणीं पुत्र उत्पन्न करावा व तसें करण्यांत दोष नाहीं, असें गौतम, बौधायन, वसिष्ठ इत्यादि म्हणतात. गौतम म्हणतो कीं, नवरा मेलेल्या

विधवेनें दिरापासून पुत्र उत्पन्न करून घेण्याची इच्छा करावी. दीर नसेल तर सपिंड, सगोत्र किंवा ऋषि यांशीं संबंध करून पुत्र संपादन करावा. दिराशिवाय इतरांशीं संबंध करूं नये, असें एक मत गौतमानें दिलें आहे व एकच पुत्र उत्पन्न करून घ्यावा असें तो म्हणतो. ठरवून नियोग केला तर तो पुत्र जनयित्याचा होत नाहीं.

बौधायनः—विधवेनें पतीच्या पश्चात् एक वर्षभर व्रतस्थ राहावें, किंवा मौद्गलमतें सहा महिने व्रतस्थ राहावें व नंतर वडील, गुरु व पूज्य यांच्या अनुमतीनें दिराशीं संभोग करून पुत्र मिळवावा. वसिष्ठानेंहि बौधायनाप्रमाणेंच नियोगाला संमति दिली आहे. पुत्राकरितां ठरवून नियोग व्हावा. इंद्रियविकारामुळें तो होऊं नये असें वसिष्ठ म्हणतो. एखाद्या स्त्रीचा नवरा पांच वर्षेपर्यंत जर बेपत्ता झाला असेल व त्याची कांहीं माहिती मिळत नसेल, तर तिनें आपल्या कुलांतील पुरुषाशीं संभोग करावा. कुलीन विद्यमान् असतांना परपुरुषाशीं संबद्ध होऊं नये असेंहि वसिष्ठ विधवास्त्रीला सांगतो.

उत्पादयितुः पुत्र इति हि ब्राह्मणम् ॥ ५
यदा यमस्य सादने जनयितुः पुत्रमब्रुवन् ॥
तस्माद्भार्यां रक्षन्ति बिभ्यन्तः पररेतसः ॥
जनयितुः पुत्रो भवति सांपराये मोघं वेत्ता कुरुते तन्तुमेतमिति ॥६॥
दृष्टो धर्मव्यतिक्रमः साहसं च पूर्वेषाम् ॥ ७ ॥
तेषां तेजोविशेषेण प्रत्यवायो न विद्यते ॥ ८ ॥
तदन्वीक्ष्य प्रयुञ्जानः सीदत्यवरः ॥ ९ ॥ आपस्तंब ( २-६-१३ )
सगोत्रस्थानीयां न परेभ्यः समाचक्षीत ॥ २ ॥
तद्व्यतिक्रमे खलु पुनरुभयोर्नरकः ॥ ६ ॥
कुलायहि स्त्री प्रदीयते इति उपदिशन्ति ॥ ७ ॥
तदींद्रिय दौर्बल्यात् विप्रतिपन्नम् ॥ ८ ॥ आपस्तंब ( २-१०-१७ )

सर्वांत प्राचीन सूत्रकार आपस्तंब यानें या नियोगाचा मात्र कडकडून निषेध केलेला आहे. नियोगानें उत्पन्न होणारा पुत्र, हा जो उत्पन्न करतो त्याचाच होय; इतरांचा तो होऊं शकत नाहीं. यमलोकांत उत्पादकाचाच तो पुत्र आहे असें म्हणतात. शहाणे लोक हे दुसऱ्याचें बीज आपल्या क्षेत्रांत येऊं नये म्हणून

फार जपत असतात. उत्पादकाचा जर पुत्र ठरला, तर तो दुसऱ्याचें नांव कसें चालविणार ? पूर्वींच्या लोकांनीं आपल्या प्रभावामुळें जरी असल्या धर्मविरुद्ध गोष्टी केल्या असल्या तरी इतरांनीं त्यांचें अनुकरण केल्यास त्यांत मोठा अधःपात आहे. आपल्या कुलांतील स्त्रीकडून परपुरुषाशीं संबंध होऊं देऊं नये. पत्नी जर पतीच्या पश्चात् अशी बेईमान होईल तर त्यापासून दोघांना नरकप्राप्ति होते. स्त्री ही कुलाला दिली जाते, हें म्हणणें इंद्रियदौर्बल्यनिदर्शक आहे. तात्पर्य दाक्षिणात्य आपस्तंबानेंच नियोगाचा निषेध वरीलप्रमाणें केला आहे.

देवराद्वा सपिण्डाद्वा स्त्रिया सम्यङ्नियुक्तया ।
प्रजेप्सिताधिगन्तव्या संतानस्य परिक्षये ॥ ५९ ॥
विधवायां नियुक्तस्तु घृताक्तो वाग्यतो निशि ।
एकमुत्पादयेत्पुत्रं न द्वितीयं कथंचन ॥ ६० ॥
विधवायां नियोगार्थे निर्वृत्ते तु यथाविधि ।
गुरुवच्च स्नुषावच्च वर्तेयातां परस्परम् ॥ ६२ ॥
नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित् ।
न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥ ६५ ॥
अयं द्विजैर्हि विद्वद्भिः पशुधर्मो विगर्हितः ।
मनुष्याणामपि प्रोक्तो वेने राज्यं प्रशासति ॥ ६६ ॥
स महीमखिलां भुञ्जन्राजर्षिप्रवरः पुरा ।
वर्णानां संकरं चक्रे कामोपहतचेतनः ॥ ६७ ॥
ततः प्रभृति यो मोहात्प्रमीतपतिकां स्त्रियम् ।
नियोजयत्यपत्यार्थं तं विगर्हन्ति साधवः ॥ ६८ ॥
यस्या म्रियेत कन्याया वाचा सत्ये कृते पतिः ।
तामनेन विधानेन निजो विन्देत देवरः ॥ ६९ ॥
यथाविध्यधिगम्यैनां शुक्लवस्त्रां शुचिव्रताम् ।
मिथो भजेताप्रसवात्सकृत्सकृदृतावृतौ ॥ ७० ॥ मनु ( अ. ९ )

मनूनें पूर्वींपासून चालत आलेली नियोगाची चाल नमूद केलेली आहे. विधवेनें सपिंड अगर दीर यांपासून व्रतस्थ राहून, अंगाला तूप फासून पुत्र उत्पन्न करून घ्यावा; पण तो फक्त एकच. नियोग-विधी संपल्यावर उभयतांनीं गुरु व

स्नुषा या नात्यानेंच वागावें. विवाह-मंत्रामध्यें हा नियोग नाहीं. अर्थात् हा पशुधर्म आहे, तो वेनराजापासून उत्पन्न झाला आहे. वर्णसंकरकालीं उत्पन्न झालेला हा विधि एकंदरींत निंद्यच होय. ज्या मुलीचा पति वाग्निश्चयानंतर मरेल, तिनेंच फक्त शुचिव्रतानें प्रत्येक ऋतुकालीं एक पुत्र होईपर्यंत नियोग करावा.

अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरः पुत्रकाम्यया ।
सपिण्डो वा सगोत्रो वा घृताभ्यक्त ऋताविियात् ॥ ६८
आगर्भसंभवाद्गच्छेत्पतितस्त्वन्यथा भवेत् ।
अनेन विधिना जातः क्षेत्रजोऽस्य भवेत्सुतः ॥ ६९ ॥ याज्ञवल्क्य अ. १

याज्ञवल्क्यानें, वडिलांचे आज्ञेनें दिराशीं किंवा सगोत्र, सपिंड पुरुषाशीं पुत्रेच्छेनें विधवेनें नियोग करावा. त्याकरितां तिनें शुचिर्भूत व व्रतस्थ असावें. गरोदर होईपर्यंत नियोग करावा. अशा पद्धतीनें उत्पन्न झालेला पुत्र हा क्षेत्रज समजावा, असें म्हटलें आहे.

विवाहाचे प्रकार, पुत्रविषयक कल्पना व नियोग यांचा विचार एवढा वेळपर्यंत केला. त्यावरून पूर्वकालीन कल्पना व आजच्या कल्पना यांत किती अंतर पडलेलें आहे, हें वाचकांना समजेल ! पुत्राचा तो हव्यास व ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' हा आशीर्वाद हीं दोन्हीं आज नकोशीं वाटतात. बहुप्रज असणें हें दारिद्र्याचें लक्षण होऊं लागलें आहे आणि अष्टपुत्रा या आशिर्वादाऐवजीं ' एक-पुत्राभव ' ' सुपुत्राभव ' असें म्हणणें बरें असें वाटत आहे. पुत्राप्रमाणेंच पुत्र ज्याकरितां पाहिजे, त्या कार्याच्याहि कल्पना आज निराळ्या बनत आहेत. श्राद्ध, तर्पण व नामसंकीर्तन याकरितां दत्तक पुत्र सांगितला आहे. परंतु आजचे दत्तक हे सर्व इस्टेटीकरितांच होत असतात आणि दत्तक झाल्यावर जे बखेडे उत्पन्न करितात ते पाहून हें दत्तक-प्रकरण नष्ट झालें तर बरें असेंहि वाटूं लागतें. गेल्या पन्नास वर्षांत जीं अनेक दत्तकविधानें झालीं, त्यांचे परिणाम कांहीं इष्ट झालेले नाहींत आणि अलीकडे तर प्रिव्ही कौन्सिलच्या ठरावानें मोठीच खळबळ उडवून दिलेली आहे. म्हणून निपुत्रिक धनवानांनीं आपल्या पत्नीची व्यवस्था करून राहिलेली मिळकत आज समाज व राष्ट्रकार्याला अर्पण करणें हेंच युक्त आहे. रुग्णालयें, धर्मादाय दवाखाने आणि शिक्षणसंस्था इत्यादींना कायम-निधि दिल्यास जवळ जवळ कायमचेंच नांव राहतें, नामसंकीर्तन होतें आणि अनेकांचे आशीर्वाद हे

परलोकी सद्गतीला कारणीभूत होतात. इतर धर्मांत दत्तविधान नाहीं. याचें कारण त्यांच्या धार्मिक कल्पना निराळ्या आहेत, हें होय. कर्मवाद, कर्मफल, पुनर्जन्म या सर्व सिद्धांतांचा विचार करूनहि आज चालू असलेली समाजांतील दत्तक संस्था नष्ट व्हावी असें वाटतें. हुंड्याच्या अनिष्ट चालीप्रमाणें या दत्तकाबद्दलहि अनेक सुधारक, सनातनी, लोकमान्य, राजमान्य लेखकांनीं, आजवर लिहिलेलें आहे. त्या सर्व लेखकांचा निष्कर्ष दत्तकसंस्था नसेल तर बरें, असाच आहे.

पूर्वीं नियोगाची चाल होती. त्यावरून विधवेला पुत्रोत्पादन करून घेण्याचा एक शास्त्रमान्य मार्ग होता असें स्पष्ट दिसतें. अक्षतयोनि विधवेचा विवाह शास्त्रमान्यच आहे. पराशराचें पुनर्विवाहपर वचन तर सुप्रसिद्धच आहे.

नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबेच पतिते पतौ ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ ३० ॥ अ. ४

या वचनाची ओढाताण निबंधकारांनीं उगाचच केली आहे. पूर्वापर-संदर्भ पाहिला तर पराशराचें मत पुनर्विवाहाला अनुकूल असेंच दिसतें. आज नियोग-स्थानीं पुनर्विवाह रूढ होणें अवश्य आहे. ज्या विधवेला मुलें-बाळें नाहींत, पोटाचें स्वास्थ नाहीं व जी तरुण आहे, अशा विधवेला वयाच्या पसतीस वर्षापर्यंत पुनर्विवाह करण्याला मोकळीक असावी. हिंदु-समाजांतील पुष्कळ जातींत पुनर्विवाह आहे. जगांतील सर्व समाजांतहि तो आहे. हिंदु-समाजांतील ज्या उच्च जातींत तो नाहीं, तेथें तो रूढ करण्याची आवश्यकता सर्व दृष्टीनें भासूं लागलेली आहे. घरांतील वागणूक चांगली नसते, पोटाचें साधन नसतें आणि समाजांत नीतीनें राहाणें जड जातें; म्हणून विशिष्ट मर्यादेपर्यंत विधवाविवाहाला अवश्य मान्यता द्यावी. विधवाविवाह विधुराशींच होणें इष्ट आहे. विधवाविवाहाविषयींचें सप्रमाण विवेचन " हिंदु समाज समर्थ कसा होईल " प्रकरण " विवाहाविषयीं चार शब्द " येथें पाहावें.

# प्रकरण आठवें

## स्त्रिया

स्त्रिया या कोणत्याहि समाजाच्या प्रमुख घटक आहेत. स्त्री व पुरुष मिळून जसा एक पूर्ण मनुष्य होतो, त्याचप्रमाणें स्त्रिया व पुरुष मिळूनच पूर्ण समाज बनत असतो. समाजाचा उत्कर्ष, अभ्युदय व उन्नति यांचा आणि स्त्रीपुरुषा-विषयींच्या परस्पर कल्पनांचा बराच निकट संबंध आहे. पुरुष हे जुलमी, अरेराव, प्रत्यक्ष देव व अनियंत्रित सत्ता गाजविणारे आहेत, अशी पुरुषाविषयीं स्त्रियांची कल्पना असणें योग्य नव्हे. तसेंच स्त्रिया या लबाड, मूर्ख, आळशी, खादाड, अतिलोभी अशा आहेत, अशी पुरुषांची समजूत असणें हेंहि अयोग्य होय. उभयतांविषयीं परस्परांच्या जितक्या यथार्थ, शुद्ध व उदात्त कल्पना असतील, त्या मानानेंच समाजस्थिति चांगली राहील. विशेषतः सांप्रत उभयतांचा समान दर्जा, उभयतांचे समान हक्क, अशी भावना उत्पन्न झाली असतां पूर्वीपेक्षां आपण या बाबतींत पुढें जात आहोंत कीं मागें आहोंत, हेंहि पाहाणें अवश्य आहे. आजची आपली विवाहसंस्था फारच शुद्ध आहे. पूर्वीचे विवाहाचे पांच गौण प्रकार हे त्या मानानें हीनच होत. स्त्रियांचा विवाहकाल, त्यांचें पावित्र्य आणि त्यांच्या-विषयींच्या इतर कल्पना धर्मशास्त्रांत काय होत्या हें या प्रकरणांत पाहावयाचें आहे.

त्रीन्कुमार्यृतूनतीत्य स्वयं युज्येतानिन्दितेनोत्सृज्य
पित्र्यानलंकारान् ॥ २० ॥
प्रदानं प्रागृतोः ॥२१॥ अप्रयच्छन्दोषी ॥२२॥ गौतम ( अ. ९ प्र. २ )
मातुरलंकारं दुहितरः सांप्रदायिकं लभेरन्नन्यद्वा ॥ ४९ ॥
न स्त्रीस्वातन्त्र्यं विद्यते ॥ ५० ॥ अथाप्युदाहरन्ति ॥ ५१ ॥
पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
पुत्रस्तु स्थाविरे भावे न स्त्री स्वातन्त्र्यमर्हतीति ॥ ५२ ॥
स्त्रियः पवित्रमतुलं नैता दुष्यन्ति कर्हिचित् ।
मासि मासि रजो ह्यासां दुरितान्यपकर्षति ॥ ६३ ॥
सोमः शौचं ददत्ता ( दौता ) सां गन्धर्वः शिक्षितां गिरम् ।
अग्निश्च सर्वभक्षत्वं तस्मान्निष्कल्मषा स्त्रियः ॥ ६४ ॥

दद्याद्गुणवते कन्यां नग्निकां ब्रह्मचारिणे ।
अपि वा गुणहीनाय नोपरुन्ध्याद्रजस्वलाम् ॥ १२ ॥
त्रीणि वर्षाण्यृतुमतीं यः कन्यां न प्रयच्छति ।
स तुल्यं भ्रूणहत्यायै दोषमृच्छत्यसंशयम् ॥१३॥ बौधायन ( अ. २ प्र.२ )
त्रीणि वर्षाण्यृतुमती काङ्क्षेत पितृशासनम् ।
ततश्चतुर्थे वर्षे तु विन्देत सदृशं पतिम् ।
अविद्यमाने सदृशे गुणहीनमपि श्रयेत् ॥ १५ ॥
बलाच्चेत्प्रहृता कन्या मन्त्रैर्यदि न संस्कृता ।
अन्यस्मै विधिवद्देया यथा कन्या तथैव सा ॥ १६ ॥
निसृष्टायां हुते वाऽपि यस्यै भर्ता म्रियेत सः ॥
साचेदक्षतयोनिः स्याद्गतप्रत्यागता सती ॥ १७ ॥ बौधायन ( अ.१ प्र. ४ )
अस्वतन्त्रा स्त्री पुरुषप्रधाना ॥ १ ॥
पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
पुत्रश्च स्थाविरे भावे न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ ४ ॥
मासि मासि रजोह्यासां दुष्कृतान्यपकर्षति ॥ ६ ॥ वशिष्ठ ( अ. ३ )
कुमार्यृतुमती त्रीणि वर्षाण्युपासीतोर्ध्वं-
त्रीभ्यो वर्षेभ्यः पतिं विन्देत्तुल्यम् ॥ ५९ ॥
प्रयच्छेन्नग्निकां कन्यामृतुकालभयात्पिता ।
ऋतुमत्यां हि तिष्ठन्त्यां दोषः पितरमृच्छति ॥ ६२ ॥
यावच्च कन्यामृतवः स्पृशन्ति । × × × ॥
भ्रूणानि तावन्ति हतानि ताभ्यां मातापितृभ्यामिति धर्मवादः ॥ ६३ ॥
बलाच्चेत्प्रहृता कन्या मन्त्रै र्यदि न संस्कृता ।
अन्यस्मै विधिवद्देया यथा कन्या तथैव सा ॥ ६५ ॥
पाणिग्राहे मृते बाला केवलं मन्त्रसंस्कृता ।
सा चेदक्षतयोनिः स्यात्पुनः संस्कारमर्हति, इति ॥६६॥ वसिष्ठ (अ.५)
न स्त्री दुष्यति जारेण न विप्रो वेदकर्मणा ।
नाऽऽपो मूत्रपुरीषेण नाग्निर्दहनकर्मणा ॥ १ ॥
स्वयं विप्रतिपन्ना वा यदि वा विप्रवासिता ।

बलात्कारोपभुक्ता वा चौरहस्तगताऽपि वा ॥ २ ॥
न त्याज्या दूषिता नारी नास्यास्त्यागो विधीयते ।
पुष्पकालमुपासीत ऋतुकालेन शुध्यति ॥ ३ ॥
स्त्रियः पवित्रमतुलं नैता दुष्यन्ति कर्हिचित् ।
मासि मासि रजो ह्यासां दुष्कृतान्यपकर्षति ॥ ४ ॥
तासां सोमोऽदद ( दा ) च्छौचं गन्धर्वः शिक्षितां गिरम् ।
अग्निश्च सर्वभक्षत्वं तस्मान्निष्कल्मषाः स्त्रियः ॥ ६ ॥
त्रीणि स्त्रियः पातकानि लोके धर्म विदो विदुः ।
भर्तुर्वधो भ्रूणहत्या स्वस्य गर्भस्य पातनम् ॥ ७ ॥
स्त्रियश्च रतिसंसर्गे श्वामृगहरणे शुचिः ॥ ८ ॥
अजाश्वा मुखतो मेध्या गावो मेध्यास्तु पृष्ठतः ।
ब्राह्मणाः पादतो मेध्याः स्त्रियो मेध्यास्तु सर्वतः ॥ ९ ॥ वसिष्ठ अ. १७
पूर्वं स्त्रियः सुरैर्भुक्ताः सोमगन्धर्ववह्निभिः ।
गच्छन्ति मानुषान्पश्चान्नैता दुष्यन्ति धर्मतः ॥ ५ ॥ वसिष्ठ अ. २८
पतौ जीवति यः स्त्रीभिरलंकारो धृतो भवेत् ।
न तं भजेरन् दायादाः भजमानाः पतन्ति ते ॥ १२ ॥ विष्णु अ. १७
ऋतुत्रयमुपास्यैव कन्या कुर्यात् स्वयंवरम् ।
ऋतुत्रये व्यतीते तु प्रभवत्यात्मनः सदा ॥ ४० ॥
पितृवेश्मनि या कन्या रजः पश्यत्यसंस्कृता ।
साकन्या वृषली ज्ञेया हरंस्तान् न विदुष्यति ॥ २१ ॥ विष्णु अ. २४

प्रथम गौतमापासून तों धर्मसूत्रकार विष्णूपर्यंत काय विचार आढळतात तें पाहूं. गौतमानें फक्त एकाच अध्यायांत नियोग व विवाहाचा विचार केलेला आहे. रजोदर्शनापूर्वी कन्येचें दान करावें. तसें न केल्यास पित्याला दोष लागतो. मुलीला नागवें हिंडण्याची लज्जा वाटूं लागली म्हणजे तिचें लग्न करावें, असेंहि एक मत गौतमानें दिलें आहे. तथापि गौतम विवाहाची वयोमर्यादा कोठेंच सांगत नाहीं. कन्येचें दान ऋतुकालापूर्वी न झालें तर तिनें तीन पाळ्यापर्यंत वाट पाहावी व त्यानंतर अनिंदित विवाह-विधीनें बापाकडील अलंकार वगैरे टाकून ( स्वयंवर ) स्वतःचें लग्न लावावें.

बौधायनानें स्त्रियाविषयींचा विचार गौतमापेक्षां अधिक केलेला आहे. तो म्हणतोः—आईचे अलंकार हे मुलींनाच मिळावेत, किंवा त्यांच्या मुलींना मिळावेत. स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं. त्यांचें रक्षण बालपणीं पित्यानें, प्रौढपणीं पतीनें व वृद्धपणीं पुत्रानेंच करावें (म्हणजे त्या स्वसंरक्षण करण्यास असमर्थ होत). स्त्रियांचें पावित्र्य हें अतुल आहे. प्रत्येक महिन्याचा रजःस्राव हा त्यांचीं सर्व पातकें नष्ट करतो. चंद्र, गंधर्व, अग्नि यांनीं अनुक्रमें पावित्र्य, मधुर वाणि व सर्वभक्षकत्व हीं त्यांना दिलीं आहेत, म्हणून त्या निष्पाप होत. गुणवान् ब्रह्मचाऱ्याला नागव्यानें हिंडणाऱ्या मुलीचें दान करावें. पण रजोदर्शन झाल्यावर गुणहीनालासुद्धां द्यावी. पण तिचा ऋतु उपरुद्ध करूं नये. ऋतुमती कन्येचें तीन वर्षांच्या आंत दान न केलें तर तिच्या पालकाला भ्रूण-हत्येचें पातक लागतें. बापाच्या भिडेस्तव मुलीनें ऋतुप्राप्तीनंतर तीन वर्षें वाट पाहावी व चौथ्या वर्षी स्वयंवर लावावें. गुणवान् व अनुरूप वर न मिळाला तर गुणहीनालाहि वरावें. बलात्कारानें पळविलेली मुलगी ही दुसऱ्याला विधिपूर्वक द्यावी. मात्र त्या मुलीची समंत्रक सप्तपदी झालेली नसावी. कन्यादान केलें, घरप्रवेशाचा होम झाला व त्यानंतर जर लगेच वर गेला, तर त्या अक्षत-योनी कन्येचा पुनर्विवाह करावा.

वसिष्ठः—यानें बहुतेक बौधायनाचाच अनुवाद केलेला आहे. मुलीला न्हाण येईल या भीतीनें पित्यानें ती नग्निका असतांनाच तिचें लग्न लावावें, तसें न केल्यास ऋतुमती कन्येच्या पित्याला, आईला व इतरांनाहि भ्रूणहत्येचें पातक लागतें. विवाह झाल्यावर लगेंच नवरा मेला तर त्या अक्षतयोनि कन्यकेचा पुनर्विवाह करावा. बलात्कारानें नेलेली व पूर्ण विवाहविधी न झालेली मुलगी दुसऱ्याला देतां येते. अग्नि दहन कर्मानें, पाणी मलमूत्रानें व ब्राह्मण वेदकर्मानें जसा दूषित होत नाहीं, तशाच स्त्रियाहि जारकर्मानें दूषित होत नाहींत. आपत्ति, दूरचा प्रवास, बलात्कार व चोरांनीं पळवून नेणें, इत्यादि कारणांनीं दूषित झालेली स्त्री सोडण्यास योग्य ठरत नाहीं. कारण विटाळशीपणानें तिची शुद्धि होते. स्त्रियांचें पावित्र्य अतुल आहे, कारण अग्नि, गंधर्व, चंद्र यांनीं त्यांना आपल्या गुणांची देणगी दिली आहे. स्त्रियांच्या ठिकाणीं पतिवध, बालहत्या व गर्भपात अशीं तीन पातकें असतात. स्त्रिया या सर्वकाळीं व सर्व प्रकारानें पवित्रच होत. देव, चंद्र, गंधर्व, अग्नि, इत्यादि

स्त्रियांचा प्रथम उपभोग घेतात व नंतर माणसें त्यांचा उपभोग घेतात. एकंदरींत त्या पवित्रच होत.

गौतमाप्रमाणें विष्णु धर्मसूत्रकार हा, कन्येनें विटाळशीपणाच्या तीन पाळयानंतर स्वयंवर लावावें असें म्हणतो. तसें न केल्यास मात्र दोष आहे. पित्याच्या घरीं असलेली ऋतुस्नात कन्या वृषली समजावी व तिला पळवून नेणाऱ्याला दोष लागत नाहीं. नवरा जिवंत असतांना जे अलंकार स्त्री धारण करते, ते भाऊबंदांनीं घेऊं नयेत. तें स्त्रीधन घेतल्यास दोष लागतो.

आपस्तंब, विवाहकालासंबंधानें व स्त्रियांच्या पावित्र्यासंबंधानें फारसें सांगत नाहीं. गौतम, बौधायन, वसिष्ठ व विष्णु हे सूत्रकार न्हाण येण्यापूर्वी लग्न व्हावें असें म्हणतात. वयाची मर्यादा कोणीच सांगत नाहीं. स्त्रियांच्या पावित्र्याविषयीं सर्वांत एकवाक्यता आहे. पण कन्येनें स्वयंवर केव्हां लावावें, याबद्दल अगदीं परस्पर विरुद्ध मतें आहेत. गौतम व विष्णु म्हणतात कीं पहिल्या तीन पाळया झाल्यावर वाट न पाहातां स्वयंवर लावावें, तर वसिष्ठ व बौधायन म्हणतात कीं न्हाण आल्यावर तीन वर्षें वाट पाहावी व त्यानंतर स्वयंवर करावें. ऋतुस्नात कन्येला विष्णु वृषली म्हणतो व तिला पळवून नेणाऱ्यालाहि दोष नाहीं असें म्हणतो. बौधायन व वसिष्ठ हे कन्येला वृषली म्हणत नाहींत. पण ऋतुस्नात कन्येच्या पित्याला व इतर नातलगांना मोठाच दोष सांगतात. बलात्कार, जारकर्म, चोरांनीं पळवून नेणें, अशा प्रसंगीं त्यागाचें कारण नाहीं असेंहि वसिष्ठ सांगतो. आतां मनूपासून पुढील कल्पना काय आहेत हें पाहूं.

मनु हा गौतम व देवल या दोन्ही टोकांच्या मध्यभागीं दिसतो. म्हणून मनुस्मृतींत बहुतेक विषयावर उलटसुलट विचार पुष्कळच आलेले आहेत. मनुपूर्वकालीन सर्व स्मृतिकारांच्या कल्पना मनूनें ग्रंथांत नमूद केल्या असून, आपलें मत बहुतेक ठिकाणीं अगदीं निराळेंच सांगितलें आहे. मनुस्मृतींत स्त्रियांचें उठावदार वर्णनहि आहे व त्यांची निंदाहि आहे. मनु हा गृहस्थाश्रमाचा पुरस्कर्ता असल्यामुळें त्यानें गृहिणींना फारच महत्त्व दिलेलें आहे. समाजाचें केंद्र घर व गृहाचें केंद्र गृहिणी; या दृष्टीनें मनूचें विवेचन योग्यच आहे. परंतु मनुस्मृतींतच स्त्रियांची निंदा जी पुढें केली आहे, ती बौद्ध संस्कृतीचा परिणाम होय. भिक्षु व

संन्याशांना महत्त्व आल्यावर स्त्रियासंबंधाचे अनुदार विचार मनुस्मृतींत प्रथित झालेले आहेत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्निपरिक्रिया ॥ ६७ ॥
स्वभाव एष नारीणां नराणामिह दूषणम् ।
अतोऽर्थान्न प्रमाद्यन्ति प्रमदासु विपश्चितः ॥ २१३ ॥
अविद्वांसमलं लोके विद्वांसमपि वा पुनः ।
प्रमदा ह्युत्पथं नेतुं कामक्रोधवशानुगम् ॥ २१४ ॥
मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ २१५ ॥
स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥ २३८ ॥ मनु ( अ. २ )

यत्रनार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ५६ ॥
शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् ।
न शोचन्ति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥ ५७ ॥
तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषुच ॥ ५९ ॥
संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ ६० ॥
यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ।
अप्रमोदात्पुनः पुंसः प्रजनं न प्रवर्तते ॥ ६१ ॥
स्त्रियां तु रोचमानायां सर्वं तद्रोचते कुलम् ।
तस्यां त्वरोचमानायां सर्वमेव न रोचते ॥ ६२ ॥ मनु ( अ. ३ )

बालया वा युवत्या वा वृद्धया वापि योषिता ।
न स्वातन्त्र्येण कर्तव्यं किंचित्कार्यं गृहेष्वपि ॥ १४७ ॥
बाल्ये पितुर्वशे तिष्ठेत्पाणिग्राहस्य यौवने ।
पुत्राणां भर्तरि प्रेते न भजेत्स्त्री स्वतंत्रताम् ॥ १४८ ॥

विशीलः कामवृत्तो वा गुणै र्वा परिवर्जितः ।
उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पतिः ॥ १५४ ॥
नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञो न व्रतं नाप्युपोषणम् ।
पतिं शुश्रूषते येन तेन स्वर्गे महीयते ॥ १५५ ॥
भार्यायै पूर्वमारिण्ये दत्त्वाग्नीनन्त्य कर्मणि ।
पुनर्दारक्रियां कुर्यात्पुनराधानमेव च ॥ १६८ ॥ मनु ( अ. ५ )
भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः ।
यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद्धनम् ॥ ४१६ ॥
चतुर्णामपि वर्णानां दारा रक्ष्यतमाः सदा ॥ ३५९ ॥ मनु ( अ. ७ )
पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्रीस्वातंत्र्यमर्हति ॥ ३ ॥
सूक्ष्मेभ्योऽपि प्रसंगेभ्यः स्त्रियो रक्ष्या विशेषतः ।
द्वयोर्हि कुलयोः शोकमाहवेयुररक्षिताः ॥ ५ ॥
पतिर्भार्यां संप्रविश्य गर्भो भूत्वेह जायते ।
जायायास्तद्धि जायात्वं यदस्यां जायते पुनः ॥ ८ ॥
यादृशं भजते हि स्त्री सुतं सूते तथाविधम् ॥
अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ।
शौचे धर्मेऽन्नपक्त्यांच पारिणाह्यस्य वेक्षणे ॥ ११ ॥
नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थितिः ।
सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुञ्जते ॥ १४ ॥
नास्ति स्त्रीणां क्रिया मंत्रैरिति धर्मे व्यवस्थितिः ।
निरिन्द्रिया ह्यमंत्राश्च स्त्रियोऽनृतमिति स्थितिः ॥ १८ ॥
यादृग्गुणेन भर्त्रा स्त्री संयुज्येत यथाविधि ।
तादृग्गुणा सा भवति समुद्रेणैव निम्नगा ॥ २२ ॥
एताश्चान्याश्च लोकेऽस्मिन्नपकृष्टप्रसूतयः ।
उत्कर्षं योषितः प्राप्ताः स्वैः स्वैर्भर्तृगुणैः शुभैः ॥ २४ ॥
प्रजनार्थं महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः ।
स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन ॥ २६ ॥

उत्पादनमपत्यश्च जातस्य परिपालनम् ।
प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबंधनम् ॥ २७ ॥
अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा ।
दाराधीनस्तथा स्वर्गः पितॄणामात्मनश्च ह ॥ २८ ॥
विधाय वृत्तिं भार्यायाः प्रवसेत्कार्यवान्नरः ।
अवृत्तिकर्षिता हि स्त्री प्रदुष्येत्स्थितिमत्यपि ॥ ७४ ॥
विधाय प्रोषिते वृत्तिं जीवेन्नियममास्थिता ।
प्रोषिते त्वविधायैव जीवेच्छिल्पैरगर्हितैः ॥ ७५ ॥
वन्ध्याष्टमेऽधिवेद्याब्दे दशमे तु मृतप्रजा ।
एकादशे स्त्रीजननी सद्यस्त्वप्रियवादिनी ॥ ८१ ॥
देवदत्तां पतिर्भार्यां विन्दते नेच्छयात्मनः ।
तां साध्वीं विभृयान्नित्यं देवानां प्रियमाचरन् ॥ ९५ ॥
उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशायच ।
अप्राप्तामपि तां तस्मै कन्यां दद्याद्यथाविधि ॥ ८८ ॥
काममारणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि ।
नचैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ ८९ ॥
त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥ ९० ॥
अदीयमाना भर्तारमधिगच्छेद्यदि स्वयम् ।
नैनः किंचिदवाप्नोति न चायं साधिगच्छति ॥ ९१ ॥
त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम् ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः ॥ ९४ ॥
प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थं च मानवाः ।
तस्मात्साधारणो धर्मः श्रुतौ पत्न्या सहोदितः ॥ ९६ ॥
अध्यग्न्यध्यावाहनिकं दत्तं च प्रीतिकर्मणि ।
भ्रातृमातृपितृप्राप्तं षड्विधं स्त्रीधनं स्मृतम् ॥ १९४ ॥
पत्यौ जीवति यः स्त्रीभिरलंकारो धृतो भवेत् ।
न तं भजेरन्दायादा भजमानाः पतन्ति ते ॥ २०० ॥ मनु ( अ. ९ )

मनुः—स्त्रियांचा समंत्रक संस्कार म्हणजे एक विवाह होय. सासरीं जाऊन पती व वडील माणसांची सेवा करणें, हाच तिचा गुरुगृहवास होय. पुरुषांना बिघडविणें हा स्त्रियांचा स्वभावच आहे. म्हणून शहाणे लोक स्त्रियांच्या बाबतींत चुकत नसतात. विद्वानाला किंवा अविद्वानाला स्त्रिया भलत्या मार्गाला नेऊं शकतात. कारण हे विद्वान्, अविद्वान् लोक कामक्रोधांच्या स्वाधीन असतात. आई, मुलगी, बहीण यांच्याशीं एकांत करूं नये. कारण बलवान् इंद्रियें विद्वानालाहि विषयांकडे खेचतात. स्त्रीरत्न कोणत्याहि दुष्कुलांत असलें तरी मिळवावें. ( अ. २ )

जेथें स्त्रियांचा सत्कार केला जातो, तेथें देवता रममाण होतात व त्याउलट स्थिति असल्यास सर्व क्रिया निष्फल होतात. ज्या घरांत स्त्रिया शोक करितात तें कुल नष्ट होतें व जेथें त्या आनंदित असतात तें कुल वाढतें. म्हणून उत्कर्षेच्छु पुरुषानें भूषण, आच्छादन व अन्न देऊन स्त्रियांना संतुष्ट करावें व सर्व उत्सवांत त्यांचा सत्कारहि करावा. ज्या कुलांत स्त्रीपुरुष परस्पर संतुष्ट व अनुरक्त असतील, तेथें मूर्तिमंत कल्याण नांदते व त्या उलट स्थिति असेल तर अपत्य होत नाहीं. कोणत्याहि कुलांत स्त्री भर्तृप्रेमानें अनुरक्त असली म्हणजे त्या कुळांत प्रेम नांदतें, नाहींतर त्याउलट स्थिति होत असते. अध्याय दोन मध्यें केलेली स्त्रीनिंदा व अध्याय ३ मध्यें केलेला गृहिणीगौरव हा वाचकांच्या लक्ष्यांत आला असेलच. ( अ. ३ )

बाल, तरुण किंवा वृद्ध स्त्रीनें सुद्धां स्वातंत्र्यानें कांहीं करतां कामा नये. तिनें पिता, पती व पुत्र यांच्या तंत्रानेंच त्या त्या अवस्थेंत राहिलें पाहिजे. दुःशील, कपाळकरंटा व विषयी असला कसलाहि नवरा असला तरी स्त्रीनें त्याची देवाप्रमाणें सेवा करावी. पतिसेवेनेंच स्त्री स्वर्गाला जाते. तिला त्यावांचून व्रत, यज्ञ व तप इत्यादि कांहीं नाहींत. अग्निहोत्र्यानें स्त्रीला ती मृत झाल्यास अरणीसह मंत्राग्नि द्यावा व स्वतः पुनः लग्न करून पुनः अग्न्याधान करावें. ( अ. ८ ) बायको, लहान मुलें व नोकर हीं अधन होत. कारण हीं ज्याच्या आश्रयानें असतात, त्याचेंच तीं धन बनतात. ( अ. ५ )

चारहि वर्णांनीं स्त्रियांचें रक्षण अत्यंत अडचणीचे प्रसंगींसुद्धां केलें पाहिजे. स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं. म्हणून त्यांचें रक्षण न झाल्यास त्या दोन्हीं कुळांना

दुःख देतात. पति हा गर्भरूपानें स्त्रीमध्यें प्रविष्ट होतो. जिच्यांत तो पुन्हां जन्म घेतो ती त्याची जाया होय. स्त्री ज्या पुरुषाशीं अनुरक्त होईल, तशी प्रजा उत्पन्न होते म्हणून प्रजा विशुध्यर्थ स्त्रीचें रक्षण केलें पाहिजे. स्वच्छता, स्वैपाक, घरांतील सर्व व्यवस्था अशा कामांत स्त्रियांना गुंतविलें पाहिजे. ( तसें न केल्यास ) त्यांचीं मनें दुसरीकडे जातात व रूप, वय आणि योग्य अयोग्य याचा विचार न करतां त्या परपुरुषाशीं अनुरक्त होतात. स्त्रियांच्या क्रिया वेदमंत्रांनीं करूं नयेत, कारण स्त्रिया अमंत्र, अनृत व अप्रमाण होत. समुद्राला मिळालेली नदी जशी समुद्ररूप होते, तशीच पतीच्या संसर्गानें स्त्री पतीसारखी होते. शीलवान्, गुणवान्, कर्तृत्ववान् अशा पतिसहवासानें अपकृष्ट जातींतील स्त्रिया उत्कर्ष प्राप्त करून घेतात.

स्त्रिया या पूजार्ह, गृहप्रभा व साक्षात् लक्ष्मीच होत. संततीकरतां त्या आहेत. रोजचा संसार चालविणें, मुलांना जन्म देणें व त्यांचें संरक्षण करणें हींच त्यांचीं मुख्य कर्मे होत. धर्मकार्ये, अपत्य–संगोपन व स्वतःचें व संसाराचें सुख हें सर्व स्त्री–आधीनच आहे. दीर्घकाल प्रवास करणाऱ्या मनुष्यानें बायकामुलांच्या पोटाची व्यवस्था करून मग जावें, तसें न केल्यास त्यांची बुध्दि बिघडते. पति दीर्घकाल गांवाला गेला असता स्त्रीनें नियम पाळून अगर्हित शिल्पावर निर्वाह करावा. वांझ स्त्रीचा आठव्या वर्षी, मृत वांझेचा दहाव्या वर्षी, मुली जिला सारख्या होतात तिचा अकराव्या वर्षी व अप्रिय बोलणाऱ्या स्त्रीचा तात्काळ त्याग करावा. भार्या ही आपल्या इच्छेपेक्षां देवाच्या कृपेनेंच मिळत असते, म्हणून तिला चांगल्या तऱ्हेनें वागविण्यास देवांचेंहि प्रिय होतें.

उत्कृष्ट, सुस्वरूप, गुणवान् असा वर मिळाला तर कन्येचें ऋतुकालापूर्वी-सुद्धां लग्न करावें. पण योग्य वराच्या अभावीं तिला गुणहीनाला देऊं नये. कन्या आजन्म ब्रह्मचारी राहिली तरी हरकत नाहीं. ऋतुस्नात कन्येनें तीन वर्षे वाट पाहून स्वयंवर लावावें.

कन्यादान करणारा योग्य पालक नसेल तर तिनें स्वयंदान करावें. त्यांत तिला मुळींच दोष नाहीं. तीस वर्षांच्या वरानें बारा वर्षांच्या मुलीशीं, किंवा चोवीस वर्षांच्या वरानें आठव्या वर्षाच्या कन्येशीं विवाह लावावा. प्रजेकरितां स्त्रिया व संतानाकरितां पुरुष निर्माण केलेले आहेत. विवाहकालीं पित्यानें आपल्या

मुलीला हौसेनें दिलेलें, नवऱ्यानें प्रेमानें दिलेलें व आई, बाप व भाऊ यांच्याकडून मिळालेलें, असे सहा प्रकारचें स्त्रीधन समजावें. पति जिवंत असतां स्त्रीनें धारण केलेले अलंकार हे स्त्रीचेच होत. ते भाऊबंदांनीं घेतल्यास त्यांना दोष लागतो व ते पतित होतात. ( अ. ९ )

मनूनें स्त्रियाविषयीं केलेल्या विस्तृत चर्चेचा सारांश वर थोडक्यांत दिलेला आहे. त्यांतील कांहीं सिद्धांत सत्य आहेत. पण कांहीं सिद्धांतांमध्यें परिस्थित्यनुरुप फेरबदल व्हावयासच पाहिजे. स्त्रिया या कुणालाहि बिघडवूं शकतात, हें एकांतिक मत आहे. ( महाभारत ). शान्तिपर्वामध्यें स्त्रियांना दुर्मार्गाला प्रवृत्त करण्याच्या कामांत पुरुषच अधिक अपराधी असतात, असें स्वच्छ म्हटलें आहे. लज्जा, धैर्याचा अभाव व मनाचा कोमलपणा यामुळें स्त्रिया या साहसाला प्रवृत्त होत नाहींत. परंतु पुरुष त्यांच्या या वैगुण्याचा फायदा घेतात. स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं, त्यांना विचार नाहीं, त्यांना सारख्या डांबून ठेवाव्यात, तसें न केल्यास त्या पाहिजे त्या पुरुषाशीं अनुरक्त होतात, इत्यादि विधानें सदोष आहेत. हीच विधानें उलट पुरुषाबद्दलहि करतां येतील. रिकामे पुरुष पाहिजे तो धिंगाणा घालतात. कूटकौटिल्यानें ते पाहिजे त्या साध्वीला भ्रष्ट करितात आणि आपल्या स्वातंत्र्याचा सर्वथैव दुरुपयोग करतात, असें सोदाहरण सिद्ध करतां येईल.

आतां याज्ञवल्क्यापासून देवलापर्यंतचे स्मृतिकार काय म्हणतात हें पाहूं.

तूष्णीमेताः क्रियाः स्त्रीणां विवाहस्तु समन्त्रकः ॥ १३

हृताधिकारां मलिनां पिण्डमात्रोपजीविनीम् ।
परिभूतामधःशय्यां वासयेत व्यभिचारिणीम् ॥ ७०

व्यभिचाराहतौ शुद्धि गर्भे त्यागो विधीयते ।
गर्भभर्तृवधादौ च तथा महति पातके ॥ ७२

भर्तृभ्रातृपितृज्ञातिश्वश्रूश्वशुरदेवरैः ।
बन्धुभिश्च स्त्रियः पूज्या भूषणाच्छादनाशनैः ॥ ८२

पितृमातृसुतभ्रातृश्वश्रूश्वशुरमातुलैः ।
हीना न स्याद्विना भर्त्रा गर्हणीयान्यथा भवेत् ॥८६॥ याज्ञवल्क्य अ. १

याज्ञवल्क्यानें मनूचाच अनुवाद सर्वांशानें केला आहे. स्त्रियांचे सर्व संस्कार अमंत्रक, पण विवाह मात्र समंत्रक करावा. व्यभिचारिणी स्त्रीचे सर्व अधिकार

काढून घेऊन तिला मलीन वस्त्र व पोटापुरतें अन्न द्यावें. तिरस्कारानें तिच्याशीं वागून भुईवर पडण्याजोगेंच एखादें रकटें तिला द्यावें. स्त्रीनें व्यभिचार केल्यास विटाळशीपणानें तिची शुद्धि होते. ती जर व्यभिचारामुळें गरोदर राहिली व गर्भपात, नवऱ्याचा वध इत्यादि करण्यास प्रवृत्त झाली तर तिचा तत्काल त्याग करावा. नवरा, भाऊ, बाप, आप्तइष्ट, सासु, सासरा, दीर इत्यादींनीं अन्न, आच्छादन व अलंकार वगैरे देऊन कुलीन स्त्रियांचा सत्कार करावा. पुत्रप्राप्ति व त्यामुळें दिव्यलोकप्राप्ति, ही स्त्रियांच्या आधीन असल्यामुळें त्यांचें रक्षण व त्यांची सेवा मोठ्या दक्षतेनें करावी. सोमगंधर्वादींनीं स्त्रियांना आपले गुण दिले आहेत. स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं, त्यांनीं पिता, पति व पुत्र यांच्या तंत्रानेंच वागावें आणि केव्हांहि आईबाप, भाऊ, मुलगा, सासूसासरा, मामा, नणंद यांच्याच आश्रयानें असावें. भर्त्याशिवाय स्त्री पाहिजे त्या ठिकाणीं एकटीदुकटी राहूं लागली म्हणजे ती लोकनिंदेला पात्र होते. याज्ञवल्क्यानें विवाहाचें वय सांगितलेलें नाहीं. विवाहाचें वय निश्चितपणें सांगणारे स्मृतिकार पराशर, संवर्त, यम व बृहस्पति हेच होत.

अष्टवर्षा भवेद्गौरी नववर्षा तु रोहिणी ।
दशवर्षा भवेत् कन्या अतऊर्ध्वं * रजस्वला ॥ ६ ॥
प्राप्ते तु द्वादशे वर्षे यः कन्यां न प्रयच्छति ।
मासि मासि रजस्तस्याः पिबन्ति पितरोऽनिशम् ॥ ७ ॥
माता चैव पिता चैव ज्येष्ठो भ्राता तथैव च ।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥ ८ ॥
यस्तां समुद्वहेत्कन्यां ब्राह्मणो मदमोहितः ।
असंभाष्यो ह्यपांक्तेयः स विप्रो वृषलीपतिः ॥ ९ ॥

---

* टीपः—बालविवाह सांगणारीं स्मृतिवचनें जशीं आहेत तशींच प्रौढ विवाहाच्या अनुमानास बळकटी आणणारीं गृह्यसूत्रांतील वचनेंहि आहेत. विवाहोत्तर निदान तीन दिवस ब्रह्मचर्य पाळावें व पुढें सहसंवेश करावा असें जे आपस्तंब, पारस्कर, खादीर, आश्वलायन, द्राह्यायण धर्मसूत्रांत सांगितलें आहे तें वरील स्मृतींच्या अगदीं विरुद्ध आहे.

यः करोत्येकरात्रेण वृषलीसेवनं द्विजः ।
स भैक्ष्यभुग्जपन्नित्यं त्रिभिर्वर्षैर्विशुद्ध्यति ॥ १० ॥ पराशर ( अ. ७ )
रोमकाले तु संप्राप्ते सोमो भुंक्तेऽथ कन्यकाम् ।
रजो दृष्ट्वा तु गंधर्वाः कुचौ दृष्ट्वा तु पावकः ॥ ६५ ॥
अष्टवर्षा भवेद्गौरी नववर्षा तु रोहिणी ।
दशवर्षा भवेत्कन्या अत ऊर्ध्वं रजस्वला ॥ ६६ ॥
माता चैव पिता चैव ज्येष्ठो भ्राता तथैव च ।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥ ६७ ॥
तस्माद्विवाहयेत्कन्यां यावन्नर्तुमती भवेत् ।
विवाहो ह्यष्टवर्षायाः कन्यायास्तु प्रशस्यते ॥ ६८ ॥
सर्वेषामेव दानानामेकजन्मानुगं फलम् ।
हाटकक्षितिगौरीणां सप्तजन्मानुगं फलम् ॥ ७९ ॥ संवर्त
पितुर्वेश्मनि या कन्या रजस्तु समुपस्पृशेत् ।
भ्रूणहत्या पितुस्तस्याः सा कन्या वृषली स्मृता ॥ १२६ ॥
माता चैव पिता चैव ज्येष्ठो भ्राता तथैव च ।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥ १२७ ॥
उद्वहेद्यस्तु तां कन्यां ब्राह्मणो मदमोहितः ।
असंभाष्यो ह्यपाङ्क्तेयः स विप्रो वृषलीपतिः ॥ १२८ ॥ आंगिरस
पितुर्गेहे तु या कन्या पश्यत्यसंस्कृता रजः ।
भ्रूणहत्या पितुस्तस्य ( स्याः ) कन्या सा वृषली स्मृता ॥ १८ ॥
यस्तां विवाहयेत्कन्यां ब्राह्मणो मदमोहितः ।
असंभाष्यो ह्यपाङ्क्तेयः स विप्रो वृषलीपतिः ॥ १९ ॥
प्राप्ते द्वादशमे वर्षे कन्यां यो न प्रयच्छति ।
मासि मासि रजस्तस्याः पिता पिबति शोणितम् ॥ २० ॥
अष्टवर्षा भवेद्गौरी नववर्षा च रोहिणी ।
दशवर्षा भवेत्कन्या अत उर्ध्वं रजस्वला ॥ २१ ॥
माता चैव पिता चैव ज्येष्ठभ्राता तथैव च ।
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥ २२ ॥

पतितानां च विप्राणां तथा स्त्रीणां विगर्हितम् ।
कथं शुद्धिर्भवेत्तासां तेषां चैव विशेषतः ॥ ३५ ॥
व्यभिचाराद्दतौ शुद्धिः स्त्रीणां चैव न संशयः ।
गर्भे जाते परित्यागो नान्यथा मम भाषितम् ॥ ३६ ॥ बृ. य. (अ.३)
लोकास्त्रयस्तेन भवन्ति दत्ता यः काञ्चनं गां च महीं च दद्यात् ॥३०॥
सर्वेषामेव दानानामेकजन्मानुगं फलम् ।
हाटकक्षितिगौरीणां सप्तजन्मानुगं फलम् ॥ ३३ ॥ बृहस्पति

आठ वर्षांची मुलगी गौरी, नऊ वर्षांची रोहिणी, दहा वर्षांची कन्या व त्यानंतर ती रजस्वला समजावी. बारा वर्षांच्या मुलीचें जो दान करीत नाहीं तो पतित होतो व त्या कन्येच्या मासिक रजामध्यें पितर लोळतात. आई, बाप व भाऊ हे तिघेहि रजस्वला कन्येला पाहून नरकाला जातात व जो अशा न्हाण आलेल्या मुलीशीं मोहानें लग्न करतो, तो वृषलीपति होय. अर्थात् तो अपंक्त व असंभाष्य समजावा. वृषलीशीं जो एक रात्र घालवतो तो तीन वर्षांनंतर प्रायश्चित्तानें शुद्ध होतो.

पराशरापेक्षां संवर्तानें एक दोन मुद्दे अधिक सांगितले आहेत. मुलीच्या विशिष्ट अवस्थेंत चंद्र, गंधर्व व अग्नि हे तिचा उपभोग घेतात. अष्टवर्षा अगर दशवर्षा कन्येचाच विवाह प्रशस्त होय. सर्व दानांचें फळ फक्त एक जन्मापुरतें असतें पण सुवर्ण, भूमि व गौरी * यांच्या दानाचें फल सात जन्मापर्यंत असतें. अंगिरःस्मृतीमध्यें रजोदर्शन झालेल्या मुलीला वृषली असें म्हणून तिच्या सर्व नातलगांना भ्रूणहत्येचें पातक लागतें, ते सर्व नरकांत जातात असें म्हटलें आहे व वृषलीपतीचा निषेध केलेला आहे. बृहद्यमस्मृतीमध्यें पराशर व संवर्ताचाच विषय थोड्या निराळ्या शद्बांत सांगितला आहे. स्त्रीनें व्यभिचार केल्यास तिच्या शुद्धीचें शास्त्र बृहद्यमानें याज्ञवल्क्याप्रमाणेंच सांगितलेलें आहे व बृहस्पतीनें गौरीदानाचें महत्त्व संवर्ताप्रमाणेंच सांगितलें आहे.

न स्त्री दुष्यति जारेण न विप्रो वेदपारगः ।
नाऽऽपो मूत्रपुरीषेण नाग्निर्दहनकर्मणा ॥ १ ॥
बलात्कारोपभुक्ता वा चौरहस्तगताऽपि वा ।

* टीपः—बालविवाहाची चाल बौद्धक्रांतीमुळें पडलेली आहे.

स्वयं चापि विपन्ना वा यदि वा विप्रवादिता ॥ २ ॥
न त्याज्या दूषिता नारी नास्यास्त्यागो विधीयते ।
पुष्पकालमुपासित्वा ऋतुकालेन शुध्यति ॥ ३ ॥
स्त्रियः पवित्रमतुलं नैता दुष्यन्ति केनचित् ।
मासि मासि रजो ह्यासां दुष्कृतान्यपकर्षति ॥ ४ ॥
पूर्वं स्त्रियः सुरैर्भुक्ता देवगन्धर्ववह्निभिः ।
भुज्यन्ते मानुषैः पश्चान्नैता दुष्यन्ति कर्हिचित् ॥ ५ ॥
असवर्णेन यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते ।
अशुद्धा तु भवेन्नारी यावच्छल्यं न मुञ्चति ॥ ६ ॥
निसृते तु ततः शल्ये रजसोऽपीह दर्शनात् ।
ततः सा शुध्यते नारी विमला काञ्चनोपमा ॥ ७ ॥
सोमः शौचं ददौ तासां गन्धर्वश्च शुभां गिरम् ।
पावकः सर्वमेध्यत्वं तस्मान्निष्कल्मषाः स्त्रियः ॥ ८ ॥
व्यञ्जनेषु च जातेषु सोमो भुङ्क्ते च कन्यकाम् ।
पयोधरेषु गन्धर्वो रजस्यग्निः प्रतिष्ठितः ॥ ९ ॥
रजसा शुध्यते नारी नदी वेगेन शुध्यति ॥ १० ॥ अत्रि स्मृति
सकृद्भुक्ता तु या नारी म्लेच्छै र्या पापकर्मभिः ।
प्राजापत्येन शुध्येत ऋतुप्रस्रवणेन तु ॥ २०१ ॥
बलाद्धृता स्वयं वाऽपि परप्रेरितया यदि ।
सकृद्भुक्ता तु या नारी प्राजापत्येन शुध्यति ॥ २०२ ॥
स्वसुता अप्रजा तावन्नाश्नीयात्तद्गृहे पिता ।
अन्नं भुङ्क्ते तु यो मोहात्पूयं स नरकं व्रजेत् ॥ ३०५ ॥ अत्रिसंहिता
गृहीता स्त्री बलादेव म्लेच्छैर्गुर्वीकृता यदि ।
गुर्वी न शुद्धिमाप्नोति त्रिरात्रेणेतरा शुचिः ॥ ४७ ॥
योषा गर्भं विधत्ते या म्लेच्छात्कामादकामतः ।
ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रा वर्णेतरा च या ॥ ४८ ॥
अभक्ष्यभक्षणं कुर्यात्तस्याः शुद्धिः कथं भवेत् ।
कृच्छ्रं सांतपनं शुद्धि र्घृतै र्योनेश्च पाचनम् ॥ ४९ ॥

असवर्णेन यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते ।
अशुद्धा सा भवेन्नारी यावच्छल्यं न मुञ्चति ॥ ५० ॥
विनिःसृते ततः शल्ये रजसो वाऽपि दर्शने ।
तदा सा शुध्यते नारी विमलं काञ्चनं यथा ॥ ५१ ॥
स गर्भो दीयतेऽन्यस्मै स्वयं ग्राह्यो न कर्हिचित् ॥ देवल ॥

स्त्रियांच्या पावित्र्याविषयीं आंगिरस, अत्रि, देवल इत्यादींचे विचार एकत्र आहेत. स्त्री ही विटाळसपणानें शुद्ध होते. मात्र तिनें विवर्णाशीं संबंध ठेवला तर ही शुद्धि नाहीं. ( स्त्रीधनाचा, वस्त्राचा बांधवांनीं अपहार केल्यास ते दुर्गतीला जातात, असेंहि आंगिरसाचें मत आहे. ) अत्रिस्मृति व अत्रिसंहिता या दोन्हीं-तील विषय अगदीं एकच आहे. पुष्कळसे श्लोकहि तेच आहेत. म्हणून अत्रि-स्मृतींत नसलेले फक्त तीनच श्लोक अत्रि संहितेपैकीं दिलेले आहेत व या दोघांनीं वसिष्ठ धर्मसूत्रांतील विचारच उतरलेले आहेत. वसिष्ठापेक्षां जो विशेष आहे तो असा–असवर्ण पुरुषांनीं स्त्रीशीं संबंध केल्यामुळें जर ती गरोदर राहिली तर गर्भमोचन होईपर्यंत ती अशुद्ध समजावी. स्त्री बाळंतीण झाल्यावर तो गर्भ टाकावा व पुन्हा ती विटाळशी झाली म्हणजे ती कांचनाप्रमाणें शुद्ध समजावी. गांवची घाण घेऊन जाणारी नदी जशी वेगाच्या ओघानें शुद्ध होते तशीच स्त्री ही रजानें शुद्ध होते. बलात्कारानें स्त्रीचा उपभोग घेतला गेला, तर तेवढ्यामुळें ती त्याग करण्यास योग्य होत नाहीं. विटाळसपणापर्यंत ती अशुद्ध समजावी व त्यानंतर ती शुद्ध होते. म्लेंच्छांनीं बलात्कारानें स्त्रीचा उपभोग घेतला असेल तर ऋतु-स्रावापर्यंत ती अशुध्द व पुढें प्राजापत्य प्रायश्चित्तानें शुध्द होते. परप्रेरणेनें, स्वतःच्या मूर्खपणानें, किंवा बलानें स्त्रीनें व्यभिचार केला असेल तर तीहि रजस्वला झाल्यानंतर प्राजापत्य प्रायश्चित्तानें शुध्द होते. ( जोंवर आपल्या मुलीला मूल झालेलें नाहीं तोंवर पित्यानें तिच्या घरीं जेवूं नये, तसें केल्यास दोष आहे. )

याज्ञवल्क्यानें व्यभिचारानें स्त्री गरोदर राहिली तर त्याग सांगितला आहे. पण अत्रीनें गर्भमोचन होईपर्यंत ती अशुद्ध असें स्पष्ट म्हटलें आहे. गर्भमोचनानंतर स्त्रीची शुद्धि याज्ञवल्क्यानें सांगितलेली नाहीं. अत्रिसंहितेमध्यें तर म्लेंच्छाच्या नांवाचा उल्लेख करून, म्लेंच्छ–संबंध जुलुमानें घडला तर तिचा त्याग न सांगतां प्रायश्चित्तानें शुद्धि सांगितली आहे. देवलस्मृति ही

इसवीसनाच्या सहाव्या शतकांतील असल्यामुळें तिचा उपक्रम व उपसंहार म्लेंच्छांच्या बलात्काराच्या प्रतिकाराकरितां आहे हें उघड दिसतें. म्लेंच्छांनीं बलात्कारानें स्त्रीला भ्रष्ट केली तर ती तीन दिवसांनीं प्रायश्चित्तपूर्वक शुद्ध होते. पण बलात्कारामुळें जर ती गरोदर राहिली असेल तर कृच्छ्र व सांतपन-व्रतें, घृतानें योनीचें शोधन, गर्भमोचन व पुन्हां रजोदर्शन अशा क्रमानें ती शुद्ध होते. बलात्कारजन्य गर्भ हा दुसऱ्याला द्यावा, पण तो घरामध्यें मात्र मुळींच ठेवूं नये. कारण त्यामुळें संकर होण्याची भीति असते.

स्त्रियांवर बलात्कार होण्याचा प्रसंग अनादिकालापासून आहे. पुरुषजातीची स्त्रीजातीवर अनेक आक्रमणें झालेलीं आहेत, म्हणून त्याचा निर्देश वसिष्ठापासून देवलापर्यंत सर्वांनीं केलेला आहे. पण प्रथम सवर्ण पुरुषाचाच बलात्कार संभवनीय होता. पुढें असवर्णाचा संबंध आलेला दिसतो व त्यानंतर अगदीं अलीकडे म्लेंच्छबलात्काराचा उल्लेख आलेला आहे. त्यावरून स्मृतींचे काल, मुसलमानांच्या स्वाऱ्या, समाजाची दुर्बलता आणि स्मृतिकारांनीं दाखविलेलें धोरण अशा अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो. स्त्रिया या उपभोग्य होत, त्यांचा देव, गंधर्व, मनुष्य उपभोग घेतात, असें वरचेवर सर्व स्मृतिकारांनीं सांगितलेलें आहे. पण स्त्रियांच्या दृष्टीनें पुरुष हेहि तसेच उपभोग्य नव्हेत काय? एकमेक एकमेकांचा उपभोगच घेतात. तेव्हां स्त्रिया याच तेवढ्या उपभोग्य होत असें म्हणण्यांत स्वारस्य तें काय?

स्त्रियांनीं मनानेंहि परपुरुषाचें चिंतन करूं नये, परपुरुषाचा स्पर्शहि त्यांना न व्हावा, त्यांचें शुद्धतम पावित्र्य राहावें, अशा आपल्या आजच्या कल्पना आहेत. या कल्पना पूर्वीच्या मानानें फारच उच्च आहेत व या उच्च कल्पना रामचरित्रावरून आपण घेतलेल्या आहेत. स्त्रियांप्रमाणेंच पुरुषांनींहि परस्त्रीचें चिंतन करूं नये, परस्त्रीचा स्पर्शहि वर्ज्य मानावा व स्वस्त्रीव्यतिरिक्त इतर स्त्रिया मातृसमान मानाव्या. समाजाची नैतिक उन्नति अशा दोहोंबाजूच्या शुद्ध आचरणावरूनच होईल. पुरुषांची दानत सुधारली व स्त्रिया साक्षर, स्वतंत्र, थोड्या धाडसी आणि प्रतिकारक्षम अशा झाल्या तर स्त्रियांचें पावित्र्य आजच्यापेक्षांहि अधिक शुद्धतर राहील.

वपन-मृतंभर्तारमादाय ब्राह्मणीवन्हिमाविशेत्।

ब्राह्मणीचेत् त्यक्तकेशा तपसा शोधयेत् वपुः ॥ व्यास अ. ३

क्वचित् ( जीवन्तीचेत् ) असाहि पाठ आहे.

पती मृत झाल्यावर ब्राह्मणस्त्रीनें वाटल्यास सहगमन करावें. पण तिला जगण्याची इच्छा असेल तर वपन करून तपानें शरीर शोधन करीत राहावें.

गर्भिणी नानुगन्तव्या मृतं भर्तारमव्ययम् ।
ब्रह्मचर्यव्रतं कुर्याद्यावज्जीवमतन्द्रिता ॥ २०५
केशरंजनतांबूलगन्धपुष्पादिसेवनम् ।
भूषणं रंगवस्त्रं च कांस्यपात्रेषु भोजनम् ॥ २०६
द्विवारभोजनं चाक्ष्णोरंजनं वर्जयेत्सदा ।
स्नात्वा शुक्लाम्बरधरा जितक्रोधा जितेंद्रिया ॥ २०७
सुनिर्मला शुभाचारा नित्यं संपूजयेद्धरिम् ॥ २०८
क्षितिशायी भवेद्रात्रौ शुचौ देशे कुशोत्तरे ।
ध्यानयोगपरा नित्यं सतां संगे व्यवस्थिता ॥ २०९ ॥ वृद्धहारित स्मृति

स्त्रियांच्या वपनाचा विषय एका व्यासस्मृतींत आहे. इतरत्र कुठेंहि तो नाहीं; पण वृद्धहारीत-स्मृतीमध्यें गरोदर स्त्रीनें मृत भर्त्याशीं सहगमन करूं नये, केशरंजन, तांबूलभक्षण, पुष्पादिसेवन, नेत्ररंजन इ. करूं नयेत, असें म्हटलें आहे. म्हणजे केशवपन न करतां व सहगमन न करतां विधवेनें व्रतस्थपणानें राहावें असेंच वृद्धहारीत म्हणतो. विधवेनें पांढरें वस्त्र नेसावें. दोन वेळां जेवावें व तें काशाच्या भांड्यांत जेवावें. सुनिर्मल, जितक्रोध, जितेंद्रिय असें राहून हरीचें ध्यान करीत असावें, भुईवर निजावें व सज्जनांचा सहवास करावा. विधवेनें वपन केलेंच पाहिजे असें नाहीं. वाटल्यास करावें, वाटल्यास न करावें. दोन ऋषि किंवा दोन स्मृतिकार जेव्हां परस्पर विरुद्ध दोन मतें सांगतात, त्यावेळीं विकल्प मानावयाचा असतो. म्हणून धर्मशास्त्रदृष्ट्या वपनाचा विकल्प आहे असें समजावें. तें वाटल्यास करावें अगर न करावें.

आतांपर्यंत प्रामाण्य, देश, काल, वर्ण, जाति, आश्रम, विवाह व स्त्रिया या विषयांचा विचार केला. यापुढें व्यवसाय, स्पर्शास्पर्श, मांसाहार, भक्ष्याभक्ष्य, धर्मतारतम्य, हा धर्म कसला इत्यादि विषयांचें विवेचन करावयाचें आहे, असें सांगून हा पूर्वार्ध संपवितों.

* पूर्वार्ध समाप्त *

# धर्मशास्त्र-मंथन

## उत्तरार्ध

## प्रकरण नववें

### व्यवसाय

आम्ही आरंभिलेल्या धर्मशास्त्रमंथन नामक ग्रंथाचा पूर्वार्ध गेल्या प्रकरणाचे शेवटीं संपला. उत्तरार्धास प्रारंभ करण्यापूर्वी मागील सिंहावलोकन व पुढील धोरण कथन केलें पाहिजे.

पहिल्या प्रकरणांत प्रामाण्याचा विचार करून, ग्रंथप्रामाण्याबरोबर, लोक-संग्रह, व्यवहार व आजचें जग यांनांहि प्रामाण्य दिलें पाहिजे असें सांगितलें. धर्म ज्या लोकांकरितां सांगावयाचा, ते कोणत्या देशांत राहातात, त्या देशाची मर्यादा कोणती, देशाच्या व्याख्येमध्यें एकवाक्यता कशी नाहीं, ती व्याख्या पुढें कशी कशी पसरत गेली व आजहि आपली देशाची व्याख्या कशी व्यापक होत आहे, हें दुसऱ्या प्रकरणांत सांगितलें. धर्माचा व लोकपरिस्थितीचा संबंध आहे व ती लोक-परिस्थिति सर्व काळीं एक असूं शकत नाहीं, म्हणून देशाप्रमाणें कालाचा विचार अपरिहार्य आहे, त्या कालाच्या कल्पनेंत कलिकल्पना ही या विसाव्या शतकांत कशी अयुक्तिक व त्याज्य आहे, अशी चर्चा तिसऱ्या प्रकरणांत केली. चौथ्या प्रकरणांत वर्णसंस्थेचें स्वरूप कसें होतें, तें पुढें कसेंकसें बदलत गेलें, चार वर्णांचे पूर्वींचे व्यवहार कसकसे बदलले आणि भविष्यकालांत पूर्वींप्रमाणें चातुर्वर्ण्य हें कसें अशक्य आहे, हें सांगून पुढच्या प्रकरणांत जाति-संस्थेचा परामर्श घेतला. आजचा हिंदु-समाज हा वर्णबद्ध नसून जातिबद्ध कसा आहे, त्या जातीची उत्पत्ति व वाढ कशी झाली, स्मृतिकारांनीं सांगितलेल्या जाति व हल्लींच्या जाति यांत किती अन्तर आहे, पूर्वकालीं खालच्या जातींच्या उत्कर्षाला कोणतीं साधनें होतीं ? आज ज्या

मागसलेल्या जाति आहेत त्यांचा उत्कर्ष कसा होऊं शकतो ? असा अत्यंत महत्वाचा व जिव्हाळ्याचा विषय पांचव्या प्रकरणांत मांडला. सहाव्या प्रकरणांत चार आश्रमांविषयींचें शास्त्रकारांचे निरनिराळे विचार कसे आहेत, त्या आश्रम-संस्थेची पूर्वी स्थिति काय होती, आज काय आहे व पुन्हां ती स्थिति येणें कसें कठीण आहे, पूर्वींच्या आश्रमांना आजचें नवें वळण कां दिलें पाहिजे इत्यादि विवेचनद्वारां हिंदु-संस्कृतीचें सामाजिक वैशिष्ठ्य जें वर्ण व आश्रम, त्याची वस्तुस्थिति वाचकांपुढें मांडली. पुढील दोन प्रकरणांत विवाहाचे प्रकार, विवाह-संस्था, पुत्रांचे प्रकार, नियोग, पुनर्विवाह, स्त्रियांचे हक्क, विवाह-काल, स्त्रियांचें पावित्र्य, विधवा-वपन, अशा अनेक बाबींचा विचार करून पूर्वीपेक्षां आपण या बाबतींत कसें पुढें जात आहोंत, हें दाखवून पूर्वार्ध संपविला.

आतां उत्तरार्धामध्यें मनुष्याच्या जीवनाला आवश्यक जो पोटाचा व्यवसाय, त्यांत परिस्थितीप्रमाणें कसे फेरबदल झाले, व्यवसायामध्यें विविधता येताच स्पर्शास्पर्शाच्या कल्पना कशा आपोआप बदलल्या, भिन्न व्यवसाय व स्पर्शास्पर्श विवेक यांचा आहारावरहि कसा परिणाम होतो, त्या आहाराचे दोन प्रकार कसे अनादि आहेत, धर्माचा पुरुष-बुद्धीशीं कसा संबंध आहे आणि धर्माचरणामध्यें, कसें तारतम्य दाखवावें लागतें याचा विचार झाल्यावर अर्थ-वादात्मक धर्म व युक्तीला न पटणारा धर्म, हा कसा निरुपयोगी आहे, हेंहि दाखविलें जाईल. भगवन्मुखांतून बाहेर पडलेली जी गीतास्मृति तीच धर्म-शास्त्रांतील अनेक विधिनिषेधावर कशी मात्रा आहे, हें सांगून शेवटच्या संकीर्ण प्रकरणांत अनेक विषयांचा परामर्श घेतल्यावर उत्तरार्धाची व ग्रंथाचीहि पूर्णता करण्यांत येईल.

प्रस्तुत प्रकरणांत व्यवसायाचा इतिहास पाहावयाचा आहे. समाज वाढूं लागला कीं व्यवसाय वाढूं लागतात. हिंदुसमाजाचें केंद्र चार वर्ण व त्या वर्णाचें केंद्रहि ब्राह्मण आहे, म्हणून एका ब्राह्मणाच्याच व्यवसायांत शास्त्राधारें व परिस्थिति-प्राप्त, कशीकशी क्रांति झाली, हें पाहिलें म्हणजे इतर सर्व व्यवसायाबद्दलहि योग्य तें अनुमान बांधतां येईल. म्हणून ब्राह्मण-व्यवसायाचा येथें विचार करतों.

चार वर्णामध्यें ब्राह्मण हा श्रेष्ठ, त्यानें सर्वांना धर्म सांगावा हें सर्व ठीक असलें तरी ब्राह्मणानें कशावर जगावें हा प्रश्न कोणत्याहि काळीं सारखाच महत्त्वाचा

आहे. त्या दृष्टीनें गेल्या दोन हजार वर्षांत परिस्थितीप्रमाणें ब्राह्मणाचे व्यवसाय बदलले आहेत आणि धर्मशास्त्रकर्त्यांनींहि व्यवसाय सांगतांना परिस्थिति थोडीबहुत ध्यानामध्यें घेतली आहे असें म्हणावें लागतें.

आपस्तंबापासून सर्व धर्मसूत्रकर्ते व पुढील स्मृतिकार सुद्धां ब्राह्मणानें षट्कर्में करावींत. त्यांतील अध्यापन, याजन व प्रतिग्रह यांवर आपली उपजीविका करावी असें सांगतात. अध्ययन, यजन व दान यावर उपजीविका अशक्यच आहे; म्हणून वरील त्रिकर्में उपजीविकेकरितां सांगितली. परंतु यावरच सर्व ब्राह्मणांचा निर्वाह होईल असें नाहीं. अर्थात् अशा ब्राह्मणांनीं काय करावें हा प्रश्न पुढें उभा राहातो. धर्मशास्त्रकर्त्यांनीं मुख्य कर्मावर उपजीविका होत नसेल तर गौण कर्मेंहि आपत्कालीं करावींत असें म्हटलें आहे. परंतु आपत्काल म्हणजे मोठा कठीण प्रसंग असाच अर्थ घेऊन भागणार नाहीं. मुख्य कर्मानें जेव्हां योगक्षेम चालत नाहीं, तेव्हां ब्राह्मणांनीं त्या अडचणीमध्यें निराळे व्यवसाय करावेत हें ओघानेंच येतें व ती अडचण म्हणजेच आपत्ति होय. या आपत्तींत ब्राह्मणांनीं खालच्या वर्णांचे म्हणजे क्षत्रिय वैश्याचे धंदे करावेत, असें बहुतेक स्मृतिकार म्हणतात. कांहींचें म्हणणें असें कीं अडचणीमध्यें ब्राह्मणानें आधीं वैश्यवृत्ति म्हणजे कृषि, वाणिज्य, गोरक्षण इत्यादि करावींत व त्यावर निर्वाह न झाला तरच शस्त्रधारी होऊन क्षात्रवृत्ति करावी. कांहीं स्मृतिकार अगदीं या उलट म्हणजे आधीं क्षात्रवृत्ति व नंतर वैश्यवृत्ति स्वीकारावी असेंहि म्हणतात. यांतहि परिस्थितीमुळें एकवाक्यता झालेली नाहीं असें दिसतें. आपत्कालीं ब्राह्मणानें वैश्यवृत्ति करावी; परंतु त्यांतहि कृषि, गोरक्ष्य, वाणिज्य यापैकीं ब्राह्मणानें कृषिसुद्धां करावी असें सर्व स्मृतिकार सांगत नाहींत. आपस्तंब तर कृषीचा उल्लेखहि करीत नाहीं व गौतमानेंहि कृषीचा विचार आपत्कालानिमित्त केलेला नाहीं. बौधायन-कालीं कांहीं ब्राह्मण अडचणीमुळें शेती करीत होते असें दिसतें. म्हणून बौधायन म्हणतो-प्राक् प्रातराशात् कर्षी स्यात् (प्र. १ अ. २ श्लो. ८१) म्हणजे न्याह-रीच्या वेळेपर्यंतच शेती करावी. अर्थात् त्या कालीं फार थोडे राबून शेतीवर निर्वाह होत असावा. परंतु कांहींचा निर्वाह तेवढ्यावर होईना म्हणून ते शेतीमध्यें बराच काळ घालवूं लागले व त्यामुळें त्यांचें वेदाध्ययन मागें पडूं लागलें; त्यांना उद्देशून बौधायन म्हणतो.

वेदः कृषिविनाशाय कृषिर्वेदविनाशिनी ।
शक्तिमान् उभयं कुर्यात् अशक्तस्तु कृषिं त्यजेत् ॥ १०१ ॥ प्र. १ अ. ५

वेदाध्ययन हें शेतीला विघातक आहे व शेतीहि वेदाध्ययनाला बाधक आहे. हीं दोन्हीं उत्तमपणें एकाद्याच समर्थ ब्राह्मणाला शक्य आहेत. अशक्तानें कृषीचा नाद सोडून द्यावा हें बरें ! बौधायनापेक्षां वसिष्ठ धर्मसूत्रकालीं परिस्थिति अगदीं निराळी होती.

तस्मात् सांडाभ्यां सनस्योताभ्याम्
प्राक् प्रातराशात् कर्षीस्यात् ॥ अ. २

ज्यांच्या नाकांत वेसणी आहेत अशा खोंडांचे योगानें न्हाहारीपर्यंत शेती करावी असें वसिष्ठ म्हणतो व पुढें नांगर, वेसण आणि इतर गोष्टींचें तपशील सांगतो. त्यावरून त्या काळीं ब्राह्मण स्वतः नांगर धरूं लागलेले असावेत. मनु कृषीचा निषेध करितो व हिंसा होते हें कारण सांगतो; परंतु श्राद्धाला, मधुपर्काला व यज्ञाला हिंसा व मांस विहित आहे असें ठासून सांगणारा मनु कृषीविषयीं बोलतांना हिंसेची सबब पुढें आणतो यावरून आजची उपलब्ध मनुस्मृति ही अंशतः बौद्ध विचारानें संस्कृत झालेली आहे, असें दिसतें.

वैश्यवृत्त्यापि जीवंस्तु ब्राह्मणः क्षत्रियोऽपिवा ।
हिंसाप्रायां पराधीनां कृषिं यत्नेन वर्जयेत् ॥ ८३
कृषिं साध्वितिमन्यन्ते सा वृत्तिः सद्भिगर्हिता ।
भूमिं भूमिशयांश्चैव हन्ति काष्ठमयोमुखम् ॥ ८४ ॥ मनु ( अ. १० )

ब्राह्मण व क्षत्रियहि वैश्यवृत्तीनें निर्वाह करीत असेल तर त्यानें यत्नपूर्वक हिंसा–प्रधान व पराधीन अशा कृषीचा त्याग करावा. कृषी बरी असें जें म्हणतात तें शिष्टमान्य नाहीं. ( यावरून मनुकालीं कृषीचें समर्थन करणारा एक वर्ग होता ) कारण भूमी व भूमींतील प्राणी यांना लाकडी फाळ चिरडून टाकीत असतो. ( त्यावेळीं लोखंडी फाळ नव्हता ). मनूनें अ. १० मध्यें आपत्कालीं जे अनेक धंदे करण्यास सांगितले आहेत त्यांत कृषीचाहि उल्लेख आहे हेंहि चिंत्य आहे.

विद्या शिल्पं भृतिः सेवा गोरक्ष्यं विपणिः कृषिः ।
धृतिर्भैक्ष्यं कुसीदंच दश जीवन हेतवः ॥ ११६

याज्ञवल्क्यानें वरील मनुवचनाचाच अनुवाद थोड्या फरकानें केला आहे तो असा—

कृषिः शिल्पं भृतिर्विद्या कुसीदं शकटं गिरिः ।
सेवाऽनूपं नृपो भैक्ष्यं आपत्तौ जीवनानि तु ॥ ४२ ॥ या. व. (अ. ३)

वैद्यकी, ज्योतिष यासारख्या विद्या, हस्तकौशल्य, नोकरी, कृषि, गोरक्षण, व्यापार, संतोष, भिक्षा, वाहनांचा धंदा, डोंगरावरील उद्योग, राजाची नोकरी इत्यादि धंदे अडचणीचे प्रसंगीं करावेत असा उपरिनिर्दिष्ट मनु याज्ञवल्क्यांच्या श्लोकांचा आशय आहे. त्यावरून धर्मसूत्रकार आपस्तंब व स्मृतिकार मनु यांच्या कालांत केवढा फरक पडला हेंहि स्पष्ट होत आहे. पराशर हा मनु व याज्ञवल्क्य यांच्या पुढचा आहे म्हणून त्या कालीं कृषीची काय परिस्थिति होती हें पाहाणें बोधप्रद आहे.

षटकर्मसहितो विप्रः कृषिकर्म च कारयेत् ॥ २
क्षुधितं तृषितं श्रांतं बलीवर्दं न योजयेत् ।
हीनांगं व्याधितं क्लीबं वृषं विप्रो न वाहयेत् ॥ ३
स्थिरांगं नीरुजं तृप्तं सुनर्दं षंढवर्जितम् ।
वाहयेद्दिवसस्यार्धं पश्चात्स्नानं समाचरेत् ॥ ४ ॥ पराशर ( अ. २ )

षट्कर्मनिरत ब्राह्मणानें यत्नपूर्वक दुसऱ्याकडून शेती करवावी ( न जमल्यास स्वतः करावी ), क्षुधित, तृषित, श्रान्त अशा बैलाला नांगराला जुंपूं नये. व्याधित, हीनांग व व्यथित बैलांकडून शेती वाहवूं नये. निरोगी, बलिष्ठ, तृप्त व उत्तम बैल नांगराला जुंपून दुपारपर्यंत शेती वाहावी व इतरहि कर्में करावींत. दोन प्रहरीं घरीं आल्यावर स्नान करून होम, जप व पंचमहायज्ञहि करावेत. ८ बैलांचा नांगर उत्तम, ६ बैलांचा मध्यम, ४ बैलांचा नांगर कनिष्ठ व दोन बैलांचा तर अगदीं कसाबांचा होय. बैलाला कशी वेसण घालावी, त्याला कोणतें दावें लावावें, त्याला कसें खावनावें व खाऊ घालावें हा विषय पराशरानें अ. २ मध्यें विस्तारपूर्वक सांगितला आहे. त्यावरून चारहि वर्ण त्या कालीं कृषीवर उपजीविका करूं लागले होते, असें वाटतें. कृषी करून क्षत्रियानेंहि देव-द्विजांचें पूजन करावें असें पराशर म्हणतो. गाई व व बैल यांचें शेतीच्या दृष्टीनें महत्त्व त्या कालीं वाढलें म्हणून पराशर स्मृतींत या संबंधाचा विषयहि बराच आलेला आहे.

पराशरानंतर पुढें अनेक स्मृतिकारांनीं कृषि हा सर्वांचा धर्ममान्य धंदा आहे असें म्हटलें आहे. त्यांतील एक वृद्धहारीत स्मृति घेतली तर त्या स्मृतीच्या कालीं कृषि हा सर्व वर्णांचा धर्म होऊन गेलेला होता, असें सिद्ध होतें.

कृषिणा वापि जीवेत सतां चानुमतेन वा।
भृतकाध्यापनं चैव न कुर्यात् वेदविक्रयम् ॥ १६८ ॥
कृषिस्तु सर्ववर्णानां सामान्यो धर्म उच्यते ॥ १७९ ॥
कृषिर्भृतिः पाशुपाल्यं सर्वेषां न निषिध्यते ॥ १८२ ॥ वृद्धहारित अ.७

ब्राह्मणानें आपत्कालीं सज्जनानुमतें वाटल्यास कृषीवर उपजीविका करावी किंवा पैसे घेऊन शिकवावें; परंतु वेदविक्रयावर मात्र जगूं नये. कृषि हा सर्व वर्णांचा सर्वसामान्य उपजीविकेचा धंदा होय. कृषि, पैसे घेऊन शिकविणें व पशुपालन हीं कोणालाहि निषिद्ध नाहींत. तात्पर्य, केवळ अध्यापन, याजन व प्रतिग्रह यावर ब्राह्मणांचें चालेनासें झाल्यामुळें ते अनेक धंद्यांत शिरले. ही सर्व स्थिति पाहूनच पराशरसमकालीन झालेल्या प्रजापतीनें—

युगधर्मेण वर्णानां धनं ग्राह्यं द्विजातिभिः ॥ ५२

द्विजातींनीं युगधर्मानें म्हणजे त्या त्या कालांत प्रतिष्ठित मानल्या गेलेल्या कोणत्याहि धंद्यानें धन मिळवावें. तें न्यायानें व आपल्या स्वभावास साजेसा धंदा करून मिळवावें असें म्हटलें आहे, तेंच खरोखर योग्य आहे. परिस्थितीप्रमाणें गरजा, शिक्षण, व्यवहार व व्याप वाढल्यावर व त्यांनीं पूर्वधंद्यांना मागें टाकल्यावर नव्या युगांतील जो धंदा उत्तम करितां येईल, तो करून पैसे मिळविणें हेंच कर्तव्य ठरतें व तेंच आज होत आहे.

ब्राह्मण-समाजाच्या तीन अवस्था उघडउघड दिसतात. एका कालीं ब्राह्मण तापसावस्थेंत होते, त्यावेळीं ते अरण्यांत राहून तप करीत व अत्यंत निस्पृहपणें अध्यापन करीत. पुढें क्षत्रिय राजांनीं अनेक आमिषें उत्पन्न करून त्यांना नगरांत आणिलें. ब्राह्मण राजपुरोहित व राजगुरु या नात्यानें नगरांत राहूं लागले. बौद्धक्रांतीमुळें ब्राह्मण व क्षत्रिय यांचें बिनसलें, अर्थात् ब्राह्मणांना समाजावर जगण्याकरितां भिक्षुकी करावी लागली. अनेक व्रतें व दान-महती, हीं सांगून ब्राह्मणांनीं संस्कृति-प्रसार केला हें खरें; पण त्यापुढें जोसपण, कुलकरण, देशमुखी, देशपांडेगिरी करितां करितां महाराष्ट्रामध्यें सोळाव्या शतकांत ब्राह्मण हे

क्षात्रवृत्तीनें चमकूं लागून सत्ताधिपतीहि झाले. त्यानंतर सेवावृत्तीला प्राधान्य आलें आणि आज तेंहि नष्ट होऊन पोटाकरितां पाहिजे त्या व्यवसायांत पडण्याची ब्राह्मण तयारी दाखवीत आहेत म्हणजे आजच्या युगाला जे धंदे करणें अवश्य आहे, ते करून जगणें व ते करून देशहित साधणें, असें ध्येय बनलें आहे. मात्र असें करण्यांत ब्राह्मण अधर्म करीत नाहींत. कारण हा आजच्या युगाचा म्हणजे कालाचाच प्रभाव आहे. युगप्रयुक्त अधर्मप्रवृत्ति ही अपरिहार्य आहे, असें माधवाचार्यांनींच म्हटलें आहे. ( प्र. ३ पान १४ पाहा )

या दृष्टीनें ब्राह्मणांनीं अनेक व्यवसायांत पडणें, प्रौढ व पुनर्विवाह स्वजातींत करणें, अस्पृश्यता नष्ट करणें, शुद्धिकार्य करणें, अंतर्ज्ञाति-विवाह करणें, इंग्रजी शिकणें, परदेशांत जाणें इत्यादि कर्मांचा अदोषत्वानेंच स्वीकार करून युगानुरूप हें योग्य आहे, असेंच समर्थन केलें पाहिजे. ब्राह्मणानें आपत्कालीं व्यापार करावा असें स्मृतिकार म्हणतात पण त्यांतील वर्ज्यावर्ज्य लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

अविहिता ब्राह्मणस्य वणिज्या ॥ १० ॥
आपदि व्यवहरेत पण्यानामपण्यानि व्युदस्यन् ॥ ११ ॥
मनुष्यान्रसान्रागान्गन्धानन्नं चर्म गवां वशां श्लेष्मोदके तोक्मकिण्वे पिप्पलिमरीचे धान्यं मांसमायुधं सुकृताशां च ॥ १२ ॥
तिलतण्डुलांस्त्वेव धान्यस्य विशेषेण न विक्रीणीयात् ॥ १३ ॥
अविहितश्चैतेषां मिथो विनिमयः ॥ १४ ॥
अन्नेन चान्नस्य मनुष्याणां च मनुष्यै रसानां च रसैर्गन्धानांच गन्धैर्विद्यया च विद्यानाम् ॥ १५ ॥ आपस्तंब ( १-७-२० )
तस्यापण्यम् ॥ ८ ॥ गंधरसकृतान्नतिलशाणक्षौमाजिनानि ॥ ९ ॥
रक्तनिर्णिक्ते वाससी ॥ १० ॥ क्षीरं सविकारम् ॥ ११ ॥
मूलफलपुष्पौषधमधुमांसतृणोदकापथ्यानि ॥ १२ ॥
पशवश्च हिंसासंयोगे ॥ १३ ॥
पुरुषवशाकुमारीवेहतश्च नित्यम् ॥ १४ ॥
भूमिव्रीहियवाजाव्यश्वऋषभधेन्वनडुहश्चैके ॥ १५ ॥
न लवण कृतान्नयोः ॥ १९ ॥ तिलानां च ॥ २० ॥
सर्वथा वृत्तिरशक्तावशौद्रेण ॥ २२ ॥ गौतम ( अ. ७ प्र. १ )

सर्वांत प्राचीन जो आपस्तंब त्याचे मतें ब्राह्मणांनीं वणिज्या करूंच नये. अडचणीचा प्रसंगच आला तर निदान ब्राह्मणानें मनुष्यें, रस, रंग, गंध, अन्न, चर्म, गाई, चिकट पदार्थ, मिरे, धान्यें, आयुधें, तीळ, तांदूळ इत्यादि जिनसांचा क्रयविक्रय करूं नये. कांहीं कांहीं जिनसांची आदलाबदल करून एकमेकांच्या गरजा भागविण्याची चाल पूर्वींपासून आहे. पण त्या निमित्तानेंहि अन्न, रस, मनुष्यें, रंग, सुगंधी पदार्थ व विद्या यांची देवघेव करूं नये व त्यावर जगूं नये असें आपस्तंब म्हणतो. गौतमाचें मतहि आपस्तंबाप्रमाणेंच असून तो अविक्रेयाच्या यादीमध्यें गंध, रस, तयार केलेले निर्लेप व खरकटें अन्न, तीळ, लोकर, अजिन, रंगविलेलीं वस्त्रें; दुधाचे–दही, लोणी, तूप, बासुंदी, श्रीखंड, इत्यादि पदार्थ; फळें, मुळें, पुष्पें, औषधें, मध, मांस, गवत, पशु, मनुष्यें, भूमी, व्रीहि, शेळी, मेंढी, अश्व अशा आणखी कित्येकांचा समावेश करितो. गौतम शेवटीं म्हणतो कीं शौद्रवृत्ति न करितां शेवटीं काय पाहिजे तें करून जगावें.

अथ पतनीयानि ॥ ५० ॥ समुद्रसंयानम् ॥ ५१ ॥
सर्वपण्यैर्व्यवहरणम् ॥ ५४ ॥ बौधायन ( प्र. २ अ. १ )

बौधायनानें तर समुद्रगमन ( त्यावरील व्यापार ) आणि ज्या वस्तूंची देवघेव होते, अशा सर्वपण्य वस्तूंचा व्यापार हीं पतनीय कर्मामध्यें सांगितलीं आहेत. तसेंच ज्यापासून पातित्य येतें अशीं जीं कर्में त्यानें सांगितलीं आहेत, त्यामध्यें नटाचा धंदा, नाटकें लिहिणें, वैद्यकी, ग्राम–जोशाचा धंदा, गो व महिषी यांचें पालन व त्यावर उपजीविका, तसेंच ज्योतिषाचा धंदा यांचाहि समावेश केलेला आहे. त्यावरून ब्राह्मण हे त्या कालीं निर्वाहार्थ वरील धंद्यांत पडूं लागले होते यांत शंका नाहीं.

अगम्यागमनं गुर्वीसखीं गुरुसखीमपपात्रां पतितां च गत्वा
भेषजकरणं ग्रामयाजनं रङ्गोपजीवनं नाट्याचार्यता
गोमहिषीरक्षणं यच्चान्यदप्येवं युक्तं कन्यादूषणमिति ॥ ६१ ॥
तेषां तु निर्वेशः पतितवृत्तिर्द्वौ संवत्सरौ ॥ ६२ ॥
नक्षत्रनिर्देशश्चेति ॥ ६४ ॥ बौधायन ( प्र. २ अ. १ )

वरील उपपातकें करणाऱ्या पतितांनीं दोन वर्षेंपर्यंत पतिताप्रमाणें प्रायश्चित्त

करावें असेंहि वरील ६२ सूत्रांत म्हटलेलें आहे. वसिष्ठानें अविक्रेयाची यादी कशी विस्तृत व स्पष्ट दिलेली आहे हें पुढील उताऱ्यामध्यें पाहा.

वैश्य जीविकामास्थाय पण्येन जीवतोऽ
श्मलवणमणिशाणकौशेयक्षौमाजिनानि च ।
तान्तवं रक्तं सर्वं च कृतान्नं पुष्पफलमूलानि
च गन्धरसा उदकं चौषधीनां रसः सोमश्च
शस्त्रंच क्षीरं च सविकारमयत्रपुजतुसीसंच ॥ २९ ॥
अथाप्युदाहरन्ति ॥ ३० ॥
सद्यः पतति मांसेन लाक्षया लवणेन च ।
त्र्यहेण शूद्रो भवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात् इति ॥ ३१ ॥
ग्राम्यपशूनामेकशफाः केशिनश्च सर्वे चाऽऽरण्याः
पशवो वयांसि दंष्ट्रिणश्च ॥ ३२ ॥
धान्यानां तिलानाहुः ॥ ३३ ॥ अथाप्युदाहरन्ति ॥ ३४ ॥
भोजनाभ्यञ्जनाद्दानाद्यदन्यत्कुरुते तिलैः ।
कृमिभूतः स विष्ठायां पितृभिः सह मज्जति ॥ ३५ ॥ वसिष्ठ ( अ. २ )
कामं वा स्वयं कृष्योत्पाद्य तिलान्विक्रीणीरन् ॥ ३६ ॥
समर्घं धान्यमुध्दृत्य महार्घं यः प्रयच्छति ।
स वै वार्धुषिको नाम ब्रह्मवादिषु गर्हितः ॥
ब्रह्महत्यां च वृद्धिं च तुलया समतोलयत् ।
अतिष्ठद् भ्रूणहा कोट्यां वार्धूषिः समकम्पत । इति ॥४६॥ व. अ. २

वैश्य-वृत्ति करणाऱ्या ब्राह्मणानें रत्नें, पाषाण, मोती, दगड, रेशमी व लोकरीचीं वस्त्रें, अजिनें, सूत, रंगविलेलें वस्त्र, अन्न, फराळाचे पदार्थ, सुगंधी पदार्थ, पाणी, औषधी, सोमरस, दुधाचे अनेक विकार व त्यापासून झालेलीं पक्वान्नें; लाख, शिसें, धरस, इत्यादि विकूं नयेत. लाख, मीठ, मांस विकतांच ब्राह्मण पतित होतो व क्षीर-विक्रयानें तो तीन दिवसांत शूद्र होतो, म्हणून वरील पदार्थ विकूं नयेत. ग्राम्यपशु, दाढांचेपशु, आरण्यपशु, हिंस्रपशु, केस पुष्कळ असलेले, एक खुर असलेले पशु, पक्षी, धान्यें, तीळ व तांदूळ इत्यादि विकूं नयेत. शिवाय भोजन, अभ्यंजन, दान व तर्पण याशिवाय तिळांचा उपयोग जो अन्यत्र

( व्यापारामध्यें ) करील तो विष्ठेंतील कृमी होतो व तेथेंच पितरांसह रहून बसतो. फार तर स्वतः शेती करून अधिक राहिलेले तीळ विकावेत, त्यांत दोष नाहीं; परंतु तिळाच्या व्यापाराला दोष आहे. स्वस्त धान्य घेऊन जो महाग विकतो तो वार्धुषिक (वाढविणारा होय) सर्वस्वीं निंद्य होय. ब्रह्मघातकी व भ्रूणघ्न यापेक्षां वार्धुषिक अधिक पातकी समजावा. मनूनें अविक्रेयांची यादि वसिष्ठाप्रमाणेंच दिलेली आहे.

सर्वान्रसानपोहेत कृतान्नं च तिलैः सह ।
अश्मनोलवणं चैव पशवो ये च मानुषाः ॥ ८६ ॥
सर्वं च तान्तवं रक्तं शाणक्षौमाविकानिच ।
अपि चेत्स्युररक्तानि फलमूले तथौषधीः ॥ ८७ ॥
अपः शस्त्रं विषं मांसं सोमं गन्धांश्च सर्वशः ।
क्षीरं क्षौद्रं दधि–घृतं तैलं मधु गुडं कुशान् ॥ ८८ ॥
आरण्यांश्च पशून्सर्वान्दंष्ट्रिणश्च वयांसि च ।
मद्यं नीलिं च लाक्षां च सर्वांश्चैकशफांस्तथा ॥ ८९ ॥
सद्यःपतति मांसेन लाक्षया लवणेन च ।
त्र्यहेण शूद्रो भवति ब्राह्मणः क्षीरविक्रयात् ॥ ९२ ॥ मनु (अ. १०)

मनूच्या वरील यादीमध्यें वसिष्ठापेक्षां मद्य, गूळ, दर्भ, इत्यादि पदार्थ, अधिक आहेत. पुढें बहुतेक स्मृतिकारांनीं मनूचीच ही वरील यादी थोड्या शाब्दिक फेरफारानें दिली आहे. या. व. अ. ३ श्लो. ३६ ते ४२, पराशर अ. २, अत्रि. श्लो. २१ ते २४, वृद्धहारित अ. ७ इत्यादि स्थळीं वसिष्ठ व मनू यांचीच अविक्रेय पदार्थांची यादी दिली आहे. विस्तार व पुनरुक्ति टाळण्याकरितां ते श्लोक येथें दिले नाहींत. ब्राह्मणवर्ग अनेक व्यवसायांत पडत असतांना पराशरापासूनच्या पुढील स्मृतिकारांनीं अविक्रेय पदार्थांचा संकोच करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनीं अगदीं पूर्वींप्रमाणें अविक्रेय पदार्थांचा विस्तारानें निर्देश केला ! त्याचा परिणाम असा झाला कीं एकंदरींत ब्राह्मणवर्ग हा व्यापारांत फार कमी पडला. महाराष्ट्रांत तर ब्राह्मण व्यापारीवर्ग पूर्वीं नव्हता. हीच स्थिति मद्रास, नागपूर, वऱ्हाड, निजामस्टेट, बडोदे, म्हैसूर, गोवें, या ब्राह्मणप्रधान भागांत पूर्वीं होती. बहुतेक

ब्राह्मण कृषि, सावकारी, जोसपण, भिक्षुकी, ज्योतिष, वैद्यकी, कुळकरण, देसाई व देशपांडे यांच्या वृत्तीमध्येंच होते व जे थोडे व्यापारांत होते, त्यांनीं धर्मशास्त्रांतील या निषेधांची पर्वा केली नसावी. बृहन्महाराष्ट्रांत बहुतेक कोमठी आर्य-वैश्य, जैन, लिंगाईत, गुजर व मारवाडी हेच लोक पूर्वींपासून व्यापार करीत आहेत. या लोकांच्या व्यापारांमध्यें वरील वर्ज्यावर्ज्य धर्मशास्त्र शिरलेंच होतें. खानदेशांत पूर्वीं मद्रासेकडून तेल येत असे. तिळाचा व्यापार व तेल काढण्याचा धंदा हा निषिद्ध म्हणून कोणीहि करीत नसे. प्रथम ज्यांनीं हे धंदे खानदेशांत सुरु केलें, त्यांना त्यांच्या जातवाल्यांनीं बहिष्कृत केलें. परंतु पुढें त्या धंद्यावर पैसा रगडून मिळतो, असें दिसूं लागताच सर्वांनीं व हल्लीं ब्राह्मणांनींहि तेलाच्या गिरण्या काढलेल्या आहेत. यंत्रामुळें तेल्याची अस्पृश्यता गेली. जर्मन रंगामुळें निळींतील अस्पर्श-दोष नष्ट झाला. व्यवसायामध्यें जशा यांत्रिक व इतर सुधारणा होऊं लागल्या तसे त्या धंद्यांत पूर्वीं जे दोष दिसत असत ते दिसेनासे झाले व त्या धंद्यांना पावित्र्यहि आलें. तात्पर्य अलीकडे परिस्थितीप्रमाणें ब्राह्मण व इतर जाति यांचे व्यवसाय बदलले व आतां धर्मशास्त्राच्या क्षेत्रांतून जवळजवळ पूर्णपणें निसटले आहेत.

# प्रकरण दहावें

## स्पर्शास्पर्श

शास्त्रांत चार पुरुषार्थ असले तरी त्यांमध्यें अर्थ हा पुरुषार्थ व्यवहारांत फारच मोठा आहे. कारण त्यावरच मनुष्याचें जीवित अवलंबून असतें. जगण्याकरितां पाहिजे तें करावें व अन्न मिळवावें असें श्रुति सांगते.

तस्मात् यया कया च विधया बह्वन्नं प्राप्नुयात् । तैत्तिरीय

अन्नमूलक जीवन व अन्नमय प्राण अशी स्थिति असल्यामुळें समाजालाहि अनेक प्रकारच्या व्यवसायामध्यें पडावें लागतें. शास्त्रांत सांगितलेले त्या त्या जातींचे व्यवसाय हे फार दिवस सारखे चालूं शकत नाहींत व शकले नाहींत. परि-

स्थितीप्रमाणें व्यवसायामध्यें बदल करावा लागतो व तो तसा कसा झाला आहे हें गेल्या प्रकरणांत साधार दाखविलें आहे.

व्यवसायामध्यें बदल झाला, कीं नव्या व्यवसायाच्या भोंवतीं जें जग असतें, तसे संस्कार आपोआप होतात व त्यामुळें स्पर्शास्पर्श, भक्ष्याभक्ष्य, भोज्याभोज्य विषयांच्या कल्पनाहि बदलूं लागतात. घरांत वेदाध्ययन करणारा बाप, मोटार ड्रायव्हर मुलगा, पुतण्या हॉटेलकीपर आणि भाऊ गांज्याच्या दुकानाचा मक्तेदार असे व्यवहार झाले म्हणजे संस्कृति, आचार व स्पर्शास्पर्श यांतहि संक्रमण होतें. हल्लींच्या यंत्रयुगांत पूर्वीच्या मंत्रतंत्रयुगांतील स्पर्शास्पर्श-विवेक हा योग्य आहे कां त्यांत बदल केला पाहिजे, हें या प्रकरणांत पूर्वपरंपरेसह पाहावयाचें आहे.

शुनोपहतः सचैलोवगाहेत ॥ १६ ॥ ( १-५-१५ ) आपस्तंब
यथा चाण्डालोपस्पर्शने संभाषायां दर्शने च
दोषस्तत्र प्रायश्चित्तम् ॥ ८ ॥
अवगाहनमुपस्पर्शने संभाषायां ब्राह्मणसंभाषा
दर्शने ज्योतिषां दर्शनम् ॥ ९ ॥ ( २-१-२ )
सर्वान्वैश्वदेवो भागिनः कुर्वीताश्वाचाण्डालेभ्यः ॥ ५ ॥
( २-४-९ ) आपस्तंब
श्वनकुलसर्पमण्डुकमार्जाराणामंतरागमने त्र्यहमुपवासः ॥ ६० ॥
प्राणायामा घृतप्राशनं चेतरेषाम् ॥ ६१ ॥ गौतम ( अ. २ प्र. १ )
पतितचण्डाल सूतिकोदक्याशवस्पृष्टितत्स्पृष्टि
उपस्पर्शने सचैलोदकोपस्पर्शनाच्छुध्येत् ॥ २८ ॥
शवानुगमने च ॥ २९ ॥ शुनश्च ॥ ३० ॥ गौतम ( अ. ५ प्र. २ )
श्वचाण्डालपतितावेक्षणे दुष्टम् ॥ २५ ॥ गौतम ( अ. ६ प्र. २ )
चैत्यवृक्षं चितिं यूपं चण्डालं वेदविक्रयम् ।
एतानि ब्राह्मणः स्पृष्ट्वा सचैलो जलमाविशेत् ॥ ६० ॥
वेदाविक्रायिणं यूपं पतितं चितिमेव च ।
स्पृष्ट्वा समाचरेत्स्नानं श्वानं चण्डालमेव च ॥ १४० ॥
शुनोपहतः सचैलोऽवगाहेत ॥ १४३ ॥ बौधायन ( अ. ५ प्र. १ )

श्वचण्डालपतितवायसेभ्यो भूमौ निर्वपेत् ॥ ६ ॥ वसिष्ठ ( अ. ११ )
श्वचाण्डालपतितोपस्पर्शने सचैलं स्नातः ।
सद्यः पूतो भवतीति विज्ञायते ॥ २८ ॥ वसिष्ठ ( अ. २३ )
नास्तिकः पिशुनश्चैव कृतघ्नो दीर्घरोषकः ।
चत्वारः कर्मचांडाला जन्मतः श्चापिपंचमः ॥ २२ ॥ वसिष्ठ ( अ. ६ )
रथ्यामाक्रम्य मूत्रपुरीषेकृत्वाचाचामेत् ।
चण्डालम्लेंच्छसंभाषणेच ॥ विष्णुधर्मसूत्र ( अ. २२ )
चण्डालम्लेच्छसंभाषे स्त्रीशूद्रोच्छिष्टभाषणे ।
उच्छिष्टं पुरुषं स्पृष्ट्वा भोज्यं वापि तथाविधम् ॥ ४ ॥
शिरः प्रावृत्य कर्णं वा मुक्तकच्छशिखोऽपि वा ।
अकृत्वा पादयोः शौचमाचान्तोऽप्यशुचिर्भवेत् ॥९॥ उशनः संहि (अ. २)
शुनांच पतितानां च श्वपचां पापरोगिणाम् ।
वायसानां कृमीणां च शनकैर्निर्वपेद्भुवि ॥ ९२ ॥
चाण्डालश्च वराहश्च कुक्कुटः श्वा तथैव च ।
रजस्वला च पंढश्च नेक्षेरन्नश्नतो द्विजान् ॥ २३९ ॥ मनु ( अ. ३ )
न संवसेच्च पतितैर्न चाण्डालैर्न पुल्कसैः ।
न मूर्खैर्नावलिप्तैश्च नान्त्यैर्नान्त्यावसायिभिः ॥ ७९ ॥ मनु ( अ. ४ )
दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं सूतिकां तथा ।
शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुध्यति ॥ ८५ ॥ मनु ( अ. ५ )
देवेभ्यश्च हुतादन्नाच्छेषाद्भूतबलिं हरेत् ।
अन्नं भूमौ श्वचाण्डालवायसेभ्यश्च निक्षिपेत् ॥१०३॥ याज्ञवल्क्य अ. १

या स्पर्शास्पर्शाच्या बाबतींत स्पष्टपणें दोन कालखंड पडतात. एक आपस्तंबापासून मनु–याज्ञवल्क्य यांचा काल व दुसरा पराशरापासून तों देवलापर्यंतचा काल. प्रथम पहिल्या कालांतील स्मृति–कारांनीं शिवाशिव केवढी मर्यादित सांगितली आहे तें पाहूं.

कुत्र्याचा स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावें. चंडालाचा स्पर्श, त्याच्याशीं संभाषण व त्याचें दर्शन यांना दोष आहे म्हणून प्रायश्चित करावें. चंडालस्पर्शास स्नान व संभाषणास ब्राह्मणाशीं संभाषण व नक्षत्र--दर्शन असें प्रायश्चित घ्यावें.

वैश्वदेवाच्या काकबलीमध्यें श्वचांडालांनाहि भागीदार करावें असें आपस्तंबाचें मत आहे. हल्लीं वैश्वदेव जे करितात ते बलिहरणानंतर एक घासभर अन्न काकबली म्हणून श्वचांडाल पतितांच्या नांवानें टाकतात. पूर्वी हें अन्न पुष्कळ असावें व त्याप्रसंगीं श्वचांडाल पतित उपस्थितहि असावेत असें वाटतें.

गौतमकालीं कुत्रें, मुंगुस, साप, बेडुक, मांजर हीं अपवित्र मानीत असत. गुरुशिष्यांमधून अध्ययन प्रसंगीं जर वरील प्राणी गेले तर तीन दिवस उपवास, घृतप्राशन व प्राणायाम हें प्रायश्चित्त सांगितलेलें आहे. पतित, चांडाल, विटाळशी, बाळंतीण, प्रेत यांचा स्पर्श व ह्यांचा स्पर्श ज्यांना झाला आहे, त्यांचाहि स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावें. प्रेतयात्रा, कुत्र्याचा स्पर्श यांनाहि स्नान हें प्रायश्चित्त आहे. श्व, चांडाल व पतित यांचें दर्शनहि दुष्ट सांगितलें आहे. बौधायनानें स्मशान, चिता, स्मशानांतील वृक्ष, लाकडें व वेदविक्रय करणारा यांच्या स्पर्शास स्नान सांगितलें आहे. वेदविक्रयी ब्राह्मण, स्मशान व चिता हीं नांवें पूर्वींपेक्षां बौधायनानें नवीं सांगितलीं आहेत. वसिष्ठानें श्वचांडाल पतित हीं नांवें देऊन ब्राह्मणवर्णांतील चार कर्म-चांडाल सांगितले आहेत. नास्तिक, चाहाडखोर, कृतघ्न व दीर्घद्वेषी असे ब्राह्मणांतील चार अस्पृश्य व जन्मतः पांचवा अस्पृश्य असे पांच चांडाल त्या कालीं होते.

विष्णुधर्मसूत्रामध्येंहि चंडाल-स्पर्शाला दोष सांगितला आहे व तो म्लेंच्छ-स्पर्शाबरोबरीचा आहे असें म्हटलें आहे.

उशनः संहितेमध्यें चांडाल, म्लेंच्छ यांच्याशीं भाषण केल्यास, स्त्रिया व शूद्र हीं उष्टी असतांना त्यांच्याशीं भाषण केल्यास किंवा आंचवल्यानंतर शूद्र पुरुषास स्पर्श केल्यास स्नान व आचमन प्रायश्चित करावें असें म्हटलें आहे. मनुस्मृतीमध्यें वैश्वदेवाच्या काकबली प्रसंगीं कृमि व पापरोगानें पीडित, पतित, कुत्रें व चांडाल यांच्या नांवानें जमीनीवर अन्न ठेवण्यास सांगितलें आहे. चांडाल, डुक्कर, कोंबडा, कुत्रा, विटाळशी व षंढ यांची दृष्टी न पडेल अशा स्थानीं बसून द्विजांनीं जेवावें. तसेंच त्यांनीं पतित, चांडाल, पुल्कस ( एक प्रतिलोम ) मूर्ख, उन्मत्त, अंत्य व अंत्यावसायी यांच्याशीं एकत्र राहूं नये. त्यांच्या वस्तींतहि राहूं नये, असें मनू म्हणतो. हा मनूचा निषेध महत्वाचा आहे. मनुपूर्वकालीं द्विजांना पतितादींच्या वस्तींत रहाण्याचा प्रसंग नसावा, तो यावेळीं येऊं लागला होता.

समाजस्थिति पालटली म्हणजे असें होत असतें. चांडाल, विटाळशी, बाळंतीण, प्रेत इत्यादींचा स्पर्शदोष मनूनें इतराप्रमाणेंच सांगितला आहे.

मनुस्मृतींमध्यें ज्यांचा स्पर्शदोष सांगितला आहे, त्यांचाच याज्ञवल्क्यानेंहि सांगितला आहे. वैश्वदेव-प्रसंगीं श्व, चांडाल व पतित इत्यादींना उद्देशून जमीनीवर अन्न टाकावें असेंच तो म्हणतो. आतां आंगिरसापासून देवलापर्यंतचे स्मृतिकार काय बोलतात तें पाहूं.

रजकं चर्मकारं च नटं धीवरमेव च ।
बुरुडं च तथा स्पृष्ट्वा शुध्येदाचमनाद्द्विजः ॥ १७
यश्च भार्यां श्वपाकस्य ब्राह्मणो ह्यधिगच्छति ।
सचैलो जलमाप्लुत्य घृतं प्राश्य विशुद्ध्यति ॥ २०
दिवाकीर्तिं मुदक्यां च पतितं सूतकं तथा ।
शवसंस्पर्शने चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुद्ध्यति ॥ १५२ ॥ अंगिरःस्मृति ॥
चाण्डालं पतितं व्यङ्गमुन्मत्तं शवमन्त्यजम् ।
शृगालं सूतिकां नारीं रजसा च परिप्लुताम् ॥ २२
श्वकुक्कुटवराहांश्च ग्राम्यान्स्पृश्याति मानवः ।
सचैलं सशिरः स्नात्वा तदानीमेव शुध्यति ॥ २३ ॥ वृद्धशातातप ॥
न च सीमान्तरं गच्छेन्न श्मशानं जिनालयम् ।
श्राद्धकृत्सर्वदा पश्येन्नोदक्याः ( क्यां ) श्वपचं शवम् ॥ ९५ ॥ प्रजापति
श्वपाकं चापि चाण्डालं विप्रः संभाषते यदि ।
द्विजसंभाषणं कुर्यात्सावित्रीं च सकृज्जपेत् ॥ २२
चंडालदर्शने सद्यः आदित्यमवलोकयेत् ।
चंडालस्पर्शने चैव सचैलं स्नानमाचरेत् ॥ २४
चंडालखातवापीषु पीत्वा सलिलमग्रतः ।
अज्ञानाच्चैकनक्तेन त्वहोरात्रेण शुध्यति ॥ २५
कुसुंभगुडकार्पासलवणं तैलसर्पिषी ।
द्वारे कृत्वा तु धान्यानि दद्याद्वेश्मनि पावकम् ॥ ४०
एवं शुद्धस्ततःपश्चात्कुर्याद्ब्राह्मणतर्पणम् ।
रजकी चर्मकारी च लुब्धकी वेणुजीवनी ।

चातुर्वर्ण्यस्य तु गृहे त्वविज्ञातानुतिष्ठति ॥ ४४
ज्ञात्वा तु निष्कृतिं कुर्यात्पूर्वोक्तस्यार्द्धमेव तु ।
गृहदाहं न कुर्वीत शेषं सर्वं च कारयेत् ॥ ४५ ॥ पाराशर स्मृति अ. ६
चाण्डालेन यदा स्पृष्टो विण्मूत्रे च कृते द्विजः ।
प्रायश्चित्तं त्रिरात्रं स्याद्भुक्तोच्छिष्टः षडाचरेत् ॥ ५ ॥
आपस्तंब स्मृति ( अ. ४ )

रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च ।
कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैतेऽन्त्यजाः स्मृताः ॥ ३३ ॥ यमस्मृति
चंडालं पतितं स्पृष्ट्वा शवमंत्यजमेव च ।
उदक्यां सूतिकां नारीं सवासाः स्नानमाचरेत् ॥ १८३ ॥
शुना पुष्पवती स्पृष्टा पुष्पवत्यान्यया तथा ।
शेषाण्यहान्युपवसेत् स्नात्वा शुध्येद् घृताशनात् ॥ १८६ ॥ संवर्त स्मृति

रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च ।
कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते चान्त्यजाः स्मृताः ॥ १९९
अन्त्यजस्य तु ये वृक्षा बहुपुष्पफलोपगाः ।
उपभोग्यास्तु ते सर्वे पुष्पेषु च फलेषु च ॥ २०५
चर्मको रजको वैण्यो धीवरो नटक स्तथा ॥ २८६
एतान्स्पृष्ट्वा द्विजो मोहादाचामेत्प्रयतोऽपि सन् ।
एतैःस्पृष्टो द्विजो नित्यमेकरात्रं पयः पिबेत् ॥ २८७
पशुर्म्लेच्छोऽपिचंडालो विप्रा दशविधा स्मृताः ॥ ३७३ ॥
क्रियाहीनश्च मूर्खश्च सर्वधर्मविवर्जितः ।
निर्दयः सर्वभूतेषु विप्र श्चांडाल उच्यते ॥ ३८३ ॥ अत्रिसंहिता
ये च प्रव्राजितापत्या या चैषां बीजसंततिः ।
विदूरा नाम चण्डाला जायन्ते नात्र संशयः ॥ १८ ॥ (अत्रिस्मृति अ. ८)

ब्राह्मण्यां शूद्रजनित श्चण्डालो धर्मवर्जितः ।
कुमारीसंभवस्त्वेकः सगोत्रायां द्वितीयकः ॥ ९ ॥
ब्राह्मण्यां शूद्रजनित श्चण्डाल स्त्रिविधः स्मृतः ॥ १० ॥
चर्मकारो भटो भिल्लो रजकः पुष्करो नटः ।

वराटो मेदचाण्डालौ दाशः श्वपचकोल्लिकाः ॥ १२ ॥
एतेऽन्त्यजाः समाख्याता ये चान्ये च गवाशनाः ।
एषां संभाषणात्स्नानं दर्शनादर्कवीक्षणम् ॥ १३ ॥

( वेदव्यासस्मृति अ. १ )

मनूनें सांगितलेल्या अस्पृश्यांचा अनुवाद पुढें याज्ञवल्क्य, आंगिरस, वृद्धशातातप, संवर्त, इत्यादींनीं अक्षरशः केलेला आहे. परंतु आंगिरसानें चांडालाची छाया व सुतकी यांच्या स्पर्शाची भर अधीक घालून त्यांना स्नानाचें प्रायश्चित्त सांगितलें आहे. व्यंगी, उन्मत्त, कोल्हा, गांवडुकरें, कोंबडे यांचीं नांवें मनूपेक्षां अधीक सांगून वृद्धशातातपानें त्यांच्या स्पर्शास सचैल स्नान कथन केलें आहे. प्रजापतीनें प्रेत, विटाळशी व श्वपाक यांच्या जोडीला स्मशान व जैनमंदिर हीं सुद्धा स्पर्शदोषामध्यें सांगून त्यांचें दर्शनहि निषेधिलें आहे. पराशरानें चंडाल स्पर्श, दर्शन, संभाषण यांचा दोष सांगून स्नान, जप, सूर्यदर्शनादि प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. पराशरकालीं चांडाल हा गांवाजवळ राहात होता व प्रसंगीं तो गांवांत येतहि होताच. क्वचित् द्विजांच्या घरीहि तो जात असावा म्हणून पराशरानें चांडालाचा प्रवेश ज्या घरांत होईल तें जाळावें असें सांगितलें आहे. करडे, कापूस, तेल, तूप असले पदार्थ घराचे दारांत भरून तें पेटवावें म्हणजे गृहशुद्धि होते असें तो म्हणतो. अंत्य व अंत्यज हे शब्द मनु व याज्ञवल्क्य यांच्या व त्या पूर्वींच्या ग्रंथांत असले तरी त्यांच्या व्याख्या कुणीहि दिलेल्या नाहींत. रजक, चर्मकार नट, धीवर, बुरुड, या पंच अंत्यजांच्या स्पर्शाला आचमन हें प्रायश्चित्त प्रथम आंगिरस सांगतो. रजक, चर्मकार, नट, बुरुड, कैवर्त, मेद व भिल्ल असे सातच अंत्यज होत, असें यम, अत्रि, संवर्त इत्यादि स्मृतिकार सांगतात. पराशरहि रजक, चर्मकार, लुब्धक व बुरुड यांचा उल्लेख अ. ६ मध्यें करतो व यांनीं जर द्विजगृहीं प्रवेश केला तर गृहदाह न करितां इतर सर्व प्रायश्चित्त करावें असें म्हणतो. त्यावरून चंडाल व सप्त अंत्यज यांमध्यें अंत्यजांचा विटाळ कमी असें पराशरमत दिसतें. चांडालस्पर्श होतांच स्नान न करितां जर मलमूत्रोत्सर्ग द्विजानें केला तर तीन दिवस प्रायश्चित्त करावें असें आपस्तंब सांगतो. अंत्यजांच्या वस्तींत जर बहुपुष्प व बहुफल-वृक्ष ( बोरे, जांभळे ) असतील तर त्यांचा उपभोग सर्वांनीं घ्यावा असें अत्रि सांगतो.

त्यावरूनहि अंत्यज वस्तीमध्यें द्विज येत असत व त्यांना दोष नसे हें दिसतें. या रजकादिकांत्यजांना मोहानें शिवल्यास एक रात्र दूध पिऊन राहावें असें अत्री म्हणतो. आंगिरस पांच अंत्यज सांगतो तर अत्रि, यम, संवर्त वगैरे सप्त अंत्यजांचा उल्लेख करितात. परंतु व्यासांनीं बारा अंत्यज सांगितले आहेत, त्यांचीं नांवें:- चर्मकार, भट, भिल्ल, पुष्कर, नट, रजक, वराट, मेद, चांडाल, दाश, श्वपच व कोलिक अशीं दिलेलीं आहेत. यावरून प्रथम अंत्य म्हणजे शूद्र किंवा शेवटीं जन्मला म्हणून ( अंते जातः ) अंत्यज हाच अर्थ असावा. पुढें समाजांत संकर वाढल्यावर प्रथम पांच, पुढें सात व शेवटीं १२ असे वर्ग व उर्फ जाति अंत्यजामध्यें गणल्या गेल्या ! अंत्यजाप्रमाणें चांडाल शब्दाची व्याप्तिहि पुढें पुढें वाढलेली दिसते. प्रथम प्रतिलोमसंकरापैकी एकच ब्राह्मणी-शूद्र-संभव चांडाल होता. वसिष्ठकालीं ब्राह्मणांतील चार कर्मचांडाल उत्पन्न झाले होते त्यांचीं नांवें वर दिलेलींच आहेत. अत्रिस्मृतीमध्यें संन्याशाच्या अपत्यांना विदूर नामक चांडाल म्हटलें आहे. तसेंच अत्रिसंहितेमध्यें ब्राह्मणांच्या म्लेंच्छ, चांडाल, शूद्र, इत्यादि दहा जाती सांगून क्रियाहीन, मूर्ख व निर्दय ब्राह्मणाला चांडाल म्हटलेलें आहे. व्यास स्मृतीमध्यें सगोत्र स्त्रीशीं विवाह केल्यानें होणारा पुत्र व मुलीला विवाहापूर्वी झालेला पुत्र या दोघांनाहि चांडाल म्हटलें आहे. त्यावरून पांच प्रकारचे कर्म-चांडाल व चार प्रकारचे जन्म-चांडाल होते, असें सिद्ध होतें. कोणताहि समाज एका स्थितींत असूं शकत नाहीं. समाजाची संकीर्णता वाढली कीं ठरलेल्या नियमापेक्षां उलटसुलट प्रकारानें प्रजा उत्पन्न होते म्हणून निरनिराळ्या शब्दांचे अर्थहि व्यापक होत जातात. चांडाल व अंत्यज हे शब्द त्यांच्या इतिहासावरून पुढें व्यापक अर्थाचे झालेले आहेत. वृद्ध-हारित व त्यासारखे इतर स्मृतिकार यांनीं शिवाशीव पुढें कसकशी वाढविली हें समजावें म्हणून त्यांतील कांहीं उतारे देऊन व त्याचें विवेचन करून हें प्रकरण रे करितों.

रजस्वलां सूतिकां वा चण्डालं पतितं तथा ।
पाषण्डिनं विकर्मस्थं शैवं स्पृष्ट्वाप्यकामतः ॥ ३५८
गोमयेनानुलिप्तांगः सवासा जलमाविशेत् ।
गायत्र्यष्टशतं जप्त्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥ ३५९

स्पृष्ट्वा तु कामतः स्नात्वा चरेत्सांतपनं व्रतम् ।
श्वपचं पतितं स्पृष्ट्वा गोवाल-व्यजनादिभिः ॥ ३६०
विड्वराहं शुनं काकं गर्दभं यूपमेव च ।
मद्यं मांसं तथैवोष्ट्रं विण्मूत्रं शवमेव च ॥ ३६१
करकं जलफेनं च वृक्ष-निर्यासमेव च ।
करंजं लशुनं चास्थि कम्बलं शिग्रुमेव च ॥ ३६२
आरग्वधद्रुमं स्पृष्ट्वा सवासा जलमाविशेत् ।
कर्ममध्ये तु मार्जारं स्पृष्ट्वा स्नानं समाचरेत् ॥ ३६३
बौद्धशैवपिशाचानामालयं योऽनुगच्छति ।
सचैलमवगाह्याप: सावित्रीं त्रिशतं जपेत् ॥ ३६४
तस्पृष्टस्पृष्टिनौ स्पृष्ट्वा सवासा जलमाविशेत् ।
ऊर्ध्वमाचमनं प्रोक्तं धर्मविद्भिरकल्मषैः ॥ ३६५
चाण्डालः पतितो वाऽपि यस्मिन्गेहे समाविशेत् ।
त्यक्त्वा मृण्मयभाण्डानि गोभिः संक्रामयेत्त्र्यहम् ॥ ४०१
अमेध्यशवचण्डाल-मद्य-मांसादिदूषितात् ॥ ४०५
कूपादुध्दृत्य कलशैः सहस्रं रेचयेज्जलम् ।
निक्षिप्य पंच-गव्यानि वारुणै रपि मन्त्रयेत् ॥ ४०६
तडागस्यापि शुध्यर्थं गोभिः संक्रामयेज्जलम् ।
प्रासाददेवहर्म्याणां चण्डालपतितादिषु ॥ ४०८
अन्तःप्रविष्टेषु तथा शुद्धिः स्यात्केन कर्मणा ।
गोभिः संक्रमणं कृत्वा गोमूत्रेणैव लेपयेत् ॥ ४०९
पुण्याहं वाचयित्वा तु तत्तोयै र्दर्भसंयुतैः ।
संप्रोक्ष्य सर्वतः पश्चादेवं समभिषेचयेत् ॥ ४१०
श्रीसूक्तेन तदा दिव्यैर्दद्यान्नीराजनं द्विजः ।
अवैष्णवस्पर्शनेऽपि एवं कुर्वीत वैष्णवः ॥ ४१३ ॥ वृद्धहारीत अ. ९

वृद्धहारिताच्या मतें विटाळशी, बाळंतीण, चंडाल, पतित, पाषंडी आपलें कर्म सोडून दुसरें करणारा द्विज, शैव ( शिवभक्त मनुष्य ) यांचा स्पर्श चुकून किंवा समजून झाला तरी सर्वांगास गोमय फासून सचैल स्नान केलें पाहिजे.

चांडाल व पतिताप्रमाणेंच कुत्रें, डुकर, कावळा, गर्दभ, वधस्तंभ, मद्य, मांस, उंट, प्रेत, विष्ठा, मूत्र, झाडांचा चीक, डिंक, पाण्याचा फेस, करंजवृक्ष, लसूण, अस्थि, कांबळें, शेवगा व आरग्वधनामक वृक्षाचा स्पर्श झाल्यास सचैल स्नान केलें पाहिजे. बौद्ध, शैव, पाशुपत, वेतालादि पिशाच्चें यांच्या स्पर्शास व त्यांचा स्पर्श ज्यांना झाला आहे त्यांच्याहि स्पर्शास सचैल स्नान केलें पाहिजे, असें निष्पाप धर्मवेत्त्यांचें मत म्हणून हारितानें सांगितलें आहे. चंडाल किंवा पतित यांचा प्रवेश स्पृश्याच्या घरीं झाल्यास त्या घरांतील मातीचीं भांडीं टाकून द्यावींत आणि घरांत गाई फिरवाव्या. ज्या विहिरीमध्यें मद्य, मांस, किंवा अमेध्य पदार्थ पडला असेल किंवा जेथें प्रेत पडलें असेल किंवा ज्या विहिरींतील जलाला चांडालाचा स्पर्श झाला असेल त्या विहिरीचा उपसा करावा व तींत पंचगव्य टाकावें. देवालयाचीं आवारें व मंडप यामध्यें चांडाल व पतित गेल्यास तेथें गाई फिरवाव्या आणि गोमूत्राचा सडा घालावा. नंतर पुण्याहवाचन करून मंत्र म्हणून दर्भानें पाणी घेऊन तें शिंपडावें. चंडाल व पतित यांचा स्पर्श झाल्यास जसें देवालय बाटतें त्याच प्रमाणें तें अवैष्णवाचा स्पर्श झाला तरी बाटतें हें हारीत मत खरोखरीच चिंत्य होय ! हारीत स्मृति ही कट्टी वैष्णव स्मृति असून ती वैष्णवांच्या उत्कर्षकालांत जन्मास आलेली दिसते. म्हणूनच त्या स्मृतीमध्यें स्मार्त, शिवभक्त किंवा वैष्णवाहून अन्य मनुष्य वैष्णवांच्या देवालयांत गेल्यास तें बाटतें व त्याची शुद्धीहि अवश्य आहे असें म्हटलेलें आहे. आपस्तंबादि सूत्रकार व मन्वादि स्मृतीकारापेक्षां वृद्धहारितानें अस्पर्शाची यादी केवढी वाढविली आहे हें वर दाखविलेंच आहे. देवालयप्रवेशाच्या निषेधाविषयीं एकाहि स्मृतिकाराचें वचन नसतां एकटा हारीत मात्र देवालयांत अस्पृश्यांचा, पतितांचा व त्याचप्रमाणें अवैष्णवाचा प्रवेश दोषार्ह ठरवितो हें ऐतिहासिक दृष्ट्या विचार करण्याजोगें असलें तरी ते व्यवहार दृष्ट्या त्याज्य आहे.

अस्पृश्यांच्या मंदिर-प्रवेशाचा प्रश्न हा अद्याप घुसळला जात आहे, म्हणून येथें त्या शास्त्राचा थोडा परामर्श घेतल्यास मुळींच अप्रासंगिक होणार नाहीं. अनेक धर्मसूत्रें व स्मृति यामध्यें मंदिर-प्रवेशाचा विषयच नाहीं. स्मृतीपैकीं एका वृद्धहारीतस्मृतीमध्येंच मंदिर-प्रवेशाच्या निषेधाविषयीं चार दोन वचनें आहेत आणि श्रुतिस्मृतीपेक्षां ज्याचें प्रामाण्य कमी महत्त्वाचें आहे अशा आगम

ग्रंथापैकीं भृगुसंहितेमध्यें असलेलें एक वचन पं. अनन्त कृष्णशास्त्री यांनीं स. ध. प्रदीपग्रंथांत दिलेलें आहे. हींच वचनें आज सर्व पंडित पुढें करीत असतात.

प्रासाददेवहर्म्याणां चण्डालपतितादिषु ॥ ४०८
अन्तः प्रविष्टेषु तथा शुद्धिः स्यात्केन कर्मणा ।
गोभिः संक्रमणं कृत्वा गोमूत्रेणैव लेपयेत् ॥ ४०९
अवैष्णवस्पर्शनेऽपि एवं कुर्वीत वैष्णवः ॥४१३॥ वृद्धहारीत (अ. ९)
चंडालैरंत्यजैश्चैव तथान्यप्रतिलोमजैः ।
म्लेच्छैश्च नीचचंडालैर्गुरुनिंदादिदूषितैः ॥
एवमादिभिः संस्पृष्टे देवागारे विशेषतः ।
स्पृष्टे प्रवेशने बाधा पूजाकाले च दर्शने ॥

आतां या वचनांचा विचार करूं. वृद्धहारीत म्हणतो कीं चंडाल व पतित हे देवालयाच्या आवारांत व सभामंडपांत गेले कीं देवालय भ्रष्ट होतें. इतकेंच नव्हे तर वैष्णवांच्या देवालयांत एकादा स्मार्त, गाणपत्य, शिवभक्त गेला तरीहि तें देवालय भ्रष्ट होतें, म्हणून देवालयाची शुद्धि केली पाहिजे. भृगु म्हणतो कीं चंडाल, अंत्यज, प्रतिलोमज, म्लेच्छ, नीचचंडाल व गुरुनिंदा आणि इतर अशींच पातित्य उत्पन्न करणारीं पातकें करणारे जे लोक आहेत, ते देवालयांत गेल्यानें तें देवालय भ्रष्ट होतें.

येथें चंडाल हा शब्द अगदीं मोघम आहे. जन्मचंडाल, कर्मचंडाल, ग्रामचंडाल असे त्याचे भेद आहेत. जन्मचंडालामध्यें शूद्रब्राह्मणीसंभव, संन्याशाचा मुलगा, ( संन्यासोत्तर पुन्हा स्वस्त्रीचे ठिकाणीं उत्पन्न केलेला ) सगोत्र स्त्रीचा पुत्र, कौमारावस्थेंत झालेला पुत्र, असे चार जन्मचंडाल आहेत. वसिष्ठ धर्मसूत्रांमध्यें नास्तिक, पिशुन, कृतघ्न, दीर्घद्वेषी असे चार व निर्दय, क्रीयाहीन व मूर्ख असा पांचवा अत्रिस्मृतींत सांगितलेला मिळून पांच कर्मचंडाल आहेत. जन्मचंडाल चार, कर्मचंडाल पांच व ग्रामचंडाल सोळा सांगितलेले आहेत. १ परीट किंवा रंगारी २ चांभार ३ बहुरूपी किंवा नट ४ बुरुड ५ कोळी ६ म्लेच्छ ७ भिल्ल ८ सोनार ९ शिंपी १० गारुडी ११ तेली १२ मांग १३ कुंभार १४ कलाल १५ न्हावी १६ शिल्पजीवी इत्यादि आहेत. या सर्वांनीं देवालयांत जाऊं नये असेंच समजावयाचें आहेना ?

आंगिरस पांच अंत्यज सांगतो, अत्रि सात सांगतो आणि व्यास बारा अंत्यजाचीं नांवें देतो तीं अशीं:—१ चर्मकार २ भट ३ भिल्ल ४ पुष्कर ५ नट ६ रजक ७ वराट ८ मेद ९ चंडाल १० दाश ११ श्वपच १२ कोलिक. म्लेंच्छ व नीच चंडाल हे दोन्ही एक आहेत असें म्हटलें तर त्यांमध्यें ख्रिश्चन, मुसलमान, युरोपिअन इत्यादि सर्व विधर्मीयांचा समावेश होतो. या लोकांनीं देवालयांत जाऊं नये हें ठीक आहे. पण गुरुनिंदादि दोषानें युक्त व इतर दोषानें पतित असलेले जे अनेक हिंदु लोक, त्यांनीं पतितपावनाच्या दर्शनाला जाऊं नये, असें म्हटलें तर अनवस्थाप्रसंग येणार आहे. गुरूची टर उडविणारे, त्यानिमित्त शिक्षा व दंड झालेले असे विद्यार्थी कांहीं थोडेथोडके नाहींत आणि पतितांची यादी करूं लागल्यास ' दुर्लभस्तु शुचिर्नरः ' असें म्हणावें लागेल ! एक ब्राह्मणच शास्त्रदृष्ट्या कशाकशानें पतित होतो तें आतां पाहूं. १ सायंप्रातःसंध्या न करणें ( २ ) वेदाध्ययन न करणें ( ३ ) दूध, तूप इत्यादि विकणें व वाटेल तो धंदा करणें ( ४ ) कांदा लसूण गाजर इत्यादि खाणें ( ५ ) अनाश्रमी राहाणें ( ६ ) अग्निहोत्र न ठेवणें ( ७ ) शिल्प व्यवहारावर जगणें ( ८ ) आठव्या वर्षी मुलीचा विवाह न करणें ( ९ ) अवकीर्णी ब्रह्मचाऱ्यानें प्रायश्चित्त न देणें ( १० ) देवपूजेचा धंदा करणें ( ११ ) जोसपणावर निर्वाह करणें ( १२ ) पैसे घेऊन शिकविणें ( १३ ) शूद्रकर्म करणें ( १४ ) सर्व संस्कार यथाविधि न करणें व ( १५ ) अनेक पातकांना सांगितलेलीं प्रायश्चित्तें न घेणें इतक्या कारणांनीं ब्राह्मण पतित होतो. आज अशा तऱ्हेचा पतित न झालेला ब्राह्मण विरळा ! तेव्हां त्यांनीं व त्याप्रमाणें द्विजांनीं म्हणजे क्षत्रियवैश्यांनीं सुद्धां देवालयांत जातां कामां नये. वरील शास्त्रवचन तंतोतंत पाळावयाचें म्हटलें तर सर्व देवालयांना कुलुपेंच ठोकलीं पाहिजेत. तेव्हां इतर सर्व शास्त्रविरुद्ध गोष्टी जशा खपत आहेत व त्याला रूढीनें व वहिवाटीनें जशी मान्यता दिली आहे, तशीच मंदिरप्रवेशालाहि मान्यता दिली पाहिजे.

इसवीसनापूर्वी ६०० च्या सुमारास झालेल्या बौधायन धर्मसूत्रामध्यें दक्षिणेकडील पांच व उत्तरेकडील पांच अशा विप्रतिपत्ति म्हणजे शास्त्रविरुद्ध गोष्टी दिलेल्या आहेत. तो क्रम तेवढ्यावरच संपला असें नसून कालमानाप्रमाणें अनेक गोष्टी घडत आहेत व समाज त्याला मान्यता देत आहे. म्हणून बौधायनानंतर

रूढ झालेल्या अनेक मान्य अनाचारांपैकीं हाहि एक अनाचार समजावा. मान्य अनाचार ठरविण्याला पुन्हां मोठा सूत्रकारच पाहिजे असें नाहीं आणि जो काय धर्म आहे तो आतां देवळांतच बसलेला आहे असें नाहीं. वैदिक-धर्मांत मुळीं देवालयेंच नाहींत. तीं यज्ञसंस्थेनंतर अलीकडेच आलेलीं आहेत. बुद्धोत्तरकालांत देवालयें वाढलीं आणि खरें पाहिलें तर हा देवदेवळांचा विषय धर्मशास्त्राचा नसून उपासना व भक्तिशास्त्र यांचा आहे. देव भावामध्यें आहे. तो भावाचा भुकेलेला आहे. तो भक्तपराधीन आहे आणि तो सर्वत्र सम आहे. देवाच्या ठिकाणीं ना जातपात, ना स्पर्शास्पर्श, ना गणगोत तेथें कांहीं नाहीं. फक्त एक भक्ति, भाव व अन्तःकरणाचा जिव्हाळा हीं असलीं म्हणजे देव भेटतो.

मूर्तींत देव नाहीं. मूर्ति हें प्रतीक म्हणजे प्रतिनिधी आहे. मूर्तींत सामर्थ्य नसतें, तें भक्ताच्या भावनेंत असतें. दगडाच्या मूर्तींनीं आजपर्यंत कधींच सामर्थ्य दाखविलेलें नाहीं. भक्तांच्या भावना जशा जाज्वल्य, तीव्र व जळजळीत असतात, तसाच देवहि असतो. जसे लोक तसे त्यांचे देव! समर्थांचा देव जयिष्णु होता, तर तुकोबांचा देव सहिष्णु होता. असा सर्व पोक्त व शास्त्रशुद्ध विचार करून सर्व मानवांना दर्शनार्थ मंदिरें खुलीं करणें हें शास्त्रसंमतच आहे.

स्पर्शा-स्पर्शाचें शास्त्र हे व्यवहार व व्यवसाय यावर अवलंबून आहे. राज्यक्रांति, उत्पात, अवर्षण, जलप्रलय यामुळें व्यवहार बदलतो. व्यवहार व व्यवसाय बदलले कीं आपोआप स्पर्शास्पर्शविषयक कल्पना बदलतात. म्हणून आजहि अभ्युदयाचे दृष्टीनें पूर्वीचा स्पर्शास्पर्श दोष जेथें नडत असेल तेथें तो नष्ट केला पाहिजे, असा या प्रकरणाचा निष्कर्ष आहे. व्यवसायाचा व स्पर्शास्पर्शाचा जसा संबंध आहे तसाच भक्ष्याभक्ष्याचाहि संबंध आहे. काय खावें, काय प्यावें व तें कुठें खावें, कोणाचे पंक्तीस जेवावें या विषयींहि धर्मशास्त्रांत पुष्कळच चर्चा आहे. पचेल तें खावें, भूक लागल्यावर खावें व जेथें प्रसन्नता वाटेल तेथें जेवावें; येवढाच विचार धर्मशास्त्रांत नाहीं. भक्ष्याभक्ष्यविवेक व भोज्याभोज्यविवेक स्मृतिकारांनीं बराच केलेला आहे; त्याचाहि विचार आतां करणें अवश्य आहे.

# प्रकरण अकरावें

## मांसाहार

मनुष्यप्राण्यास जिवंत राहाण्याकरितां कांहींतरी अन्न हें पाहिजेच. हें सर्व जगत् प्राणांचें अन्न होय असें मनुसुद्धां म्हणतो. सर्व वस्तु हें प्राणाचें अन्न आहे असें म्हटलें तरी मनुष्य हा खाण्याजोग्या वस्तूच खातो. त्या दृष्टीनें पाहिलें तर प्रारंभापासून मनुष्यप्राणि हा मांसाहारीच आहे. समाजाच्या बाल्यावस्थेमध्यें हरिण, ससे, उंदीर, चिमण्या, बिळांतील प्राणि यावरच मनुष्य हा निर्वाह करीत असतो. इतर सर्व समाजाप्रमाणें प्राचीन काळीं वैदिक आर्यहि मांसाहारीच होते. धर्मशास्त्रग्रंथामध्यें यज्ञ, श्राद्ध व मधुपर्क-प्रसंगीं मांस हें अवश्य पाहिजे असें म्हटलेलें आहे. मांसाहारांतूनच आपला समाज शाकाहारी बनला आहे. प्रथम मांसाहाराची चर्चा करून नंतर शाकाहाराचा विचार करूं.

एकखुरोष्ट्रगवयग्रामसूकरशरभगवाम् ॥ २९ ॥
धेन्वनडुहोर्भक्ष्यम् ॥ ३० ॥
मेध्यमानडुहमिति वाजसनेयकम् ॥ ३१ ॥
कुक्कुटो विकिराणाम् ॥ ३२ ॥ प्लवः प्रतुदाम् ॥ ३३ ॥
क्रव्यादः ॥ ३४ ॥ हंस भास चक्रवाकसुपर्णाश्च ॥ ३५ ॥
कुञ्चक्रौञ्चवार्ध्राणसलक्ष्मणवर्जम् ॥ ३६ ॥
पञ्चनखानां गोधाकच्छपश्वाविट्च्छल्यकखड्गशशपूतिखषवर्जम्
अभक्ष्यश्चेटो मत्स्यानाम् ॥ ३८ ॥
सर्पशीर्षी मृदुरः क्रव्यादो ये चान्ये विकृता यथा मनुष्य शिरसः ॥३९॥

आपस्तंब ( १-५-७ )

संवत्सरं गव्येन प्रीतिः ॥ २६ ॥ भूयांसमतो माहिषेण ॥ २७ ॥
एतेन ग्राम्यारण्यानां पशूनां मांसं मेध्यं व्याख्यातम् ॥ २८ ॥

आपस्तंब ( २-७-१६ )

खड्गोपस्तरणे खड्गमासेमानन्त्यं कालम् ॥ १ ॥
तथा शतबलेर्मत्स्यस्य मांसेन ॥ २ ॥

वार्ध्रीणसस्य च ॥ ३ ॥ आपस्तंब ( २-७-१७ )
भक्ष्याः प्रतुदविष्किरजालपादाः ॥ ३५ ॥
( तुण्डेन प्रतुद्य प्रतुद्य ये भक्षयन्ति ते प्रतुदाः ।
ये पादाभ्यां विकीर्य भक्षयन्ति मयूरादयस्ते विष्किराः ।
जालाकारौ पादौ येषां ते जालपादाः । एते भक्ष्याः )
मत्स्याश्चाविकृताः ॥ ३६ ॥
( विकृता मनुष्यशिरस्कादयस्तद्विपरिता अविकृताः भक्ष्या इति ॥ )
वध्याश्च धर्मार्थे ॥ ३७ ॥ गौतम ( प्र. २ अ. ८ )
( ये भक्ष्या उक्तास्ते न केवलं स्वयं मृता अन्यहता वा भक्ष्या अपि तु वध्याश्च । धर्मार्थेऽतिथिपूजादौ )
अभक्ष्याः पशवो ग्राम्याः ॥ १४८ ॥ क्रव्यादाः शकुनयश्च ॥ १४९ ॥
तथा कक्कुटसूकरम् ॥ १५० ॥ अन्यत्राजाविभ्यः ॥ १५१ ॥
भक्ष्याः श्वाविड् गोधा शश शल्यक कच्छप खड्गाः खड्ग वर्जाः पञ्च पञ्चनखाः ॥ १५२ ॥
तथर्श्यहरिणपृषतमहिषवराहकुलङ्गाः कुलवङ्ग वर्जाः पञ्च द्विखुरिणः ॥ १५६ ॥
पक्षिण स्तित्तिरिकपोत कपिञ्जल वार्ध्रीणस मयूरवारणा वारणवर्जाः पञ्च विष्किराः ॥ १५४ ॥
मत्स्याः सहस्रदंष्ट्रश्चिलिचिमो वर्मिबृहच्छिरोमशकरिरोहित राजीवाः ॥ १५५ ॥ बौधायन ( प्रथम प्रश्न अ. ५ )
पितृदेवतातिथिपूजायां पशुं हिंस्यात् ॥ ५ ॥
मधुपर्केच यज्ञेच पितृदैवतकर्मणि ।
अत्रैव च पशुं हिंस्यान्नान्यथेत्यब्रवीन्मनुः ॥ ६ ॥
नाकृत्वा प्राणिनां हिंसां मांसमुत्पद्यते क्वचित् ।
न प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्माद्यागे वधोऽवधः ॥ ७ ॥
अथापि ब्राह्मणाय वा राजन्याय वाऽभ्यागताय वा
महोक्षं वा महाजं वा पचेदेवमस्याऽऽतिथ्यंकुर्वन्तीति ॥ ८ ॥

वसिष्ठ ( अ. ४ )

नियुक्तस्तु यदा श्राद्धे दैवे वा मांसमुत्सृजेत् ।
यावन्ति पशुरोमाणि तावन्नरकमृच्छति ॥ ३१ ॥ वसिष्ठ ( अ. ११ )

वर जीं मांसाहारासंबंधाचीं विविध वचनें दिलीं आहेत, त्यावरून पूर्वी वैदिक धर्मामध्यें मांसाहार हा विहित मानलेला होता, याबद्दल मुळींच शंका वाटत नाहीं. प्राचीन धर्मसूत्रकार आपस्तंब हा एक खुराचे पशु, उंट, गवय, गांव-डुकरें, शरभ, गाई, धेनु, बैल इत्यादींचेंहि मांस भक्ष्य आहे, असें म्हणतो. कोंबडा, तोंडानें कुरतडून खाणारे पक्षी, मोर, बदकें, हंस, भास, चक्रवाक हे पक्षीहि आपस्तंबाचे मतें भक्ष्यच होत. पंचनखांपैकीं वानर, वराह विशेष, ससा, कासव, एक तऱ्हेचा हरिण हे अभक्ष्य होत. सर्पशीर्षी व मनुष्यशीर्षी मासे व चेट इत्यादि नांवाचे मासे मात्र अभक्ष्य होत.

गाईच्या दुधातुपानें पितर एक संवत्सर तृप्त होतात तर माहिष मांसानें त्याहिपेक्षां अधिक तृप्त होतात. माहिष हा ग्राम्य पशु होय. अर्थात् आपस्तंबाचे मतें ग्राम्य व आरण्य असे दोन्ही पशु खाण्यास पवित्रच होत. गेंड्याच्या कातड्यावर ब्राह्मणांना बसवून त्यांना गेंड्याचें मांस खावयास घातलें तर पितर अनंतकाल तृप्त होतात. त्याचप्रमाणें शतबली नांवाच्या माशाचे मांसानें आणि वार्ध्राणस म्हणजे एक प्रकारच्या बोकडाच्या मांसानें पितर हे अनंत कालपर्यंत तृप्त होत असतात असें आपस्तंबाचें मत आहे.

गौतम धर्मसूत्रकारानें हाच विचार थोड्या फेरफारानें सांगितला आहे. कांहीं वर्ज्य करून सर्व पंचनख पशु भक्ष्य होत. घोडे, साप, एक खुराचे पशु, गांव-चिमण्या, हंस, चक्रवाक, कावळे, बहिरी ससाणे, बदकें, गांव-कोंबडे, गांव-डुकरें, गाई, बैल इत्यादि गौतमाचे मतें अभक्ष्य होत. आरण्य पशु व आरण्य पक्षी व कांहीं तऱ्हेचे मासे इत्यादि सर्व भक्ष्य होत. वेंकटेश्वर प्रेसमधील गौतम स्मृतींत कोणत्या मांसानें पितर किती दिवस तृप्त होत असतात अशा विषयाचीं जीं सूत्रें आहेत तीं आनंदाश्रम प्रतींत नाहींत. आपस्तंबापेक्षां गौतमाचें मत या बाबतींत जरी थोडेसें निराळें असलें तथापि गौतमानें मांसाहाराचा निषेध मुळींच केलेला नाहीं.

बौधायनानें श्राद्ध-प्रकरणांत हा विषय दिलेलाच नाहीं, पण भक्ष्याभक्ष्य प्रकरणांत हा विषय दिलेला असून चिलचिम, अंगावर केस व कवच असलेले,

रोहित व राजीव या नांवाचे मासे, तसेंच कांहीं वर्ज्य करून पंचनख पशु व पक्षी भक्ष्य होत असें म्हटलें आहे. द्विखुरी पशूंपैकीं पांच प्रकारचे वर्ज्य करून व पायानें विस्कटणाऱ्या पक्ष्यांपैकीं पांच प्रकारचे पक्षी वर्ज्य करून बाकी सर्व पशुपक्षी खाण्यास त्यानें मोकळीक दिलेली आहे.

धर्मसूत्रकार वसिष्ठ हा पितर, देवता व अतिथी-सत्कारानिमित्त पशूंची हिंसा अवश्य करावी, त्याशिवाय ती मुळींच करूं नये असें सांगतो. हिंसेशिवाय मांस उत्पन्न होत नाहीं, म्हणून यागांतील वध हा अवध होय. हिंसा व अहिंसा या बाबतींत वसिष्ठाचें मत अहिंसेविरुद्ध दिसतें. ( कारण अन्यत्र त्यानें वेदवित् आततायी वधाला जरी तो मोठा असला तरी संमति दिली आहे. ) ब्राह्मण, राजा, श्रोत्रिय, हे घरीं आले तर त्यांच्या आतिथ्याकरितां मोठा बैल अगर मेंढा मारावा व तसें आतिथ्य करीत असत असें वसिष्ठ म्हणतो. वसिष्ठानें ( अ. १४ ) भक्ष्याभक्ष्य प्रकरणांत मांसाहाराविषयीं आपस्तंब, गौतम व बौधायन या सर्वांच्या विचारांचें संकलन केलेलें आहे. कांहीं पशु-पक्ष्यांची यादी वाढवून लांबविलेली आहे पण एक विशेष बाब अशी आहे कीं वसिष्ठ-धर्म-सूत्र-कालीं मांसाहार हा कांहीं ब्राह्मणांना आवडत नव्हता. कित्येक ब्राह्मण श्राद्धास जेवावयास गेले असतां मांस टाकीत असत. अर्थात् तें त्यांनीं टाकूं नये म्हणून नरकाचें भय वसिष्ठानें घातलें आहे.

द्वौ मासौ मत्स्य मांसेन, त्रीन हारिणेन, चतुरश्चौरभ्रेण, पंचशाकुनेन, षट्छागेन, सप्त रौरवेण, अष्टौपार्षतेन, नवगवयेन, दशमाहिषेण, एकादश कौर्मेण, संवत्सरं गव्येन पयसा तद्विकारैर्वा ॥ विष्णु ( अ. ८० )

द्वौ मासौ मत्स्य-मांसेन त्रिमासान् हारिणेनच ॥ १३७ ॥
औरभ्रेणाथ चतुरः शाकुनेनेह पञ्चतु ।
षण्मासांश्छागमांसेन रौरवेण नवैवतु ॥ १३८ ॥
दशमासांस्तु तृप्यन्ति वराहमहिषामिषैः ।
शशोर्णवृकयो मांसै मांसानेकादशैव तु ॥ १३९ ॥
संवत्सरन्तु गव्येन पयसा पायसेन च ।
वार्ध्रीणसस्य मांसेन तृप्तिर्द्वादशवार्षिकी ॥१४०॥ उशनःसंहिता (अ.३)
न किंचिद्वर्जयेच्छ्राद्धे नियुक्तस्तु द्विजोत्तमः ।
न मांसं प्रतिषेधेत न चान्यस्यान्नमीक्षयेत् ॥ ६४ ॥

योन नाश्नाति द्विजो माषं नियुक्तः पितृकर्मणि ।
स प्रेत्य पशुतां याति संभवानेकविंशतिम् ॥६५॥ उशनःसंहिता अ. ५

विष्णुः—मत्स्यमांसानें पितर दोन महिने तृप्त होतात. हरिण मांसानें तीन महिने, उरभ्रमांसानें चार महिने, शकुनि मांसानें पांच महिने, मेषमांसानें सहा महिने, रुरुमांसानें सात महिने, पृषतमांसानें आठ महिने, गवयमांसानें नऊ, माहिषमांसानें दहा, कूर्ममांसानें अकरा आणि गाईच्या दुधातुपांच्या पदार्थांनीं पितर हे बारा महिनेपर्यंत तृप्त होत असतात.

उशनः संहिताः—यांत बहुतेक विष्णूचाच अनुवाद आहे. पण थोडा फरक आहे तो असाः—रुरुमांसानें पितर नऊ महिने तृप्त होतात. वराह व माहिष मांसानें दहा महिने, ससा, मेंढा व लांडगा यांच्या मांसानें अकरा महिने पितर तृप्त होत असतात. गव्यानें पितर एक वर्षभर, वार्ध्रीणस मांसानें पितर बारा वर्षेपर्यंत तृप्त होत असतात. या ग्रंथांत पुढें लगेच पांचव्या अध्यायामध्यें, माषाचा ( उडदाचा ) उल्लेख आहे. कलकत्ता प्रतींतून वरील उतारा घेतला आहे. तो प्रक्षेप असावा किंवा ' मांस ' या शद्बाऐवजीं माष हा शद्ब पडला असावा किंवा उशनसाच्या काळीं माषान्नाचा प्रघात पडत असावा. श्राद्धाला बसलेल्या ब्राह्मणानें कांहींसुद्धां टाकूं नये. उडदाच्या अन्नाचा निषेध करूं नये व दुसऱ्या अन्नाची अपेक्षाहि करूं नये. जो ब्राह्मण श्राद्धसमयीं उडदाचें अन्न खात नाहीं, तो मेल्यावर पशु होतो.

पितृणां मासिकं श्राद्धमन्वाहार्यं विदुर्बुधाः ।
तच्चामिषेण कर्तव्यं प्रशस्तेन प्रयत्नतः ॥ १२३ ॥
तिलैर्व्रीहियवैर्माषैरद्भिर्मूलफलेन वा ।
दत्तेन मासं तृप्यन्ति विधिवत्पितरो नृणाम् ॥ २६७ ॥
द्वौ मासौ मत्स्यमांसेन त्रीन्मासान्हारिणेन तु ।
औरभ्रेणाथ चतुरः शाकुनेनाथ पञ्च वै ॥ २६८ ॥
षण्मासां श्छागमांसेन पार्षतेन च सप्त वै ।
अष्टावेणस्य मांसेन रौरवेण नवैव तु ॥ २६९ ॥
दशमासास्तु तृप्यन्ति वराहमहिषामिषैः ।
शशकूर्मयोस्तु मांसेन मासानेकादशैवतु ॥ २७० ॥

संवत्सरं तु गव्येन पयसा पायसेनच ।
वार्ध्रीणसस्य मांसेन तृप्तिर्द्वादश वार्षिकी ॥ २७१ ॥
कालशाकं महाशल्काः खड्गलोहामिषं मधु ।
आनन्त्यायैव कल्पन्ते मुन्यन्नानि च सर्वशः ॥ २७२ ॥ मनु ( अ. ३ )
पाठीनरोहितावाद्यौ नियुक्तौ हव्यकव्ययोः ।
राजीवान्सिंहतुण्डांश्च सशल्कांश्चैव सर्वशः ॥ १६ ॥
न भक्षयेदेकचरानज्ञातांश्च मृगद्विजान् ।
भक्ष्येष्वपि समुद्दिष्टान्सर्वान्पञ्चनखांस्तथा ॥ १७ ॥
श्वाविधं शल्यकं गोधां खड्गकूर्मशशांस्तथा ।
भक्ष्यान्पञ्चनखेष्वाहुरनुष्ट्रांश्चैकतोदतः ॥ १८ ॥
यज्ञार्थं ब्राह्मणै र्वध्याः प्रशस्ता मृगपक्षिणः ।
भृत्यानां चैव वृत्यर्थमगस्त्यो ह्याचरत्पुरा ॥ २२ ॥
प्रोक्षितं भक्षयेन्मांसं ब्राह्मणानां च काम्यया ।
यथाविधि नियुक्तस्तु प्राणानामेव चात्यये ॥ २७ ॥
प्राणस्यान्नमिदं सर्वं प्रजापतिरकल्पयत् ।
यज्ञाय जग्धि मांसस्येत्येष दैवो विधिः स्मृतः ।
अतोऽन्यथा प्रवृत्तिस्तु राक्षसो विधिरुच्यते ॥ ३१ ॥
नाद्यादविधिना मांसं विधिज्ञोऽनापदि द्विजः ।
जग्ध्वा ह्यविधिना मांसं प्रेत्य तैरद्यतेऽवशः ॥ ३३ ॥
नियुक्तस्तु यथान्यायं यो मांसं नात्ति मानवः ।
स प्रेत्य पशुतां याति संभवानेकविंशतिम् ॥ ३५ ॥
यज्ञार्थं पशवः सृष्टाः स्वयमेव स्वयंभुवा ।
यज्ञस्य भूत्यै सर्वस्य तस्माद्यज्ञे वधोऽवधः ॥ ३९ ॥
मधुपर्के च यज्ञे च पितृदैवतकर्मणि ।
अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्यब्रवीन्मनुः ॥ ४१ ॥
एष्वर्थेषु पशून्हिंसन् वेदतत्त्वार्थविद्द्विजः ।
आत्मानं च पशुं चैव गमयत्युत्तमां गतिम् ॥ ४२ ॥
या वेदविहिता हिंसा नियतास्मिश्चराचरे ।

अहिंसामेव तां विद्याद्वेदाद्धर्मो हि निर्बभौ ॥ ४४ ॥
नाकृत्वा प्राणिनां हिंसां मांसमुत्पद्यते क्वचित् ।
न च प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्मान्मांसं विवर्जयेत् ॥ ४८ ॥
समुत्पत्तिं च मांसस्य वधबन्धौ च देहिनाम् ।
प्रसमीक्ष्य निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात् ॥ ४९ ॥
स्वमांसं परमांसेन यो वर्धयितुमिच्छति ।
अनभ्यर्च्य पितॄन्देवांस्ततोऽन्यो नास्य पुण्यकृत् ॥ ५२ ॥
न मांस भक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने ।
प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥ ५६ ॥ मनु ( अ. ५ )

मासिक श्राद्ध आमिषानें करावें असें मनूचें मत आहे. तिसऱ्या अध्यायाचे शेवटीं कोणत्या मांसानें पितर किती दिवस तृप्त होत असतात हा मनूचा विचारहि चिंत्य आहे. मत्स्यमांसानें दोन महिने, हारिणमांसानें तीन, मेंढ्याचे मांसानें चार, वहिरीससाण्याचे मांसानें पांच, छागमांसानें सहा, पृषतमांसानें सात, एणमांसानें आठ, रुरुमांसानें नऊ, माहिषमांसानें दहा, शश व कूर्म मांसानें अकरा महिने पितर तृप्त होतात, असें म्हटलें असून पुढें वार्ध्रीणस मांसानें बारा वर्षे व गेंड्याचे मांसानें अनंतकालपर्यंत पितर तृप्त होत असतात असें सांगितलें आहे. मनुस्मृतिकालीं जसें मांसाहाराचें महत्त्व होतें तसेंच मुनि अन्नाचेंहि होतें. पितरांना मुन्यन्न दिलें व गाईच्या दुधातुपाची निरनिराळीं पक्वान्नें केलीं तरीहि पितर अनंतकालपर्यंत तृप्त होत असतात असेंहि एक मत मनूनें नमूद केलेलें आहे. अध्याय पांच मध्यें हव्यकव्यांत कोणते मासे खावेत व कोणते खाऊं नयेत; तसेंच इतरहि पशुपक्षी कोणते भक्ष्य व कोणते अभक्ष्य हें सांगून यज्ञाकरितां व कुटुंब भरणाकरितां ब्राह्मणांनीं हत्या अवश्य करावी, असें म्हटलेलें आहे. ब्रह्मदेवानें हे स्थावरजंगम जगत् प्राणांचें अन्न म्हणूनच निर्माण केलेलें आहे. म्हणून जगांत भक्ष्य व भक्ष्यक असा संबंध आहे. चालणारे न चालणाऱ्यांना, हिंस्र पशु अहिंस्र पशूंना, पराक्रमी दुर्बळांना व शूर भित्र्यांना खात असतात, हा जगाचा नियमच आहे. विधीपूर्वक मांस खावें, अविधीपूर्वक खाऊं नये, योग्य कालीं खावें, अयोग्य कालीं खाऊं नये, विशिष्ट प्रसंगींच तें खावें, उगाच रोजच्या रोज खाऊं नये. यज्ञ, मधुपर्क व श्राद्ध यावेळीं अवश्य

हत्या करावी, त्यावेळचा वध हा अवध होय. वेद-विहित हिंसा ही अहिंसाच होय असें ठासून सांगून शेवटीं शेवटीं मनूनें मांस न खाल्यास बरें असें म्हटलें आहे. एकंदरींत मनूचे मतें मांस-भक्षण, मद्य व मैथुन यामध्यें कांहीं दोष नाहीं. ही भूतांची स्वाभाविक प्रवृत्तीच आहे. तथापि यापासून निवृत्त असणें हें बरें, असेंच आहे. यावरून मनूनें मांसाहाराचा निषेध केला नसून फक्त दुसरें एक मत जातां जातां नमूद केलें आहे इतकेंच.

याज्ञवल्क्यस्मृति आचाराध्याय श्लोक १६७-१८१ मध्यें मांसाहार सांगितला आहे. शंखस्मृतीमध्यें यमस्मृतीचा उल्लेख करून मनूनें सांगितलेलाच मांसाहार सांगितला आहे. पराशरस्मृतीमध्यें मांसाहाराचा विषय नाहीं. संवर्त स्मृतीमध्यें मांसाहार आलेला आहे. पण तो प्रायश्चित्तप्रकरणांत आहे. व्यास-स्मृतीमध्यें श्राद्धाशिवाय मांस खाऊं नये. क्षत्रियानें मृगया करून पितरांचें तर्पण करूनच मांस खावें. वृथा मांस अविधीपूर्वक खाल्यास नरकप्राप्ति होते असें व्यास ठासून सांगतो. अत्रिसंहिता व स्मृति, अंगिरस, आपस्तंब, गोभिल, दक्ष, देवल, लघुआश्वलायन, लिखित, इत्यादि स्मृतीमध्यें श्राद्धाचा विषय आलेला असून तेथें मांसाहाराची चर्चा नाहीं. आश्वलायन, पारस्कर, द्राह्यायण इत्यादि गृह्यसूत्रांमध्यें मुलाच्या अन्नप्राशन संस्काराकरितां कोणकोणतीं मांसें वापरावींत याचा विचार केलेला आहे. बृ. आ. उपनिषदामध्यें ज्या तऱ्हेचा मुलगा पाहिजे असेल त्या तऱ्हेचे विशिष्ट मांस पतिपत्नींनीं खाऊन मग संभोग करावा असें म्हटलें आहे. तात्पर्य गर्भादान व अन्नप्राशनापासून तो श्राद्धापर्यंत मांसाहार धर्मशास्त्रामध्यें कांहीं स्मृति सोडून दिल्यास सर्वत्र आलेला आहे. मांसाच्या जागीं माषान्न म्हणजे उडदाचा वडा हा कसा आला व त्याचें समर्थन प्रजापतीनें कसें केलेलें आहे हें आतां पाहूं.

मद्यमप्यानृ ( प्यमृ ) तं श्राद्धे कलौ ततु विवर्जयेत् ।
मांसान्यपि हि सर्वाणि युगधर्मक्रमाद्भवेत् ॥ १५१ ॥
अतो माखा ( षा ) न्नमेवैतन्मासार्थे ब्रह्मणा कृतम् ।
पितरस्तेन तृप्यन्ति श्राद्धं कुर्व ( र्यां ) त्त तद्विना ॥ १५२ ॥
यथा बलिष्ठ मांसत्वान्माखा ( षा ) न्नमपि तत्समम् ।
सौगंधिकं च स्वादिष्टं मधुरं द्रव्यभेदतः ॥ १५३ ॥

भक्ष्यं भक्षविधौ यत्तु गर्हितं तद्विवर्जयेत् ।
अभक्ष्यमपि भक्ष्यं स्याद्देशधर्मेण वै मुने ॥ १५४ ॥ प्रजापति

कोणत्याहि नव्या सुधारणेकडे लोक साशंक दृष्टीनेंच पाहातात. रूढी सोडून नव्याकडे प्रवृत्त होणें कठीण असतें. अशा वेळीं नव्या सुधारणेमागेंहि मोठी परंपरा आहे असें सिद्ध करावें लागतें. ह्या दृष्टीनें प्रजापति स्मृतीमध्यें माषान्नाचा पुरस्कार मोठ्या युक्तीनेंच केलेला आहे. पूर्वीं सर्व कांहीं म्हणजे मद्यहि श्राद्धामध्यें विहित होतें. परंतु कलीमध्यें मद्य योग्य नाहीं हा सर्वसामान्य युक्तिवाद प्रजापतीनें प्रथम केला आहे. शिवाय ब्रह्मदेवानें मांसाचे स्थानीं माष उत्पन्न केला, त्यानें पितर तृप्त होतात, हा माष मांसाइतकाच बलिष्ठ आहे. सुगंधी, स्वादु, मधुर आहे, तेव्हां अवश्य खावा असें म्हणून शेवटीं त्या त्या कालीं जें गर्हित तें टाकावें; देशधर्मानें अभक्ष्य हें भक्ष्य व भक्ष्यहि अभक्ष्य होतें असें प्रजापतीचें निर्णायक मत आहे. प्रजापतीचे मतें मद्य व मांस हीं दोन्ही विहितच आहेत. मांसा-बरोबर मद्याचाहि उल्लेख अनेक ग्रंथांत आहे. मधु व मांस हीं वर्ज्य करावींत असें म्हटलें असलें तरी त्याचा अर्थ मद्य व मांस वर्ज्यावींत असाच आहे. परंतु ' मधु ' शब्दाचे अर्थ टीकाकारांनीं ओढून ताणून दिलेले आहेत. खरें तत्त्व हेंच कीं मद्य व मांस हीं अभक्ष्य नव्हतीं तर विहित होतीं. पुढें तीं कायदा व दुसरें अन्न आणि अहिंसेचें तत्त्वज्ञान यामुळें लोकांना आवडेनाशी झालीं व कलिवर्ज्यामध्यें त्यांचा समावेश झाला. देश व काल भेदानें भक्ष्य हें अभक्ष्य होतें व अभक्ष्य हें भक्ष्य होतें असें जर प्रजापतीसारख्या स्मृतिकाराचें मत आहे तर आधुनिक परिवर्तनवादी पंडित तरी दुसरें काय म्हणतात ? देशकालपरिस्थितीप्रमाणें आचार-धर्म बदलतो व त्यांत फरक करणें हें अधर्म्य नाहीं हेंच त्यांचें म्हणणें आहे ! सनातनधर्म हा परिवर्तनीय नाहीं. तो अगदीं प्रथमपासून आहे तसाच आहे. त्यांत ईश्वरहि बदल करूं शकत नाहीं हें म्हणणें किती साहसाचें आहे पाहा. सनातन धर्मांत अनंतकालपर्यंत मांसाहार होता पण तो बौद्धक्रांतीनंतर अनेक कारणांमुळें बंद पडला. हा बदल ईश्वरानें केला नाहीं तर ईश्वराची वाट न पाहातां लोकांनीं व राजांनीं केला ! म्हणजे माणसांनीं केला. कलींत मांसाहार बंद करावा व तो बंद होईल असें सर्वज्ञ कल्प आपस्तंब, गौतम, बौधायन यांपैकीं एकहि धर्मसूत्रकार म्हणत नाहीं.

सर्वज्ञांच्या त्या आज्ञा पुढें दुसऱ्या सर्वज्ञांनीं गुंडाळून ठेविल्या हेंच खरें. आजचें बहुतेक सर्व जग मांसाहारी आहे. चीन व जपान हीं बौद्धधर्मी राष्ट्रेंसुद्धां मांसाहारी बनलीं आहेत. अगदीं रानटी व सुधारलेल्या स्थितींतहि मनुष्यप्राणी मांसाहारी असतो. युरोपखंडांत ' शाकाहार बरा ' असें मत बोललें जात आहे. तें कृतींत कांहीं लोक कित्येक वर्षांनीं आणतील ! परंतु अहिंसेच्या तत्त्वज्ञानामुळें जगांतील मांसाहार बंद पडेल हें मात्र असंभाव्य होय. हिंदुस्थानांतील पुष्कळ जाति मांसाहारी आहेत, मत्स्याहारी तर पुष्कळच आहेत. पंचद्राविड ब्राह्मण-समाज व त्याचें अनुकरण करणाऱ्या कांहीं जाति या मांसनिवृत्त आहेत. येवढ्या अल्प समाजानें मांसाहार केला अगर न केला तरी जगाच्या उलाढालींत त्यामुळें फारसा फरक पडेल असें नाहीं. महाराष्ट्रिय क्षत्रियांनीं मात्र हें ब्राह्मणी अनुकरण अवश्य सोडून द्यावें. कारण मांसाहार हा त्यांना विहित आहे. या मांसानिवृत्त समाजानें मांसप्रवृत्त व्हावें असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु तेवढ्या एका गोष्टीवर भर देऊन आम्ही काय ते जगांत श्रेष्ठ आहोंत, आम्हापेक्षां गौड ब्राह्मण हे मांसाहारी अतएव कनिष्ट आहेत असें समजणें हें सर्वस्वी चुकीचें आहे. उच्च व नीच मानण्याचीं गमकें अनेक आहेत. त्यांतील आहार हें एक क्षुद्र गमक आहे. परंतु शाकाहारी म्हणून उच्च व मांसाहारी अतएव निंद्य असा समज मात्र चुकीचा आहे. मनुष्य खातो काय ? पितो काय ? हें पाहाण्यापेक्षां तो वागतो कसा ? बोलतो काय ? करतो काय ? त्याची दानत, त्याची राष्ट्रभक्ति, त्याचा त्याग व त्याची माणुसकी हीं पाहाणें हें सर्वस्वीं श्रेयस्कर होय.

आहाराचा व उच्चनीचतेचा जसा फार अल्प संबंध आहे, तसाच हिंसा व अहिंसा या तत्त्वाचा आहे. नीतितत्त्वें कालसापेक्ष असतात हें वेदव्यासांनीं भारतांत फार सखोलपणें दाखविलें आहे. मनूचे मताप्रमाणें हें सर्व चराचर जर प्राणाचें अन्न आहे व प्राण जगविण्याकरितां अन्न अवश्य आहे तर अहिंसेचें अवास्तव स्तोमहि व्यर्थ आहे. बलवान् दुर्बळाला खातो, असें मनूच म्हणतो. अर्थात् दुर्बळ हा बलवानानें आपणाला खाऊं नये म्हणून अहिंसेचा धर्म सांगत सुटतो ! आततायी मनुष्य मोठा वेदवित् जरी असला तरी त्याला ठार करावें हें तत्त्वहि योग्य वेळीं हिंसा अवश्य आहे, असेंच प्रतिपादतें. हिंसा व अहिंसा हीं सापेक्ष आहेत, तीं देशकाल ध्यानीं घेऊन व्यवहारांत आणलीं पाहिजेत व तसें वागणें हेंच खरें शहाणपणाचें होय.

वर दिलेलीं अनेक वचनें धर्मज्ञान नसलेल्या आणि वेडगळ समजुतीच्या लोकांना चमत्कारिक वाटतील. पण हा दोष जसा शास्त्रकारांचा नाहीं तसा तीं वचनें पुढें मांडणाऱ्याचाहि नाहीं, तर धर्माचें खरें ज्ञान करून न घेणाऱ्यांचा आहे. अहिंसाभक्त, गोभक्त व कांहीं धर्मभक्त वरील वचनावर तुटून पडतील. कारण आपस्तंब अत्यंत पवित्र म्हणून गोमांस खावें म्हणतो व आज तर गोमांसभक्षक म्हणजे अहिंदु अशी व्याख्या कांहीं करीत आहेत. तात्पर्य पूर्वींच्या धर्मकल्पनापेक्षां आजच्या धर्मकल्पना निराळ्या आहेत व आजच्यापेक्षांहि पुढच्या धर्मकल्पना निराळ्या होतील ! हें सर्व परिस्थितिसापेक्ष आहे यांत अनादि व सनातन असें कांहीं नाहीं, येवढें पक्कें ध्यानांत ठेवावें.

# प्रकरण बारावें

## शाकाहार व भोज्याभोज्य

मांसाहाराच्या चर्चेनंतर शाकाहाराचा प्रश्न क्रमानेंच येतो. धर्मशास्त्रदृष्ट्या सर्व प्रकारच्या भाज्या, फळें, अन्नें व धान्यें जर खाद्य ठरलीं असतीं तर त्यांत विचार करण्याजोगें कांहीं राहिलें नसतें. परंतु तशी स्थिति नाहीं. शाकाहारामध्यें सुद्धां भक्ष्याभक्ष्यविवेक पुष्कळच आहे. तो आपस्तंबापासून कुणी कसकसा सांगितला आहे हें पाहूं.

नापणीयमन्नमश्नीयात् ॥ १४ ॥ शुक्तं चापरयोगम् ॥ २० ॥
सर्वं मद्यमपेयम् ॥ २१ ॥ तथैलकं पयः ॥ २२ ॥
उष्ट्रीक्षीरमृगीक्षीरसन्धिनीक्षीरयमसूक्षीराणीति ॥ २३ ॥
धेनोश्चानिर्दशायाः ॥ २४ ॥ तथा कीलालौषधीनां च ॥ २५ ॥
करञ्जपलण्डुपरारीकाः ॥ २६ ॥ आपस्तंब ( १–५–१७ )
विलयनं मथितं पिण्याकं मधु मांसं च वर्जयेत् ॥ १ ॥
कृष्णधान्यं शूद्रान्नं ये चान्येनाद्य संमताः ॥ २ ॥ आपस्तंब २-८-१८
गोश्च क्षीरमनिर्दशायाः सूतके ॥ २२ ॥ अजामहिष्योश्च ॥ २३ ॥

नित्यमाविकमपेयमौष्ट्रमैकशफंच ॥ २४ ॥
स्यन्दिनीयमसूसंधिनीनांच ॥ २५ ॥ विवत्सायाश्च ॥ २६ ॥
किसलयक्याकुलशुननिर्यासाः ॥ ३१ ॥
लोहित व्रश्चनाः ॥ ३२ ॥ गौतम ( अ. ८ प्र. २ )
अनिर्दशाहसंधिनीक्षीरमपेयम् ॥ १५६ ॥
विवत्सान्यवत्सयोश्च ॥ १५७ ॥
आविकमौष्ट्रिकमैकशफमपेयम् ॥ १५८ ॥
अपेयपयःपाने कृच्छ्रोऽन्यत्र गव्यात् ॥ १५९ ॥
गव्ये तु त्रिरात्रमुपवासः ॥ १६० ॥
पर्युषितंशाकयूषमांससर्पिःशृतधानागुडदधिमधुसक्तुवर्जम् ॥ १६१ ॥
शुक्तानि तथा जातो गुडः ॥ १६२ ॥ बौधायन ( प्र. ५ अ. ५ )

आपस्तंबाचे मतें बाजारांत मांडलेलें अर्थात् रस्त्यावरील दुकानांत मांडलेलें अन्न खाऊं नये. आंबविलेले पदार्थ, त्यांत दुसरें मिश्रण केलें तरी न खावेत. सर्व तऱ्हेचें मद्य, शेळीचें दूध, सांढ, हरणी, एक वेळ दूध देणारी गाभ गेलेली गाय किंवा एकच वेत देणारी गाय यांचें दूध खाऊं नये. सोयर न फिटलेल्या गाईचें दूध, दारु ज्यापासून उत्पन्न होते अशा वनस्पति ( द्राक्षें, खजूर ) व त्यांचे पदार्थ, तांबडा व पांढरा लसूण, करीरक म्हणजे म्लेंच्छांनीं आणलेले कांहीं कांद्यासारखे पदार्थ, ताकांतलें लोणी, हातानें घुसळलेलें दहीं व ताक, मध, निषिद्धमांस, काळे उडीद, काळे हुलगे, पावटे, हरभरे, जोंधळे ( काळ्या गोंडाचे ) व शूद्रान्न इत्यादि सर्व अभक्ष्य होत. ( आपस्तंब धर्मसूत्रांत म्हशीच्या दुधाचा उल्लेख नाहीं ). गौतमानें भक्ष्याभक्ष्य प्रकरणांत म्हैस, एक खुराच्या पशूंच्या माद्या व जिला वासरु नाहीं अशी गाय, म्हैस व शेळी यांचेंहि दूध खाऊं नये असें म्हटलें आहे व तें आपस्तंबापेक्षां अधीक आहे. जिच्या स्तनांतून दूध सारखें वाहतें तिचें तें दूधहि अभक्ष्य होय. कांदा, लसूण, झाडांचा चीक ( हिंगासारखे पदार्थ ) तांबडा डिंक इत्यादि पदार्थ अभक्ष्य होत.

बौधायनानें आपस्तंब व गौतम यांनीं सांगितलेलेच सर्व अभक्ष्य पदार्थ सांगितले आहेत, तथापि अपेय जीं गव्यें त्यांच्या प्राशनास तीन दिवस उपवासाचें प्रायश्चित्त व गव्याहून अन्य अपेय-पानास एक कृच्छ्र प्रायश्चित्त सांगितलें आहे.

तसेंच दीर्घकालामुळें शिळे झालेले व विटलेले सर्व पदार्थ, भाज्या, कोशिंबिरी, पक्वान्नें, तूप, दूध, मांस, गूळ, साखर, सातु वगैरे घालून केलेले पदार्थ हे सर्व अभक्ष्य होत. सर्व तऱ्हेचीं मादकपेयें व त्यापासून बनलेला गूळहि अभक्ष्यच होय.

बौधायनापेक्षां पुढें वसिष्ठानें अभक्ष्यामध्यें अधीक भर काय घातली याचा विचार करण्याकरितां प्रथम वसिष्ठोक्त भक्ष्याभक्ष्य प्रकरण उद्धृत करितों. हा एकंदर भक्ष्याभक्ष्य विवेक द्विजाकरितांच दिसतो.

लशुनपलाण्डुकेमुकगृञ्जनश्लेष्मातकवृक्षनिर्यासलोहितव्रश्चनश्व-
काकावलीढशूद्रोच्छिष्टभोजनेषु कृच्छ्रातिकृच्छ्र इतरेऽप्यन्यत्र
मधुमांसफल विकर्षेष्वग्राम्यपशव ( पशु ) विषयः ॥ २८ ॥
संधिनीक्षीरमवत्साक्षीरं गोमहिष्यजानामनिर्दशाहानामन्तर्ना-
व्युदकमपूपधानाकरम्भसक्तुवटकतैलपायसशाकानि शुक्तानि
वर्जयेत्, अन्यांश्च क्षीरयवपिष्टविकारान् ॥ २९ ॥ वसिष्ठ ( अ. १४ )

वसिष्ठानें पूर्वधर्मसूत्रकारापेक्षां केमुक ( काळे वांगें ), गाजर, भोकरें, ज्यांतून चिकट व गिळगिळीत गोड रस येतो अशीं फळें, कावळा व कुत्रें यांनीं हुंगलेले पदार्थ, दह्यांत कालवलेले सातु ( आपस्तंब हा पदार्थ भक्ष्य म्हणतो ) सातू मिश्रित वडे, तेलांतील भाज्या आणि दूध व यवांचें पीठ यांच्या विकारापासून झालेले सर्व पदार्थ अभक्ष्य ठरविले आहेत.

भूस्तृणं सुरसं शिग्रुं पालकं सिंधुकं तथा ।
कूष्मांडालाबुवार्ताककोविदारांश्च वर्जयेत् ॥ १९ ॥
पिप्पली मरिचं चैव तथा वै पिंडमूलकम् ।
कृतं च लवणं सर्वं वंशाग्रं तु विवर्जयेत् ॥ २० ॥
राजमाषान्मसूरांश्च चणकान्कोरदूषकान् ।
लोहितान्वृक्षनिर्यासान् श्राद्धकर्मणि वर्जयेत् ॥२१॥ शंखस्मृति (अ.१४)
लशुनं गृजनं चैव पलाण्डुं कवकानिच
अभक्ष्याणि द्विजातीनाममेध्यप्रभवाणिच ॥ ५ ॥
लोहितान्वृक्षनिर्यासान्वृश्चनप्रभवांस्तथा
शेलुं गव्यं च पेयूषं प्रयत्नेन विवर्जयेत् ॥ ६ ॥
वृथा कृसरसंयावं पायसापूपमेव च ।

अनुपाकृतमांसानि देवान्नानि हवींषिच ॥ ७ ॥
अनिर्दशाया गोः क्षीरमौष्ट्रमैकशफं तथा ।
आविकं संधिनीक्षीरं विवत्सायाश्च गोः पयः ॥ ८ ॥
छत्राकं विड्वराहंच लशुनं ग्रामकुक्कुटम् ।
पलाण्डुं गृंजनं चैव मत्या जग्ध्वा पतेत्द्विजः ॥ १९ ॥
अमत्यैतानि षट्जग्ध्वा कृच्छ्रं सान्तपनं चरेत् ।
यतिचान्द्रायणं वापि शेषेषूपवसेदहः ॥ २० ॥ मनु. ( अ. ५ )

शंखस्मृतीमध्यें निदान श्राद्धामध्यें तरी पुढील पदार्थ वर्ज्य करावेत असें म्हटलें आहे. त्यावरून त्या कालीं श्राद्धाशिवाय इतर सर्व प्रसंगीं ते पदार्थ चालत असत हें सिद्ध होतें. म्हणजे समाजाची वाढ पूर्वीपेक्षां अधिक झाली व लोक शेवगा, समुद्रकांठचे मीठ, कोहळा, भोपळा, कोविदार, पिंपळी, मिरे, पिंड नांवाचा मुळा, मातीचे बनविलेलें कृत्रीम मीठ, राजमाष, मसूर, हरबरे इत्यादि पदार्थ खाऊं लागले म्हणून हा निषेध असावा.

मनूनें अभक्ष्यांचीं नांवें आपस्तंब, गौतम इत्यादींनीं दिलेलींच उच्चारलीं आहेत. परंतु सोनखतापासून उत्पन्न होणारे सर्व पदार्थ वर्ज्य सांगितले आहेत. शिवाय कांदा, लसूण, गाजर, गांवकोंबडा, गांवडुक्कर व छत्रीसारखी उगवणारी पांढरी वनस्पति यांच्या भक्षणाचा निषेध अगदीं कडकडून केला आहे. चुकून वा समजून जरी वरील पदार्थ भक्षिले तरी कृच्छ्र व शांतपन हीं व्रतें सांगितलीं आहेत.

शिवाय मनूच्या सांगण्यांत हा विशेष आहे कीं देवतादिकांच्या उद्देशानें म्हणजे नैमित्तिक प्रसंगानें तीळ, तांदूळ, साखर, दूध इत्यादींचीं जीं पक्वान्नें केलेलीं नसतात, तींहि सर्व अभक्ष्यच होत. स्वतःच्या जिव्हालौल्यानिमित्त गृहस्थानें पक्वान्नें करूं नयेत व केलीं तरी तीं इतरांनीं खाऊं नयेत असा मनूचा आग्रह आहे.

अन्नं पर्युषितं भोज्यं स्नेहाक्तं चिरसंस्थितम् ।
अस्नेहा अपि गोधूमयवगोरसविक्रियाः ॥ १६९
संधिन्यनिर्दशावत्सागोपयः परिवर्जयेत् ।
औष्ट्रमैकशफं स्त्रैणमारण्यकमथाविकम् ॥ १७०

देवतार्थं हविः शिग्रुं लोहितान्व्रश्चनांस्तथा ।
अनुपाकृतमांसानि विड्जानि कवकानि च ॥ १७१
पलाण्डुं विड्वराहं च छत्राकं ग्रामकुक्कुटम् ।
लशुनं गृञ्जनं चैव जग्ध्वा चान्द्रायणं चरेत् ॥१७६॥ याज्ञवल्क्य अ. १

याज्ञवल्क्यानें पूर्व-सूत्रकारांचा व स्मृतिकारांचा अगदीं थोडक्या शब्दांत अनुवादच केलेला आहे. फक्त घृत-मिश्रित पदार्थ उ. साखरभात हा शिळा असला तरी भोज्य समजावा आणि गहू, गोरस व यव यांचे पदार्थ जरी घृतयुक्त नसले तरी ते जर विटलेले व नासलेले नसतील तर तेहि भक्ष्य होत, असें याज्ञवल्क्याचें मत आहे. संवर्तानें श्लो. १९४।१९५ मध्यें मनूचेंच मत निराळ्या शब्दांत मांडून दाखविलें आहे.

लशुनपलांडुगृंजनभक्षणे तप्तकृच्छ्रम् ॥ ९ ॥
उष्ट्री खरी मानुषीक्षीरपाने पुनरुपनयनं कृच्छ्रं च ॥१०॥ लघुशातातप

शातातपानें लसूण, कांदा, गाजर, यांच्या भक्षणास तप्तकृच्छ्र हें प्रायश्चित्त सांगितलें आहेच. पण त्याशिवाय पुनरुपनयाचेंहि प्रायश्चित्त कथिलें आहे कीं जें उष्ट्री, खरी, मानुषी क्षीर-पानाला अवश्य केलेंच पाहिजे ! शेवटीं वृद्धहारीताचा उतारा देऊन नंतर भोज्याभोज्याकडे वळतों.

यच्छास्त्रेषु निषिद्धं तु तत्प्रयत्नेन वर्जयेत् ।
कोद्रवं चौलकं लुब्धं यावनालं तथा सितम् ॥ ११० ॥
निष्पावं च मसूराश्च तुच्छधान्यानि सर्वशः ।
भुक्तं पर्युषितं रूक्षं यज्ञे कर्मणि वर्जयेत् ॥ १११ ॥
वर्जयेदारनालं च मद्यमांससमानि च ।
निर्यासान्वर्जयेत्सर्वान् विना हिंगु च गुग्गुलम् ॥ ११२ ॥
छत्राकं मूलकं शिग्रुं करंजं लशुनं तथा ।
कुम्भीदलं च पिण्याकं श्वेतवृन्ताकमेव च ॥ ११३ ॥
आंत्रं च नालिकाशाकं नारिकेलाख्यमेव च ।
पीलुं च शणपुष्पं च भूस्तृणं भौतिकं तथा ॥ ११४ ॥
कोशातकीं बिम्बफलं मद्यमांससमानि च ।
अभक्ष्याण्यप्यशेषाणि वर्जयेद्यज्ञकर्मसु ॥ ११५ ॥

कलिंगं कतकं बिम्बफलं जन्तुफलं तथा ।
वंशांकुरमलाबुं च तालहिन्तालके फले ॥ ११६ ॥
अश्वत्थं प्लक्षनीपं च वटमारग्वधं तथा ।
कलम्बिका च निर्गुण्डी मुण्डी वार्ताकमेव च ॥ ११७ ॥
ऊषरं लवणं चैव श्वेतं च बृहतीफलम् ।
नखचर्मांतकं चैव चिंचिलं चेति यत्नतः ॥ ११८॥ वृद्धहारीतस्मृति अ.७

वृद्धहारीत हा कट्टा वैष्णव स्मृतिकार दक्षिण हिंदुस्थानांतील दिसतो. त्यानें विष्णूच्या नैवेद्याला जे अनेक वर्ज्य पदार्थ सांगितले आहेत, ते जर सर्व सोडून दिले, तर आज देवाला नैवेद्य कशाचा दाखवावयाचा ही पंचाईतच पडेल ! त्यानें दिलेलीं पुष्कळ नांवें आज अपरिचित आहेत म्हणून परिचितापैकींच कांहीं देतो.

पांढरा यावनाल, कुळीथ, पावटे, मसूर, राळे, नाचणे, सावे इत्यादि तुच्छ धान्यें, हिंग, गुग्गुळ, डिंक, मुळा, गाजर, शेवगा, करंज, लशुन, कांदा, हातानें घुसळलेलें दहीं, पांढरें वांगें, नारळ, पीलु, दोडके, तोंडले, भोपळा, चिंच, घोसावळें इत्यादि सर्व अभक्ष्य होत. अर्थात् हे पदार्थ नैवेद्याला उपयोगी नाहींत. या सर्व उताऱ्यावरून आपस्तंबापासून वृद्धहारितापर्यंत परिस्थितीप्रमाणें अभक्ष्य प्रकरण वाढतच गेलेलें आहे. तें संकोच मात्र पावलेलें नाहीं. हा शास्त्रांत सांगितलेला अभक्ष्यविचार आज पाळला जात नाहीं. ५० वर्षांपूर्वीहि तो पाळला जात नव्हता व पेशवाईंतहि तो तसाच पाळीत असत, याविषयीं प्रमाण नाहीं. येवढें खरें कीं शरीराच्या व बुद्धीच्या आरोग्याला हितकर असा आहार पाहिजे. शरीरांतील जोम, कांति, उत्साह हीं कायम राहून १०० वर्षे जगतां येईल, असा आहार कोणता हें ठरविण्याची आतां वेळ आली आहे. तसेंच शरीरधारणा, आरोग्य, चित्तैकाग्र्य व चित्तशुद्धि यांना पोषक असा सात्विक आहार कोणता हेंहि विचारपूर्वक ठरविलेंच पाहिजे. दूध, फळें, सुका मेवा म्हणजे आजचा महात्मागांधींचा आहार हा सात्विक व पारमार्थिकांना उपयुक्त आहे यांत शंका नाहीं. त्यांनीं फक्त शेळीच्या दुधाऐवजीं गोरस सेवन करावा. मूग, गहू, तांदूळ, साखर, तूप, तीळ हीं सर्व हविर्द्रव्येंहि सात्विक होत. यांचें स्निग्ध व मधुर पदार्थ करून खाल्यानें शरीर सत्वयुक्तच होईल. तेव्हां पारमार्थि-

कांचा, संन्याशी, त्यागी, साधक इत्यादींचा आहार ठरल्यासारखाच आहे. आतां व्यावहारिकांच्या आहाराची थोडी चर्चा करूं.

व्यावहारिक लोकांना पोटाकरितां अनेक व्यवसाय करावे लागतात, अर्थात् त्या त्या धंद्यांना पोषक असा आहार त्यांनीं केला पाहिजे. आजचें शास्त्र फार पुढें गेलें आहे व त्यानें धर्मशास्त्रापेक्षांहि अनेक उपयुक्त शोध पुढें मांडलेले आहेत. टमाटो हा तांबडा व मांसासारखा दिसतो म्हणून धर्मशास्त्र त्याचा निषेध करितें; परंतु आजचें वैद्यशास्त्र त्यामध्यें व्हिटामिना अधीक आहे म्हणून त्याचें सेवन करावयास सांगतें. ज्या लसणीचा निषेध सर्व धर्मशास्त्रकर्ते करितात ती लसूण अमृत वल्ली आहे, ती क्षयरोग, आंत्ररोग आणि कफक्षय नष्ट करिते, ती रोज खावी असें प्राणाचार्य लागवणकर म्हणत असत ! कांदा, गाजर, दोडका, तोंडले, कोहळा, वांगें हे सर्व पदार्थ आजच्या वैद्यशास्त्रानें निषिद्ध ठरविलेले नाहींत. कोंबडीच्या डिंकाचे लाडू अत्यंत पौष्टिक व मांसापेक्षां अधीक शक्ति देणारे असतांना तो डिंकच धर्मशास्त्रानें अभक्ष्यांत घातलेला आहे. कूष्मांडपाक अत्यंत पौष्टिक असें वैद्य सांगतात; परंतु धर्मशास्त्र त्याला अभक्ष्यांत ढकलतें. मुळा अत्यंत पाचक व शेवगा सारक आहे. दोडका आम नाहींसा करितो. हुलगा ज्वरघ्न आहे म्हणून त्याचें माडगें अजारांत देतात. धर्मशास्त्रानें अनेक अभक्ष्य ठरविलेल्या पदार्थांची नवीन शास्त्राचे आधारें परीक्षा झाली पाहिजे आणि आरोग्य व सुलभता या दोन्ही दृष्टीनें व्यावहारिकांना उपयुक्त असा आहार आतां सांगितला पाहिजे. धर्मशास्त्रानें भक्ष्य म्हणून सांगितलेले पदार्थ दुर्मीळ व महाग असले तर ते तरी कसे परवडणार म्हणून प्रापंचिकांना अवश्य व आर्थिक दृष्ट्याहि सोयीचा असा आहार ठरविला पाहिजे. या बाबतींत जुनें धर्मशास्त्र फारसें उपयोगी पडणार नाहीं. शाकाहाराप्रमाणेंच मांसाहारांतील वर्ज्यावर्ज्य विषयाची छाननी आतां झाली पाहिजे. धर्मशास्त्रांमध्यें रुरु, एण, हरिण, पृषत्, पाठीन, रोहित, माहिष, खड्ग इत्यादींचीं मांसें उत्तम म्हणून म्हटलेलें आहे. खरोखरीच हीं मांसें कां उत्तम आहेत व इतर निषिद्ध हीं कां त्याज्य आहेत, याचें शास्त्रहि जगापुढें आलें पाहिजे; अर्थात् हा विचार मांसाहाऱ्यांनीं केला पाहिजे.

काय खावें व काय न खावें हा विषय जसा विचारार्ह आहे; तसाच कोणाचे घरीं जेवावें व कोणाचें घरीं न जेवावें हाहि प्रश्न महत्वाचा आहे.

धर्म-शास्त्रामध्यें याचाहि विचार आहे. आज अनेक प्रसंगीं सहभोजन करणें अगत्याचें असतें म्हणून त्याचाहि परामर्श घेतला पाहिजे. पूर्वी ब्राह्मण व इतर सर्व वर्ण एका पंक्तीस बसून जेवीत असत व एकमेकांचे घरींहि भोजनास जात असत. शूद्रान्नाचा निषेध कांहीं स्मृतींत असला तरी त्यांतील कांहीं शूद्र अपवाद म्हणून भोजन करण्यास योग्य असे सांगितले आहेत. शूद्र, क्षत्रिय, वैश्य व ब्राह्मण यांतील ' अभोज्यान्न ' कोण हें येथें पहावयाचें आहे. या बाबतींतहि चमत्कार असा आहे कीं आपस्तंबापासून याज्ञवल्क्यापर्यंत सर्वांचीं अभोज्यांचीं नांवें अगदीं सारखी नसून तीं वाढत गेलीं आहेत.

सर्वेषां च शिल्पाजीवानाम् ॥ १८ ॥ ये च शस्त्रमाजीवन्ति ॥ १९ ॥
ये चाधिम् ॥ २० ॥ भिषक् ॥ २१ ॥
वार्धुषिकः ॥ २२ ॥ क्लीबः ॥ २७ ॥
राज्ञां प्रैषकरः ॥ २८ ॥ अहविर्याजी ॥ २९ ॥
चारी ॥ ३० ॥ अविधिना च प्रव्रजितः ॥ ३१ ॥
यश्चाग्नीनपास्यति ॥ ३२ ॥ आपस्तंब ( १–६–१८ )
मत्त उन्मत्तो बद्धोणिकः प्रत्युपविष्टो यश्च प्रत्युपवेशयते तावन्तं कालम् ॥ १ ॥ ( १–६–१९ )
चिकित्सकस्य मृगयोः शल्यकृन्तस्य पाशिनः ।
कुलटायाः षण्ढकस्य च तेषामन्तमनाद्यम् ॥ १४ ॥ ( १-६-१९ )
श्विन्नः शिपिविष्टः परतल्पगाम्यायुधीयपुत्रः ॥ आपस्तंब ( २-७-१७ )

शिल्पावर जगणारे ( क्षत्रिय सोडून ), शस्त्रावर निर्वाह करणारे, स्वतःचें घर भाड्यानें देऊन त्यावर निर्वाह करणारे, वैद्य, सावकार, वाढीदिडीचा धंदा करणारे, षंढ, राजसेवक, अभिचार, चेटुक वगैरे कर्मे करणारे, सारखा प्रवास करणारे, अविधीनें म्हणजे वैतागानें संन्यासी बनलेले, अग्नीचा त्याग केलेले, मत्त, उन्मत्त, बंदीखान्यांत जाऊन आलेले, पुत्रापासून विद्या शिकणारे, ऋण न फेडणारा देणेकरी, बाण व जाळी यांवर निर्वाह करणारा शिकारी, वेश्या, कोष्टा, अगम्यगमनी, आयुधजीवी इत्यादींचे घरीं जेऊं नये, असें आपस्तंब म्हणतो. हे सर्व अभोज्य ब्राह्मण वर्णांतील कां इतर वर्णांतील हा एक प्रश्नच आहे. कांहींनीं हे सर्व शूद्रेतर द्विजापैकीं होत असें उत्तर दिलेलें आहे. त्यावरून इ. स.

पू. ८०० च्या सुमारास वरील अनेक धंद्यावर त्रैवर्णिक निर्वाह करीत होते असेंच म्हणावें लागतें. मात्र ते धंदे सर्वमान्य झालेले नव्हते म्हणून हें निषेध-प्रकरण उपस्थित झालेलें असावें.

गौतमानेंहि प्र. २ अध्याय ८ मध्यें अभोज्यान्न सांगितलेले आहेत. त्यांत तो आपस्तंबापेक्षां आईबापांनीं ज्याला हाकलून दिलेलें आहे, ज्याचेवर समाजाचा बहिष्कार आहे, जो समाजांत चोरासारखा राहातो, स्वतःचें नांवहि सांगण्यास लाजतो, राजानें ज्याला दंडाधिकारावर नेमिलें आहे, शूद्र, वैश्यापुत्र, तक्षा, अतिलोभी व बाणाशिवाय शिकार करणारा; इतक्यांचीं नांवें अधीक सांगतो व हे सर्व अभोज्यान्न होत असें म्हणतो. बौधायन धर्मसूत्रांत हा विषयच नाहीं (हा विषय कां आला नाहीं कळत नाहीं.) वसिष्ठानें मात्र हा विषय घेतला आहे व पूर्व स्मृतिकारापेक्षा त्यानें अभोज्यामध्यें थोडी अधीकच भर घातलेली आहे.

चिकित्सकमृगयुपुंश्चलीदण्डिकस्तेनाभिशस्तषण्ढ
पतितानामन्नमभोज्यम् ॥ २ ॥
कदर्यदीक्षितबद्धातुरसोमविक्रयितक्षकरजक शौण्डिक
सूचक वार्धुषिक चर्मावकृत्तानां, शूद्रस्य चास्त्रभृतश्च ॥
वाचाऽभिघुष्टंगणान्नं गणिकान्नं चेति ॥ ४ ॥ अथाप्युदाहरन्ति ॥ ५ ॥
नाश्नन्ति श्ववतो देवा नाश्नन्ति वृषली पतेः ।
भार्याजितस्य नाश्नन्ति यस्य चोपपतिर्गृहे, इति ॥ ६ ॥ वसिष्ठ अ. १४

वसिष्ठानें दिलेल्या वरील नामावलींत आपस्तंब व गौतमापेक्षां चोर, पतित, सोमविक्रयी, रोगी, चहाडखोर, गारुडी, परीट, कलाल, शिंपी, वाढीदिढीचा व्यापारी, चामड्यांना रंग देणारा, शस्त्रधारी शूद्र, हीं नांवें अधीक आहेत व त्यांचें अन्न न खावें असें म्हटलें आहे. ज्या अन्नाची खूप चर्चा अगर वाटाघाट झाली आहे, जें अन्न अनेक व्यक्तींचें आहे अतएव अभोज्य होय. जो स्त्रीचे आधीन आहे, ज्यानें प्रौढ स्त्रीशीं विवाह केला आहे व ज्याच्या घरीं एक उपपति आहे, त्याचें अन्न देव स्वीकारीत नाहींत, असेंहि वसिष्ठ म्हणतो. मनूनें अ. ४ श्लो. २०७ ते २१७ मध्यें हाच भोज्याभोज्य विचार विवेचिला आहे. विस्तारभयामुळें मनूचे ते श्लोक देत नाहीं. परंतु मनूच्या श्लोकांचा अनुवाद अगदीं तंतोतंत ज्यामध्यें आहे असे शंखस्मृतींतील व याज्ञवल्क्य स्मृतींतील श्लोक येथें उद्धृत करितो.

शूद्रान्नं ब्राह्मणो भुक्त्वा तथा रंगावतारिणः ।
चिकित्सकस्य क्षुद्रस्य तथा स्त्रीमृगजीविनः ॥ ३५ ॥
षंढस्य कुलटायाश्च तथा बंधनचारिणः ।
बद्धस्य चैव चौरस्य अवीरायाः स्त्रियस्तथा ॥ ३६ ॥
चर्मकारस्य वेनस्य क्लीबस्य पतितस्य च ।
रुक्मकारस्य धूर्तस्य तथा वार्धुषिकस्य च ॥ ३७ ॥
कदर्यस्य नृशंसस्य वेश्यायाः कितवस्य च ।
गणान्नं भूमिपालान्नमन्नं चैव श्वजीविनम् ॥ ३८ ॥
मौंजिकान्नं सूतिकान्नं भुक्त्वा मासं व्रतं चरेत् ।
शूद्रस्य सततं भुक्त्वा षण्मासान्व्रतमाचरेत् ॥ ३९ ॥ शंख स्मृति अ. १७

वरील शंखवचनावरून पूर्वी सर्व वर्ण सर्वांकडे जेवीत असत हें उघड आहे. मात्र पुढील निबंधकारांनीं ओलें व कोरडें अन्न असे भेद केले. ( ते मुळांत नाहींत ). शूद्र, नट, वैद्य, क्षुद्र, स्त्रिया व पशु यावर जगणारा; षंढ, गणिका, बद्ध, चोर, अवीरास्त्री, चांभार, बुरुड, पतित, धूर्त, सावकार, विक्रू, निर्दय, लबाड, यांचें अन्न अभोज्य होय. तसेंच गणांनीं जमविलेलें व शिजविलेलें अन्न, राजान्न, मुंज व बारसें या प्रसंगांचीं अन्नें इत्यादि अभोज्य होत.

कदर्यबद्धचौराणां क्लीबरंगावतारिणाम् ।
वैणाभिशस्तवार्धुष्यगणिकागणदीक्षिणाम् ॥ १६१ ॥
चिकित्सकातुरक्रुद्धपुंश्चलीमत्तविद्विषाम् ।
क्रूरोग्रपतितव्रात्यदाम्भिकोच्छिष्टभोजनम् ॥ १६२ ॥
अविरास्त्रीस्वर्णकारस्त्रीजितग्रामयाजिनाम् ।
शस्त्रविक्रयकर्मारतन्तुवायश्ववृत्तिनाम् ॥ १६३ ॥
नृशंसराजरजककृतघ्नवधजीविनाम् ।
चैलधावसुराजीवसहोपपतिवेश्मनाम् ॥ १६४ ॥
पिशुनानृतिनोश्चैव तथा चाक्रिकबन्दिनाम् ।
एषामन्नं न भोक्तव्यं सोमविक्रयिणस्तथा ॥ १६५ ॥ याज्ञवल्क्य अ. १

याज्ञवल्क्यानें ही अभोज्यांची यादी सर्वांचें संकलन करून दिलेली आहे. या यादीप्रमाणें लोभी, कैदेंत पडलेला, चोर, नपुंसक, नट, बुरुड, शापित अगर तिरस्कृत, सावकार, गणिका, यज्ञावर जगणारा दीक्षित, वैद्य, डोक्कर, रोगी, रागीट,

व्यभिचारिणी, विद्या व द्रव्य यानें उन्मत्त, शत्रू, आंतून सारखा जळणारा, उग्र प्रकृतीचा, पतित, व्रात्य, लबाड, उच्छिष्ट खाणारा, पति पुत्र रहित स्त्री, सोनार, स्त्रैण, गांवजोशी, शस्त्रविक्रयी, लोहार, सुतार, शिंपी, श्ववृत्ति म्हणजे स्वाभिमान-शून्ययुक्त नोकर, निर्दय, राजा, रंगारी, कृतघ्न, वधजीवी ( मांग ), परीट, मद्यपी व मद्य विक्रयी, घरांत जारास आश्रय देणारा, टवाळखोर, खोटें बोलणारा, तेली, कुंभार, गाडीवान्, वाहानांचा धंदा करणारा, स्तुतिपाठक, सोमविक्रेता, हांजीहांजी करणारा इत्यादि सर्व लोक अभोज्यान्न होत. ही सर्व बेरीज सुमारें ५० पर्यंत जात आहे. हे सर्व अभोज्यान्न लोक ब्राह्मणापैकीं असावेत असें म्हटलें तर वरील सर्व प्रकारच्या धंद्यांत पूर्वी ब्राह्मण शिरले होते असें म्हणावें लागतें. वरील अभोज्यान्न हे ब्राह्मण नसून त्रैवर्णिक होते असें म्हटलें तर इतक्या सर्व व अशा तऱ्हेच्या इतर त्रैवर्णिकाकडे ब्राह्मण व इतरहि भोजनास जात येत असत व त्यावेळीं तें मान्य होतें असें सिद्ध होतें. पुढील काळांत हें चमत्कारिक वाटूं लागलें व कलिवर्ज्य प्रकरणानें तर सवर्णाचेंच अन्न ग्रहण करावें असें ठरविलें. त्यामुळें रोटिबंदी, लोटिबंदी सुरु झाली आणि दळणवळणाचा मोठा मार्ग बंद पडला. कित्येक जुने व सोवळे लोक वरील शास्त्रास अनुसरून कुठेंहि जेवीत नाहींत व परान्न घेत नाहींत. दुसरीकडे कुठेंच जेवावयाचें नाहीं असें ठरविलें म्हणजे वरील अभोज्यान्नांची कटकट आपोआप बंद पडते. एकंदरींत या अभोज्यांचा विचार केला तर आपस्तंब प्रथम सुमारें २५ नांवें देतो तर याज्ञवल्क्य तीं नांवें ५० चे वर वाढवितो. या नांवांत देशकालाप्रमाणें वाढ झाली आहे. अगदीं पहिल्या सूत्रकाराप्रमाणें पुढें नामावली दिलेल्या नाहींत. त्यावरून हाहि धर्म बदलत गेला व बदलणारा आहे असें सिद्ध होतें.

आज ब्राह्मण वर्गाचा इतरांच्या घरीं भोजनास जाण्याचा प्रघात नाहीं. परंतु ब्राह्मणापैकीं जे अभोज्य ब्राह्मण म्हणून शास्त्र म्हणतें तें शास्त्रहि हल्लीं गुंडाळून ठेविलें आहे. पूर्वी एका कालीं सर्व वर्ण एकमेका घरीं जेवीत असत. पण आज प्रत्येकानें आपापल्या जातींतील अभोज्यांकडे भोजन न करण्याचें ठरविलें तर तेंहि चालणार नाहीं. तात्पर्य हा भोज्याभोज्य विवेक आज पाळला जात नाहीं व पुढेंहि पाळला जाण्याची आशा नाहीं. तथापि व्यक्तिधर्माच्या दृष्टीनें आपल्या

घरांत कोणाला भोजन द्यावें व आपण कोणाच्या पंक्तीस भोजन करावें हें ठरविण्यास जो तो स्वतंत्र आहे. परंतु समष्टिदृष्ट्या राष्ट्रीय सभा, हिंदु महासभा आणि अशाच मोठमोठ्या सभा व साहित्य, नाट्य, वैद्यक इत्यादि संमेलनें, उत्सव, यात्रा अशा प्रसंगीं एका पंक्तीस बसून सर्वांनीं जेवणें हें इष्ट व अपरिहार्य आहे. एक आहार ज्यांचा आहे त्यांचीच एक पंगत व्हावी, अन्नाची शुद्धता, वाढपी व आचारी यांची शुद्धता व स्वच्छता इत्यादि काळजी पुष्कळच घेतली जावी. ज्यांना हें सहभोजन उर्फ एक पंक्ति भोजन अधर्म्य आहे असें वाटत असेल त्यांनीं तेथें जाऊंच नये व गेल्यास तो दोष नष्ट करण्याकरितां पुढील पंक्तिभेदाचें शास्त्र ध्यानांत ठेवावें.

अग्निना भस्मना वाऽपि स्तंभेन सलिलेन च।
द्वारेण चापमार्गेण पंक्तिभेदो बुधैः स्मृतः ॥ बृहस्पति ॥

उदकं च तृणं भस्म द्वारं पंथास्तथैव च।
एभिरंतरितं कृत्वा पंक्तिदोषो न विद्यते ॥ हारित ॥

दोन पाटामध्यें अग्नि ठेवला, भस्माची रेघोटी ओढली, पाण्याचा शिडकाव केला, एखादा खांब, दरवाजा आणि वाढण्याची वाट मध्यें असली म्हणजे पंगत तुटते व एक पंक्तीचा दोष लागत नाहीं. राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीनें हे प्रसंग येणार व आले पाहिजेत तेव्हां फार सोवळ्या लोकांनीं या ठिकाणीं जाऊंच नये व गेल्यानंतर वरील पंक्तिभेदाचें शास्त्र पाळावें.

सहभोजन म्हणजे एका ताटांत जेवणें व एकमेकांचे घरीं एकमेकांनीं जेवणें असा शास्त्रकारांचा अर्थ आहे. एका पंक्तीस जेवणें हें सहभोजन होय, ही अशास्त्रीय कल्पना फक्त महाराष्ट्रांत आहे. जेथें साहित्यकार्य, राष्ट्रकार्य, धर्मकार्य या नात्यानें माणसें एकत्र येतात तेथें होणारें सहभोजन शास्त्रदृष्ट्या गर्ह्य नाहीं. समानसंस्कृति, समानध्येय, समानआचार असलेल्यांनीं व जेथें आपलेपणा उत्पन्न झालेला आहे, अशा ठिकाणीं एकापंक्तीस जेवण्यांत दोष नाहीं. खरोखर ही भोजन चर्चा जितकी न होईल तितकी बरी ! केवळ भोजनांतच धर्म आहे ही कल्पना सर्वथैव त्याज्य होय.

# प्रकरण तेरावें

## धर्म-तारतम्य

धर्म हा विषय पुरुषबुद्धीला गोचर नाहीं. धर्मामध्यें पुरुषबुद्धीचा प्रवेश नाहीं. धर्म हा केवळ अदृष्ट, अलौकिक व अपूर्वाकरितां आहे, अशी एक पूर्वापार भ्रामक समजूत आहे. धर्माचा व्यवहाराशीं, अभ्युदयाशीं व लोकयात्रेशीं मुळींच संबंध नाहीं, हें म्हणणें साहसाचें आहे. धर्म हा सर्वांशानें पुरुषबुद्धीला गोचर होत नसला, तरी प्रत्येक धर्मकर्मांतील बराचसा धर्मांश पुरुषबुद्धीला समजण्याजोगा असतो. कोणत्याहि कर्माची दृष्ट व अदृष्ट अशीं दोन फलें असतात. स्नानाचें दृष्ट फल शरीर-शुद्धि हें होय! पण तेंच स्नान नित्य नियमितपणें प्रातःकाळीं करण्याचा नियम केला तर, दीर्घकालानें त्या नियमाचा अदृष्ट परिणाम आरोग्य, बुद्धि, दीर्घायुष्य इत्यादि वाढविण्यामध्यें होत असतो. दीर्घकालानें मिळणारें फळ हें अदृष्ट फल होय आणि तत्काल मिळणारें फल हें दृष्ट फल होय. मनःसमाधान, चित्ताची प्रसन्नता आणि एखादा नियम सतत पाळल्यामुळें उत्पन्न होणारा आत्मविश्वास हें त्या स्नान कर्माचें अदृष्ट फल होय.

मनुष्याला धर्माचें दृष्ट फल मुळींच न समजतें तर तो धर्माचरणाला प्रवृत्त झाला नसता. दृष्टापेक्षां क्वचित् प्रसंगीं धर्माचें अदृष्ट फल मोठें असूं शकेल किंवा क्वचित् अदृष्टापेक्षां दृष्टफलच अधीक असूं शकेल! मी अमुक धर्माचरण करतों, त्याचें मला अमुक फल मिळतें किंवा मिळावें या बुद्धीनेंच मनुष्य धर्मकर्म करतो. स्नान, संध्या, ईश्वरोपासना, जप, तप, व्रतें, उत्सव, स्पर्शास्पर्श अशा हरएक धर्माचरणाचें दृष्टफल असतेंच. धर्माचें दृष्टफल मनुष्य आपल्या कल्पनेनें ठरवितो व धर्माचरणास प्रवृत्त होतो. म्हणून शास्त्रकारांनीहि धर्माचीं दृष्टफलें, कुठें अर्थवादात्मक, तर कुठें सयुक्तिक आणि कुठें बुद्धिमानांनाच पटणारी, अशीं सांगितलेलीं आहेत. 'अहिंसा, सत्य, अस्तेय' इत्यादि नीतिधर्मांचें व श्राद्धपक्ष, स्नानसंध्या, अतिथीपूजा, दानधर्म इत्यादि धार्मिक आचारांचें आचरणहि तारतम्यानें, धोरणानें आणि व्यवहार कुशलतेनेंच केलें पाहिजे. तसें न केल्यास प्रसंगीं दृष्टफल जरी अनिष्ट न दिसलें, तथापि त्यापासून उत्पन्न होणारें अदृष्ट व अपूर्व फारच

विपरीत बनण्याचा संभव असतो. कुपात्रीं दान केल्यास दृष्ट परिणाम एकदम वाईट होणार नाहीं. परंतु लोकांच्या कुपात्रीदानानें जर दुर्जन माजला, तर तो पुढें लोकांना तापदायक होतो, म्हणून तारतम्यानें, धोरणानें व कौशल्यानेंच धर्माचरण केलें पाहिजे.

स्मृतिकारांनीं सांगितलेल्या अनेक धर्माचारांचा व्यवहाराशीं व अभ्युदयाशीं कसा संबंध आहे, त्यांचें दृष्टफलच मुख्य कसें आहे आणि त्या फलाचा पुरुष-बुद्धीशीं कसा संबंध आहे, हें या प्रकरणांत साधार दाखवावयाचें आहे. प्रथम आपस्तंब काय म्हणतो तें पाहूं.

छायायां मूत्रपुरीषयोः कर्म वर्जयेत् ॥ १६ ॥
अग्निमादित्यमपो ब्राह्मणं गा देवताश्चाभिमुखो
मूत्रपुरीषयोः कर्म वर्जयेत् ॥ २० ॥ ( १-११-३० )
शूद्रमभ्यागतं कर्मणि नियुञ्ज्यात् । अथास्मै दद्यात् ॥ १९ ॥
ये नित्या भाक्तिकास्तेषामनुपरोधेन संविभागो विहितः ॥ १० ॥
काममात्मानं भार्यां पुत्रं वोपरुन्ध्यान्न त्वेव दासकर्मकरम् ॥ ११ ॥
तथा चात्मानोनुपरोधं कुर्याद्यथा कर्मस्वसमर्थः स्यात् ॥१२॥ (२-४-९)
भिक्षणे निमित्तमाचार्यो विवाहो यज्ञो मातापित्रो-
र्बुभूर्षार्हतश्च नियम विलोपः ॥ १ ॥
तत्र गुणान्समीक्ष्य यथाशक्ति देयम् ॥ २ ॥ ( २-५-१० )
इन्द्रिय प्रीत्यर्थस्य तु भिक्षणमनिमित्तम् ।
न तदाद्रियेत ॥ ३ ॥ ( २-५-१० )
अकरः श्रोत्रियः ॥ १० ॥ आपस्तंब ( २-१०-२६ )

आपस्तंबादि धर्मसूत्रकारांनीं जे धर्मविधी सांगितलेले आहेत, त्यांत व्यवहार, धोरण, तारतम्य व लोकसंग्रह या सर्वांचा समावेश आहे. नुसती शास्त्राज्ञा म्हणून धर्माचरण करावें असें नसून देशकालपरिस्थिती इ. ध्यानीं घेऊनच धर्माचरण केलें पाहिजे. आपस्तंबानें तारतम्यानें कोणत्या धर्माज्ञा केल्या आहेत हें पाहणें मनोरंजकच आहे.

आपस्तंबः—वृक्षाच्या सावलीमध्यें ( खालीं ) मलमूत्र करूं नये, ( कारण झाडाच्याखालीं सावलीच्या आश्रयास कोणीहि मनुष्य येऊन बसण्याचा संभव

असतो. अग्नि, सूर्य व इतर देवता म्हणजे आपणास पूज्य अशा ज्या व्यक्ति अगर देवता असतील त्यांच्या समोर शौचास अगर लघवीस बसूं नये, हें कोणालाहि पटण्याजोगें आहे. दोनप्रहरच्या वेळेला कोणी अतिथी आला तर विद्वानाचा सत्कार आधीं करावा. शूद्र अतिथी आला तर त्याला अन्न द्यावेंच, पण त्याच्याकडून काम करून घेऊन मग त्याला अन्न द्यावें. जे आपणावर नोकरचाकर अवलंबून आहेत, त्यांच्या पगारामध्यें काटकसर करून व त्यांच्याशीं घासाघीस करून वाचविलेल्या पैशाचा दानधर्म न करावा. प्रसंगीं आपल्या बायकामुलांच्या गरजा कमी कराव्या, पण नोकरांचे पगार वेळेवर द्यावेत व त्यांच्याशीं त्या बाबतींत फारशी घासाघीस करूं नये. कोणतेंहि दान करितांना, त्यामुळें आपलें सामर्थ्य क्षीण न होईल व आपणास त्यामुळें दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहाण्याचा प्रसंग न येईल, अशी दक्षता ठेवावी. आचार्याला गुरुदक्षिणा देणें, विवाह, यज्ञ, आणि आईबापांचें पोषण करणें, अग्निहोत्र चालविणें, या निमित्त आलेल्या याचकांनाच द्रव्य द्यावें.+ अनेक मागणारे आले तर त्यामध्यें अधीक गुणवान् जो असेल त्याच्या गुणाची परीक्षा करूनच यथाशक्ति द्यावें. केवळ धंदा म्हणून लुच्चेगिरीनें चैनीकरितां जो भिक्षा मागत असेल त्याला धुडकावून लावावें. कोणत्याहि राजाच्या राज्यांत विद्वानाला उपाशी, वस्त्रहीन व थंडीवाऱ्याची बाधा होईल अशा तऱ्हेचा राहाण्याचा प्रसंग न यावा.

आपस्तंबानें ज्या वरील धर्माज्ञा केलेल्या आहेत, त्या सर्व अदृष्टाकरितां, अपूर्वाकरितां आहेत असें नाहीं. विद्वानापासून कर घेऊं नये. तसेंच सत्पात्रीं दान करावें, लुच्चांना धुडकावून लावावें. हे सर्व व्यवहार चातुर्याचेच नियम आहेत. व्यवहाराला सोडून कसें तरी वागणें, हें धर्मसंमत नाहीं.

प्रतिश्रुत्याप्यधर्मसंयुक्ताय न दद्यात् ॥ २१ ॥

ऋत्विगाचार्यश्वशुरपितृव्यमातुलानामुपस्थाने मधुपर्कः ॥ २५ ॥

गौतम (अ. ५ प्र. १)

नित्यं शुचिः सुगंधिः स्नानशीलः ॥ ३ ॥

सति विभवे न जीर्णमलवद्वासाः स्यात् ॥ ४ ॥

---

+ अत्रीनें ब्रह्मचारी, यति, विद्यार्थी, वाटसरू, गुरुपोषक व वृत्तिच्छेद झालेला, असे ६ भिक्षुक सांगितले आहेत.

न रक्तमुल्बणमन्यधृतं वासो बिभृयात् ॥ ५ ॥
न रुढश्मश्रुरकस्मात् ॥ ८ ॥
न वाय्वग्निविप्रादित्यापो देवता गाश्च
प्रति पश्यन्वा मूत्रपुरीषामेध्यान्व्युदस्येत ॥ १३ ॥
न म्लेच्छाशुच्याधार्मिकैः सह संभाषेत ॥ १७ ॥ गौतम ( अ.९प्र.१ )
चलतश्चैतान्स्वधर्मे स्थापयेत् ॥ १० ॥
देशजातिकुलधर्माश्चाऽऽम्नायैरविरुद्धाः प्रमाणम् ॥ २० ॥
गौतम ( अ. २ प्र. )
शक्तितः प्रकर्षेद्गुणसंस्कारविधिरन्नस्य ॥ ६ ॥ यथोत्साहं वा ॥ ८ ॥
श्रोत्रियान्वाग्रूपवयःशीलसंपन्नान् ॥ ९ ॥
विवाहमैथुननर्मार्तसंयोगेष्वदोषमेकेऽनृतम् ॥ २९ ॥
गौतम ( अ. ६ प्र. २ )

गौतमः—एकाद्या मनुष्याला आपण मुलगी व इतर कांहीं देतो, असें देतो म्हणून कबूल केलें व नंतर तो लबाड आहे असें कळलें, तर त्याला कांहीं देऊं नये. ऋत्विज, आचार्य, चुलता, मामा व सासरा अशी वडील मंडळी एक वर्षांनीं आल्यास त्यांचा मधुपर्कानें आदरसत्कार करावा. गृहस्थानें नेहमीं स्वच्छ, पवित्र, स्नानशील व व्यवस्थित असावें. योग्यता व आनकूल्य असतांना, घाणेरडीं, फाटकीं अशीं वस्त्रें धारण करूं नयेत. दुसऱ्याचे कपडे वापरूं नयेत. विनाकारण हजामत वाढवूं नये. पूज्य व्यक्ति व पदार्थ यांच्या समोर मलमूत्रोत्सर्ग करूं नये. अधार्मिक, अपवित्र व म्लेंच्छ इत्यादींशीं संभाषण करूं नये. चातुर्वर्ण्यांतील लोक धर्मापासून च्युत होऊं लागले तर राजानें त्यांना पुनः धर्मानें वागण्यास भाग पाडावें. वेदाला विरुद्ध नसलेलेच, देश, जाति व कुलधर्म हे प्रमाण होत. श्राद्धाला आपली शक्ति, हौस व योग्यता यांना अनुरुप अशीं पक्वान्नें करावींत; वाणी, रूप, वय, विद्या व शीलसंपन्न अशा श्रोत्रिय ब्राह्मणांना भोजनास बोलवावें. खोटें बोलूं नये हें खरें, पण विवाह, मैथुन, थट्टा, आजार अशा प्रसंगीं खोटें बोलून जर इष्ट कार्य घडत असेल तर त्यांत दोष नाहीं.

पञ्चधा विप्रतिपत्तिर्दक्षिणतस्तथोत्तरतः ॥ १९ ॥
यानि दक्षिणतस्तानि व्याख्यास्यामः ॥ २० ॥

तथैतदनुपेतेन सह भोजनं स्त्रिया सह भोजनं
पर्युषितभोजनं मातुलपितृष्वसृदुहितृगमनमिति ॥ २१ ॥
अथोत्तरत ऊर्णाविक्रयः सीधुपानमुभयतोदद्भिर्व्यवहार
आयुधीयकं समुद्रसंयानमिति ॥ २२ ॥
इतरदितरस्मिन्कुर्वन्दुष्यतीतरादितरस्मिन् ॥ २३ ॥
तत्र तत्र देशप्रामाण्यमेव स्यात् ॥ २४ ॥ बौधायन (प्र. १ अ. १)
आसनं शयनं यानं नावः पथि तृणानि च ।
श्वचण्डालपतितस्पृष्टं मारुतेनैव शुध्यति ॥ ६२ ॥
शूद्रश्चेदागतस्तं कर्मणि नियुञ्ज्यात् ॥ १७ ॥ (प्र. १ अ. ५)
पन्था देयो ब्राह्मणाय गवे राज्ञे ह्यचक्षुषे ।
वृद्धाय भारतप्ताय गर्भिण्यै दुर्बलाय च ॥ ५७ ॥
द्वौ दैवे पितृकार्ये त्रीनेकैकमुभयत्र वा ।
भोजयेत्सुसमृद्धोऽपि न प्रसज्येत विस्तरे ॥ २९ ॥ (प्र. २ अ. ३)
सत्क्रियां देशकालौ च शौचं ब्राह्मणसंपदम् ।
पञ्चैतान्विस्तरो हन्ति तस्मात्तं परिवर्जयेत् ॥ ३० ॥ (प्र. २ अ. ८)
अन्तरा प्रातराशं च सायमाशं तथैव च ।
सदोपवासी भवति यो न भुङ्क्ते कदाचन ॥ ३६ ॥ (प्र. २ अ. ७)

बौधायनः—( हा सूत्रकार इसवीसनापूर्वी सहाव्या शतकांतला असतांना इतक्या प्राचीन काळीं समाजामध्यें अनाचार वाढलेले होते. ) दक्षिण देशांत पांच अनाचार विप्रतिपत्ति व उत्तर देशांत पांच विप्रतिपत्ति ( अनाचार+ ) आहेत असें तो म्हणतो. समाजामध्यें धर्माचरण करण्याला अनुकुल परिस्थिति नसली म्हणजे शास्त्रांत न सांगितलेल्या गोष्टीहि कराव्या लागतात व त्यांना पुढें दीर्घ-कालानें मान्यताहि मिळते. अनुपनीत व स्त्रिया यांच्याशीं एका ताटांत जेवणें, शिळें अन्न खाणें आणि मामा व आत्या यांच्या मुलीशीं लग्नें लावणें हे दक्षिणे-कडील अनाचार होत. उत्तर देशांतील अनाचारामध्यें लोकर विकणें, मद्यपान

+ बौधायनानंतर अनाचार वाढले नाहींत असें नाहीं. पण त्यांचा निर्देश नाहीं.

करणें, आयुधांवर जगणें, समुद्रगमन करणें व एकच पदार्थ दोघांनीं दोन्ही बाजूंनीं दातानें तोडणें ( विड्या तोडणें वगैरे ) इत्यादि गोष्टी आहेत. प्रत्येक अनाचार हा त्या त्या देशांतच प्रमाण होय. एका देशांतील अनाचार दुसऱ्या देशांत केल्यास त्यांत दोष आहे.

आसन, शय्या, वाहन, नौका आणि रस्त्यावरील गवत यांना कुत्रे, चंडाल व पतित यांचा स्पर्श झाल्यास वरील पदार्थ वाऱ्याच्या झुळकेनेंच शुद्ध होतात. शूद्र अतिथीला काम देऊन जेवूं घालावें. मार्गानें जातांना समोरून आंधळा, वृद्ध, भारानें दमलेला, गरोदर स्त्री व दुर्बल यांपैकीं कोणी आल्यास, तसेंच विद्वान् ब्राह्मण व राजा आल्यास आपण बाजूस होऊन त्यांना मार्ग द्यावा. हा सामान्य तारतम्याचा शिष्टाचार आहे व तो प्रत्येक स्मृतिकारानें कमी अधीक प्रमाणानें सांगितलेला आहे. पूर्वीच्या काळीं रस्ते बरेच अरुंद असावेत, म्हणून हा शिष्टाचार जेथें तेथें सांगितला असावा. प्रशस्त व रुंद रस्त्यावर आधीं वाट कुणाला द्यावी, हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. म्हातारा मनुष्य, ओझ्यानें वाकलेला, आंधळापांगळा यांना वाट कां द्यावी, हें पुरुषबुद्धीला सहज कळण्यासारखें आहे. यांत कांहीं अदृष्ट नाहीं, अपूर्व नाहीं व गूढहि नाहीं.

श्राद्धविषय प्रत्येक स्मृतिकारानें पुष्कळ सांगितला असून, सर्वांचें मत असें आहे कीं, कितीहि अनुकूलता असली तरी श्राद्ध-विस्ताराच्या भानगडींत शहाण्यानें पडूं नये. देवस्थानीं व पितृस्थानीं एकेक किंवा देवस्थानीं दोन व पितृस्थानीं तीन असे ब्राह्मण सांगून श्राद्ध उरकावें. पुष्कळ ब्राह्मण, पुष्कळ पदार्थ यामुळें सत्क्रिया, देशकाल व पावित्र्य यांत वैगुण्य येतें. सुटसुटीत, आटोपशीर व त्वरित होणारें कार्य हेंच पवित्र असूं शकतें. जितका विस्तार जास्ती, तितका पवित्रपणा कमी, हें तत्त्व खरें आहे. मध्यें न खातां फक्त दोन वेळ जेवणारा मनुष्य सदा उपवासी समजावा.

> यस्य चैव गृहे मूर्खो दूरे चैव बहुश्रुतः ।
> बहुश्रुताय दातव्यं नास्ति मूर्खे व्यतिक्रमः ॥ १० ॥
> ब्राह्मणातिक्रमो नास्ति विप्रे वेदविवर्जिते ॥

यश्च काष्ठमयो हस्ती यश्च चर्ममयो मृगः ।
यश्च विप्रोऽनधीयानस्त्रयस्ते नामधारकाः ॥ १२ ॥
रजसा शुध्यते नारी नदी वेगेन शुध्यति ।
भस्मना शुध्यते कांस्यं ताम्रमम्लेन शुध्यति ॥ ५४ ॥
अद्भिर्गात्राणि शुध्यन्ति मनः सत्येन शुध्यति ।
विद्यातपोभ्यां भूतात्मा बुद्धिर्ज्ञानेन शुध्यति ॥ ५६ ॥
अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः ।
क्षेत्रदारहरश्चैव षडेते ह्याततायिनः ॥ १९ ॥
आततायिन मायान्तमपि वेदान्तपारगम् ।
जिघांसन्तं जिघांसीयान्न तेन ब्रह्महा भवेत् ॥ २० ॥
स्वाध्यायिनं कुले जातं यो हन्यादाततायिनम् ।
न तेन भ्रूणहा स स्यान्मन्युस्तं मृत्युमृच्छति ॥ २१ ॥ वसिष्ठ अ. ३
आमपात्रे यथान्यस्तं क्षीरं दधि घृतं मधु ।
विनश्येत्पात्रदौर्बल्यातच्च पात्रं रसाश्च ते ॥ २९ ॥
एवं गां च हिरण्यं च वस्त्रमश्वं महीं तिलान् ।
अविद्वान्प्रतिगृह्णानो भस्मी भवति दारुवत् ॥ ३० ॥ वसिष्ठ अ. ६
सत्क्रियां देशकालौ च शौचं ब्राह्मणसंपदम् ।
पञ्चैतान्विस्तरो हन्ति तस्मात्तं परिवर्जयेत् ॥ २५ ॥
अपि वा भोजयेदेकं ब्राह्मणं वेदपारगम् ।
श्रुतशीलोपसंपन्नं सर्वालक्षण वर्जितम् ॥ २६ ॥ वसिष्ठ अ. ११
देवद्रोण्यां विवाहेषु यज्ञेषु प्रकृतेषु च ।
काकैः श्वभिश्च संस्पृष्टमन्नं तन्न विसर्जयेत् ॥ २२ ॥
तस्मादन्नमपोध्दृत्य शेषं संस्कारमर्हति ॥
अन्नं पर्युषितं भावदुष्टं सकृल्लेखं पुनःसिद्धमामम् ।
मांसं पक्वं च कामं तु दध्ना घृतेन वाऽभिघारितमुपयुञ्जीत ॥ अ. १४
उद्वाहकाले रतिसंप्रयोगे प्राणात्यये सर्वधनापहारे विप्रस्य चार्थे ह्यनृतं वदेयुः पञ्चानृतान्याहुरपातकानि ॥ ३१ ॥ अ. १६
राजभिर्धृतदण्डास्तु कृत्वा पापानि मानवाः ।

निर्मलाः स्वर्गमायान्ति सन्तः सुकृतिनो यथा ॥ ३० ॥ अ. १९

वसिष्ठः—ज्याच्या घरीं मूर्ख ब्राह्मण आहे व विद्वान् ब्राह्मण तेथून फार दूर आहे, तर विद्वानालाच दान द्यावें, घरच्या मूर्खाला देऊं नये व त्यांत दोष नाहीं. अविद्वान् ब्राह्मणाला न दिल्यास तो अतिक्रम होत नाहीं. अविद्वान् ब्राह्मण हा काष्टाचा हत्ती व चर्ममृगाप्रमाणेंच समजावा. स्त्री रजःस्रावानें, नदी ही वेगानें, काशाचें भांडें भस्मानें व तांबें चिचेनें शुद्ध होतें. स्थूल शरीर पाण्यानें, मन सत्यानें, विद्या व तप यांनीं अन्तःकरण व ज्ञानानें बुद्धि शुद्ध होते. हा शुद्धिप्रकार किती मार्मिक व तर्कशुद्ध आहे बरें ? घर पेटविणारा, विष देणारा, शस्त्रानें मारणारा, द्रव्य हरण करणारा आणि बायको व शेत उपटणारा, असे हे सहा आततायी होत. अंगावर चालून येणारा आततायी मनुष्य जरी वेदांतपारग ब्राह्मण असला, तथापि त्याला ठार केल्यास ब्रह्महत्येचा दोष लागत नाहीं. आततायी जरी विद्वान् व कुलीन असला तथापि त्याला ठार केल्यास भ्रूणहत्येचा दोष लागत नाहीं, कारण त्याच्या दुष्कर्मापासून उत्पन्न झालेला राग हाच त्याला ठार करतो. कच्च्या मडक्यांत दूध, दहीं, तूप इत्यादि ठेवल्यास जसें तें नासतें, त्याप्रमाणें अश्व, वस्त्र, हिरण्य, इत्यादि अविद्वानाला दिल्यास अगदीं निरुपयोगी होतात. वसिष्ठानें श्राद्धविधी व श्राद्धविस्ताराचा संकोच इतराप्रमाणें सांगितला आहे. तो म्हणतो विद्वान्, शीलसंपन्न व अलक्षणांनीं वर्जित असा एक ब्राह्मण जरी श्राद्धदिवशीं जेवूं घातला तरी बस्स आहे. देव-यात्रा, विवाह व यज्ञप्रसंगीं जर मोठ्या अन्नाच्या राशीला कुत्रें, कावळा अगर असेंच कोणी येऊन शिवलें तर तें सर्व अन्न टाकूं नये. जेवढ्या भागाला कुत्र्याचें तोंड अगर कावळ्याची चोंच लागली असेल, तेवढें अन्न टाकावें व बाकीच्यावर प्रोक्षण करून खुशाल खावें. हाच विषय असाच पुढें पराशरानें सांगितला आहे. शिळें अन्न, विसकटलेलें अन्न, दुर्लक्षित व कच्चें अन्न हें दुधाचा किंवा तुपाचा त्यावर अभिघार करून ( शिंपडून ) खुशाल खावें. विवाह, मैथुन, प्राणात्यय, सर्वस्वापाहारप्रसंग व ब्राह्मणकार्य अशा प्रसंगीं खोटें बोलल्यास दोष नाहीं. हे प्रसंग म्हणजे सत्याचे अपवाद होत. राजाज्ञेनें अधिकृत असलेल्या लोकांनीं राजाचा हुकूम बजावण्याकरितां जरी पातकें केलीं तथापि त्यांना दोष लागत नाहीं. वसिष्ठाच्या वरील प्रत्येक धर्माज्ञेंत व्यवहार, धोरण, दृष्टफल हीं नाहींत, असें म्हणणें हा शुद्ध आग्रह होय.

गुरोः कुले न भिक्षेत न ज्ञातिकुलबन्धुषु ।
अभावेऽप्यथ गेहानां पूर्वं पूर्वं विवर्जयेत् ॥ ५६ ॥ उशनः ( अ. १ )
तुषाङ्गारकपालेषु राजमार्गे तथैव च ।
न क्षेत्रे न बिले चापि न तीर्थे च चतुष्पथे ॥ ३९ ॥ ( अ. २ )
अपूपञ्च हिरण्यञ्च गामश्वं पृथिवीं तिलान् ।
अविद्वान् प्रतिगृह्णानो भस्मीभवति काष्ठवत् ॥ ११८ ॥ ( अ. ३ )
निमंत्रितश्च यो विप्रो ह्यध्वानं याति दुर्मतिः ॥
भवन्ति पितरस्तस्य तन्मासं पांशुभोजनाः ॥ ९ ॥
न श्राद्धे भोजयेन्मित्रं धनैः कार्योऽस्य संग्रहः ॥ ( अ. ५ )
क्रियाहीनस्य मूर्खस्य महारोगिण एव च ।
ये एषां मरणाख्याहुर्मरणान्तमशौचकम् ॥ ९ ॥
कारवः शिल्पिनो वैद्या दासीदासास्तथैवच ॥ ५५ ॥
राजानो राजभृत्याश्च सद्यः शौचाः प्रकीर्तिताः ।
सत्रिणो व्रतिनस्तावत् सद्यः शौचमुदाहृतम् ।
राजा चैवाभिषिक्तश्च प्राणसत्रिण एवच ॥ ५७ ॥
यज्ञे विवाहकाले च देवयागे तथैव च ।
सद्यः शौचं समाख्यातं दुर्भिक्षे वाप्युपद्रवे ॥ ५८ ॥
विषाद्युपहतानाञ्च विद्युता पार्थिवैर्द्विजैः ।
सद्यः शौचं समाख्यातं सर्पादिमरणेऽपिच ॥ ५९ ॥
अग्निमेरूप्रपतने विषोघाम्रपराशने ।
गोब्राह्मणान्ते सन्यस्ते सद्यः शौचं विधीयते ॥ ६० ॥ उशनः अ. ६

उशनः संहिताः— गुरुगृहीं व गुरूचे आप्तेष्ट यांच्या घरीं भिक्षा मागूं नये. ( तसें केल्यास तो गुरूंना व त्यांच्या आप्तेष्टांना दुहेरी उपद्रव होतो. ) राजमार्ग, चव्हाटा, तीर्थ, क्षेत्र, बीळ अशा ठिकाणीं मलमूत्रोत्सर्ग करूं नये. अविद्वान् व कुपात्र यांना दान दिल्यास तें व्यर्थ होतें. श्राद्धाचें निमंत्रण घेतलेल्या ब्राह्मणानें व्रतस्थ राहावें व परगांवीं जाऊन श्राद्धघात करूं नये. श्राद्धदिवशीं योग्य ब्राह्मणच भोजनास बोलवावेत. आप्त, इष्ट, मित्र, जावई, अधिकारी अशांना, त्या दिवशीं श्राद्धाचे ब्राह्मण म्हणून भोजनास सांगूं नये. सर्व धर्मशास्त्रकर्त्यांनीं सूतकाच्या

बाबतींत फारच तारतम्य सांगितलेलें आहे. क्रियाहीन, मूर्ख व महारोगी हे मरेपर्यंत सुतकी होत. मजुरी व शिल्प करणारे, दासीदास, राजसेवक, वैद्य, न्हावी इत्यादि लोक स्नानानें तत्काल शुद्ध होतात व आपआपलीं कार्यें बंद न ठेवतां तीं चालवूं शकतात. ब्रह्मचारी, यज्ञ करणारा यजमान व अभिषिक्त राजा हे तत्काल शुद्ध होतात. यज्ञ, विवाह व देवयाग, दुर्भिक्ष व इतर आपत्ति अशा प्रसंगीं दहा दिवस अशौच न धरतां स्नानानें तत्काल शुद्धि होते. सर्पदंश, विष-प्राशन, विद्युत्पात, अग्निकाष्ठभक्षण, मेरुप्रपतन ( कड्यावरून लोटणें ) यामुळें मेलेल्या, किंवा राजदूतांनीं मरावयास भाग पाडलेल्या मनुष्याचें अशौच दहा दिवस धरण्याचें कारण नाहीं, केवळ स्नानानें शुद्धि समजावी.

नित्यं नैमित्तिकं काम्यं क्रियांगमलकर्षणम् ।
क्रियास्नानं तथा षष्ठं षोढा स्नानं प्रकीर्तितम् ॥ १
सर्वे प्रस्रवणाः पुण्याः सरांसि च शिलोच्चयाः ।
नद्यः पुण्यास्तथा सर्वा जाह्नवी तु विशेषतः ॥ १४
यस्य पादौ च हस्तौ च मनश्चैव सुसंयतम् ।
विद्या तपश्च कीर्तिश्च स तीर्थफलमश्नुते ॥ १५ ॥ शंखस्मृति अ. ८
श्राद्धं कृत्वा प्रयत्नेन त्वराक्रोधविवर्जितः ।
उञ्छमन्नं द्विजातिभ्यः श्रद्धया विनिवेदयेत् ॥ १२
म्लेच्छदेशे तथा रात्रौ संध्यायां च विशेषतः ।
न श्राद्धमाचरेत्प्राज्ञो म्लेच्छदेशे न च व्रजेत् ॥ ३० ॥ शंखस्मृति अ. १४
जनने मरणे चैव सपिंडानां द्विजोत्तमः ।
त्र्यहाच्छुद्धिमवाप्नोति योऽग्निवेदसमन्वितः ॥ १
सपिंडता तु पुरुषे सप्तमे विनिवर्तते ।
नामधारकविप्रस्तु दशाहेन विशुध्यति ॥ २ ॥ शंखस्मृति अ. १५
शुद्धं प्रसारितं पण्यं शुद्धे चाजाश्वयोर्मुखे ॥ शंखस्मृति अ. १६

शंखस्मृतिः—नित्य, नैमित्तिक, काम्य, क्रियांग, मल नष्ट करणारे व कामानंतर अवश्य अशीं सहा स्नानें आहेत. पुढें पराशरानें आतपस्नान, वायुस्नान व मृत्तिकास्नान हीं तारतम्यानेंच सांगितलीं आहेत. तळीं व विहिरी यापेक्षां वाहातें पाणी पवित्र होय. उंच डोंगरावरून वहाणाऱ्या नद्या या अधिक पवित्र व

सर्वांत गंगा ही पवित्रतम होय. ज्याचीं कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें व मन हीं संयत आहेत व जो तप व विद्या यांनीं युक्त आहे, तोच तीर्थफलाला प्राप्त होतो. संताप व घाई न करतां श्राद्ध करावें. ब्राह्मणांना श्रद्धेनें अन्न द्यावें. संध्याकाळीं, रात्रीं व म्लेंच्छदेशांमध्यें श्राद्ध करूं नये. अग्नि व वेद यांनीं युक्त असणाऱ्या ब्राह्मणानें सपिंडाचें जनन व मरणाशौच फक्त तीन दिवस पाळावें. पण नामधारक विप्रानें तें दहा दिवस पाळलें पाहिजे. सात पिढ्यानंतर सापिंड्य नष्ट होतें. यज्ञपात्रें, भूमि, घर, लाकूड इत्यादींची शुद्धि शंखानें युक्तीला पटेल अशीच सांगितली आहे. मुखाशिवाय गाय शुद्ध, आश्रमांतील मांजर शुद्ध, बाजारांतील पदार्थ शुद्ध आणि शेळी व घोडा यांचीं तोंडें नेहमीं शुद्ध समजावींत. उशनःसंहिते-प्रमाणेंच विष्णुधर्मसूत्रांत तारतम्यानें जो धर्म सांगितलेला आहे, तो आतां पाहूं.

विद्युत् नृपहतानां नाशौचं। न राज्ञां राजकर्मणि । न व्रतिनां व्रते ।
न सत्रिणां सत्रे । न कारूणां कारुकर्मणि ॥ न देशविप्लवे ।
आपद्यपि कष्टायाम्। मृत्तोयैः शुध्यते शोध्यं नदी वेगेन शुध्यति ॥
रजसा स्त्री मनोदुष्टा सन्यासेन द्विजोत्तमः ॥ ९० ॥ विष्णु अ. २२
लौकिकं वैदिकं वापि तथाध्यात्मिकमेव वा ।
आददीत यतो ज्ञानं न तंद्रुह्येत कदाचन ॥ ४३ ॥ अ. २९
जीवितं धर्मकामौ च धने यस्मात् प्रतिष्ठितौ ।
तस्मात् सर्वप्रयत्नेन धनहिंसां विवर्जयेत् ॥ १६
प्राणिहिंसापरो यस्तु धनहिंसापर स्तथा ।
महादुःखमवाप्नोति धनहिंसापरस्तयोः ॥ १७ ॥ अ. ५२
गंधलेपक्षयकरं शौचं कुर्यात्
वटार्कखदिरकरंजबदरनिंबअपामार्गमालतीबिल्वानामन्यतमं ।
कषायं तिक्तं कटुकं च ॥ अ. ६०
वृद्ध-भारि-नृप-स्नात-स्त्री-रोगिवर-चक्रिणाम् ।
पन्था देयो नृपस्त्वेषां मान्यः स्नातश्च भूपतेः ॥ ५१ ॥ अ. ६४
नाजीर्णे ( अश्नीयात् ) नार्धरात्रे । नार्द्रवासाः ।
न बालकान् निर्भर्त्सयेत् । नैकोमिष्टं ( अश्नीयात् ) अ. ६८
न कंचनावमन्येत । न हीनान् सेवेत । नाश्लीलं कीर्तयेत् ॥ अ. ७१

न शूद्रराज्ये निवसेत । नाधार्मिके जनाकीर्णे ।
द्वौ दैवे त्रीन् पित्र्योः एकैकमुभयत्र वा ॥ अ. ७३
सर्वदानाधिकं अभयप्रदानं दानं ॥ अ. ९२

विष्णुः— अशौच धर्म विष्णूनें इतराप्रमाणें तारतम्यानें सांगितला आहे. माती व पाणी हीं सर्वांचें शोधन करितात. नदी ही वेगानें, ब्राह्मण चतुर्थाश्रमानें व मनांत परपुरुषेच्छा उत्पन्न झालेली स्त्री ही विटाळशीपणानें शुद्ध होते. कित्येक स्मृतिकारांनीं जारकर्म, बलात्कार व परपुरुषसंभोग यामुळें भ्रष्ट झालेली स्त्री ही रजःस्रावानें शुद्ध होते, असें म्हटलें आहे. पण विष्णु हा मनोदुष्ट स्त्रीलाच तें प्रायश्चित्त सांगतो. वैदिक किंवा लौकिक कोणतेंहि ज्ञान हें कोठूनहि ग्रहण करावें. ज्ञानदाता अमक्या जातीचा किंवा धर्माचा म्हणून त्याचा द्रोह करूं नये. मनुष्याचें जीवित, त्याचे अर्थ व काम हे पुरुषार्थ, हे द्रव्यामुळें साध्य होतात, म्हणून यत्नानें कोणाचीहि धनहिंसा करूं नये, म्हणजे त्याचें द्रव्य लुबाडूं नये. प्राण-हिंसा आणि धन-हिंसा यामध्यें धनहिंसेचें पातक अधिक आहे. विष्णूचें हें हिंसातारतम्य फारच विचारार्ह आहे. अनेक स्मृतिकारांनीं शौचशुद्धीकरितां मातीचे गोळे शरीराच्या भागांना लावण्यास सांगितले आहे. पण विष्णू म्हणतो कीं दुंगणाची घाण जाईपर्यंत शुद्धि करावी. तेथें गोळे व माती यांचा प्रश्न नाहीं. दांत व काष्ठ यांच्या संयोगांत अपूर्व नाहीं तर दांत चांगले घासण्यामध्यें अपूर्व म्हणजे एकदम लक्षांत न येणारे असें फल आहे. कडु, तुरट, आंबट अशा जातीचीं काष्ठें दंतधावनाला असावीत. बेल, बोर, कडुलिंब, खेर, रुई, आघाडा इत्यादींचीं काष्ठें दंतधावनास योग्य होत. विष्णूचें हें म्हणणें प्रत्यक्ष फल सांगणारेंच आहे. येथें अपूर्वाचा कांहीं संबंध नाहीं. श्राद्ध-संकोच व मार्गांतून जातांना वाट देणें, हा विषय विष्णूनें इतराप्रमाणेंच सांगितला आहे, पण त्याशिवाय सर्व सामान्य व मार्मिक नियम सांगितले आहेत ते असेः—मध्यरात्रीं व अजीर्णोत्तर जेवूं नये. ओलेत्यानें जेवूं नये, अपशब्द बोलूं नयेत, कोणाचा अपमान करूं नये. मुलांची निर्भर्त्सना करूं नये व मुलाबाळांना न देतां एकट्यानें मिष्टान्न खाऊं नये. सर्व दानांमध्यें कुणी अन्नदान, कुणी विद्यादान, कुणी श्राद्धदान, श्रेष्ठ आहे असें म्हणतात पण विष्णूनें सर्व दानांमध्यें अभयदान हें श्रेष्ठ होय, असें म्हटलें आहे.

चाक्रिणो दशमीस्थस्य रोगिणो भारिणः स्त्रियाः ।
स्नातकस्य च राज्ञश्च पन्था देयो वरस्य च ॥ १३८ ॥
तेषां तु समवेतानां मान्यौ स्नातकपार्थिवौ ।
राजस्नातकयोश्चैव स्नातको नृपमानभाक् ॥ १३९ ॥ मनु अ. २
सुवासिनीः कुमारीश्च रोगिणो गर्भिणीः स्त्रियः ।
अतिथिभ्योऽग्र एवैतान्भोजयेदविचारयन् ॥ ११४
सत्क्रियां देशकालौ च शौचं ब्राह्मणसंपदः ।
पञ्चैतान्विस्तरो हन्ति तस्मान्नेहेत विस्तरम् ॥ १२६
एकैकमपि विद्वांसं दैवे पित्र्ये च भोजयेत् ।
पुष्कलं फलमाप्नोति नामंत्रज्ञान्बहूनपि ॥ १२९ ॥
न श्राद्धे भोजयेन्मित्रं धनैः कार्योऽस्य संग्रहः ॥ अ. ३
न सीदेत्स्नातको विप्रः क्षुधाशक्तः कथंचन ।
न जीर्णमलवद्वासा भवेच्च विभवे सति ॥ ३४ ॥
यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ।
यद्यदात्मवशं तु स्यात्तत्तत्सेवेत यत्नतः ॥ १५९
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥ १६०
न वार्यपि प्रयच्छेत्तु बैडालव्रतिके द्विजे ।
न बकव्रतिके विप्रे नावेदविदि धर्मवित् ॥ १९२
यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान्बुधः ।
यमान्पतत्यकुर्वाणो नियमान्केवलान्भजन् ॥ २०४ ॥ अ. ४
सर्वेषामेव शौचानामर्थशौचं परं स्मृतम् ।
योऽर्थे शुचिः स शुचिर्न मृद्वारिशुचिः शुचिः ॥ १०६
क्षान्त्या शुद्ध्यन्ति विद्वांसो दानेनाकार्यकारिणः ।
प्रच्छन्नपापा जप्येन तपसा वेदवित्तमाः ॥ १०७ ॥
नित्यं शुद्धः कारुहस्तः पण्ये यच्च प्रसारितम् ।
ब्रह्मचारिगतं भैक्ष्यं नित्यं मेध्यमिति स्थितिः ॥ १२९ ॥ अ. ५
तं देशकालौ शक्तिं च विद्यां चावेक्ष्य तत्त्वतः ।

यथार्हतः संप्रणयेन्नरेष्वन्यायवर्तिषु ॥ १६ ॥
दण्डः शास्ति प्रजाः सर्वा दण्ड एवाभिरक्षति ।
दण्डः सुप्तेषु जागर्ति दण्डं धर्मं विदुर्बुधाः ॥ १८ ॥
यदि न प्रणयेद्राजा दण्डं दण्ड्येष्वतन्द्रितः ।
शूले मत्स्यानिवापक्ष्यन्दुर्बलान्बलवत्तराः ॥ २० ॥
अलब्धं चैव लिप्सेत लब्धं रक्षेत्प्रयत्नतः ।
रक्षितं वर्धयेच्चैव वृद्धं पात्रेषु निःक्षिपेत् ॥ ९९ ॥
एतच्चतुर्विधं विद्यात्पुरुषार्थप्रयोजनम् ।
अस्य नित्यमनुष्ठानं सम्यक्कुर्यादतन्द्रितः ॥ १०० ॥
बकवच्चिन्तयेदर्थान्सिंहवच्च पराक्रमेत् ।
वृकवच्चावलुम्पेत शशवच्च विनिष्पतेत् ॥ १०६ ॥
आपदर्थं धनं रक्षेद्दारान्रक्षेद्धनैरपि ।
आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ॥ २१३ ॥ अ. ७
सभां वा न प्रवेष्टव्यं वक्तव्यं वा समंजसम् ॥
बलाद्दत्तं बलाद्भुक्तं बलाद्यच्चापि लेखितम् ।
सर्वान्बलकृतानर्थानकृतान्मनुरब्रवीत् ॥ १६८ ॥ अ. ८
आरभेतैव कर्माणि श्रान्तः श्रान्तः पुनः पुनः ।
कर्माण्यारभमाणं हि पुरुषं श्री र्निषेवते ॥ ३०० ॥ अ. ९
शक्तः परजने दाता स्वजने दुःखजीविनि ।
मध्वापातो विषास्वादः सधर्मप्रतिरूपकः ॥ ९ ॥
भृत्यानामुपरोधेन यत्करोत्यौर्ध्वदेहिकम् ।
तद्भवत्यसुखोदर्कं जीवतश्च मृतस्य च ॥ १० ॥
योऽसाधुभ्योऽर्थमादाय साधुभ्यः संप्रयच्छति ।
सकृत्वा प्लवमात्मानं संतारयति तावुभौ ॥ १९ ॥
तस्य भृत्यजनं ज्ञात्वा स्वकुटुम्बान्महीपतिः ।
श्रुतशीले च विज्ञाय वृत्तिं धर्म्यां प्रकल्पयेत् ॥ २२ ॥
यद्गर्हितेनाचरन्ति कर्मणा ब्राह्मणा धनम् ।
तस्योत्सर्गेण शुध्यंति जप्येन तपसैव च ॥ १९३ ॥

अनुक्त निष्कृतीनां तु पापानामपनुत्तये ।
शक्तिं चावेक्ष्य पापं च प्रायश्चित्तं प्रकल्पयेत् ॥ २०९ ॥
ख्यापनेनानुतापेन तपसाऽध्ययनेन च ।
पापकृन्मुच्यते पापात्तथादानेन चापदि ॥ २२७ ॥
यथा यथा नरोऽधर्मं स्वयं कृत्वानुभाषते ।
तथा तथा त्वचेवाहिस्तेनाधर्मेण मुच्यते ॥ २२८ ॥
यथा यथा मनस्तस्य दुष्कृतं कर्म गर्हति ।
तथा तथा शरीरं तत्तेनाधर्मेण मुच्यते ॥ २२९ ॥
कृत्वा पापं हि संतप्य तस्मात्पापात्प्रमुच्यते ।
नैवं कुर्यां पुनरिति निवृत्त्या पूयते तु सः ॥ २३० ॥
तपोमूलमिदं सर्वं दैवमानुषकं सुखम् ॥
ब्राह्मणस्य तपो ज्ञानं तपः क्षत्रस्य रक्षणम् ।
वैश्यस्य तु तपो वार्ता तपः शूद्रस्य सेवनम् ॥ २३५ ॥
यद्दुस्तरं यद्दुरापं यद्दुर्गं यच्च दुष्करम् ।
सर्वं तु तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ॥ २३८
यथैधस्तेजसा वन्हिः प्राप्तं निर्दहति क्षणात् ।
तथा ज्ञानाग्निना पापं सर्वं दहति वेदवित् ॥ २४६ ॥ अ. ११
यादृशेन तु भावेन यद्यत्कर्म निषेवते ।
तादृशेन शरीरेण तत्तत्फलमुपाश्नुते ॥ ८१ ॥
वेदाभ्यासस्तपो ज्ञानमिन्द्रियाणां च संयमः ।
अहिंसा गुरुसेवा च निःश्रेयसकरं परम् ॥ ८३ ॥
सर्वेषामपि चैतेषामात्मज्ञानं परं स्मृतम् ।
तद्ध्यग्र्यं सर्वविद्यानां प्राप्यते ह्यमृतं ततः ॥ ८५ ॥
तपो विद्या च विप्रस्य निःश्रेयसकरं परम्
तपसा किल्बिषं हन्ति विद्ययाऽमृतमश्नुते ॥ १०४ ॥ मनु. अ. १२

मनुः—मार्गांतून जाताना आधीं कुणाला वाट द्यावी, हें मनूनें इतराप्रमाणें सांगतलें आहे. पण विद्वान् व राजा असे दोघे जर समोरून आले, तर विद्वानाला

आधीं मार्ग द्यावा. अतिथीच्या पूर्वी गरोदर स्त्रिया, लहान मुलें, मुली व वृद्ध इत्यादींना भोजन दिलें तर त्यांत दोष नाहीं. श्राद्ध-विस्तर न करतां संकोचच मनूनें सांगितला आहे. अमंत्र व अविद्वानांना श्राद्धीय भोजन देण्यापेक्षां विद्वानालाच देवस्थानीं व पितृस्थानीं बसवून भोजन दिल्यास श्राद्धफळ मिळतें. गृहस्थानें अनुकूल असतांना उपाशी मरूं नये व जुने कपडे धारण करूं नयेत. परवशकर्माचा यत्नानें त्याग करावा व स्वायत्त कर्माचा स्वीकार करावा. परवशतेमध्यें दुःख आहे व स्वाधीनतेमध्यें सुख आहे. दांभिक, शठ, बकध्यानी व बोकोबाचें व्रत चालविणाऱ्या ब्राह्मणांना पाणीसुद्धां देऊं नये. मनुष्यानें सतत संयमी असावें व अनेक नियम धरूं नयेत. सर्व पावित्र्यामध्यें अर्थपावित्र्य हें श्रेष्ठ होय. माती व पाणी यांच्या शुद्धीपेक्षां सर्वांत दुसऱ्याचें द्रव्य न लुबाडणें ही शुद्धि श्रेष्ठ होय. क्षमेनें विद्वान्, दानानें अकर्म करणारे, जपानें प्रच्छन्न पातकी व तपानें वेदवेत्ते, शुद्ध होतात. शिल्पकाराचा हात, बाजारांत मांडलेले पदार्थ व ब्रह्मचाऱ्यानें आणलेलें अन्न हीं सदा शुद्ध होत.

मनूनें सर्व पावित्र्यामध्यें परधन विषासमान मानणें हें मोठें पावित्र्य होय असें जें म्हटलें आहे; तें किती विचारार्ह, सयुक्तिक व योग्य आहे बरें ! स्नानसंध्या, सोवळें ओवळें आणि इतर नियम पाळणाऱ्यांनीं हें अर्थशौच पाळल्यास दुधांत साखर पडल्यासारखी होईल ! राजानें अन्यायानें वागणाऱ्यांना त्याचें वय, शक्ति व त्यांची विद्या हीं लक्ष्यांत घेऊनच दंड करावा. दंडाशिवाय जग चालणार नाहीं. दंडच सर्वांना जागरूक ठेवतो, दंडच सर्वांचें रक्षण करतो म्हणून दंड हा धर्म होय. राजा जर निरलसपणें दंडाचा उपयोग न करील, तर बलवान् लोक दुर्बलांना माशाप्रमाणें खाऊन टाकतील. न मिळालेलें मिळवावें, मिळालें असेल तें रक्षावें, रक्षिलेलें वाढवावें व वाढविलेल्या द्रव्याचा विनियोग सत्पात्रीं करावा. पुरुषार्थाचें प्रयोजन वरील चतुष्टय हेंच होय. वरील चतुष्टयाचें आचरण दक्षतेनें करावें. बकासारखे अर्थचिंतन करावें, सिंहासारखा पराक्रम करावा, लांडग्यासारखी झडप घालून सशासारखी झुकांडी द्यावी. आपत्कालाकरितां द्रव्य रक्षावें, द्रव्यानें कुटुंबाचें रक्षण करावें आणि द्रव्य व कुटुंब यांच्या सहाय्यानें स्वतःचें रक्षण करावें. आधीं सभेंत जाऊं नये व गेल्यास असमंजस बोलूं नये. बलात्कारानें दिलेलें, भोगलेलें व लिहून घेतलेलें हें सर्व झालें नाहीं असेंच समजावें.

श्राद्धाला ब्राह्मण म्हणून मित्र, जांवई वगैरे सांगूं नयेत. इत्यादि आणि अशौचविचार, शुद्धिविचार व आततायी वधाचा विचार मनूनें पूर्वस्मृतिकारांप्रमाणेंच केला आहे. मनानें दूषित झालेली स्त्री रजस्रावानें शुद्ध होते. हें मनूचें म्हणणें विष्णूप्रमाणेंच आहे. मनुष्यानें पुनः पुन्हां यत्न केला पाहिजे. न थकतां सारखा यत्न केल्यानेंच मनुष्य संपत्ति मिळवितो. घरच्या लोकांना दुःख देऊन, बाहेरच्यांना औदार्यानें सुख देणारा मनुष्य हा धर्माचें एक सोंगच होय. त्याची कृति आरंभीं मधुर व शेवटीं कडू अशीच असते. घरांतील बायकामुलांना व सेवकांना पोटभर अन्नवस्त्र न देतां जो मेलेल्यांचें और्ध्वदेहिक खूप खर्च करून करतो तें त्याचें कर्म इहपरलोकीं सुखकर होत नाहीं. जो लबाडांचें द्रव्य हरण करून तें सत्पुरुषांना देतो, तो स्वतः सेतु ( पूल ) बनून सज्जन व लबाड या दोघांना तारून पलीकडे नेतो. राजानें ब्राह्मणाचें कुटुंब व इतर परिवार जाणून आणि त्याची विद्वत्ता लक्ष्यांत घेऊन त्याचा योगक्षेम चालवावा. अन्यायानें मिळविलेल्या द्रव्याचा त्याग ब्राह्मणांनीं करावा आणि जप व तप करावें. ज्या पापांची निष्कृति सांगितलेली नाहीं. त्यावेळीं शक्ति व पाप आणि इतर सर्व पाहूनच प्रायश्चित्त सांगावें. पापी मनुष्य पश्चाताप, अध्ययन, दान, तप व केलेल्या पापाचा उच्चार यानें शुद्ध होतो.

मनुष्य जसजसा आपल्या पापाचा उच्चार पश्चात्तापानें व मोकळेपणें करील, तसतसा तो त्वचेपासून मुक्त झालेल्या सर्पाप्रमाणें पापमुक्त होतो. दुष्कर्माबद्दल जितका तिटकारा उत्पन्न होईल, तितका मनुष्य अधर्मापासून मुक्त होतो. वाईट गोष्ट केल्याचा पश्चात्ताप व मी ती पुन्हां कधीं करणार नाहीं असा निश्चय यामुळें मनुष्य पापविमुक्त होतो. या जगांतील दैवी व मानुषी सुखें तपोमूलकच आहेत. ज्ञान, रक्षण, व्यापार व सेवा हीं अनुक्रमें ब्राह्मणक्षत्रियादींचीं तपें होत. तपानें काय पाहिजे तें मिळूं शकतें. दुष्कर, दुस्तर व दुर्लभ असें जें कांहीं असेल तें सर्व तपानेंच साध्य होतें. अग्नि जसा एका क्षणांत सर्पणाला जाळून टाकतो, त्याप्रमाणें वेदवेत्ता मनुष्य ज्ञानाग्नीनें सर्व पापें जाळून टाकतो. ज्या भावनेनें जें कर्म केलें जातें, त्याचें फल त्या त्या भावनेनेंच भोगावें लागतें. वेदाभ्यास, तप, इंद्रियनिग्रह, अहिंसा हींच निश्रेयसदायक होत. सर्वांमध्यें आत्मज्ञान हें श्रेष्ठ, सर्व विद्यामध्यें अग्रेसर व अमृत देणारें असें आहे. तप आणि विद्या हींच ब्राह्मणाची

निश्रेयसाचीं साधनें आहेत. तपाच्या योगानें पाप नष्ट होतें व विद्येनें अमृतत्त्वाची म्हणजे मोक्षाची प्राप्ति होते. भगवान् मनूच्या वरील विचारांत सर्वत्र सयुक्तिकता, तर्कशुद्धता आणि प्रत्यक्ष व्यवहार यांचा मिलाफ आहे.

# प्रकरण चौदावें

## धर्म-तारतम्य ( पुढें चालू )

गेल्या प्रकरणांत आपस्तंबापासून मनूपर्यंत कोणी, कसें व कुठें धर्मतारतम्य सांगितलें आहे हें पाहिलें. हा विषय येवढ्यावरच आटोपण्याजोगा नाहीं. प्रत्येक स्मृतिकारानें केलेली धर्म-तारतम्य-व्यवस्था वाचकांना कळणें अवश्य आहे. लोकांना स्वतंत्रपणें बुद्धि चालविण्याची सवय लागली पाहिजे आणि ती लागण्यास याज्ञवल्क्यापासून देवलापर्यंतचे सर्व स्मृतिकार कसें साह्य करितात हें दाखविण्याकरितां थोडा ग्रंथविस्तार झाला तरी तो क्षम्य समजून हें प्रकरण आरंभिलें आहे. प्रत्येक स्मृतिकार धर्माचा अभ्युदयाशीं संबंध कसा जोडीत आहे, हें वाचकांनीं सावधानतेनें पाहावें.

सकृत्प्रदीयते कन्या हरंस्तां चौरदण्डभाक् ।
दत्तामपि हरेत्पूर्वाच्छ्रेयांश्चेद्वर आव्रजेत् ॥ ६५ ॥
विप्राहिक्षत्रियात्मानो नावज्ञेयाः कदाचन ।
आमृत्योः श्रियमाकांक्षेन्न कंचिन्मर्मणि स्पृशेत् ॥ १५३ ॥
न विद्यया केवलया तपसा वापि पात्रता ।
यत्र वृत्त मिमे चोभे तद्धि पात्रं प्रकीर्तितम् ॥ २०० ॥
विद्यातपोभ्यां हीनेन नतु ग्राह्यः प्रतिग्रहः ॥
श्रान्तसंवाहनं रोगिपरिचर्या सुरार्चनम् ।
पादशौचं द्विजोच्छिष्टमार्जनं गोप्रदानवत् ॥ २०९ ॥ याज्ञवल्क्य अ. १
स्मृत्यो र्विरोधे न्यायस्तु बलवान् व्यवहारतः ।
अर्थशास्त्रात् तु बलवत् धर्मशास्त्रमिति स्थितिः ॥ २१ ॥ अ. २

सर्वधर्ममयं ब्रह्म प्रदानेभ्योऽधिकं यत : ॥ २१२ ॥ अ. १
देवातिथ्यर्चनकृते गुरुभृत्यार्थमेव वा ।
सर्वतः प्रतिगृह्णीयादात्मवृत्त्यर्थमेव च ॥ २१६ ॥ याज्ञवल्क्य अ. १
अतो न रोदितव्यं हि क्रियाः कार्याः स्वशक्तितः ॥ ११ ॥
दाने विवाहे यज्ञे च संग्रामे देशविप्लवे ।
आपद्यपि हि कष्टायां सद्यःशौचं विधीयते ॥ २९ ॥
मलिनो हि यथाऽऽदर्शो रूपालोकस्य न क्षमः ।
तथाविपक्वकरण आत्मज्ञानस्य न क्षमः ॥ १४१ ॥ अ. ३
यस्मिन्देशे य आचारो व्यवहारः कुलस्थितिः ।
तथैव परिपाल्योऽसौ यदा वशमुपागतः ॥ ३४३ ॥
दैवे पुरुषकारे च कार्यसिद्धिर्व्यवस्थिता ॥
यथा ह्येकेन चक्रेण रथस्य न गति र्भवेत् ।
एवं पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति ॥ ३५१ ॥
ज्ञात्वाऽपराधं देशं च कालं बलमथापि वा ।
वयः कर्म च वित्तं च दण्डं दंड्येषु पातयेत् ॥ ३६८ ॥ अ. १
कालोऽग्निः कर्म मृद्वायुर्मनो ज्ञानं तपो जलम् ।
पश्चात्तापो निराहारः सर्वेऽमी शुद्धिहेतवः ॥ ३१ ॥ याज्ञवल्क्य अ. ३

मनूनंतर झालेल्या अनेक स्मृतिकारांनीं बहुतेक पूर्वीचेच विषय सांगितले आहेत. कांहीं विशेष गोष्टी ज्या त्यांनीं सांगितल्या आहेत, तेवढ्यांचाच निर्देश येथें योग्य होय. रस्त्यांत आधीं वाट कुणाला द्यावी व अतिथीपूर्वीं कोणाला भोजन द्यावें हें मनूप्रमाणेंच याज्ञवल्क्यानें सांगितलें आहे.

याज्ञवल्क्यः—कन्येचें दान एकदांच करावयाचें असतें. तिचें हरण करणाऱ्या चोराला चांगली शिक्षा करावी. विवाह ठरल्यावर त्यापेक्षां जर चांगला वर मिळत असेल तर पूर्वीचें लग्न मोडावें. ब्राह्मण, साप, क्षत्रिय व स्वतःची मनोदेवता यांचा अवमान करूं नये. कोणालाहि मर्मस्पर्शी न बोलतां मरेपर्यंत लक्ष्मीची इच्छा करावी. रस्त्यांतील चिखल आणि असलेच अंत्यज, काक इत्यादींनीं स्पर्शिलेले पदार्थ वाऱ्याच्या झुळुकीनें शुद्ध होतात. केवळ ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जन्मला म्हणून तो कसाहि असला तरी श्रेष्ठ असें मनु व पराशर स्मृतींत आहे, पण

याज्ञवल्क्य म्हणतो, केवल विद्या किंवा केवल तप यांनीं पात्रता न वाढतां, शील आणि विद्या व तप यांचे योगानेंच पात्रता वाढते. तप व विद्या-विहीनानें दान घेऊं नये, घेतल्यास दोष आहे. दमलेल्यांची सेवा, रोग्यांची शुश्रुषा, देवपूजा आणि विद्वत्सेवा व ब्राह्मणांची उष्टी काढणें इत्यादि कर्मे गोप्रदानाप्रमाणें पुण्यकारक समजावीं.

स्मृतिमध्यें परस्पर विरोध असल्यास व्यवहारानें मानलेली रूढी हीच श्रेष्ठ होय. अर्थशास्त्रापेक्षां धर्मशास्त्र अधिक बलवान् होय. सर्व दानांमध्यें विद्यादान श्रेष्ठ होय. त्यामुळें ब्रह्मलोकाची प्राप्ति निश्चित होते. देव, अतिथि, गुरु या निमित्त व स्वोदरपोषणार्थ पाहिजे त्याकडून दान घ्यावें. मनुष्य मेल्यानंतर त्याबद्दल रडत न बसतां त्याचें कार्य त्याच्या पश्चात् यथाशक्ति चालवावें. विवाह, यज्ञ, संग्राम, दुष्काळ, आपत्ति व दान अशा प्रसंगीं सुतक अगर सोयराची अडचण आल्यास स्नानानें तत्काल शुद्धि होते. घाणेरड्या आरशामध्यें जसें तोंड दिसत नाहीं त्याप्रमाणें पापयुक्त अन्तःकरणाला आत्मज्ञान होत नाहीं. ज्या देशांत जो आचार व जी कुलस्थिति असेल, त्या देशांत त्याचें तसेंच अनुष्ठान करावें. दैव व यत्न या दोघांमुळेंच कार्यसिद्धी होते. रथ जसा एका चाकानें चालूं शकत नाहीं, त्याप्रमाणें यत्नाशिवाय दैव सिद्ध होत नाहीं. देश, काल, अपराध, वय आणि वित्त हीं सर्व ध्यानांत घेऊनच प्रायश्चित्ताची योजना करावी. कोणत्याहि पापाच्या शुद्धीचीं काल, अग्नि, माती, वायु, पाणी, उपास व पश्चात्ताप हीं कारणें समजावींत. या साधनांनीं सर्व पातकें नष्ट होतात.

एकाहाच्छुध्यते विप्रो योऽग्निवेदसमन्वितः ।
त्र्यहात्केवलवेदस्तु द्विहीनो दशभिर्दिनैः ॥ ५ ॥ पराशर अ. ३
काकश्वानावलीढं तु गवाघ्रातं खरेण वा ।
स्वल्पमन्नं त्यजेद्विप्रः शुद्धिर्द्रोणाढके भवेत् ॥ ७१ ॥
अन्नस्योद्धृत्य तन्मात्रं यच्च लालाहतं भवेत् ।
सुवर्णोदकमभ्युक्ष्य हुताशेनैव तापयेत् ॥ ७२ ॥ अ. ६
रजसा शुध्यते नारी विकलं या न गच्छति ।
नदी वेगेन शुद्ध्येत लेपो यदि न दृश्यते ॥ ४
तूलिकाद्युपधानानि रक्तवस्त्रादिकानि च ।

शोषयित्वार्कतापेन प्रोक्षणाच्छुद्धतामियुः ॥ ३२ ॥
मार्जारमक्षिकाकीटपतंगकृमिदर्दुराः ।
मेध्यामेध्यं स्पृशंतो ये नोच्छिष्टं मनुरब्रवीत् ॥ ३३ ॥
अग्निरापश्च वेदाश्च सोमसूर्यानिलास्तथा ।
एते सर्वेऽपि विप्राणां श्रोत्रे तिष्ठान्ति दक्षिणे ॥ ३९ ॥
प्रभासादीनि तीर्थानि गंगाद्याःसरितस्तथा ।
विप्रस्य दक्षिणं कर्णे सान्निध्यं मनुरब्रवीत् ॥ ४० ॥ अ ७
स्नानानि पंच पुण्यानि कीर्तितानि मनीषिभिः ।
आग्नेयं वारुणं ब्राह्मं वायव्यं दिव्यमेव च ॥ ९ ॥
आग्नेयं भस्मना स्नानमवगाह्य तु वारुणम् ।
आपोहिष्ठेति च ब्राह्मं वायव्यं गोरजः स्मृतम् ॥ १० ॥ अ. १२
इतरेषामहोरात्रं पंचगव्यं च शोधनम् ॥ ४२ ॥ अ. १०
गृहस्थस्तु दयायुक्तो धर्ममेवानुचिंतयेत् ।
पोष्यवर्गार्थसिद्ध्यर्थं न्यायवर्ति स बुद्धिमान् ॥ ४२ ॥
न्यायोपार्जितवित्तेन कर्त्तव्यं ह्यात्मरक्षणम् ।
अन्यायेन तु यो जीवेत्सर्वकर्मबहिष्कृतः ॥ ४३ ॥
कुटुंबिने दरिद्राय श्रोत्रियाय विशेषतः ।
यद्दानं दीयते तस्मै तद्दानम् शुभकारकम् ॥ ४८ ॥
रामचंद्रसमादिष्टं नलसंचयसंचितम् ।
सेतुं दृष्ट्वा समुद्रस्य ब्रह्महत्यां व्यपोहति ॥ ६८ ॥
गाश्चैवैकशतं दद्याच्चातुर्विद्येषु दक्षिणाम् ।
ब्राह्मणानां प्रसादेन ब्रह्महा तु विमुच्यते ॥ ७१ ॥ अ. १२
क्षत्रियश्चापि वैश्यश्च क्रियावन्तौ शुचिव्रतौ ।
तद्गृहेषु द्विजैर्भोज्यं हव्यकव्येषु नित्यशः ॥ १३ ॥ पराशर अ. ११

पराशरः—अग्नि व वेद यांनीं युक्त असलेल्या ब्राह्मणाला एक दिवसापेक्षां अधिक सुतक नाहीं. वैदिकानें तीन दिवस व वेदशास्त्रविहीनानें दहा दिवस सपिंडाचें अशौच पाळावें. स्नानसंध्या-विहीन, भ्रष्ट व केवळ जातीच्या ब्राह्मणानें

दहा दिवस सुतक धरावें. वैद्य, दासदासी, शिल्पी, कारु, राजे व यज्ञ करणारा यजमान हे सर्व स्नानानें तत्काल शुद्ध होतात. पराशरानें वरील अशौच निर्णय इतरांप्रमाणेंच सांगितला आहे. कुत्रें, कावळा, गाढव यांचा स्पर्श झालेल्या अन्नाची शुद्धि, वसिष्ठाप्रमाणेंच सांगितली आहे. कुत्र्याच्या तोंडाची लाळ जेथें लागली असेल तेवढें अन्न टाकून प्रोक्षणानें इतर अन्नाची शुद्धि करावी व मग तें खुशाल खावें. गाद्यागिरद्या, उश्या, उंची वस्त्रें हीं उन्हांत टाकावींत व तीं प्रोक्षणानें शुद्ध होतात. मांजर, माशी, पतंग, बेडकी इत्यादींनीं जरी मेध्यामेध्य पदार्थांचा स्पर्श केला असला तरी त्यांच्या स्पर्शाचें अन्न उष्टें व अपवित्र समजूं नये. पराशरानें भूमी, गृह आणि इतर सर्व पदार्थांच्या शुद्धीचा विचार इतरां-प्रमाणेंच केलेला आहे. पण विशेष आहे तो असा-अग्नि, चंद्र, सूर्य, वायु इत्यादि देवता, ब्राह्मणाच्या उजव्या कानाच्या ठिकाणी असतात. म्हणून तेथें गंगायमुनादि नद्या, प्रभासादि तीर्थें वास करीत असतात. अर्थात् उजव्या कानाला स्पर्श केल्यानें अनेक पातकें नष्ट होतात. म्हणून दोष-नाशार्थ कर्णस्पर्श करावा. पराशरानें नुसतें जलस्नान सांगितलेलें नसून, भस्मानें अग्निस्नान, धुळीनें वायुस्नान, उन्हानें दिव्यस्नान, मार्जनानें ब्राह्मस्नान व प्रत्यक्ष पाण्यांत बुडून वारुणस्नान होतें, असें तो म्हणतो. वायु, आतप व अग्नि हीं स्नानें अनेक प्रायश्चित्तांना रूढ करण्याजोगीं आहेत. पंचगव्य हें तर सर्वांचें शोधन करतेंच.

गृहस्थानें सदयतेनें वागावें व धर्म-चिंतन करावें, परिवाराच्या पोषणाकरितां न्यायानें वागून मिळविलेल्या द्रव्यानें आत्मरक्षण करावें. विद्वान्, दरिद्री व कुटुंबवत्सल अशा मनुष्याला दान दिल्यास तें शुभकारक होतें. पराशर पूर्वकालीन स्मृतिकारांनीं ब्रह्महत्येच्या पातक-निवृत्तीकरितां मरणाचें प्रायश्चित्त आणि कोठें कोठें तर द्वादशवर्षांचें कडक प्रायश्चित्त सांगितलें आहे. परंतु पराशरानें सेतुदर्शनानें ब्रह्महत्या नष्ट होते, असें म्हटलें आहे. रामानें सांगितल्यावरूनच नळानें बांधलेला सेतु पाहावा, शंभर गायींची वेदवेत्त्यांना दक्षणा देऊन त्यांचा प्रसाद मिळवावा, म्हणजे ब्रह्महत्या नष्ट होते. ब्राह्मणानें क्षत्रिय व वैश्य यांच्या घरीं ते क्रियावान् व शुचि असल्यास हव्यकव्यप्रसंगीं अवश्य भोजन करावें व शूद्रापैकीं दास नापित गोपाल इत्यादिकांच्या घरीं प्रसंगीं जेवावें. पूर्व स्मृति-कारापेक्षां पराशरानें कांहीं बाबतींत फारच तारतम्य व धोरण दाखविलेलें आहे.

रोगेण यद्रजः स्त्रीणामत्यन्तं संप्रवर्तते ।
अशुच्यस्ता न तेन स्युस्तासां वैकारिको मदः ॥ ४३
तूलिका चोपधानानि पुष्परक्ताम्बराणि च ।
शोषयित्वार्कतापेन प्रोक्षणेन विशुद्ध्यति ॥ १४२ ॥ अंगिरः स्मृति
ज्वराभिभूता या नारी रजसाच परिप्लुता ।
कथं तस्या भवेत् शौचं शुद्धिः स्यात् केन कर्मणा ॥
चतुर्थेऽहनि संप्राप्ते स्पृशेत् अन्या तु तां स्त्रियम् ।
सा सचैलावगाह्यापः स्नात्वा स्नात्वा पुनः स्पृशेत् ॥
दश द्वादशकृत्वो वा आचमेच्च पुनः पुनः ।
अंते च वाससां त्यागः ततः शुद्धा भवेच्च सा ॥ उशनस ॥
एकाहाच्छुध्यते विप्रो योऽग्निवेदसमन्वितः ।
त्र्यहात्केवलवेदस्तु निर्गुणो दशभिर्दिनैः ॥ ८३
विवाहोत्सवयज्ञेषु अन्तरा मृतसूतके ।
पूर्वसंकल्पितार्थस्य न दोषश्चात्रिरब्रवीत् ॥ ९८
व्याधितस्य कदर्यस्य ऋणग्रस्तस्य सर्वदा ।
क्रियाहीनस्य मूर्खस्य स्त्रीजितस्य विशेषतः ॥ १०२
व्यसनासक्तचित्तस्य पराधीनस्य नित्यशः ।
स्वाध्यायव्रतहीनस्य सततं सूतकं भवेत् ॥ १०३
ब्रह्मचारी यतिश्चैव विद्यार्थी गुरुपोषकः ।
अध्वगः क्षीणवृत्तिश्च षडेते भिक्षुकाः स्मृताः ॥ १६५
गोकुले कन्दुशालायां तैलचक्रेक्षुचक्रयोः ।
अमीमांस्यानि शौचानि स्त्रीणां च व्याधितस्य च ॥ १९२
प्राकाररोधे विषमप्रदेशे सेनानिवेशे भवनस्य दाहे ।
आरब्धयज्ञेषु महोत्सवेषु तथैव दोषा न विकल्पनीयाः ॥ २३२
भ्रष्टा भ्रष्टयवाश्चैव तथैव चणकाः स्मृताः ।
खर्जूरं चैव कर्पूरमन्यद्भ्रष्टतरं शुचि ॥ २४१
अमीमांस्यानि शौचानि स्त्रीभिराचरितानि च ।
अदुष्टाः सततं धारा वातोध्दूताश्च रेणवः ॥ २४२

देवयात्रा विवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ २४९
आरनालं तथा क्षीरं कन्दुकं दधिसक्तवः ।
स्नेहपक्कं च तक्रं च शूद्रस्यापि न दूष्यति ॥ २५० ॥
सर्वेषामेव दानानां विद्यादानं ततोऽधिकम् ।
पुत्रादिस्वजने दद्याद्विप्राय च न कैतवे ॥ ३४०
सर्वेषामेव दानानां श्राद्धदानं विशिष्यते ।
मेरुतुल्यं कृतं पापं श्राद्धदानं विशोधनम् ॥ ३६८ ॥ अत्रि संहिता ॥
सर्वं शुध्यति तोयेन तत् तोयं केन शुध्यति ।
सूर्यरश्मिनिपातेन मारुतस्पर्शनेन च ।
गवां मूत्रपुरीषेण तत्तोयं तेन शुध्यति ॥ ७ ॥ आपस्तंब अ. २
रोगेण यद्रजः स्त्रीणामत्यर्थं हि प्रवर्तते ।
अशुद्धास्तास्तु नैवेह तासां वैकारिको मदः ॥ २ ॥ अ. ७
विवाहोत्सवयज्ञेषु अन्तरा मृतसूतके ।
सद्यः शुद्धिं विजानीयात् पूर्वसंकल्पितं च यत् ॥ १६ ॥ अ. १०
पत्नी पाकं यदा कुर्यात्पुत्रः पुष्पकुशान्हरेत् ।
किं गयायां यदि श्राद्धं स्वकाले स्वगृहे भवेत् ॥ ५६ ॥ प्रजापति
अगस्त्यं भृङ्गिराजं च तुलसी शतपत्रिका ।
तिलं च तिलपुष्पं च षडेते पितृवल्लभाः ॥ १०१ ॥
कालो ह्यनन्तरूपस्तु कालो वै परमेश्वरः ।
तस्मात्काले प्रसन्नेन कर्तव्यं कर्म निश्चितम् ॥ १६९ ॥
सूतकादिनिमित्तेन द्रव्याभावादिभेदतः ।
स्थितं महालयं कुर्याद्यावद्वृश्चिकदर्शनम् ॥ १७२ ॥ प्रजापति

पराशोत्तर स्मृतिकारांचे विचार अगदीं संक्षेपानें नमूद करतों. रोगामुळें ज्या स्त्रीचा रजःस्राव वरचेवर होतो, तो स्राव तिचा विकार असल्यामुळें अपवित्रता उत्पन्न करीत नाहीं म्हणजे या प्रसंगीं तिला विटाळ नाहीं. गाद्यागिर्द्यांची शुद्धि न धुतां अर्कतापानेंच होते, असें आंगिरस म्हणतो. मिताक्षरेमध्यें उशनसाच्या नांवावर विटाळशीच्या शुद्धीचीं जीं वचनें आहेत, त्यांचें तात्पर्य असें कीं,

ज्वरानें पीडलेल्या रजस्वला स्त्रीस चौथ्या दिवशीं स्नान न घालतां दुसऱ्या एका चांगल्या स्त्रीनें तिला बारा वेळा स्पर्श करावा व बारा वेळा स्वतः स्नान व आचमन करावें आणि शेवटीं तिचें व स्वतःचें वस्त्रांतर करावें, म्हणजे अत्यंत अजारी असलेल्या विटाळशीची शुद्धि होते.

अत्रीनें अशौच-विचार इतरांप्रमाणेंच केला आहे. पण रोगी, कद्रु, ऋणग्रस्त, क्रियाहीन, मूर्ख, स्त्रैण, पराधीन, व्यसनासक्त आणि स्वाध्यायव्रत-विहीन मनुष्यानें जन्मभर सुतक धरावें असें म्हटलें आहे. ब्रह्मचारी, यति, गुरुला पोसणारा विद्यार्थी, वाटसरू व वृत्तिच्छेद झालेला बेकार असे सहा भिक्षुक होत. गुऱ्हाळ, गौळवाडा, तेल्याचा घाणा आणि कोठांगण, तसेंच अजार व स्त्रिया यांच्या बाबतींत शिवाशिवीचा विचार न करावा. सैन्याचा वेढा पडला असतां, भलत्या देशांत असतां, गृहदाह व सैन्याचा तळ अशा प्रसंगीं आणि यज्ञ व उत्सव प्रसंगीं स्पर्शास्पर्श दोष नाहीं. देवयात्रा, विवाह, यज्ञ, उत्सव अशा प्रसंगीं शिवाशिवीचा दोष नाहीं हें अत्रीचें म्हणणें कितीतरी योग्य आहे. कांहीं प्रसंग असे असतात कीं त्या ठिकाणीं शिवाशिवीची चर्चाच न केलेली बरी. भाजलेले पोहे, फुटाणे, खजूर, दहीपोहे, तुपांतले व दुधांतले पदार्थ शूद्राच्या घरचे जरी खाल्ले तरी कांहीं दोष लागत नाहीं, असें अत्रि म्हणतो. सर्व दानांमध्यें विद्यादान आणि श्राद्धदान हींच श्रेष्ठ होत, असेंहि अत्रिसंहितेमध्यें आहे. सर्वांची शुद्धि ज्या जलानें होते, त्याची शुद्धि वायु, सूर्यकिरणें व गोमूत्र यांनीं होते असें आपस्तंब म्हणतो. प्रजापतीनें श्राद्धाचाच विचार फार केला आहे. तो म्हणतो कीं घरीं बायकोनें स्वयंपाक करावा, मुलांनीं दर्भादि साहित्य आणावें व अशा प्रकारें आपल्या घरांत योग्य कालीं केलेल्या श्राद्धाची योग्यता गयेस जाऊन केलेल्या श्राद्धाइतकीच आहे. माका, अगस्ता, तुळशी हींच पितरांना अर्पण करावींत आणि प्रसन्न कालींच कोणतेंहि कर्म करावें. कांहीं अडचणीनें राहिलेलें महालय श्राद्ध हें वृश्चिक संक्रांतिपर्यंत केलें तरी चालतें.

> परान्नेन तु भुक्तेन मैथुनं योऽधिगच्छति ।
> यस्यान्नं तस्य ते पुत्रा अन्नाच्छुक्रं प्रवर्तते ॥ १५ ॥
> परान्नं परवस्त्रं च परयानं परस्त्रियः ।
> परवेश्मनि वासश्च शक्रस्यापि श्रियं हरेत् ॥ १७ ॥

उपस्थिते विवाहे च यज्ञे दाने च वासव ।
मोहाच्चरति विघ्नं यः स मृतो जायते कृमिः ॥ ७० ॥
पक्षिणां बलमाकाशं मत्स्यानामुदकं बलम् ।
दुर्बलस्य बलं राजा बालस्य रुदितं बलम् ॥ २८ ॥
बलं मूर्खस्य मौनत्वं तस्करस्यानृतं बलम् ॥
दहत्यग्निस्तेजसा च सूर्यो दहति रश्मिना ।
राजा दहति दण्डेन विप्रो दहति मन्युना ॥ ३० ॥ शंखलिखित
सायंप्रातर्द्विजातीनामशनं श्रुतिनोदितम् ।
नांतरा भोजनं कुर्यादग्निहोत्री समाहितः ॥ १२
विप्रो दशाहमासीत दानाध्ययनवर्जितः ।
क्षत्रियो द्वादशाहानि वैश्यः पंच-दशैव तु ॥ ३७
शूद्रः शुध्यति मासेन संवर्तवचनं यथा ।
प्रेतायान्नं जलं देयं स्नात्वा तद्गोत्रजैः सह ॥ ३८ ॥ संवर्त अ. १
क्रियाहीनस्य मूर्खस्य पराधीनस्य नित्यशः ।
नीचसेवारतस्यैतस्त ( वं स ) दाऽशौचं तदोच्यते ॥ १ ॥ (प्र. २१)
स्नानेन च बहिः शुद्धिरात्मज्ञानेन चान्तरा ।
सत्कर्मणा द्विजः शुद्धः सर्वकर्मसु चैव हि ॥ ७ ॥ ल. आश्व. प्र. २२
जीवत्येकः स लोकेषु बहुभिर्योऽनुजीव्यते ।
जीवन्तोऽपि मृताश्चान्ये पुरुषाः स्वोदरंभराः ॥ ४० ॥
बह्वर्थं जीवते कश्चित्कुटुम्बार्थे तथा परः ॥ ४१ ॥ दक्ष अ. २
आयुर्वित्तं गृहच्छिद्रं मन्त्रं मैथुनमौषधम् ।
पापकर्मापमानश्च धर्मो गोप्यानि यत्नतः ॥ १५ ॥ दक्ष अ. ३
एकाहाच्छुध्यते विप्रो योऽग्निवेदसमन्वितः ।
त्र्यहात्केवलवेदस्तु द्विहीनो दशभिर्दिनैः ॥ ६ ॥
शुध्येद्विप्रो दशाहेन द्वादशाहेन भूमिपः ।
वैश्यः पञ्चदशाहेन शूद्रो मासेन शुध्यति ॥ ७ ॥
व्याधितस्य कदर्यस्य ऋणग्रस्तस्य सर्वदा ।
क्रियाहीनस्य मूर्खस्य स्त्रीजितस्य विशेषतः ॥ ९ ॥

व्यसनासक्तचित्तस्य पराधीनस्य नित्यशः ।
श्रद्धात्यागाविहीनस्य भस्मान्तं सूतकं भवेत् ॥ १० ॥
यज्ञे प्रवर्तमाने तु जायते म्रियतेऽपिवा ।
पूर्वसंकल्पितार्थानां न दोषस्तत्र विद्यते ॥ १३ ॥
यज्ञकाले विवाहे च देवयागे तथैव च ।
हूयमाने तथा चाग्नौ ना शौचं नैव सूतकम् ॥ १४ ॥
स्वस्थकाले तथा सर्वं सूतकं परिकीर्तितम् ।
आपद्ग्रस्तस्य सर्वस्य सूतकेऽपि न सूतकम् ॥ १५ ॥ दक्ष अ. ६
शौचे यत्नः सदा कार्यः शौचमूलो द्विजः स्मृतः ।
शौचाचारविहीनस्य समस्ता निष्फला क्रियाः ॥ २ ॥
शौचं च द्विविधं प्रोक्तं बाह्यमाभ्यन्तरं तथा ।
मृज्जलभ्यां स्मृतं बाह्यं भावशुद्धिस्तथाऽऽन्तरम् ॥ ३ ॥ दक्ष अ. ५
यद्ददासि विशिष्टेभ्यो यच्चाश्नासि दिने दिने ।
तत्ते वित्तमहं मन्ये शेषं कस्यापि रक्षसि ॥ १६ ॥
यद्ददाति यदश्नाति तदेव धनिनो धनम् ॥
किं धनेन करिष्यन्ति देहिनो गत्वरायुषः ।
यद्वर्धयितुमिच्छन्ति तच्छरीरमशाश्वतम् ॥ १८ ॥
यदि नाम न धर्माय न कामाय न कीर्तये ।
यत्परित्यज्य गन्तव्यं तद्धनं किं न दीयते ॥ २० ॥
जीवन्ति जीविते यस्य विप्रा मित्राणि बान्धवाः ।
जीवितं सफलं तस्य आत्मार्थे को न जीवति ॥ २१ ॥
क्रिमयः किं न जीवन्ति भक्षयन्ति परस्परम् ।
परलोकाविरोधेन यो जीवति स जीवति ॥ २२ ॥
पशवोऽपि हि जीवन्ति केवलात्मोदरंभराः ।
किं कायेन सुपुष्टेन बलिना चिरजीविना ॥ २३ ॥
यस्य चैव गृहे मूर्खो दूरे चापि गुणान्वितः
गुणान्विताय दातव्यं नास्ति मूर्खे व्यतिक्रमः ॥ ३५ ॥ वेदव्यास

शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः ।
वक्ता शतसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥ ६० ॥
न रणे विजयाच्छूरोऽध्ययनान्न च पण्डितः ।
न वक्ता वाक्पटुत्वेन न दाता चार्थदानतः ॥ ६१ ॥
इंद्रियाणां जये शूरो धर्मं चरति पण्डितः ।
सत्यवादी भवेद्वक्ता दाता भूतहिते रतः ॥ ६२ ॥ वेदव्यास अ. ४

शंखलिखितस्मृतीमध्यें कांहीं सुभाषितें, कांहीं लौकिक न्याय व कांहीं सामान्य नियम सांगितले आहेत. परान्न-सेवन करून स्त्रीसंभोग केल्यास होणारा पुत्र हा दुसऱ्याचा, कारण अन्नापासूनच शुक्रसंभव होतो. परान्न, परवस्त्र, परगृहवास आणि परस्त्रीसेवन यामुळें इंद्राचेंसुद्धां बल नष्ट होतें, मग माणसाची काय कथा ? यज्ञ, विवाह व दान यांच्या समारंभांत जो विघ्न उत्पन्न करतो, तो कृमिकीटकांत जन्म घेतो. म्हणून विघ्नसंतोषीपणा करूं नये. पक्ष्याचें बल आकाश, माशाचें बल उदक, दुर्बलाचें बल राजा व मुलांचें बल रडणें हें होय. ( आजच्या परिस्थितींत राजा हा दुर्बलांचा वाली नसून तो सबलांचाच त्राता आहे असें दिसतें. ) अग्नि हा तेजानें, सूर्य हा किरणानें, आणि राजा दंडानें आणि ब्राह्मण कोपानें जाळीत असतो. ( शिव्याशाप देणें हेंच दुर्बलाचें बल होय.)

दुपारीं व रात्रीं असे फक्त दोन वेळां जेवणें हें सशास्त्र आहे. म्हणून अग्निहोत्र्यानें मधेंआधें कांहीं खाऊं नये. दान व अध्ययन यांनीं रहित अशा विप्रानें दहा दिवस, क्षत्रियानें बारा, वैश्यानें पंधरा व शूद्रानें एक मास-पर्यंत अशौच पाळावें असें संवर्त म्हणतो. प्रेताच्या गोत्रजांनीं दहा दिवसांनंतर स्नान करून प्रेताला तिलाञ्जली द्यावी व अन्न द्यावें.

क्रियाहीन, मूर्ख, पराधीन व नीचसेवातत्पर मनुष्यानें सतत सुतकी असावें. स्नानानें बाह्य शुद्धि व आत्मज्ञानानें अन्तःशुद्धि होते, म्हणून सत्कर्मानें वागणारा ब्राह्मण हा सर्वत्र शुद्ध होय असें लघु आश्वलायन म्हणतो.

दक्षानें धर्मविचार दक्षपणानेंच केलेला आहे. ज्यावर अनेक लोक उपजीविकेकरितां अवलंबून असतात, तोच खरोखरी जन्मलेला जिवंत मनुष्य समजावा. पोटाच्या पाठीमागें लागलेले, उदरंभरी असे अनेक लोक हे जिवंत असून मेल्याप्रमाणेंच होत. एखादा मनुष्य अनेकांकरितां जगतो, दुसरा

कुटुंबाकरितां जगतो, पण एखाद्याला आपलें पोट भरतांभरतांच पुरेवाट होते. आयुष्य, वित्त, गृहच्छिद्र, मंत्र, औषध, पापकर्म व अपमान हीं सर्व गुप्तच ठेवलेलीं बरी. दक्षानें सुतकाचा विचार आतांपर्यंत सांगितलेल्या स्मृतिकारांसारखा केला असून श्रद्धा व त्याग-विहीन मनुष्य मरेपर्यंत सुतकी समजावा, असें तो म्हणतो. यज्ञ सुरु झाल्यानंतर जननमरणाशौचाचा दोष नाहीं. यज्ञ, विवाह, देवयाग अशा प्रसंगीं सोयेर व सुतक नाहीं. दक्षाच्या शास्त्राचें सार एका वाक्यांत सांगावयाचें म्हणजे स्वस्थकालीं सर्व कांहीं सुतक व सोयर पाळावें, पण आपत्तीनें ग्रासल्या वेळीं सुतक, सोयर हीं पाळावयाचें कारण नाहीं. पावित्र्याकरितां सदा यत्न करावा. शौचाचार हें ब्राह्मणाचें मूळ होय. शुद्धाचार-विहीनाच्या सर्व क्रिया निष्फळ होतात. बाह्य व अंतर असें दोन प्रकारचें शौच आहे. भावशुद्धीनें अन्तःशुद्धि होते व मृत्तिकोदकानें बाह्यशुद्धि होते.

व्यासस्मृतीमध्यें अविद्वान् ब्राह्मणाची निंदा केली असून, त्यानें विद्याविहीन असूं नये असा उपदेश केला आहे. व्यवहाराला उपयुक्त, प्रत्यक्ष आचरतांना उपयोगीं अशीं सुभाषितें व्यासांनीं सांगितलीं आहेत. व्यास धनवानाला उद्देशून म्हणतो " अरे जें तूं विशिष्ट लोकांना देतोस व स्वयोगें रोज अन्न खातोस, तेंच तुझें द्रव्य होय. इतरांचें रक्षण कोणाकरितां करतोस ? जें देतो व जें खातो, तेंच धनवंताचें धन होय. आयुष्य नष्ट झालेले लोक द्रव्यानें काय बरें करणार ? कारण ज्या द्रव्यानें जें शरीर वाढविण्याची ते इच्छा करितात, तें शरीरच मुळीं क्षीणायुषी असतें. धर्म, काम व कीर्ति यांकरितांच द्रव्य आहे. मृत्युसमयीं जें द्रव्य टाकून जावयाचें आहे, तें हे धनिका तूं कां बरें देत नाहींस ? ज्याच्या जीवितावर मित्र, बांधव हे जिवंत राहतात, त्याचें जीवित सफल होय. स्वतःकरितां कोण बरें जगत नाहीं ? कृमि, कीटक, एकमेकाला खाऊन जगतातच. पशुसुद्धां उदरंभरण करितातच. दुसऱ्याला उपयोगी न पडणारें असें सुपुष्ट शरीर काय कामाचें ? " व्यासांचीं वरील सर्व सुभाषितें सोपी व पठणीय आहेत.

हा वेळपर्यंत आपस्तंबापासून व्यासापर्यंत सर्व स्मृतिकारांच्या ज्या अनेक धर्माज्ञा आहेत, त्यांचें परीक्षण केलें. त्यावरून त्यांच्या धर्माज्ञांचा अभ्युदयाशीं, व्यवहाराशीं व लोकसंग्रहाशीं संबंध आहे हें उघडच दिसतें. शौच, मुखमार्जन, दंतधावन, स्नान, शरीरशुद्धि, मनःशुद्धि, स्मश्रुकर्म, दान, अतिथिपूजा,

विवाह, वस्त्रधारण, सत्यासत्य-विवेक, वडिलांना मान देणें, मार्गानें जातांना वाट देणें, श्राद्ध-संकोच, प्राण-हिंसा व धन-हिंसा यांतील तारतम्य, अर्थशौच, अन्नाची शुद्धि, साधू व असाधूंशीं वागणूक, रोगपरिचर्या, दैव, यत्न, शील व प्रायश्चित्त इत्यादि अनेक विषयांचा विचार त्यांनीं पुरुषबुद्धीला समजेल, तर्काला पटेल व व्यवहाराला जुळेल असाच केलेला आहे. धर्माची प्रत्येक बाब परलोक-संबद्ध असते आणि तें फल मनुष्याला अगोचर असतें, हें म्हणणें किती तर्कशुद्ध आहे, हें वाचकांच्या लक्षांत वरील विवेचनावरून येण्याजोगें आहे. धर्म हा केवळ व्यवहार व अभ्युदय याकरितां नसला तरी अभ्युदय हें एक धर्माचें फल आहे, हें निःसंशय खोटें नाहीं. प्रपंच-परमार्थ, प्रवृत्ति-निवृत्ति, अभ्युदय व निश्रेयस, अशा या जोड्यापैकीं एका भागाशीं धर्माचा मुळींच संबंध नाहीं, हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. धर्मामुळें या जगांत अभ्युदय झाला पाहिजे व परलोकांत मोक्ष मिळाला पाहिजे. ज्याला इहलोकांत प्रपंच नीट करून पुरुषार्थ साधतां येत नाहींत तो चवथा पुरुषार्थ कसा साधील ? धर्म हा मनुष्याला पुरुषार्थाला प्रवृत्त करतो व ते पुरुषार्थ योग्य तऱ्हेनें साध्य व्हावेत म्हणून तार-तम्यानेंच धर्माचें आचरण केलें पाहिजे असें सर्व स्मृतिकार सांगतात. महाभारत हा ग्रंथ तारतम्यानेंच धर्माचरण केल्यास कसें इष्ट साधतें हें सांगणारा महत्वाचा ग्रंथ आहे. तेव्हां युक्ति, तर्क आणि बुद्धि इ. धार्मिक बाबतींत सुद्धां जितकी चालवितां येईल, तितकी चालवून, परिस्थिति लक्षांत घेऊन, धर्माधर्मांतील तरतम भाव जाणून, धर्माचरण करावें. तसें केलें तरच व्यक्ति, समाज व राष्ट्र यांची उन्नति होते व तसें न केल्यास ऱ्हास होतो, हें अनेक इतिहासांतील उदाहरणा-वरून सिद्ध करितां येण्याजोगें आहे.

दोन प्रहरच्या वेळीं अतिथी आल्यास त्याची पारख करून त्याशीं तार-तम्यानेंच वागावें असें आपस्तंब, वसिष्ठ इत्यादि सांगतात परंतु पुढें पराशर म्हणतो:—

> चौरो वा यदि चांडालः शत्रुर्वा पितृघातकः
>
> वैश्वदेवे तु संप्राप्ते सोऽतिथिः स्वर्गसंक्रमः ॥ अ. १ । श्लो. ६२

चोर, चांडाल, शत्रु, पितृघातक, इत्यादि वैश्वदेव प्रसंगीं आले तर ते स्वर्गाला नेतात म्हणून सर्वथैव पूज्य होत. पराशराचें हें म्हणणें भोळ्या लोकांनीं

पुढील काळांत अक्षरशः ऐकलें आणि पितृघातक, संस्कृतिघातक, स्त्रियांना पळविणारे, देवळें फोडणारे, धर्म नष्ट करणारे असे जे जे विधर्मी व विदेशी अतिथि येथें आले त्यांचा स्वर्गसाधन म्हणून सत्कार केला ! त्याचा परिणाम स्वर्ग तर साधलाच नाहीं पण इहलोकहि साधला नाहीं असा झाला ! म्हणून धर्मामध्यें तारतम्य पाहिलें पाहिजे व पुरुषबुद्धि जेवढी चालेल तेवढी चालविलीच पाहिजे.

# प्रकरण पंधरावें

## हा धर्म कसला ?

कोणत्याहि धर्मातील आचार, नीति व तत्त्वज्ञान यामुळें मनुष्याची उन्नति होते आणि ती उन्नति म्हणजे सदाचारप्रियता, समाजसेवा, शौर्य, पराक्रम, प्रतीकारक्षमता, पापभीरुता, नीतिनिष्ठा, ईश्वरभक्ति, इत्यादि गुणांचा विकास होणें ही होय. कोणत्याहि समाजांत धर्माच्या अशुद्ध, वेडगळ, अर्थवादात्मक अशाच कल्पना आढळतात. त्या कल्पनांचें शुद्धिकरण, तर्कशुद्धपद्धतीनें केलें पाहिजे. ईश्वराविषयींच्या पहिल्या पहिल्या कल्पना ( उ. इंद्राच्या कथा ) अशा होत्या कीं तो फार क्रूर आहे, दंडधारी आहे, भयंकृत व भयनाशन आहे, फारच सत्तावान् आहे व जगांतील सर्वांत श्रेष्ठ असा अरेराव व जुलमी असा तो आहे. पण तत्त्वज्ञानाचा विचार जसजसा वाढत गेला, तसतशा ईश्वरविषयक कल्पना अत्यंत शुद्ध, निर्मल व उदात्त होत गेल्या. याचें प्रत्यंतर गीता, अध्याय ५।९।१२ मधील अनुक्रमें श्लोक १४।१५ व श्लो. २९ आणि श्लो. ७ यांवरून सहज येईल. ईश्वर–विषयक कल्पनांमध्यें जसें शोधन झालें, त्याप्रमाणें धर्मशास्त्रांत सांगितलेले जे अनेक आचार व विधी, त्यांचेंहि शोधन तात्त्विक व तर्कशुद्ध रीतीनें झालें पाहिजे. या विसाव्या शतकांत जी चिकित्सकबुद्धि उत्पन्न झाली आहे, ती धर्माचेंहि शोधन करीत आहे. एखादा धार्मिक विधि केल्यास म्हणे एकदम स्वर्गप्राप्ति होते व तो न केल्यास लगेंच नरकप्राप्ति होते, असले उलटसुलट अर्थ व अनर्थ वादात्मक सिद्धान्त

आज तरी मुळींच पटत नाहींत. म्हणून धर्माबद्दलची श्रद्धा नष्ट होते. त्यास उपाय एकच आहे; तो हा कीं, धर्म सांगण्याची पद्धत बदलली पाहिजे. उदाहरणार्थ, कर्मविपाक विषय घेऊं. मनु, याज्ञवल्क्य, पराशर, अत्रि या सर्वापेक्षां शातातप स्मृतीमध्यें हा कर्मविपाक मोठ्या विस्तारानें सांगितला आहे. हा सर्व कर्मविपाक व त्याचें फल सांगण्याची पद्धति पाहिली म्हणजे असें वाटतें कीं हा धर्म कसला? अमुक कर्में वाईट आहेत तीं करूं नयेत, तीं केल्यास मानसिक अधःपात होतो, असें सांगावयाचें सोडून, अमुक केल्यानें अमुक होतें असें जें दोन न दोन चारच्या बेरजेप्रमाणें सिद्धान्तवत् ठासून सांगितलें आहे, तें अमळ चमत्कारिक वाटतें. सोनें चोरलें कीं नखें काळीं होतात. मद्य-प्राशनानें दांत वाईट होतात. ब्रह्महत्त्येनें क्षयरोग होतो. चहाडी केल्यानें तोंडांतून पू गळतो. धान्य चोरल्यानें अंगहीनत्व येतें. ब्राह्मणाचें धन उपटणारा ब्रह्मराक्षस होतो. मध, दूध, रस, तूप, मांस चोरल्यानें अनुक्रमें मधमाशी, कावळा, कुत्रा, मुंगुस व गिधाड होतो, असें मनु म्हणतो. याज्ञवल्क्यहि ब्रह्मघातकी मनुष्य डुकर व उंट यांच्या योनीला जातो, सोनें चोरणारा कृमिकीटक व पतंग होतो. मद्यपी, पुक्कस व वेण या जातींत जन्म घेतो असें म्हणतो. ब्राह्मणाचें सोनें ज्यानें चोरलें असेल, त्यानें राजाकडे जाऊन सोनें चोरलें असें सांगावें व राजाच्या हातांत एक मुसळ द्यावें. राजानें त्या मुसळानें त्याला ठार केलें किंवा सोडून दिलें म्हणजे तो मुक्त होतो असेंहि जें म्हटलें आहे, त्यापेक्षां राजानें चोरांना कडक शासन करावें व चोरी करणें फार वाईट आहे असें म्हणतां आलें नसतें काय? या सर्व कर्मविपाकाबद्दल असें विचारतां येईल कीं धर्मशास्त्रकर्त्यांनीं हें जें सांगितलें हें खरें कशावरून? पितृघाती आंधळा होतो, भगिनीघाती बधिर होतो, बंधुघाती मुका होतो, बालघाती वांझ होतो, उष्ट्रघाती घोघऱ्या आवाजाचा होतो, अश्वघाती वक्रतुंड होतो, अजाघाती अधिकांग होतो, काकघाती कर्णहीन होतो, इत्यादि जें शातातपानें सांगितलें आहे, हें खरोखरीच गणिताच्या उत्तराप्रमाणें बरोबर असेल काय? असा संशय येण्याचें कारण नास्तिकपणा नव्हे, तर त्याच स्मृतीमध्यें त्या पातकांकरितां पुढें जी निष्कृति सांगितली आहे, ती चमत्कारिक वाटते. उष्ट्रघात्यानें कर्पूरफल, अश्वघात्यानें चंदन, हरिण-घात्यानें अश्व, अजाघात्यानें अजा, इत्यादि दानें दिल्यास ते दोष नष्ट होतात,

असें जें म्हटलें आहे तें युक्तीस पटत नाहीं. देवालयांत लघवी केल्यास गुदरोग होतो, दूध चोरल्यास बहुमूत्राचा रोग जडतो, गूळ चोरल्यास गुल्म होतो. तसेंच मातासुताभगिनींशीं गमन केल्यास अनेक प्रकारचीं कुष्ठें होतात, इत्यादि जें भय वाटावें म्हणून सांगितलेलें आहे, तें भयाकरितांच जर असेल तर त्यांत वाईट कांहीं नाहीं. पण जर स्मृतिकारांनीं सांगितलेले अगदीं जसेंच्या तसेंच होतें, अशी जर समजूत असेल तर तो मात्र भ्रम आहे.

सत्यनारायण व्रत केल्यानें स्वर्ग मिळतो हा अर्थवाद म्हणजे पोकळ स्तुति आहे. धर्मविधीबद्दलची पोकळ स्तुति व तो न केल्यास त्याबद्दलची पोकळ भीति या दोन्ही अपायकारक होत. देवालयांत लघवी करूं नये, तसें केल्यास देहदंड व शिक्षा होईल हें सांगणें योग्य होईल; परंतु लगेच त्या पातकाच्या निवृत्तीकरितां दान करावें, ब्राह्मणभोजन घालावें, असें जें सांगितलें, तें यापुढें पटणार नाहीं. आचमनाकरितां पाणी बेतानें घ्यावें, असें सांगणें योग्य होय. पण उडीद ज्यामध्यें बुडेल, एवढेंच पाणी घ्यावें व अधिक पाणी प्राशन केल्यास दारू प्याल्याचें पातक लागतें असें सांगणें हें हास्यास्पद होय. याकरितां अर्थवाद व पोकळ भीति इत्यादि टाकूनच धर्माचें मर्म या काळांत सांगितलें पाहिजे. नुसत्या संध्येच्या आचमनाच्या कमी अधिक पाण्यानें जर मद्यपानाचें पातक लागत असेल तर हा धर्म कसला, असें मनांत आल्यावांचून राहात नाहीं. कर्मविपाकाविषयीं अनेक स्मृतिकारांचीं वचनें पुष्कळ आहेत. येथें फक्त नमुन्याकरितां अत्रिस्मृतींतील एक लहान उतारा देतों.

असत्सु भोजी वानरः । ७ । अनिमन्त्रितभोजी वायसः । ८
इतस्ततस्तर्कको मार्जारः । ९ । कक्षागारदाहकः खद्योतः । १०
अवधूतदायी बलीवर्दः ।१२ मिष्टान्नमदत्त्वा यः स्वयंभोजी स कृमिः ।१३
मत्सरी भ्रमरः । १४ । फलहरणाद्गलदण्डी । १५ । वस्त्रहरणाच्छित्त्री । १६
चण्डालीपुल्कसीगमनेऽजगरः । १७ । प्रव्रजितोपगमने मरूपिशाचः ।१८
शूद्रीगमने दीर्घकीटः । १९ । वार्धुषिकः कूर्मः । ४०
फलविक्रयादफलः । ४१ । ऊर्णनाभो नास्तिकः कृतघ्नश्च । ४२

अत्रिस्मृति अ. ४

दुर्जनाकडे जेवणारा वानर होतो. अनिमंत्रित मनुष्य दुसऱ्याकडे जेवला तर तो कावळा होतो. इतस्ततः तर्क करणारा मनुष्य मांजर होतो. गवताचें खोपट जाळणारा मनुष्य घुबड होतो. अवधूताला दान करणारा बैलोबा होतो. मत्सरी मनुष्य भोंगा होतो. गोड गोड पदार्थ दुसऱ्याला न देतां जो खातो, तो कृमि होतो. फळें चोरणाऱ्याला गंड-माळा होतात. वस्त्रें चोरणारा कुष्ठी होतो. चंडाली-गमन करणारा अजगर होतो. भिक्षुणीशीं गमन करणारा मरुदेशांतील पिशाच्च होतो. शूद्रागमनी लांब किडा होतो. व्याज बट्टा करणारा कासव होतो. फल विक्रेता वांझ होतो व लोकर विकणारा नास्तिक व कृतघ्न होतो इ. "हा धर्म कसला" असें जीं वचनें वाचून मनांत येतें, त्यांतील कांहीं वचनें येथें उध्दृत करितों. प्रथम बौधायनापासून याज्ञवल्क्यापर्यंतचीं वचनें व त्यांचा सारांशहि वाचकांपुढें ठेवितों.

शुना दष्टस्तु यो विप्रो नदीं गत्वा समुद्रगाम् ।
प्राणायामशतं कृत्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥ १४६ ॥
सुवर्णरजताभ्यां वा गवां शृङ्गोदकेन वा ।
नवैश्च कलशैः स्नात्वा सद्य एव शुचिर्भवेत्, इति ॥ १४७ ॥
बौधायन ( प्र. ५ अ. ५)

आहरेन्मृत्तिकां विप्रः कुलात्ससिकतां तथा ॥
एका लिङ्गे करे तिस्र उभाभ्यां द्वे तु मृत्तिके ।
पञ्चापाने दशैकस्मिन्नुभयोः सप्त मृत्तिकाः ॥ १६ ॥
एतच्छौचं गृहस्थस्य द्विगुणं ब्रह्मचारिणः ।
वानप्रथस्य त्रिगुणं यतीनां च चतुर्गुणम् ॥ १७ ॥
न म्लेंच्छभाषां शिक्षेत् ॥ ३६ ॥ वसिष्ठ अ. ६
गुरुतल्पगः सवृषणं शिश्नमुत्कृत्याञ्जलावाधाय
दक्षिणामुखो गच्छेत् ॥ १४ ॥ वसिष्ठ अ. २०
मातुलस्य सुतां वापि गत्वा चांद्रायणं चरेत् ॥
पलाण्डुं लशुनञ्चैव भुक्त्वा चांद्रायणं चरेत् ॥ ३१ ॥
उष्ट्रयानं समारुह्य खरयानञ्च कामतः ।
त्रिरात्रेण विशुध्येत नग्नो न प्रविशेज्जलम् ॥ ६९ ॥
नीलं रक्तं वसित्वा तु ब्राह्मणो वस्त्रमेव हि ।
अहोरात्रोषितः स्नातः पञ्चगव्येन शुध्यति ॥ ७१ ॥

कृष्णाष्टम्यां महादेवं तथा कृष्णचतुर्दश्याम् ।
सम्पूज्य ब्राह्मणमुखैः सर्वपापैः प्रमुच्यते ॥ १०७ ॥ उशनस अ. ९

बौधायनः—ज्याला कुत्रा चावला आहे त्या विप्रानें समुद्रगा नदीमध्यें स्नान करावें, शंभर प्राणायाम करून व तूप पिऊन शुद्ध व्हावें किंवा सुवर्णरजत कलशांतील पाण्यानें आणि गोशृंगोदकानें स्नान करून शुद्ध व्हावें.

वसिष्ठः—ब्राह्मणानें नदी काठची बारीक वालुकामिश्रित माती आणावी. ती चांगली मळावी व शौचाचे वेळीं तिचे गोळे विशिष्ट अवयवांचे ठिकाणीं एक, दोन, पांच व सात असे लावावे. ही गोळ्यांची संख्या ब्रह्मचाऱ्यानें दुप्पट, वानप्रस्थानें तिप्पट आणि संन्याशानें चौपट वाढवावी. म्लेंच्छभाषा शिकूं नये. गुरुपत्नीशीं गमन करणाऱ्याचें पुरुषलिंग उपटून त्याच्या ओंजळींत द्यावें व त्यानें दक्षिण दिशेनें जावें.

उशनसः—मामाच्या मुलीशीं लग्न केल्यास दोष आहे म्हणून चांद्रायणव्रत करावें. कांदा व लसूण खाल्यास दोषनिरशनार्थ चांद्रायणव्रत करावें. उंट, खेचर व गाढव यांच्या वाहानांत बसल्यास तीन दिवसांनीं शुद्धि होते. नागव्यानें पाण्यांत प्रवेश करूं नये. निळें व तांबडें वस्त्र नेसणाऱ्या ब्राह्मणानें अहोरात्र उपास करून स्नान व पंचगव्यानें शुद्धि प्राप्त करून घ्यावी. वद्य पक्षांतील अष्टमी व चतुर्दशीस महादेवपूजा केली तर सर्व पातकें नष्ट होतात.

मृतं द्विजं न शूद्रेण निर्हारयेत् ।
न शूद्रं द्विजेन न द्विजं पितरमपिशूद्राः ॥ विष्णु. अ. १९
गवां कंडूयनं चैव सर्वकल्मपनाशनम् ।
गवां ग्रासप्रदानेन स्वर्गलोके महीयते ॥ ६० ॥ विष्णु अ. २३
आखुर्धान्यहारी । हंसः कांस्यापहारी । मधुहारी दंशः
पयोहारी काकः । रसहारी श्वा । घृतहारी नकुलं ॥ अ. ४४
लशुनपलांडुगृंजनकुक्कुटवानरगोमांसभक्षणेच ।
सर्वेषु एतेषु द्विजानां प्रायश्चित्तान्ते भूयः संस्कारं कुर्यात् ॥ अ. ५१
श्वशृगालविड्वराहखरवानरवायसपुंश्चलीभिर्दष्टः
स्रवतीमासाद्य षोडशप्राणायामान् कुर्यात् ॥ अ. ५४

एका लिंगे गुदे तिस्रः तथैकत्र करे दश ।
उभयोः सप्त दातव्या मृदस्तिस्रस्तु पादयोः ॥ २५ ॥ अ. ६०

न म्लेंच्छान्त्यजपतितैः सह संभाषणं कुर्यात् ।
अकृत्वा देवपितृतर्पणं स्नानशाटीं न पीडयेत् ॥ अ. ६४

अथफाल्गुनी स्यात् तस्यां ब्राह्मणाय स्वास्तीर्णं शयनं
निवेद्य भार्यां मनोज्ञां रुपवतीं द्रविणवतीं प्राप्नोति
नार्यपिभर्तारं । चैत्री चेत् स्यात् तस्याम् चित्रवस्त्र-
प्रदानेन सौभाग्यं प्राप्नोति । ज्येष्ठी ज्येष्ठायुता चेत्
तस्याम् छत्रोपानहप्रदानेन गवाधिपत्यं प्राप्नोति ।
गोप्रदानेन स्वर्गलोकमाप्नोति । विष्णु अ. ९२ ।

मेलेल्या ब्राह्मणाला शूद्रांनी नेऊं नये. शूद्र-प्रेताला ब्राह्मणांनीं वाहूं नये. शूद्राचा बाप द्विज असला तरी मेल्यानंतर त्यानें त्याला खांदा देऊं नये. गाईला खाजवलें व कुरवाळलें म्हणजे सर्व पातकें नष्ट होतात. गोग्रास दिला म्हणजे स्वर्गलोक मिळतो. धान्य चोरणारा उंदीर, कासें, मध, दूध, रस व तूप चोरणारे अनुक्रमें हंस, मधमाशी, कावळा, कुत्रा व मुंगूस इत्यादि होतात लसूण, कांदा, गाजर, कोंबडा, वानर इत्यादि व गोमांस भक्षण केल्यावर द्विजांनीं प्रायश्चित्त घ्यावें व त्यानंतर पुन्हां उपनयन करून घ्यावें.

कुत्रें, कोल्हा, गांवडुकर, वानर, कावळा इत्यादि ज्या ब्राह्मणाला चावलीं असतील, त्यानें नदींत जाऊन स्नान करावें व सोळा प्राणायाम जपावे म्हणजे शुद्धि होते. शौचाचे वेळीं एक, तीन, दहा, सात असे गोळे विशिष्ट अवयवांना लावावे. देव व पितृ तर्पण केल्याशिवाय ओलीं वस्त्रें धुवूं नयेत. ज्याला मनोज्ञ व रूपवती बायको पाहिजे असेल त्यानें फाल्गुनी पूर्णिमेला ब्राह्मणाला स्वतः पसरलेलें हंतरुण दान करावें. ज्या स्त्रीला नवरा उत्तम पाहिजे असेल, तिनें चैत्री पूर्णिमेला चित्रविचित्र वस्त्रांचें दान सुवासिनीला द्यावें. ज्येष्ठा नक्षत्रावर ज्येष्ठी पूर्णिमा असल्यास त्यावेळीं छत्री, जोडे दान दिल्यानें गवाधिपत्य मिळतें व गोप्रदानानें स्वर्ग मिळतो.

पशुमण्डुकमार्जारश्वसर्पनकुलाखुभिः ।
अन्तरागमने विद्यादनध्यायमहर्निशम् ॥ १२६ ॥ मनु अ. ४

छत्राकं विड्वराहं च लशुनं ग्रामकुक्कुटम् ।
पलाण्डुं गृञ्जनं चैव मत्या जग्ध्वा पतेत्द्विजः ॥ १९ ॥ अ. ५
अमत्यैतानि षट् जग्ध्वा कृच्छ्रं सान्तपनं चरेत् ॥ २० ॥
असपिण्डं द्विजं प्रेतं विप्रो निर्हृत्य बन्धुवत् ।
विशुध्यति त्रिरात्रेण मातुराप्तांश्च बान्धवान् ॥ १०१ ॥
न विप्रं स्वेषु तिष्ठत्सु मृतं शूद्रेण नाथयेत् ।
अस्वर्ग्या ह्याहुतिः सा स्याच्छूद्रसंस्पर्शदूषिता ॥ १०४ ॥
एका लिङ्गे गुदे तिस्रस्तथैकत्र करे दश ।
उभयोः सप्त दातव्या मृदः शुद्धिमभीप्सता ॥ १३६ ॥
एतच्छौचं गृहस्थानां द्विगुणं ब्रह्मचारिणाम् ।
त्रिगुणं स्याद्वनस्थानां यतीनां तु चतुर्गुणम् ॥ १३७ ॥ मनु. अ. ५
उष्ट्रयानं समारुह्य खरयानं तु कामतः ।
स्नात्वा तु विप्रो दिग्वासाः प्राणायामेन शुध्यति ॥२०१॥ मनु. अ.११
गृहीतशिश्नश्चोत्थाय मृद्भिरभ्युद्धृतैर्जलैः ।
गन्धलेपक्षयकरं शौचं कुर्यादतंद्रितः ॥ १७ ॥
तेनोपसृष्टो लभते न राज्यं राजनन्दनः ।
कुमारी च न भर्तारमपत्यं गर्भमङ्गना ॥ २७५ ॥
आचार्यत्वं श्रोत्रियश्च न शिष्योऽध्ययनं तथा ।
वणिग्लाभं न चाप्नोति कृषिं चापि कृषीवलः ॥ २७६ ॥ या.व. अ.३
फलपुष्पान्नरसजसत्त्वघाते घृताशनम् ॥ २७५ ॥ याज्ञवल्क्य अ. ३
वृक्षगुल्मलतावीरुच्छेदने जप्यमृकशतम् ॥ २७६ ॥
पुंश्चलीवानरखरैर्दष्टश्चोष्ट्रादिवायसैः ।
प्राणायामं जले कृत्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥ २७७ ॥
ब्राह्मणे नानुगंतव्यो न शूद्रो न द्विजः क्वचित् ।
अनुगम्याम्भसि स्नात्वा स्पृष्ट्वाग्निं घृतभुक् शुचिः ॥ २६ ॥ अ. ३

मनुः—गुरु व शिष्य यामधून जर पशु, बेडूक, मांजर, घोडे, साप, उंदीर व मुंगूस गेलें, तर तीन दिवस अनध्याय पाळावा. गांवडुक्कर, गांवकोंबडा, लसूण, कांदा, गाजर व पावसाळ्यांत उकिरड्यावर वाढणारी छत्री नांवाची वनस्पती, ही

बुद्धिपूर्वक खाल्ली तर द्विज पतित होतो, व अबुद्धिपूर्वक खाल्ली तर कृच्छ्र व सांतपन व्रत आचरावें. असपिंड द्विजाचें प्रेत व आईचे आप्त व बांधव यांचीं प्रेतें ब्राह्मणानें वाहिल्यास तो तीन दिवसांनीं शुद्ध होतो. मेलेल्या ब्राह्मणाला जवळ ब्राह्मण असतांना शूद्रानें खांदा देऊं नये. शूद्रानें खांदा दिल्यास मंत्राग्नि स्वर्गप्रद होत नाहीं. शौचाचे वेळीं विशिष्टस्थळीं यथाधिकार मातीचे गोळे लावावे. उंट व गाढव यांच्या वहानांत बसल्यास नागव्यानें प्राणायाम करावा व शुद्ध व्हावें.

याज्ञवल्क्यः — शौचानंतर शिश्न हातांत धरून उठावें व माती आणि पाणी यांच्या सहाय्यानें निरलसपणें घाण जाईपर्यंत ढुंगण धुवावें. विपरीत स्वप्नें पडलीं म्हणजे विपरीत फळें मिळतात. राजपुत्राला राज्य, मुलीला नवरा, स्त्रियांना गर्भ, श्रोत्रियाला आचार्यत्व, शिष्याला अध्ययन, वाण्याला लाभ व शेती करणाऱ्याला पीक प्राप्त होत नाहीं, म्हणून त्यांनीं दुष्ट स्वप्न निरसनार्थ स्नान, दान, पुण्याहवाचन इत्यादि करावींत. फल, पुष्प, अन्न व रस यांतून उत्पन्न झालेल्या प्राण्याचा वध केल्यास स्नानपूर्वक तूप प्यावें. वृक्ष, गुल्म, लता यांचा छेद केल्यास शंभर ऋचांचा जप करावा. वानर, खर, अश्व, उंट, कावळा इत्यादि चावल्यास पाण्यांत प्राणायाम करावा व तूप पिऊन शुद्ध व्हावें. ब्राह्मणाच्या प्रेतयात्रेस शूद्रानें व शूद्र-प्रेतयात्रेस द्विजानें न जावें. द्विज गेलाच तर स्नान, अग्निस्पर्श व घृतप्राशन यानें शुद्ध होतो. बाजारांत बसून पदार्थ विकणें, पैसे घेऊन शिकविणें, व्याज बट्टा करणें, मीठ तयार करणें, औषध देऊन जगणें, जळणाकरितां झाडें तोडणें इत्यादि उपपातकें याज्ञवल्क्यानें सांगितलेलीं आहेत.

बौधायनापासून याज्ञवल्क्यापर्यंतच्या स्मृतिकारांनीं सांगितलेल्या अनेक वचनांपैकीं कांहीं निवडक वचनें वर देऊन त्यांचा भाव मराठींत सांगितला. आतां थोड्या चिकित्सक बुद्धीनें त्या वचनांची चर्चा करितों. कुत्रें, वानर, गाढव इत्यादि चावलें असतां नदींत जाऊन स्नान कां करावें ? त्या स्नानानें कुत्र्याचें अथवा इतरांचें विष उतरतें काय ? कुत्रें चावल्यावरोबर स्नानाला जर नदी नसली किंवा वाहतें पाणी नसलें तर काय करावें ? कुत्रें चावल्याबरोबर तें खुळें होतें, कां पिसाळलेलें होतें याची चौकशी आधीं करावयास नको काय ? कुत्र्याचें विष स्नान, प्राणायाम व घृतप्राशन यांनीं नष्ट होत नाहीं. त्या विषाला मारक असा उपाय दुसराच आहे. तेव्हां कुत्र्याचा दंश व त्यानिमित्त

स्नान यांत काय धर्म आहे ? येथें सर्व स्मृतिकारांनीं एकच प्रायश्चित्त सांगितलें असें नाहीं. कुत्र्याचा स्पर्शदोष मानला आहे खरा; पण ब्राह्मण शेती करूं लागल्यावर कुत्रें त्याला लागूं लागलें आणि पुढें तें दत्ताचें वाहन झाल्यावर त्याचा विटाळ गेला ! ब्राह्मण शेतकऱ्याचीं मुलें सर्वत्र कुत्रीं घेऊन खेळतात. श्वदंशास बौधायन म्हणतो कीं समुद्रगा नदींत स्नान करावें व शंभर प्राणायाम करावेत. विष्णु म्हणतो कीं वाहत्या पाण्यांत जाऊन स्नान करावें व सोळा प्राणायाम करावेत. पण याज्ञवल्क्य म्हणतो कीं पाण्यांत प्राणायाम करावेत, (स्नान करून कां न करतां ?) व तूप पिऊन शुद्ध व्हावें. तात्पर्य कुत्र्याचा दंशदोष सर्वांना मान्य पण प्रायश्चित्ताबद्दल एकवाक्यता नाहीं. उंदीर, मांजर, कोल्हा इत्यादि चावल्यास त्यांच्या विषाची बाधा न होईल असा उपाय करणें जरूर नाहीं काय ? यांपैकी एखाद्याचें विष स्नानामुळें सर्व अंगभर पसरलें व मृत्यु लौकर आला तर त्याला जबाबदार कोण ? अर्थात् या धर्माज्ञा कशाशाच वाटतात व यांत कसला धर्म आला आहे असाहि संशय येतो !

शौचाकरितां विविध ठिकाणची माती आणावी आणि तिचे अमुक गोळे चार आश्रमांतील माणसांनीं लावावे इत्यादि शौच विधि वसिष्ठ, विष्णु, मनु, याज्ञवल्क्य, अत्रि, आश्वलायन व दक्ष अशा अनेक स्मृतिकारांनीं सांगितलेला आहे. प्रश्न असा कीं या मातीच्या गोळ्यांचा व शौचाचा संबंध काय? माती चोळून ढुंगण धुवा असें सांगितलें असतें तर तें सयुक्तिक होतें. या मातीच्या गोळ्यामुळें शौचाला साफ होतें काय ? हाताला वर गोळे लावल्यानें खालची घाण कशी जाणार ? मातीच्या गोळ्यांची संख्या कमी असूं नये व जास्ती असूं नये. कमी अधिक संख्या केल्यास प्रायश्चित्त आहे असें पुढें दक्षानें म्हटलें आहे आणि टीकाकारहि गोळ्यांची संख्या अपूर्वाकरितां आहे असें म्हणतात; शौचाला बसण्यांत व मातीचे गोळे लावण्यांत असें काय पुण्य किंवा अपूर्व असावें ? शौचाला एका विशिष्ट पद्धतीनें बसण्यामध्यें पुण्य व न बसण्यांत पाप, असें जर होऊं लागलें तर उपकार, दया, दान, अनासक्ति, कर्तव्यनिष्ठा इत्यादि गुणांच्या योगानें जी पुण्यप्राप्ति होते असें म्हणतात, तिची वाट काय ? ढुंगण स्वच्छ धुतल्यानें आरोग्य प्राप्त होतें, आरोग्यामुळें उत्साह वाढतो, उत्साहामुळें कार्य चांगलें होतें; अशी अपूर्व परंपरा आहे व ती कोणालाहि पटण्याजोगी

आहे. तेव्हां न्यूनाधिक गोळे लावल्यानें पुण्य नष्ट होतें असें सांगण्यांत काय धर्म आहे हेंच कळत नाहीं. स्वच्छ पाणी व माती यांनीं निर्मळ शुद्धि करावी. त्यामुळें आरोग्य वाढतें असें सांगणेंच सयुक्तिक नव्हे काय ?

पूर्वकाळीं गुरुगृहीं विद्यार्थी असत. अर्थात् गुरुपत्नी तरुण असल्यास तिचा व विद्यार्थ्यांचा वेडावांकडा संबंध होत असे, असें दिसतें. गुरुतल्पाचें कडक प्रायश्चित्त व गुरुपत्नीशीं योग्य वागणूक हा विषय पुष्कळांनीं पुष्कळच सांगितला आहे. आजच्या परिस्थितींत तो प्रसंग फारसा येत नाहीं. कारण गुरुपत्नी व विद्यार्थी हीं निकट सहवासांतच येत नाहींत. गुरुपत्नीगमनाबद्दल शिष्याला कडक प्रायश्चित्त सांगितलें आहे, तें अयोग्य आहे असें आजहि म्हणतां येत नाहीं. पण त्या पत्नीलाहि कांहीं शिक्षा नको काय ? तिच्या शिक्षेबद्दल एकहि स्मृतिकार अवाक्षर काढीत नाहीं. तेव्हां हा पक्षपाताचा धर्म कसला ?

मामा व आत्या यांच्या मुलीशीं लग्न केल्यास दोष आहे, असें उशनस व इतरहि म्हणतात. पण बौधायन ही दक्षिणेकडील विप्रतिपत्ति म्हणून नमूद करतो. कांदा, लसूण, गाजर, गांवकोंबडे व गांवडुक्कर आणि गोमांसभक्षण हीं सर्व एकाच माळेंत गोंविलीं आहेत व सर्वांना एकच प्रायश्चित्त सांगितलें आहे याचें आश्चर्य वाटतें ! कांदा, लसूण, गाजर, वांगें, मुळा, टामाटो इत्यादि पदार्थांत वैद्यशास्त्रदृष्ट्या गुण नाहीं काय ? विशिष्ट रोगावर लसूण खावी. उष्ण प्रदेशांत कांद्याची जरूर आहे. गाजर व टामाटो यांमध्यें जीवनशक्ति अधिक आहे, असें आजचें शास्त्र सांगत असतांना कांदा व लसूण यांच्या भक्षणास पुन्हां मुंज केली पाहिजे असें जें प्रायश्चित्त सांगितलें आहे तें कितीतरी अयुक्तिक वाटतें. हें प्रायश्चित्त भीतीकरितां असेल, तर त्या पदार्थांतील दोष सांगावयास पाहिजेत. हें प्रायश्चित्त अपूर्वाकरितां असेल तर कांदा व लसूण खाण्यामध्यें विशेष पाप आहे व तीं न खाण्यांत विशेष पुण्य किंवा अपूर्व आहे असें आजच्या जगाला वाटत नाहीं. सगळा धर्म अमुक खाणें व अमुक न खाणें यांतच आहे काय ? व असेल तर तो कसला धर्म ? आरोग्यदृष्ट्या हितकर, आर्थिक दृष्ट्या सोईचे व व्यवहारांत वागतांना जी वृत्ति पाहिजे तिला पोषक, असे हे पदार्थ असतांना त्यांच्या भक्षणाबद्दल जीं मोठमोठीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत तीं या काळांत तरी बदललीं पाहिजेत.

निळ्या व तांबड्या वस्त्रांत असा काय दोष आहे कीं जें नेसल्यानें स्नानच केलें पाहिजे. पूर्वी निळीचा धंदा घाणेरडा होता व आळत्याचा तांबडा रंगहि फार घाणेरडेपणानेंच होत असे. आज तो प्रसंग नाहीं म्हणून स्नानाचें प्रायश्चित्त नको. महादेवाची पूजा अमूक दिवशीं केली व विविध पूर्णिमेच्या कालीं विविध दानें दिलीं म्हणजे चांगली बायको, चांगला नवरा, गवाधिपत्य इत्यादि प्राप्त होतात व पाप नष्ट होतें, हें सांगणें बुद्धीला पटत नाहीं. चांगला नवरा किंवा चांगली बायको मिळविण्याचें साधन दान हें नसून विद्या, कर्तृत्व, शील, पराक्रम इत्यादि नव्हेत काय ? दानानेंच सर्व प्राप्त होतें असें म्हटल्यामुळें समाजाचें कर्तृत्व नष्ट होत नाहीं काय ? गाईला खाजविणें, देवपूजा करणें अशा गोष्टी पुष्कळ माणसें रोज करतात आणि अशा तऱ्हेच्या चांगल्या गोष्टी कराव्या, त्यामध्यें आपला उत्कर्ष आहे असें अवश्य सांगावें. पण त्याला जी भली मोठी फलश्रुति जोडली आहे, ती आजच्या काळांत निरुपयोगी आहे. पोकळ स्तुति व पोकळ भीति ही आतां नको आहे.

शूद्रप्रेतयात्रेला ब्राह्मणानें जाऊं नये व ब्राह्मणप्रेतयात्रेला शूद्रानें जाऊं नये हें आजच्या हिंदु संघटनेच्या काळांत कसेंसेंच वाटतें. अशा निषेधामुळेंच हिंदुप्रेतयात्रेस एकंदरींत माणसें कमी जातात व त्यांतल्यात्यांत ब्राह्मण प्रेतयात्रेस फारच कमी जमतात. कोणत्याहि हिंदूच्या प्रेतयात्रेस सर्वांनीं जावें व स्नानानें शुद्ध व्हावें, असा आजचा धर्मविधी नको काय ? क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्या प्रेतयात्रेस गेल्यास ब्राह्मणानें अनुक्रमें एक, दोन व तीन दिवस अशौच पाळावें असें पराशरानें म्हटलें आहे. तसेंच असपिंड द्विज प्रेतयात्रेस गेल्यास तीन दिवस अशौच आहे असें मनूहि सांगतो. या शास्त्राचें अदृष्ट फल जरी कळत नसलें, तथापि दृष्ट फल मात्र असें दिसतें कीं यामुळें प्रेतयात्रेस कोणीहि हौसेनें जात नाहींत. बोलवावयास गेले तर अनेक खरीं खोटीं कारणें सांगतात व जेमतेम जरूरीपुरती माणसें जमण्याची मारामार पडते ! तेव्हां दृष्ट फल ज्याचें अनिष्ट दिसतें व ज्यामुळें समाजाचें विघटन होतें, असें शास्त्र केवळ अदृष्टाकरितां अभ्युदय नष्ट करून मानण्याची प्रवृत्ति आजच्या जगांत नको आहे. म्हणून धर्म सांगण्याची पद्धत बदलली पाहिजे.

शिष्य व गुरु यांमधून उंदीर, मांजर, सर्प इत्यादि गेले म्हणजे तीन दिवस

सुटी मिळते, हें जर आजच्या विद्यार्थ्यांना समजेल, तर ते रोज एकेक उंदीर आणून सोडून सुटी मिळवितील ! पूर्वीचे अनध्याय आज पाळणें अशक्य व अव्यवहार्य आहे व ते न पाळण्यांत पाप आहे असें मुळींच नाहीं. आज दिपवाळीची व उन्हाळयाची सुटी हेच अनध्याय होत. याशिवाय इतरहि सुट्या असतात. मनःप्रसाद, शुचिर्भूतपणा आणि पवित्रता अशा स्थितींतच विद्येचें दान व ग्रहण व्हावें हें सर्वथैव योग्य ! पण पूर्वीचें विशिष्ट अनध्याय पाळण्यांत धर्म आहे व अपूर्व आहे, असें समजणें भ्रामक आहे. मनुष्याला विकार जडला व झोप नीट न आली म्हणजे बरींवाईट स्वप्नें पडतात. त्या स्वप्नांचा व राज्य, पुत्र, धन यांच्या प्राप्तीचा कांहीं संबंध नाहीं. दुष्टस्वप्नशमनार्थ पुण्याहवाचन केल्यानें पुत्रप्राप्ति कशी होणार ? राज्यप्राप्तीचा मार्ग दान व पुण्याहवाचन नसून, तो मुत्सद्दीपणा, पराक्रम, लोकसंग्रह, शिस्त, संघटना, हाच नाहीं काय ? तेव्हां दुःस्वप्नांचें भयहि वाजवीपेक्षां जास्त सांगण्यांत धर्माचा व समाजाचा अधःपात आहे. वृक्ष, लता, औषधी यांचा उगाच कोणी छेद करूं नये, हें योग्य होय. पण औषधांवर जगणें, जळणाकरितां झाड तोडणें, पैसे घेऊन शिकविणें, मीठ तयार करणें, अशा गोष्टी याज्ञवल्क्यानें उपपातकांत घातल्या आहेत त्या अनर्थावह नाहींत काय ?

शिरो वेष्ट्य तु यो भुंक्ते दक्षिणाभिमुखस्तु यः ।
वामपादकरः स्थित्वा तद्वै रक्षांसि भुंजते ॥ ५९ ॥
यतये कांचनं दत्वा तांबूलं ब्रह्मचारिणे ।
चौरेभ्योऽप्यभयं दत्त्वा दाताऽपि नरकं व्रजेत् ॥ ६० ॥ पराशर अ. १
अनाथं ब्राह्मणं प्रेतं ये वहंति द्विजातयः ।
पदे पदे यज्ञफलमानुपूर्व्याल्लभंति ते ॥ ४१ ॥
शवं च वैश्यमज्ञानाद्ब्राह्मणो ह्यनुगच्छति ।
कृत्वा शौचं द्विरात्रं च प्राणायामान् षडाचरेत् ॥ ४६ ॥
प्रेतीभूतं तु यः शूद्रं ब्राह्मणो ज्ञानदुर्बलः ।
अनुगच्छेन्नीयमानं त्रिरात्रमशुचिर्भवेत् ॥ ४७ ॥
त्रिरात्रे तु ततः पूर्णे नदीं गत्वा समुद्रगाम् ।
प्राणायामशतं कृत्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥ ४८ ॥

तस्माद्द्विजो मृतं शूद्रं न स्पृशेन्न च दाहयेत् ।
दृष्टे सूर्यावलोकेन शुद्धिरेषा पुरातनी ॥ ५० ॥ अ. ३
ऋतुस्नाता तु या नारी भर्तारं नोपसर्पति ।
सा मृता नरकं याति विधवा च पुनः पुनः ॥ १४ ॥
ऋतुस्नातां तु यो भार्यां सन्निधौ नोपगच्छति ।
घोरायां भ्रूणहत्यायां युज्यते नात्र संशयः ॥ १६ ॥ अ. ४
वृकश्वानशृगालादिदष्टो यस्तु द्विजोत्तमः ।
स्नात्वा जपेत्स गायत्रीं पवित्रां वेदमातरम् ॥ १
गवां शृंगोदकस्नानान्महानद्यास्तु संगमे ।
समुद्रदर्शनाद्वापि शुना दष्टः शुचिर्भवेत् ॥ २
वेदविद्याव्रतस्नातः शुना दष्टो द्विजो यदि ।
स हिरण्योदके स्नात्वा घृतं प्राश्य विशुध्यति ॥ ३
ब्राह्मणी तु शुना दष्टा जंबुकेन वृकेण वा ।
उदितं ग्रहनक्षत्रं दृष्ट्वा सद्यः शुचिर्भवेत् ॥ ७ ॥ अ. ५
हत्वा मूषकमार्जारसर्पाजगरडुंडुभान् ।
कृसरं भोजयेद्विप्राँल्लोहदण्डं च दक्षिणाम् ॥ ९
चोरः श्वपाकश्चण्डालो विप्रेणाभिहतो यदि ।
अहोरात्रोषितः स्नात्वा पंचगव्येन शुध्यति ॥ २१
पादुकास्थो न भुंजीत पर्यंकस्थः स्थितोऽपि वा ।
श्वानचण्डालदृक्चैव भोजनं परिवर्जयेत् ॥ ६६ ॥ अ. ६
विद्यमानेषु हस्तेषु ब्राह्मणो ज्ञानदुर्बलः ।
तोयं पिबति वक्त्रेण श्वयोनौ जायते ध्रुवम् ॥ ५३ ॥ अ. १२

प्रभासादीनि तीर्थानि गंगाद्याः सरितस्तथा ।
विप्रस्य दक्षिणे कर्णे सांनिध्यं मनुरब्रवीत् ॥
अग्निरापश्चवेदाश्च सोमसूर्यानिलस्तथा ॥ अ. ७
कुशैः काशैश्च बध्नीयाद्गोपशुं दक्षिणामुखम् ॥ ३४ ॥
यत्किंचित्क्रियते पापं सर्वं केशेषु तिष्ठति ।
सर्वान्केशान्समुध्दृत्य च्छेदयेदंगुलिद्वयम् ॥ ५५ ॥ पराशर अ. ९

एकपंक्त्युपविष्टानां विप्राणां सहभोजने ।
यद्येकोऽपि त्यजेत्पात्रं शेषमन्नं न भोजयेत् ॥ ८
पीयूषं श्वेतलशुनं वृंताकफलगृंजने ।
पलांडुं वृक्षनिर्यासान् देवस्वं कवकानि च ॥ १०
त्रिरात्रमुपवासेन पंचगव्येन शुद्धता ॥ १२ ॥ अ. ११
निराशास्ते निवर्तन्ते वस्त्रनिष्पीडने कृते ।
तस्मान्न पीडयेद्वस्त्रमकृत्वा पितृतर्पणम् ॥ १३
क्षुते निष्ठीवने चैव दंतोच्छिष्टे तथाऽनृते ।
पतितानां च संभाषे दक्षिणं श्रवणं स्पृशेत् ॥ १९
दक्षिणार्थं तु यो विप्रः शूद्रस्य जुहुयाद्धविः ।
ब्राह्मणस्तु भवेच्छूद्रः शूद्रस्तु ब्राह्मणो भवेत् ॥ ३६ ॥ अ. १२
मंडूकं चैव हत्वा च सर्पमार्जारमूषकान् ।
त्रिरात्रोपोषितस्तिष्ठेत्कुर्याद्ब्राह्मणभोजनम् ॥ १५० ॥
पादुकोपानहौ छत्रं शयनान्यासनानि च ।
विविधानि च यानानि दत्वा द्रव्यपतिर्भवेत् ॥ ५७
दद्याद्यः शिशिरे वह्निं बहुकाष्ठं प्रयत्नतः ।
कायाग्निदीप्तिं प्राज्ञत्वं रूपं सौभाग्यमाप्नुयात् ॥ ५८
औषधं स्नेहमाहारं रोगिणां रोगशांतये ।
दत्वा स्याद्रोगरहितः सुखी दीर्घायुरेव च ॥ ५९
इंधनानि च यो दद्याद्विप्रेभ्यः शिशिरागमे ।
नित्यं जयति संग्रामे श्रिया युक्तस्तु दीप्यते ॥ ६०
ऋतुमतीं यो भार्यां सन्निधौ नोपगच्छति ।
तस्या रजसि तं मासं पितरस्तस्य शेरते ॥ ९९
ब्रह्मघ्नश्च वनं गच्छेद्वल्कवासा जटी ध्वजी ।
वन्यान्येव फलान्यश्नन् सर्वकामविवर्जितः ॥ ११३
ख्यापयन्मुच्यते पापाद्ब्रह्महा पापकृत्तमः ।
अनेन तु विधानेन द्वादशाब्दव्रतं चरेत् ॥ ११६ ॥ संवर्त ॥

अन्यैस्तु खानिताः कूपास्तडागानि तथैव च ।
येषु स्नात्वा च पीत्वा च पञ्चगव्येन शुध्यति ॥ ५ ॥ आपस्तंब अ. २
रोमकूपैर्यदा गच्छेद्रसो नील्यास्तु कर्हिचित् ।
पतितस्तु भवेद्विप्रस्त्रीभिः कृच्छ्रैर्विशुध्यति ॥ ५
नीली दारु यदा भिन्द्याद्ब्राह्मणस्य शरीरकम् ।
शोणितं दृश्यते तत्र द्विजश्चान्द्रायणं चरेत् ॥ ६ ॥ आपस्तंब अ. ६
मृते भर्तरि या नारी नीली+वस्त्रं तु धारयेत् ।
स्वामी तिष्ठति पाताले नीलीवस्त्रस्य धारणात् ॥ ३९
अग्न्यागारे गवां गोष्ठे देवब्राह्मणसन्निधौ ।
भोजने जपकाले च पादुकानां विसर्जनम् ॥ १०५
पादुकासनमारूढः स्वगृहात्परगृहं व्रजेत् ।
छेदयेत्तस्य पादौ तु धार्मिकः पृथिवीपतिः ॥ १०६
अग्निहोत्री तपस्वी च श्रोत्रियो वेदपारगः ।
एते सपादुका यान्ति शेषान्दण्डेन ताडयेत् ॥ १०७ ॥ अंगिरः ॥
गवां शृंगोदके स्नात्वा महानद्युपसंगमे ।
समुद्रदर्शनेनैव व्यालदष्टः शुचिर्भवेत् ॥ ६५
वृकश्वानशृगालैस्तु यदि दष्टश्च ब्राह्मणः ।
हिरण्योदकसंमिश्रं घृतं प्राश्य विशुद्ध्यति ॥ ६६
भुक्तमात्रो यदा विप्र आर्द्रपाणिस्तु तिष्ठति ॥ १४६
लक्ष्मीर्बलं यशस्तेज आयुश्चैव प्रलीयते ॥

---

+ टीप—निळीचा व नीलवस्त्राचा निषेध इतका केला आहे त्याचें कारण असें:— निळीचें झाड शेवरीसारखें असतें. त्यावर हिरवा निळसर रंग पानालगत असतो. निळीच्या पेंढ्या एका बांधलेल्या हौदांत कुजत घालतात. कांहीं दिवसांनीं हौदांतील पाणी उकळूं लागतें. नंतर पेंढ्या धुवून बाहेर टाकतात. कांहीं दिवसांनीं हौदाच्या बुडाशीं रंगाचा थर त्यांत एरंडेल टाकल्यामुळें दृष्टीस पडूं लागतो. हौदांत नीळ कुजूं लागली कीं नरकाप्रमाणें दुर्गंधी येते आणि माशांचे थवेच्या थवे गुंगगुंग करीत हिंडतात. इतक्या घाणीमुळें होणारा रंग व त्याचा वस्त्राशीं संबंध म्हणून हा निषेध केला असावा.

मत्स्यास्थिजम्बुकास्थीनि नखशुक्तिकपर्दिकाः ।
स्पृष्ट्वा स्नात्वा हेमतप्तघृतं पीत्वा विशुध्यति ॥ ९१ ॥ अत्रिसंहिता ॥
ब्राह्मणस्तु शुना दष्टो जम्बूकेन वृकेण वा ।
उदिते ग्रहनक्षत्रे दृष्ट्वा सद्यः शुचिर्भवेत् ॥ २ ॥
रक्तवस्त्रस्य विक्रेता लाक्षारजकमेव च ।
वेणुजीवनकैवर्ततक्षचर्मोपजीविनः ॥ ५२ ॥
एतेषां स्पर्शनात्पापं तथा चैव तु मोहितः ।
प्रतिग्रहाच्च विप्रो वै नरकं प्रति गच्छति ॥ ५३ ॥ बृ. यम अ. १
गन्धालंकारवस्त्राणि धूपमाल्यानुलेपनम् ।
उपवासे न दुष्यन्ति दन्तधावनमञ्जनम् ॥ ५५ ॥
दन्तकाष्ठममावास्यां चतुर्दश्यां च मैथुनम् ।
हन्ति सप्त कुलान्कृत्वा तैलाभ्यङ्गं तथा व्रती ॥ ५६ ॥ वृद्धशातातप ॥
नकुलभोजने लशुनपलाण्डुगृञ्जनभक्षणे तप्तकृच्छ्रम् ॥ ९ ॥
पुनरुपनयनं कृच्छ्रंच ॥ १० ॥
दन्तधावनमङ्गुल्या प्रत्यक्षलवणं च यत् ।
मृत्तिकाभक्षणं चैव तुल्यं गोमांसभक्षणैः ॥ ७३ ॥
गवां श्वासोदकस्नाने महानद्याश्च संगमे ।
समुद्रदर्शने चैव शुना दष्टः शुचिर्भवेत् ॥ ८८ ॥ लघुशातातप ॥
यथाविधि ततः कुर्यादुत्सर्गं मलमूत्रयोः ।
ब्रह्मचारी गृहस्थश्च शौचमद्भिर्मृदाऽऽचरेत् ॥ ९ ॥
एका लिङ्गे करे तिस्रः करयोर्मृद्द्वयं गुदे ।
पञ्च वामे दश प्रोक्ताः करे सप्ताथ हस्तयोः ॥ १० ॥
एतच्छौचं गृहस्थस्य द्विगुणं ब्रह्मचारिणः ।
वानप्रस्थस्य त्रिगुणं यतेश्चैव चतुर्गुणम् ॥ ११ ॥ ल. आ. प्र. १
एका लिङ्गे गुदे तिस्रो दश वामकरे तथा ।
उभयोः सप्त दातव्या मृदस्तिस्रस्तु पादयोः ॥ ५ ॥
गृहस्थे शौचमाख्यातं त्रिष्वन्येषु यथाक्रमम् ।
द्विगुणं त्रिगुणं चैव चतुर्थे च चतुर्गुणम् ॥ ६ ॥

न्यूनाधिकं न कर्तव्यं शौचं शुद्धिमभीप्सता ।
प्रायश्चित्तेन युज्येत विहितातिक्रमे कृते ॥ १३ ॥ दक्ष अ. ५
अतर्पितेषु पितृषु वस्त्रं निष्पीडयेच्च यः ।
निराशाः पितरस्तस्य भवन्ति सुरमानुषैः ॥ २४ ॥ व्यास अ. ३
उद्धृत्य वामहस्तेन तोयं वक्त्रेण यः पिबेत् ।
स सुरां वा पिबेत् व्यक्तां सद्यः पतति रौरवे ॥ २७५
शङ्खेनापोशने पीत्वा शङ्खेन दधिपायसे ।
शङ्खेनान्नरसं क्षीरं पीत्वैव पतितो भवेत् ॥ २७६
प्रत्यक्षलवणं शुक्रं क्षीरं लवण संयुतम् ।
दधि हस्तेन मथितं सुरापानसमं स्मृतम् ॥ २७७ ॥ वृ. हा. स्मृति ॥

पराशरः—डोक्याला वस्त्र गुंडाळून दक्षिणेकडे तोंड करून डाव्या पायावर हात ठेवून जो जेवतो, त्याचें अन्न राक्षस खातात. यतीला कांचन, ब्रह्मचाऱ्याला विडा व चोराला अभय देणारा मनुष्य नरकाला जातो. जे त्रैवर्णिक अनाथ ब्राह्मणाचें प्रेत वाहातात, त्यांना प्रत्येक पावलागणिक यज्ञाचें फल मिळतें. क्षत्रिय, वैश्य व शूद्र प्रेतयात्रेला ब्राह्मण जर अज्ञानानें गेला तर अनुक्रमें एक, दोन व तीन दिवस अशौच पाळून स्नान करून शुद्ध व्हावें. द्विजानें शूद्राला ( मृत ) स्पर्श करूं नये किंवा जाळूं नये. तसें केल्यास त्रिरात्र अशौच, समुद्रगामी नदीमध्यें स्नान, घृतप्राशन व सूर्यदर्शन असें प्रायश्चित्त आहे. ऋतुस्नात स्त्री जर भर्त्याकडे गेली नाहीं, तर मेल्यावर ती नरकांत जाते व पुनः पुन्हा विधवा होते. जो पुरुष आपल्या स्त्रीशीं ऋतुकालीं गमन करीत नाहीं, त्याला घोर असें भ्रूणहत्येचें पातक लागतें. कुत्रें, लांडगा, कोल्हा इत्यादि चावल्यास समुद्रदर्शन, महानदीसंगमस्नान, गायत्रीजप, इत्यादि प्रायश्चित्त सांगितलें आहे. ब्राह्मणीला जर कुत्रें, कोल्हा किंवा लांडगा चावला तर नक्षत्र पाहून ती शुद्ध होते. उंदीर, मांजर, साप, अजगर व दुतोंडें यांना ठार केल्यास ब्राह्मणांना कृसर नांवाचें पक्वान्न ( तांदूळ, दूध, तूप, साखर मिश्रित ) जेवूं घालावें व ब्राह्मणांना लोहदंड व दक्षिणा द्यावी. चोर, श्वपाक, चंडाल यांना ब्राह्मणानें ठार केल्यास अहोरात्र उपोषण, स्नान व पंचगव्यप्राशन यानें शुद्धि होते. पायांत घालून व पलंगावर बसून जेवूं नये. कुत्रें व चंडाल यांची दृष्टि आपणाकडे असतांना जेवूं नये. हात असतांना जो ब्राह्मण

कुत्र्यासारखे तोंड लावून पाणी पितो, ( ओंज्यानें न पितां ) तो कुत्रा होतो. प्रभासादि तीर्थें व गंगादि नद्या या ब्राह्मणाच्या उजव्या कानांत असतात व तेथेंच देवतांचें वास्तव्य असतें.

गाईला कुश व काश यांच्या दोऱ्यांनीं दक्षिणेकडे तोंड करून बांधावें. जें जें पाप केलें जातें, तें सर्व केसामध्यें राहातें, म्हणून पुरुषाचा क्षौर करावा व स्त्रीचा सबंध क्षौर न करितां सर्व केसांचीं शेवटचीं टोकें दोन दोन अंगुलें छाटावीं. एका पंक्तीस बसलेल्या अनेक ब्राह्मणांपैकीं जर एक ब्राह्मण मध्येंच उठून गेला, तर इतरांनीं पानांतील अन्न न खातां उठावें. कांदा, गाजर, वांगें, झाडाचा चीक इत्यादि खाल्यास तीन दिवस उपवास करून पंचगव्य पिऊन शुद्ध व्हावें. स्नानानंतर धोतरें न धुतां आधीं स्नानांग पितृतर्पण करावें. तसें न केल्यास पितर निराशेनें परततात. शिंक, जांभई, खोकला, पतितसंभाषण आणि अनृतभाषण घडल्यास उजव्या कानाला स्पर्श करावा. दक्षिणेकरितां जो ब्राह्मण शूद्रानें सांगितलेला होम करील, तो शूद्र होतो.

संवर्तः—बेडूक, मांजर, साप, उंदीर यांची हत्या केल्यास तीन दिवस उपोषण करून ब्राह्मण भोजन घालावें. छत्री, जोडे, आसन व बिछाने दान दिल्यानें दाता द्रव्यपती होतो. थंडीच्या दिवसांत अग्नि व काष्ठें दान दिल्यास सुखरूप, सौभाग्य, बुद्धिमत्ता व शरीरतेजस्विता प्राप्त होते. रोग्यांना आहार व औषध दिल्यास दाता रोगरहित होतो. थंडीच्या दिवसांत ब्राह्मणास सर्पणाचें दान दिलें असतां लढाईंत जय मिळतो व राज्यश्री मिळते. ऋतुमती भार्येच्या सन्निध जो जात नाहीं तिच्या रजामध्यें तो महिना पितर लोळतात. ब्रह्मघातक्यानें जटावल्कलें धारण करून, वन्यफळें खाऊन आपलें पाप तोंडानें उच्चारून बारा वर्षें काढावीत म्हणजे तो शुद्ध होतो.

आपस्तंब स्मृतिः—दुसऱ्यांनीं खणलेल्या विहिरी व बांधलेलीं तळीं यांत स्नानपान केल्यास पंचगव्यानें शुद्धि होते. निळी नामक वनस्पतीचा रस जर केसाच्या छिद्रांत गेला, तर तो ब्राह्मण तीन कृच्छ्रांचें प्रायश्चित्त घेतल्यानें शुद्ध होतो. नीळी वृक्षाचें लाकूड ब्राह्मणाच्या शरीराला लागलें व त्यांतून रक्त आलें तर ब्राह्मणानें चांद्रायणव्रत आचरावें.

अंगिरस्मृतिः—पति मेल्यानंतर जी स्त्री निळें वस्त्र नेसते ती आपल्या पतीला

खालीं ढकलते. अग्निशाळा, गोठा, देवालय, ब्राह्मणाचा आश्रय या ठिकाणीं जोडे घालून न जातां बाहेर काढून ठेवावे. खडावा घालून आपल्या घरांतून दुसऱ्याच्या घरीं जो जातो, त्याचे दोन्ही पाय धार्मिक राजानें तोडून टाकावे. अग्निहोत्री, तपस्वी, श्रोत्रिय, एवढ्यांनींच खडावा घालून मार्गानें जावें. इतरांना राजानें काठीनें बडवावें.

अत्रिसंहिताः—सर्प चावला असतां समुद्रदर्शन, महानदीच्या संगमांत स्नान किंवा गोश्रृंगोदकानें स्नान केल्यास मनुष्य शुद्ध होतो. लांडगा, कुत्रें, कोल्हा इत्यादि चावल्यास सुवर्ण व पाणी घातलेलें तूप पिऊन शुद्धि होते. आंचवल्यानंतर ओल्या हातानें जो ब्राह्मण वावरतो, त्याची लक्ष्मी, बल, यश, तेज व आयुष्य हीं सर्व नष्ट होतात. नख, शिंप, कवडी, मत्स्य व कोल्हा याचें हाड, यांचा स्पर्श झाल्यास सोनें घालून तापविलेलें तूप पिऊन शुद्ध व्हावें.

बृहद्यमः—कुत्रें, लांडगा, कोल्हा इत्यादि ब्राह्मणाला चावल्यास, स्नान व नक्षत्र दर्शनानें शुद्धि होते. तांबडी वस्त्रें विकणारा, लाख, परीट, बुरुड, कोळी, सुतार, ढोर, चांभार, यांचा स्पर्श झाल्यास पाप लागतें व त्याकडून प्रतीग्रह घेतल्यास नरकप्राप्ति होते.

वृद्धशातातपः—उपवासाच्या दिवशीं गंध, अलंकार व वस्त्रें धारण केल्यानें आणि दांत घासल्यानें दोष लागत नाहीं. पण आवसेच्या दिवशीं काष्ठानें दांत घासल्यास व चतुर्दशीस स्त्रीसंभोग केल्यास सप्त कुळांचा अधःपात होतो.

लघुशातातपः—मुंगुस, लसूण, कांदा, गाजर इत्यादि खाल्ल्यास तप्तकृच्छ्र व पुनरुपनयन हें प्रायश्चित्त घ्यावें. बोटानें दांत घासणें, समुद्राचें मीठ खाणें ( मातीचें मीठ खाणें ) हीं सर्व गोमांस भक्षणाच्या बरोबरीचीं आहेत. कुत्रें चावल्यास समुद्र-दर्शनादि प्रायश्चित्त घ्यावें.

लघुआश्वलायनः—मलमूत्रोत्सर्ग हा यथाविधी यथाधिकार मातीचे गोळे लावून करावा. दक्षानेंहि असेंच सांगितलें आहे. पण तो म्हणतो कीं ही गोळ्यांची संख्या कमी अधिक केल्यास प्रायश्चित्त घ्यावें.

व्यासः—पितरांचें तर्पण न करितां धोतरें धुतल्यास पितर निराशेनें परततात.

वृद्धहारीतः—डाव्या हातानें भांडें उचलून तोंडानें जो पाणी पितो तो जणु दारूच पितो व लगेंच नरकांत पडतो. आपोष्णी घेतांना, दहीं व खीर खातांना

आणि अन्नरस ( आमटी वगैरे ) खातानां भुरका मारूं नये. भुरका मारल्यास जो शद्ब होतो, त्यामुळें व मिटक्या मारीत मारीत खाल्ल्यामुळें मनुष्य पतित होतो. तसेंच हातानें घुसळलेलें दही, समुद्राचें मीठ, मादक पेयें, इत्यादि सुरापानासमान समजावींत.

पराशरापासून तों वृद्धहारीतापर्यंत स्मृतिकारांनीं सांगितलेले धर्मशास्त्रांतले कांहीं विधी सांगितले. त्यांची आतां थोडी चर्चा करूं. दक्षिणेकडे तोंड करून जेवूं नये. डाव्या पायावर हात ठेवून जेवूं नये, पलंगावर बसून व कुत्रें पाहात असतानां जेवूं नये. जेवल्यानंतर ओल्या हातांनीं राहूं नये हे सामान्य त्या काळचे शिष्टाचाराचे नियम आहेत. पण ते न पाळले कीं लगेंच राक्षस अन्न खातात व लक्ष्मी, बल, तेज, आयुष्य हीं नष्ट होतात, असें सांगणें बरोबर नाहीं. डाव्या पायावर चुकून हात ठेवला किंवा पुसण्यास फडकें नसल्यामुळें हात चुकून ओले राहिले तर त्यांत असें काय बिघडलें ? या अशा साध्या गोष्टीमध्यें कसला धर्म आहे ? आजारी असतानां पलंगावर बसून जेवावें लागतें व आजच्या काळांत जरुरीप्रमाणें पायांत बूट घालूनहि खावें प्यावें लागत नाहीं काय ? व तो अधर्म तरी कसा ? यतीलाहि आगगाडीच्या भाड्याला पैसे द्यावे लागतात. तेव्हां त्यानिमित्त यतीला द्रव्य देणारा मनुष्य नरकांत काय म्हणून जावा ? अनाथ ब्राह्मण प्रेतयात्रेला गेल्यास यज्ञाचें फल मिळतें. तसेंच कोणत्याहि अनाथ प्रेतयात्रेस गेल्यास पुण्य लागतें असें कां समजूं नये. पण ब्राह्मणांनीं इतरांच्या प्रेतयात्रेस जाऊं नये. गेल्यास अशौच पाळावें. या निर्बंधानें समाजाची हानीच केली आहे. ऋतुस्नात स्त्रीशीं गमन करावें. इतर वेळीं गमन करूं नये. ब्रह्मचर्य पाळावें, असें सांगावयाचें सोडून तसें त्या उभयतांनीं न केल्यास स्त्रीला विधवा होण्याची भीति, पुरुषाला भ्रूण हत्येचें पातक आणि पितरावर तिच्या रजांत लोळण्याचा प्रसंग कां आणला हें कळत नाहीं. स्त्रीच्या ऋतुकालीं पुरुष परगांवीं असला, कामानिमित्त व लढाईनिमित्त दूर गेला असला, किंवा कायदेभंग करून तुरुंगांत गेला असला तर त्या बिचाऱ्यावर एवढ्या पापाचा गहजब विनाकारणच नव्हे काय ? म्हणून अशा प्रकारचा धर्म सांगण्याची पद्धति बदलली पाहिजे.

स्नानानंतर पितरांचे तृप्तीकरितां स्नानांग तर्पण करावें, असें सांगणें अयोग्य नाहीं. पण वस्त्रें आधीं धुतलीं कीं लगेच पितर निराशेनें परततात हें म्हणणें

चमत्कारिक आहे. कर्मवादाप्रमाणें पितरांना त्यांच्या कर्माप्रमाणें गती मिळालेलीच असते. तेव्हां दुसरीकडे जन्म घेऊन निराळ्या कर्मांत गुंतलेले पितर हे रोजच्या रोज येतात व निराशेनें परततात, हें म्हणणें तर्काला मुळींच पटत नाहीं. पितरांचें स्मरण म्हणूनच तर्पण करावयाचें असतें. त्यांना तृप्त करण्याकरितां नव्हे.

प्रसंगीं एखादा मनुष्य भांडें नसल्यास ओंजळीनें पाणी पितो. पण समाधान होत नाहीं, म्हणून नदी, ओढा, हौद या ठिकाणीं तो तोंड लावून पाणी पितो. तसें पाणी पिणें बरें नव्हे, असें सांगावयाचें सोडून त्याला कुत्र्याच्या योनींत जन्मण्याची भीती केवढी घातली आहे बरे ? तसेंच उभ्या हातानें पाणी पिऊं नये म्हणून डाव्या हातानें पाणी प्याल्यास व आमटी, खीर यांचे जोरानें भुरके मारून चव घेतघेत ते पदार्थ खाल्ल्यास त्यांत लगेंच नरकांत जाण्याजोगें व पतित होण्याजोगें असें काय पातक घडतें ? शिवाय सगळा धर्म जर विशिष्ट पद्धतीनें स्नान, पान, भोजन व वस्त्रें धुणें यांतच येऊन बसला असेल तर तो धर्म कसला असेंहि आतां स्पष्टपणें विचारावेंसे वाटतें.

ब्राह्मणाच्या उजव्या कानांत अनेक देवता आहेत. सर्व पातकें केसांत राहातात आणि विविध पदार्थांचें दान दिल्यानें युद्धांत जय, लोकांत प्रतिष्ठा इत्यादि मिळतात. हीं विधानें धर्मशास्त्रांत असलीं तरी त्यांचें महत्त्व आतां मुळींच नाहीं, असें आदरानें व नम्रतेनें म्हणण्याची वेळ आलेली आहे. ब्राह्मणाच्या कानांत जर अग्नि, आप, सूर्य अशा देवता आहेत तर त्याला कुत्रें, मांजर, अस्पृश्य इत्यादींचा विटाळ कां होतो ? तसेंच सर्व पातकें जर केसांतच राहातात तर क्षौराशिवाय इतर प्रायश्चित्तें कां सांगितलीं ? हिवाळ्यामध्यें ब्राह्मणाला सर्पण दान करून आजपर्यंत युद्धांत कुणालाहि जय मिळाला असेल, असें मुळींच वाटत नाहीं. मात्र यावर विश्वास ठेवून शेवटच्या बाजीरावासारखे वीर पराभूतच झालेले आहेत !

नीळ, नीळीचें वस्त्र याबद्दलचा कटाक्ष हा त्या कालच्या त्या धंद्याच्या घाणेरडे-पणावरच अवलंबून आहे. पूर्वीं घाणेरडे असलेले धंदे आज किती तरी स्वच्छ झालेले आहेत.

पायांत घालून अमुक अमुक ठिकाणीं जाऊं नये हें स्वच्छतेच्या दृष्टीनें पाळणें अत्यंत आवश्यक आहे. पण खडावा घालून दुसऱ्याच्या घराकडे

जाणाऱ्याचे पाय राजानें तोडून टाकावेत, हें म्हणणें तत्कालीन राजालाहि पटलें नसावें आणि आज ते सामान्य माणसालाहि पटणार नाहीं. पूर्वी कांहीं विशिष्ट अधिकारीच खडावा घालीत. खडावा हें वैराग्याचें लक्षण समजलें जाई. पण आज इतरांनींहि खडावे घातले तर त्यांत कांहीं धर्महानी नाहीं. पायांत जोडे व खडावा; डोक्याला पागोटे व टोपी; ढुंगणाला धोतर अगर विजार हे विषय अगदीं गौण आहेत. त्यांत धर्म नाहीं व अधर्महि नाहीं आणि पाप नाहीं व पुण्यहि नाहीं.

शिंप, कवडी यांचा विटाळ, लाखेचा विटाळ, तांबडीं वस्त्रें विकणाऱ्याचा विटाळ, सुतार, बुरुड, इत्यादींचे विटाळ हे पापप्रद कां आहेत? शिंपा व कवड्या या सोवळ्यांत, औषधाला, देवाच्या गंधाला आणि अशाच अनेक कामांना औषधीदृष्ट्या व सोईच्या दृष्टीनें उपयोगी पडतात. हे पदार्थ स्वच्छहि आहेत. मग त्यांचा विटाळ मानण्यांत कसला धर्म आला आहे, हें पूर्वी तरी कळत होते कीं नाहीं याची शंकाच आहे.

लघवी व शौच हे यथाविधी, यथाशास्त्र करणें म्हणजे काय व तसें करण्यांत काय पुण्य आहे, हें आजच्या महा-मीमांसकालाहि सांगतां येणार नाहीं. बोटानें दांत घासण्यांत असें कोणतें पातक आहे कीं त्यानें गोमांस-भक्षणाची बरोबरी करावी? आवसेदिवशीं तोंड बुरसें ठेवावें कीं काय? कोणत्याहि काष्ठानें त्या दिवशीं दांत घासले तर त्यामुळें सप्त कुळांचा नाश होण्याचें कारण काय आहे? प्रत्येक मनुष्य हा आपल्या कर्मानेंच उद्धरतो व दुष्कर्मानें नाश पावतो. खापरपणत्वाच्या पणतूनें आवसेच्या दिवशीं काष्ठानें दांत घासले म्हणून सात पिढ्यापूर्वीचा तपस्वी व अग्निहोत्री ब्राह्मण अधोगतीला जाईल, हें सर्वस्वीं खोटें आहे. धर्मशास्त्राच्या नांवाखालीं पाहिजे तीं संस्कृत वाक्यें आलेलीं आहेत. तीं सर्व वाक्यें अदृष्ट व अपूर्व सांगणारीं आहेत; त्याप्रमाणें वागलें पाहिजे अशी समजूत करून घेणें हें समाजाच्या व राष्ट्राच्या अधःपातास कारणीभूत होणार आहे.

धर्मशास्त्राचें मंथन करून त्यांतील युक्तीला पटणारा व सर्वोपयोगी असाच धर्म या विसाव्या शतकांत सांगितला पाहिजे आणि तो भगवन्मुखांतून गीतेच्या स्वरूपानें बाहेर पडलेला आहे. धर्मशास्त्रांतील अनेक विधी व निषेध यांचें शोधन करून आर्यसंस्कृतीच्या मूलभूत तत्त्वाशीं जे विधी जमणारे असतील तेवढे ठेवून

इतर सर्व प्रायश्चित्त धर्मांचा ' सर्व धर्मान्परित्यज्य ' या भगवानांच्या उक्तीप्रमाणें त्याग करून गीताधर्माचा प्रचार यापुढें करावयास पाहिजे.

गीता हा एक स्मृतिग्रंथच आहे. भगवन्मुखांतून बाहेर पडलेल्या या ग्रंथाचा स्मृतिग्रंथ म्हणूनच पुष्कळ लोकांनीं उल्लेख केलेला आहे. सर्व स्मृति-ग्रंथावर हाच स्मृतिग्रंथ उतारा आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं आणि भविष्यकाळांत या स्मृतींतील कर्मयोग आचारांत यावयास पाहिजे. गीतेमध्यें आचारधर्म, प्रायश्चित्तधर्म व व्यवहारधर्महि नाहीं. पण कोणत्याहि कर्माचें आणि धर्माचें कौशल्य ज्या योगांत आहे तो कर्मयोग गीतेनें मोठ्या खुबीनें सांगितला आहे. कर्म म्हणजे काय, कोणतें कर्म करावें, तें कां करावें व कसें करावें या चार प्रश्नांचा उहापोह गीतेमध्यें आहे.

हें सर्व जगत् म्हणजे कर्मविपाक होय. जग म्हणजेच कर्म. कर्म हें शरीराबरोबर उत्पन्न झालेलें आहे आणि कर्मामुळेंच शरीरहि बनलेलें आहे. तेव्हां कोणीहि मनुष्य क्षणभर कर्माशिवाय राहूं शकत नाहीं. शरीराचा कोणताहि व्यापार म्हणजे कर्म व देहधारीला कर्माचा सर्वथैव त्याग अशक्य आहे. तात्पर्य गीतेचें कर्म फार व्यापक आहे. तें वर्ण, आश्रम, जाती, पंथ यांत गुंतलेलें नाहीं. कर्म कोणतें करावें याचें उत्तर गीता असें देतें कीं स्वभावज, प्रकृतिज, स्वभाव-नियत, सहज कर्म मनुष्यमात्रानें करावें. सुबुद्ध मनुष्यानें आपलें शिक्षण, आपले संस्कार, आपला स्वभाव, आपली परंपरा व परिस्थिति या सर्वांचा विचार करून आपलें कर्तव्य ठरवावें व त्याशीं अनन्य असावें.

स्वभावनियत कर्म हेंच विहित कर्म होय. प्रत्येकानें या विहित कर्माशीं मातेशीं जसें बालक, पाण्याशीं जसा मासा अनन्य असतो तसें असावें. धैर्य व उत्साह यांनीं युक्त होऊन निर्दोषपणें विहित कर्म करण्याचा यत्न धिम्मेपणानें करावा. गीता अमुकानें अमुकच कर्म करावें, तमुकच कर्म करावें, असला विधिनिषेध सांगत नाहीं. तर ज्याला जें उत्तम करतां येईल तें त्यानें करून जगत्चक्र चालवावें असा गीतेचा संदेश आहे. स्वभावानुरूप कर्म म्हणजे स्वेच्छाचार नव्हे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कुटुंब व समाज यापेक्षां राष्ट्राच्या हिताला पोषक अशीं कर्में मनुष्यानें करावीं. व्यष्टिधर्मापेक्षां समष्टिधर्म हा श्रेष्ठ आहे आणि समष्टिधर्माचें योग्य प्रतिपालन करणें हीच ईश्वराची पूजा आहे.

प्रत्येकानें आपलें कर्मरूपी कुसुम ईश्वराला वहावें. स्वकर्मरूपी कुसुमाचा सुगंध हाच ईश्वराला प्रिय असतो. म्हणून अंगचोरपणा न करतां व कायक्लेशभयानें कर्म न टाकतां मनुष्यानें कर्मरत असलें पाहिजे.

कर्म कां केलें पाहिजे याचें उत्तर गीता असें देते कीं हें सृष्टिचक्र कर्ममूलक आहे म्हणून कर्म केलें पाहिजे. ज्ञानी, स्थितप्रज्ञ आणि प्रत्यक्ष ईश्वरसुद्धां कर्म करतो म्हणून कर्म केलें पाहिजे. शरीर हें कर्माचेंच बनलें आहे म्हणून कर्म केलें पाहिजे. पण तें कर्म आसक्ति व अहंकार टाकून केलें म्हणजेच ईश्वरास पोचतें व तें कर्मबंधक होत नाहीं. शास्त्रांतील अनेक विधि, निषेध आणि प्रायश्चित्तें हीं सर्व आसक्ति व अहंकार पूर्वक आचरलीं तर कर्माचें बंधन नष्ट होत नाहीं. म्हणून मी करतों, मीच करीन, हा अहंकार व्यर्थ आहे आणि केलेल्या कर्माचें फळ मलाच मिळालें पाहिजे हा आग्रह ऊर्फ आसक्ति ही खोटी होय. अर्जुनाचा हा अहंकार नष्ट करण्याकरितां त्याला विश्वरूप दाखवून 'निमित्तमात्रं भव सव्य साचिन्' असें त्याला स्पष्ट बजावलें. या जगांत एक मोठी शक्ति आहे. तिच्या प्रेरणेनें सर्व उलाढाली चाललेल्या आहेत. ती शक्ति मनुष्याला निमित्त करून अनेक घटना घडवून आणते. असें एकदां ठरल्यावर मानवी अहंकार आपोआप झिजूं लागतो. रोजच्या व्यवहारांत मानवी शक्तीच्या पलीकडे असलेल्या अनेक गोष्टी घडून येतात व त्यांच्या निरीक्षणानें मनुष्याला मीच सर्व कांहीं करतो असें जें वाटत असतें तें वाटेनासें होतें.

जगत्चालकशक्तीची कल्पना आल्यावर जसा अहंकार कमी होतो तशी आसक्तीहि कमी होऊं लागते. मनुष्यजात ही मागील कित्येक पिढ्यांच्या अनुभवाचे फायदे आज घेत आहे. त्याचप्रमाणें मनुष्य प्राण्यालाहि त्यानें स्वतः न केलेल्या पण दुसऱ्याकडून केल्या गेलेल्या चांगल्या व वाईट गोष्टींचा अनुभव येत असतो. या कर्मसृष्टींत एकाची प्रेरणा दुसऱ्याला, दुसऱ्याची प्रेरणा तिसऱ्याला असें होऊन स्वतः न केलेल्या गोष्टींचा लाभ जसा मनुष्याला मिळतो तसाच त्यानें केलेल्या कर्मांचा लाभ त्यालाच होईल असें नसून तो जगालाहि होईल. कर्म म्हटलें कीं त्याला फळ हें आहे व निष्फल कर्म संभवतच नाहीं. कर्माचें फल मिळालेंच पाहिजे व तें कर्त्याला व परंपरेनें समाजालाहि मिळतें. पण आसक्तीनें त्याची इच्छा केल्यास दुःख होतें व आसक्ति सोडल्यानें सुख होतें.

अशा प्रकारचा हा गीतेचा कर्मयोगरूपी तोडगा धर्मशास्त्रांतील सर्व विधी, निषेध व प्रायश्चित्तांवर आहे. कणकेवर जशी काकडी, खोबऱ्यावर जसा तांदूळ, हुरभ्यावर जसें ताक, मुंग्यावर जसा कापूर इत्यादि उतारा समजतात, किंवा कांहीं विषावर, मादक पदार्थावर उदाहरणार्थ अफूवर चिंचेचा कोळ हा जसा उतारा सांगतात त्याप्रमाणें सर्व धर्मशास्त्रावर गीताधर्म हा उतारा आहे व त्याचाच प्रसार या विसाव्या शतकांत जितका अधिक करतां येईल तितका केला पाहिजे.

# प्रकरण १६ वें

## कांहीं संकीर्ण विषय व उपसंहार

गेल्या पंधरा प्रकरणांत धर्मशास्त्रांतील मुख्यमुख्य विषयांसंबंधाची चर्चा बऱ्याच विस्तारानें केलेली आहे. आणखी पुष्कळ विषय असे आहेत कीं त्यांचाहि विचार या किंवा अशा तऱ्हेच्या ग्रंथांत व्हावयास पाहिजे. परंतु प्रत्येक विषयाला कांहीं तरी मर्यादाहि अवश्य आहे. म्हणून शेवटीं अगदीं थोड्या प्रश्नावर मतप्रदर्शन करून हें प्रकरण व हा ग्रंथ आम्ही पूर्ण करणार आहोंत.

**कालनिर्णय कसा केला:—**आधारास घेतलेल्या अनेक सूत्र व स्मृति-ग्रंथांचा कालनिर्णय आम्ही पुढील प्रमाणें केला आहे. नियोग, मांसाहार आणि मधुपर्क प्रसंगीं मांस इत्यादि विषय ज्या ग्रंथांत विस्तारानें व विधी म्हणून मांडलेले आहेत, ते ग्रंथ प्राचीन होत यांत शंका नाहीं. प्राचीन ग्रंथांत कलि-कल्पना नाहीं. ती विष्णुधर्मसूत्रापासून आलेली आहे. अर्थात् कलिप्रयुक्त धर्माचा विचार, किंवा कलीचा उल्लेख ज्या ग्रंथांत अधीक आहे, ते ग्रंथ अलीकडचे आहेत, हें सिद्धच आहे ! नियोगाचा निषेध, मांसाहाराचे जागीं माषान्नाचा विधी, आणि दानमहती असे विषय बहुतेक अलीकडील स्मृतिग्रंथांत आहेत. प्राचीन ग्रंथांत त्रैवर्णिक व शूद्र एवढेच उल्लेख आढळतात. पण अलीकडील ग्रंथांत सत् शूद्र व असत् शूद्र, निरवसित शूद्र व अनिरवसित् शूद्र, विविध धंदे करणारे बारा प्रकारचे शूद्र, असे उल्लेख आढळतात. प्राचीन ग्रंथांत अंत्यज हा शब्दच नाहीं.

पण अलीकडील ग्रंथांत अंत्यजांचे अनुक्रमें पांच, सात व बारा प्रकारहि सांगितलेले आहेत. तसेंच ब्राह्मणांचेहि वैश्य, शूद्र, म्लेंच्छ, चंडाल असे भेद सांगितले आहेत. बुरुड हा शब्द अलीकडील स्मृतिग्रंथांतच आहे. त्याचप्रमाणें द्वैत अद्वैत व विशिष्टाद्वैतासारखे शद्बहि ज्या ग्रंथांत आले आहेत, ते ग्रंथ प्राचीन आहेत, असें म्हणणें अयोग्य आहे. तात्पर्य ग्रंथांतील शब्द, भाषा व उल्लेख या अन्तःप्रमाणांनींच स्मृतींचे काल कोणालाहि जे ठरवितां येतील, तेच आम्ही ठरविले आहेत. फक्त आपस्तंब धर्मसूत्राच्या कालाविषयीं इतर अभ्यासकाशीं आमचा मतभेद आहे. आर्षवाङ्मयाची छटा, पाणिनीय सूत्रांचें अनुकरण, मागील अधिकारांची सूत्रांत अनुवृत्ति आणि औपनिषद् वेदांताची मांडणी, इत्यादि कारणांमुळें हा ग्रंथ जसा प्राचीन आहे, तसाच तो त्या ग्रंथांत आलेल्या अनेक अपरिचित नांवांच्या उल्लेखावरूनहि सर्वांत प्राचीन आहे, असें आमचें मत आहे. इतर सौत्र व स्मृतिग्रंथांच्या कालाविषयीं इतर अभ्यासकासारखींच आमचीं मतें आहेत.

भाषांतर दिलेलें नाहीं:—वाचकांना येथें हें मुद्दाम सांगितलें पाहिजे कीं आम्ही ठिकठिकाणीं दिलेल्या स्मृतिवचनांचें शद्बशः भाषांतर दिलेलें नाहीं. तर त्या वचनांचा भावार्थ लक्षांत यावा, अशा दृष्टीनें रूपांतर दिलेलें आहे. भाषांतर दिलें असतें तर ग्रंथ वाढला असता. कारण कित्येक संस्कृत पारिभाषिक शद्ब असे आहेत कीं त्यांच्या व्याख्या दोनदोन तीनतीन श्लोकांमध्यें मूळ ग्रंथांत दिल्या आहेत. उदाहरणार्थ पुनर्भू हा शद्ब पाहा. या शद्बाचा व्यवहार हल्लीं रूढ नाहीं. म्हणून तो सांगण्याकरितां नारदस्मृतींतील पुढील श्लोक आधारास घ्यावे लागतात.

पुनर्भूस्त्रिविधा तासां स्वैरिणी तु चतुर्विधा ।
परपूर्वाः स्त्रियस्त्वन्याः सप्त प्रोक्ता यथाक्रमम् ॥
कन्यैवाक्षतयोनि र्या पाणिग्रहणदूषिता ।
पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनः संस्कार मर्हति ॥
कौमारं पतिमुत्सृज्य यात्वन्यं पुरुषं श्रिता ।
पुनः पत्युर्गृहमियात् सा द्वितीया प्रकीर्तिता ॥
असत्सु देवरेषु स्त्री बांधवै र्या प्रदीयते ।
सवर्णाय सपिंडाय सा तृतीया प्रकीर्तिता ॥

पुनर्भूचे प्रकार तीन आहेत. जी अक्षत योनी असून पाणिग्रहणानें दूषित झालेली असते, ती प्रथम पुनर्भू होय ! जी बालपणांतील पतीचा त्याग करून दुसऱ्या पुरुषाचा आश्रय करते व पुन्हां कांहीं दिवसांनीं पहिल्या पतीच्या घरीं येते, ती दुसरी पुनर्भू होय ! दीर नसतांना घरांतील स्त्री, ही नियोगाकरितां घरांतील माणसाकडून सवर्ण व सपिंड अशा मनुष्याला दिली जाते, तेव्हां ती स्त्री तिसऱ्या प्रकारची पुनर्भू समजावी, इत्यादि. अशा तऱ्हेचे बरेच पारिभाषिक शब्द धर्मशास्त्रांत येतात. ते व्यवहार हल्लीं नाहींत म्हणून व विस्तार टाळावा म्हणून आम्ही पुष्कळ शब्दांचे अर्थ अगदीं संक्षेपानें दिलेले आहेत. व्युत्पन्न व संस्कृतज्ञ वाचकांना स्वातंत्र्यानें विचार करितां येईल अशी या ग्रंथामध्यें स्थल-निर्देशपूर्वक योजना केलेली आहेच.

विवाह-वयोमर्यादा व टीकाकार:—हरदत्त लग्नानंतर बाराव्या दिवशीं गर्भादान करावें म्हणतो व कांहीं देशामध्यें लग्नाच्या दिवशींच संभोग होतो असेंहि तो म्हणतो. जनपदधर्म हा जसा असेल तसा चालवावा असें त्याचें म्हणणें आहे. आश्वलायन गृह्यसूत्रांत व शांखायन गृह्यसूत्रांत लग्नानंतर तीन रात्रीं ब्रह्मचर्य पाळावें असें म्हटलें आहे. नग्निका या शब्दाचे अर्थ टीकाकारांनीं कुचरहिता, आसन्नार्तवा, अप्राप्तस्त्रीभावा, 'मैथुनार्थे नग्निका भवितुं योग्या' असें पाहिजे तसे केले आहेत. नागव्यानें फिरण्याची मुलीला लाज वाटूं लागली कीं लग्न करावें, अशा अर्थापासून तों वर दिलेल्या शेवटच्या अर्थापर्यंत वयाची मर्यादा पांच ते सोळापर्यंत जाते. ही सगळी एकवाक्यताच काय ?

क्षात्रधर्म—ब्राह्मण धर्माचें विवेचन निरनिराळ्या स्मृतीमध्यें पुष्कळ आलेलें आहे. त्या मानानें क्षत्रियधर्माचें विवेचन फार कमी आहे. कांहीं स्मृतींत राजधर्म आहे पण प्रत्येक क्षत्रिय कांहीं राजा असत नाहीं. राजानें कसें वागावें, कसें लढावें, कोणापासून किती कर घ्यावा, न्यायदानाकरितां कोणाची नेमणूक करावी, असे विविध विषय राजाच्या कर्तव्यामध्यें सांगितले आहेत. पण क्षत्रिय-वर्णांतील माणसांनीं कसें वागावें हा विषय व वैश्य वर्गाचा धर्म याकडे स्मृतिकारांनीं कानाडोळा केलेला आहे, आणि पुष्कळ स्मृतिकारांनीं व्यवहारापेक्षां आचार व प्रायश्चित्त धर्मच पुष्कळ सांगितला आहे.

आज क्षत्रिय राजे नाहींत व जरी असले तरी त्यांना त्यांचा धर्म शिकविणारे गुरु निराळेच आहेत. पण सामान्य मनुष्यहि आज राजकीय हक्कांकरितां भांडत आहे. अर्थात् तो एका दृष्टीनें क्षत्रियच बनत आहे. अशा या नव्या क्षत्रिय वर्गांतील लोकांना व पुढाऱ्यांना उपयुक्त होईल म्हणून येथें थोडेसें क्षत्रिय-धर्माचें संकलन करीत आहें.

आपस्तंबापासून विष्णुसूत्रकारापर्यंत साधारणतः पुढील गोष्टींत सर्वांची एकवाक्यता आहे. राजानें माणसें परीक्षून त्यांची योग्य ठिकाणीं योजना करावी. धर्मनिष्ठांना धर्मकार्यांत गुंतवावें, शूरांना संग्रामावर पाठवावें, कलावंतांना कला सांगाव्या व त्यांचा संबंध यावा म्हणून प्रत्येक महिन्यांतून एक दिवस त्यांना आपलें काम वेठीनें करण्यास बोलवावें. खोटें बोलणाऱ्या साक्षीदाराचें सर्वस्व हरण करावें, लढाईला गेल्यावर परतूं नये. लढाईंत सेनापती भीतीनें पळाल्यास अपकीर्ति होते व सर्व सैनिक गर्भगळित होतात. विचार करून पाऊल पुढें टाकावें पण टाकल्यानंतर मागें घेणें बरें नव्हे. राजकारण उघडें नसावें, कार्य झाल्यावरच तें उघडकीस यावें. धर्म, व्यवहार, छल, बल, साम, दान या सर्व उपायांनीं धन मिळवावें.

प्रजेला फार पीडलें तर प्रजेचा असंतोषाग्नि भडकतो व तो राजाला, त्याच्या कुलाला व त्याच्या लक्ष्मीला दग्ध केल्यावांचून राहात नाहीं. ज्या देशांत जो आचार असेल तोच पाळावा. त्या विरुद्ध वागल्यास लोकांचा क्षोभ होऊन कार्य साधत नाहीं. केव्हांहि तुटेल तेवढें ताणूं नये. न तुटतां जमेल असें करावें. ब्रह्मरंध्राचा भेद करून मोक्षाला जाणारा संन्यासी व धीरोदात्त वृत्तीनें लढत मरणारा वीर हे दोघे सारखेच होत. एखाद्या ध्येयाकरितां सारखे लढत राहाणें हाच पुरुषार्थ होय. क्षत्रियानें शस्त्रधारण करून मोठ्या दराऱ्यानें प्रजेचें रक्षण करावें आणि परसैन्यें धुळीस मिळवून पृथ्वीचें धर्मानें पालन करावें. लक्ष्मी ही कुलपरंपरेनें किंवा कपाळावरील रेषेमुळें येत नाहीं. तर ती तलवार गाजवून व मिळवूनच तिचा उपभोग घेता येतो. अर्थात् वसुंधरा ही वीरभोग्या आहे. शत्रूंनीं वेढलेला वीर ज्या ठिकाणीं मरतो तो जर शरणागतीची भाषा न बोलेल तर अक्षय्य लोकाला जातो. लढतांना मरण आल्यास देवांगना माळ घालतात आणि जिवंत राहिल्यास विजयश्री मिळते. क्षणामध्यें नष्ट होणारें हें शरीर

असतांना रणामध्यें मरण्याची एवढी चिंता कां वाटावी ? शूर लढत लढत मरूं लागला कीं वीरांगना, देवकन्या, नागकन्या, इत्यादि हा भर्ता मला मिळो, म्हणून धांवत येत असतात. ज्याच्या ललाट देशांतून रक्त वहात वहात तें तोंडांत जातें अशा त्या वीराचें रणयज्ञांतील रक्तप्राशन म्हणजे यज्ञांतील सोमपानच होय ( पराशर ). पण स्वतःच्या जखमेचें रक्त तोंडांत जाण्यापेक्षां शत्रूच्या नरडीचें रक्त म्हणजे अमृतपान होय, असें भीमकृत दुःशासनवधावरून वाटतें.

श्रीशंकराचार्य व धर्मनिर्णयः—श्रीमत् आद्य शंकराचार्य यांच्या दिग्विजयापासून मठसंस्थेला प्रारंभ झाला. पुढें पुढें धर्मशास्त्राच्या बाबतींत निग्रहाचें व अनुग्रहाचें काम या संस्थेनें आपणाकडे घेतलें. वास्तविक धर्माधर्म विचिकित्सेचें व धर्मनिर्णय देण्याचें काम हें विद्वान् ब्राह्मणांचें आहे. पूर्वी ठिकठिकाणच्या ब्रह्मवृंद-सभा ते करीत असत. कोणत्याहि स्मृतिग्रंथांमध्यें धर्माधर्माचा निर्णय शंकराचार्यांनीं द्यावा असें म्हटलेलें नाहीं. त्या त्या वेळेला जे शिष्ट ब्राह्मण असतील त्यांनींच हा निर्णय द्यावा असें धर्मशास्त्र सांगतें. ब्राह्मणाकडील हा अधिकार शंकराचार्यांनीं पुढें बळकावला, हें गिजरे घराण्यांतील जो पत्रव्यवहार धुळ्याचे श्री. भट यांनीं प्रकाशित केला आहे त्यावरूनहि दिसून येतें. विद्वत्ता व इतर कांहीं गुण यामुळें शंकराचार्यांना महत्त्व आलें व त्यांनीं निग्रहानुग्रहाचे अधिकार बळकावले. शंकराचार्यांनीं आपापल्या द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि मतांचा प्रचार करावा, हेंच त्यांचें कर्तव्य होय. भविष्य कालांत हेंच त्यांनीं करावें. धर्माधर्मातील चिकित्सा ही ब्रह्मवृंदांनीं, पंडितांनीं आणि कोणत्याहि विद्वानांनीं करावी. यापुढें या क्षेत्रांत शंकराचार्य संस्थेचें महत्व राहाणार नाहीं व तसें होणेंच इष्ट आहे.

धर्मशास्त्र व वैद्यकः—रूढीचा प्रभाव असा आहे कीं ज्याला धर्मशास्त्रानें अति निंद्य ठरविलें, त्याला ती वंद्य ठरविते. वैदिक, शास्त्री, याज्ञिक, हा वर्ग जुन्या विद्येचें अध्ययन करणारा म्हणून तो पूज्य समजला जातो व तें धर्मशास्त्रसंमत आहे. हल्लीं वैदिक, पुराणिक, याज्ञिक याच पूज्य वर्गामध्यें वैद्यवर्गाला गणण्याची पद्धत आहे, ती धर्मशास्त्रविरुद्ध आहे. धर्मशास्त्रानें जवळजवळ चंडाळाप्रमाणेंच या वैद्यांची निंदा केलेली आहे. औशनसस्मृतीमध्यें ब्राह्मण-पुरुष व क्षत्रिय-कन्या यांच्यापासून चौर्यकर्मानें भिषक् उत्पन्न होतो असें

म्हटलें आहे. बौधायनानें 'भैषज करणम्' हें उपपातकामध्यें गणिलेलें आहे. सर्व स्मृतिकारांनीं वैद्य व चिकित्सक हा अभोज्यान्न ठरविलेला आहे. चिकित्सकाचे घरीं जेवूं नये, त्याचा तो धंदा करूं नये, असे जवळ जवळ तीव्र निषेध या चिकित्सकवर्गाविषयीं असतांना ठिकठिकाणचे वैद्य, चिकित्सक, आयुर्वेदाचार्य हे आज धर्ममार्तंड म्हणून मिरवीत आहेत व लोक त्यांना धर्मनिष्ठ समजतात हें महदाश्चर्य होय! ज्या धर्मशास्त्रांत या वैद्य व चिकित्सक वर्गाची इतकी निंदा केली आहे त्यांचा वर्णाश्रमाभिमानी म्हणून लोकांनीं उदोउदो करावा हा दैवदुर्विलासच होय!

देवालय प्रवेश व पुराणें:—स्नात्वा प्रभातकाले च शमीदूर्वादलं तथा। गृह्यविघ्नेशपूजार्थं जग्मतुः स्नेहभावतः॥ अंत्यजेन स्वकीया च प्रदत्ता ब्राह्मणाय वै। पूजा दूर्वादिसंयुक्ता गणेशाय स्वधर्मतः॥ ब्राह्मणो गणराजं तं पूजयामास भावतः। ततोऽसौ जनसंघातैर्जग्मतुर्देवसत्तमाः। गर्भागारद्वारयात्रां चक्रतुः परमादरात्॥ महाराष्ट्रेऽन्त्यजः कश्चित् शुश्राव श्राणस्य च। माहात्म्यं गणराजस्य भक्त्याश्रितं द्विजात्पुरा॥ तत्र चित्तं समानीय गणराजपरोऽभवत्। आगते श्रावणेमासे स्नात्वा देवालये स्थितं॥ ननामनियमेनैव नित्यं भक्तिसमान्वितः॥

मुद्गल पुराण, खंड ६१, अ. १२श्लोक १ ते ४

एका प्रसंगीं ब्राह्मण व अंत्यज हे दोघे सकाळीं स्नान करून शमी व दूर्वा घेऊन गणपती पूजेकरितां देवळाकडे गेले. अंत्यजानें आपलीं पूजाद्रव्यें ब्राह्मणाजवळ दिलीं व त्यानें तीं गणपतीला वाहिलीं. नंतर त्या दोघांनीं सर्व जनासमवेत उत्सवमूर्तीची मिरवणूक काढून ती मूर्ती गाभाऱ्याच्या द्वारापर्यंत नेऊन पोचविली. महाराष्ट्रांतील एका अंत्यजानें गणपती महात्म्य ऐकलें व तो गणपतीभक्त बनला. श्रावण मासामध्यें तो गणपतीचें दर्शन नियमानें घेत असे. असल्या गोष्टी स्कंद व पद्मपुराणामध्येंहि आहेत.

विष्णवालय समीपस्थान् विष्णुसेवार्थमागतान्।
चाण्डालान् पतितान्वापि न स्पृष्ट्वा स्नानमाचरेत्॥
उत्सवे वासुदेवस्य स्नायाद्योऽशुचिशंकया।
तादृशं कल्मषं दृष्ट्वा सवासाजलमाविशेत्॥

वरील श्लोक हे निबंध-ग्रंथांत आलेले आहेत. विष्णूच्या देवालयामध्यें विष्णुपूजेकरितां आलेले चंडाल व पतित, यांचा स्पर्श झाल्यास स्नान करूं नये. वासुदेवाच्या उत्सवांत शिवाशिवीच्या कल्पनेनें जो स्नान करील त्याचें तें स्नान करण्याचें पातक पाहून सचैल जलप्रवेश करावा.

**म्लेंच्छाचा संपर्क:**—सभायां स्पर्शने चैव म्लेच्छेन सह संविशेत् ।
कुर्यात्स्नानं सचैलं तु दिनमेकमभोजनम् ॥

सभेमध्यें म्लेंच्छाशेजारीं बसल्यास सचैल स्नान करावें व एक दिवस उपवास करावा, असें देवल म्हणतो. आपस्तंबानें म्लेंच्छाचा उल्लेख केलेला नाहीं. गौतम-न म्लेच्छाशुच्यधार्मिकैः सह संभाषेत । अ. ९ ॥ म्हणजे म्लेंच्छ व इतर अशुची व अधार्मिकाशीं बोलूं नये असें म्हणतो. बौधायनाच्या नांवावर एक वचन दिलें जातें पण तें आनंदाश्रम प्रतींत नाहीं. तें वचन असें :—

गोमांसखादको यस्तु विरुद्धं बहु भाषते ।
सर्वाचारविहीनश्च म्लेंच्छ इत्यभिधीयते ॥

वसिष्ठ म्हणतो कीं, 'न म्लेच्छभाषां शिक्षेत्' ॥ अ. ६ ॥ म्लेंच्छांची भाषा शिकूं नये हा निषेध वसिष्ठकालीं आला म्हणजे कालानुक्रमानें प्रथम म्लेंच्छदर्शन त्याज्य होतें, पुढें त्याशीं संभाषण त्याज्य ठरलें. परिचय अधिक झाल्यामुळें भाषा शिकण्याचा प्रसंग वसिष्ठसूत्रकालीं आला व पुढें ते राज्यकर्ते झाल्यामुळें मांडीला मांडी लावून बसावयाचा व्यवहार सुरु झाला. एवढें खरें कीं प्रथमपासून अखेरपर्यंत म्लेंच्छाचा निषेध स्मृतीमध्यें आहे आणि व्यवहार क्रमानें जसा पाहिजे तसा होत आहे. म्लेंच्छ व यवन हे दोन्ही शब्द आज समानार्थी समजले जातात. पण यवनाचा उल्लेख एका गौतमाशिवाय कोणत्याहि स्मृतिकारानें केलेला नाहीं. 'न नीचो यवनात्परः' 'न वदेत् यावनीं भाषाम्' हे वाक्प्रचार अलीकडील आहेत. गौतमानें क्षत्रियशूद्रापुत्राला यवन म्हटलें आहे.

**पंचमहापातकें:**—गुरुस्त्रीगमन, सुरापान, भ्रूणहत्या, सुवर्णापहार हीं कर्मे करणारे व त्यांचा संसर्ग हीं पंचमहापातकें होत. आज सुद्धां व्यभिचार, मद्यपान, खून व चोरी हीं पातकेंच आहेत. या पातकांना राजानेंच शिक्षा सांगितलेली आहे. आजच्या कायद्यानें या गोष्टी जशा निंद्य ठरविल्या आहेत, तशा समाजानेंहि ह्या गोष्टी निंद्यच ठरविल्या आहेत! स्वस्त्रीवांचून इतर स्त्रीचा

संबंध हें पातकच होय. तीच गोष्ट परद्रव्यापहाराची व परप्राणापहाराची आहे. हा धर्म शाश्वतच आहे. पूर्वींचीं उपपातकें मात्र आज त्या कक्षेंतून बाहेर जात आहेत. नाटकें लिहिणें, औषधें विकणें, वैद्य व डॉक्टर होणें, तीळ तांदूळ वस्त्र व लोकर इत्यादि विकणें, डेयऱ्या काढणें, यांना उपपातकें म्हणण्याचे दिवस गेले. एका काळीं कांहीं ठराविक पद्धतीची समाजाची घडी होती, त्या वेळेला जीं कर्में योग्य होतीं तीं सर्व आतां बदललीं आहेत, म्हणून स्वकर्मत्यागाच्या पातकाचा व तदनुषंगिक उपपातकाचाहि विचार संपलेला आहे. संसर्गदोषहि तितकासा पापजनक नाहीं. तथापि कोणताहि बरावाईट सहवास हा मनावर परिणाम करतो व कृतीवरहि त्याचे संस्कार होतात, हें नाकारण्यांत शहाणपण नाहीं.

पतित-परामर्शः—ज्याला शिक्षण नाहीं, विद्या नाहीं, उपनयन नाहीं, तो पतित हें काय सांगावयास पाहिजे ? आपस्तंबादि सूत्रकारांनीं उपनीताचा विषय सांगितल्यावर लगेच, अनुपनीत जे पतित त्यांचाहि विषय चर्चेला घेतला आहे. उपनयन व पुढील संस्कार न झालेले जे पतित असतील त्यांना योग्य प्रायश्चित्त देऊन उपनयन करून त्यांचें परावर्तन करावें, असें सूत्रकारांचें मत आहे. पतिताला अधिक पतित होऊं न देतां त्याला वर घेण्याचें धोरण सूत्रकारांचें असे; तर पुढील कांहीं स्मृतिकारांचें धोरण अशांना दूर लोटण्याचें आहे. पहिली दृष्टी संग्राहकतेची व पतितोद्धाराची होती पण पुढील दृष्टी विग्रहाची व हीनत्व स्थापण्याची झाली.

पातित्य हें संस्कारहीनत्वामुळें, स्वकर्मत्यागामुळें व अविहित कर्मामुळें येत असतें. हें सर्व पातित्य नष्ट करण्यास व्रात्यस्तोमविधि किंवा अश्वमेधावभृत हीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. व्रतहीनता म्हणजे व्रात्य. हा व्रात्यपणा ज्या ज्या कारणांनीं येतो तीं सर्व कारणें एकदम नष्ट होणें शक्य नाहीं म्हणून प्रथम व्रात्यस्तोमविधि करून पतितांचें सावित्रीपातित्य नष्ट करावें. विद्येकडे व संस्कार बदलण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली म्हणजे हीन आचरणाचा तिटकारा येतो. स्वतः वर राहून खालच्याला वर आणणें हें वैदिक संस्कृतीचें ध्येय आहे. वरच्याला खालीं ढकलणें व आपण खालीं जाणे हें वैदिक संस्कृतीविरुद्ध आहे.

कलिवर्ज्यः—कलिवर्ज्याचा एक मोठा बाऊ सनातनी दाखवीत असतात. पण तें कलिवर्ज्य प्रकरण श्रुतिस्मृतीमध्यें आहे काय ? श्रुतिस्मृतींतील धर्म जर

आदित्यपुराण रद्द करूं लागलें तर प्रीव्हीकौन्सिलचा ठराव तालुकाकोर्टहि रद्द ठरवील !

अग्निहोत्रं गवालंभं संन्यासं पल-पैत्रिकम् ।
देवराच्च सुतोत्पत्तिः कलौ पंच विवर्जयेत् ॥ आ. पु.

कलियुगांत अग्निहोत्र, अतिथीकरितां गाय मारणें, संन्यास, मांसान्नानें पितरांना तृप्त करणें व दिरापासून पुत्र उत्पन्न करून घेणें या गोष्टी वर्ज्य समजाव्या, असें आदित्यपुराण म्हणतें. पण मीमांसकांनीं बंड करून अग्निहोत्र सुरुं केलें. शंकराचार्यांनीं बंड करून संन्यास रूढ केला. बंड न करतांच पंचगौड ब्राह्मणामध्यें मांसाहार चालू आहे आणि नियोग नसला तरी पुनर्विवाह हा हिंदुसमाजांत आतां रूढ होऊं लागलेला आहे.

पंचगौडांना आदित्य पुराणाचें भय मुळींच नाहीं. तसेंच संन्यासी व अग्निहोत्री यांनांहि तें नाहीं. अर्थात् नियोगस्थानीं पुनर्विवाह रूढ करणाऱ्यांनांहि कलिवर्ज्याचें भय बाळगावयास नको. कलिवर्ज्याविरुद्ध बंड करून संन्यास व अग्निहोत्र यांचा पुरस्कार करणारे जसे आज पूज्य ठरतात, तसेच इतरहि पूज्य ठरतील. तात्पर्य कलिकल्पनाच अशास्त्रीय व युक्तीला न पटणारी, मग त्या कल्पनेवर बसविलेल्या कलिवर्ज्याची किंमत ती काय ?

आतां ग्रंथाचा शेवट आला. पूर्वार्धाचें सिंहावलोकन नवव्या प्रकरणांत केलें आहे. उत्तरार्धाचेंहि तेथें दिग्दर्शन केल्याप्रमाणें शेवटच्या प्रकरणापर्यंत विवेचन केलें. उत्तरार्धांतील सगळे विषय फारच जिव्हाळ्याचे व महत्वाचे आहेत. शेवटीं धर्मशास्त्राचें अध्ययन करून जें आमचें मत बनलें, तें वाचकापुढें ठेवून हा ग्रंथ पुरा करतों.

संस्कृतिप्रसार–संस्कृतीचा प्रसार बरा कीं संस्कृतीचा संकोच बरा असें विचारल्यास संस्कृतीप्रसारच बरा असें कोणीहि सुज्ञ सांगेल. विद्या ही दुसऱ्याला दिल्यानेंच वाढते. मुलगी घरीं ठेवण्यापेक्षां तिचा विवाह केल्यावरच वंश–विस्तार होतो. पैसा व्यवहारांत व व्यापारांत वापरतां येत असला म्हणजेच वाढतो. पैसा पुरून ठेवून व्याज येत नसतें. ग्रंथहि वाचून व विवंचूनच सार्थकी लागतात. तसेंच संस्कृतीचें आहे. गेल्या कांहीं शतकांत संस्कृतीचा संकोच झालेला आहे. ती परंपरा बंद करून यापुढें विस्तार परंपरा वाढविली पाहिजे. बौद्ध–क्रांतीनंतर

संस्कृतिसंकोचाची लाट उसळली. त्यापूर्वी संस्कृतीचा विस्तारच होता. बौद्ध क्रांति ही भयंकर सामाजिक क्रांति होती. म्हणून संकोच परंपरा उद्भवली, पुढें मुसलमानांच्या स्वाऱ्यावर स्वाऱ्या होऊं लागल्यानंतर त्या तडाख्यांतून वर येतां येतां पुरें झालें. मराठे, रजपूत आणि शीख यांनी इस्लाम विरुद्ध थोडें डोकें वर उचललें परंतु त्याच वेळेला पाश्चात्य संस्कृतीनें आर्यसंस्कृतीला पादाक्रांत केलें. पहिलीं कांहीं वर्षे त्या संस्कृतीचा परिचय करून घेण्यांत गेलीं व आतां आपलें चांगलें काय आहे व जगांत चांगलें काय आहे हें समजूं लागल्यामुळें आर्य संस्कृतींतील जें जें कांही चांगलें आहे तें सर्व जगाला ( हिंदुसमाजालाच नव्हे ) देण्याची सुसंधी प्राप्त झाली आहे असें आम्हास वाटतें.

औपनिषद् तत्वज्ञान, गीतेंतील कर्मयोग, विद्यादानाची परंपरा, आदरातिथ्य, तीन ऋणांचें अपाकरण, एक-पत्निव्रत, पातिव्रत्य, बीज-शुद्धि, क्षेत्रशुद्धि, अन्तःशुद्धि, पावित्र्य, अन्नशुद्धता, ईश्वरनिष्ठा, भक्ति, त्याग, शुद्धाचार, दया, शील, तप इत्यादि आर्यसंस्कृतीतील सर्व तत्वांचा अधिकार मनुष्यमात्राला आहे असे समजून त्याचा प्रसार केला पाहिजे व असें करणें हें वैदिक आर्यांच्या उद्देशाला अनुसरूनच आहे.

सर्व हिंदु समाजांत एका संस्कृतीचा, एका ध्येयाचा, एका आचारविचाराचा, एका पूज्य विषयाचा व एकाच द्वेष्य विषयाचाहि प्रसार झाला पाहिजे. सर्वांची संस्कृति समान झाली म्हणजेच सर्वांची स्फूर्ति, विचार, हृदयें, भावना व ध्येयें हीं एक बनतात. समाजांत जितकी एकरूपता येईल, तितकी समता नांदेल व सर्व भूतांच्या ठिकाणीं समदृष्टि ठेवण्याला ती एकरूपता उपयोगी पडेल. ईश्वर करो आणि सर्व हिंदुसमाजांत एक संस्कृति, एक भावना, एक रूपता आणि एक ध्येय हीं उत्पन्न होवोत असे वेद-मंत्रांनीं घोषित करून हा ग्रंथ पुरा करतों.

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समान मस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥
यथा वः सुसहासति ॥

* समाप्त *